

साहित्य आणि संस्कृती मंडळ
महाराष्ट्र राज्य
हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम
लेखक : शंकरभाई पटेल
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई

## अनुक्रमणिका

# हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम

(काही आठवणी)

*शंकरभाई पटेल*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
१९९३

अनुक्रमणिका

- **दुसरी आवृत्ती :** १९९३

- **प्रकाशक**
  सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  मुंबई-१

- © **प्रकाशकाधीन**

- **मुद्रक**
  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय, वाई (सातारा)

- **सजावट**
  कला विभाग, शासन मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय,
  मुंबई - ४०० ००४.

- **किंमत** रुपये १२५/-

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

प्रस्तावना ........ ५

अध्यक्षांचे निवेदन ........ ७

आशीर्वाद : डॉ. रत्नाप्पा कुंभार ........ ८

अर्पण ........ १५

कै. श्री. शंकरभाई पटेल ........ १६

निझामी राजवट ........ १७

महाराष्ट्र परिषद ........ ३३

१९३८ चा सत्याग्रह ........ ४१

वैयक्तिक सत्याग्रह ........ ५९

१९४७ चा सत्याग्रह ........ ६३

कारागृहातून पलायन ........ ७८

रझाकार व सरंजामी राजवट ........ ९२

सशस्त्र लढा ........ १०५

निझामी हद्दीतील लढ्याची काही केन्द्रे ........ १३६

शस्त्रासाठी कारागृह ........ १५०

रझाकारांचे अत्याचार आणि पोलीस कारवाई ........ १६४

# *प्रस्तावना*

हैदराबादचा स्वातंत्र्य लढा हा आमच्या भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे पान. निझाम आणि इत्तिहाद्उल् मुस्लिमीन यांच्या रझाकारी शोषणापासून आणि अत्याचारांपासून ज्यांनी हैदराबादला मुक्त करण्याकरिता अटीतटीचे प्रयत्न केले त्या स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, काशीनाथराव वैद्य, केशवराव कोरटकर, के. व्ही. नरसिंहराव, अच्युतभाई देशपांडे, रघुनाथराव रांजणीकर, सीताराम पप्पू, विजयेंद्र काबरा या मंडळींच्याबरोबर 'हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम'या ग्रथांचे लेखक शंकरभाई पटेल यांनी काम केले आहे. जेव्हा एखादा प्रसिद्ध इतिहास लिहिला जातो तेव्हा त्यात काही खरे, काही खोटे येऊ शकते. अशा वेळी भिन्न मताच्या लोकांनी मांडलेला इतिहास जपून ठेवणेही आवश्यक असते. हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्रामावर वसंत पोतदार यांनीही ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात अनेक चुका आहेत असे शंकरभाई पटेल यांचे म्हणणे. हीच गोष्ट अच्युत खोडवे यांना पण जाणवली. माझे मित्र अनंतराव भालेराव यांनी याच लढ्यावर 'पेटलेले दिवस' नावाचे पुस्तक लिहिले. उमरी बँक लुटण्याची घटना आणि नांदेडमधील चाउस इत्यादींच्या संबंधातल्या असलेल्या घटनांचा त्यांनी उल्लेख केला. आमचे दुसरे मित्र रघुनाथराव रांजणीकर यांना अनंतराव यांच्या कथनात काही त्रुटी जाणवल्या. वस्तुस्थिती अशी असते की, एखाद्या प्रदेशाचा इतिहास जेव्हा लिहिला जातो तेव्हा निरनिराळे इतिहासकार आणि त्या घटनेचे साक्षीदार यांनासुद्धा त्या इतिहासाचे सगळेच पापुद्रे माहीत नसतात आणि त्यांना त्यामुळे या घटनांत वेगवेगळा अर्थ जाणवतो. अशा वेळी ज्यांना जे सांगावयाचे आहे त्यांचे एकदा सांगून होणे महत्त्वाचे ठरते. कारण इतिहास म्हणून जे सांगितले जाते ते इतिहासाचे साधनमात्र असते. त्यामुळे जे जे हैदराबादवर इतिहास लिहिले गेले ते केवळ स्वकपोलकल्पित असले तरी ते प्रसिद्ध केले पाहिजेत असे मला वाटते.

यादृष्टीने अनंतराव भालेराव, वसंत पोतदार यांचे ग्रंथ महत्त्वाचे आहेतच. तसेच शंकरभाई पटेल यांच्या ग्रंथालाही ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्व आहे. उद्या श्री. सीताराम पप्पू किंवा दामोदर पांगरेकर किंवा के. व्ही. नरसिंहराव आदी लोक हैदराबाद स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास लिहितील तेव्हा त्यालाही एक महत्त्व राहणार आहे. शंकरभाई पटेल हे एक मोठे कार्यकर्ते. त्यांचा अनुभव फार मोलाचा. शंकरभाई यांचे वय आता बरेच झाले आहे. त्यांनी यावेळी हा ग्रंथ लिहून पुढील पिढीवर मोठे उपकार करून ठेवले आहेत. आपला अनुभव पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हेही एक मोठे समाजकार्यच असते. ते शंकरभाई पटेल यांनी पुरे केले आहे. आपले लेखन हे आपल्या अपत्यासारखे असते. आपले मूल वेळीच घरी परतले नाही तर आईच्या मनात हुरहूर लागते. या पुस्तकास विलंब लागत आहे असे पाहून शंकरभाईंनाही हुरहूर लागणे स्वाभाविक आहे. पण लेखनानंतरच्या प्रक्रियेला बराच कालावधी लागत असतो. शंकरभाई पटेल यांच्या ग्रंथ-प्रकाशनास विलंब लागला, त्यास साहित्य आणि संस्कृती मंडळाचा नाईलाज होता. हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यात मंडळाकडून कोणतीही कुचराई झाली नाही असे मी शंकरभाई पटेल यांना आश्वासन देतो. हा ग्रंथ प्रसिद्ध करताना मंडळास आनंद होत आहे हे सांगणे नकोच.

**अनुक्रमणिका**

**सुरेन्द्र बारलिंगे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

४२, यशोधन,
दिनशा वाच्छा रोड,
मुंबई - ४०० ०२०
२ ऑक्टोबर १९८६

## अनुक्रमणिका

# *अध्यक्षांचे निवेदन*

श्री. शंकरभाई पटेल यांनी लिहिलेले “हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम” हे पुस्तक ऑक्टोबर १९८६ मध्ये मंडळातर्फे प्रकाशित करण्यात आले होते. या पुस्तकात असंख्य मुद्रणदोष असल्याचे आणि त्याच्या मुखपृष्ठाची छपाई गचाळ असल्याचे आढळले. रणजित प्रकाशन, कोल्हापूर या संस्थेने या पुस्तकाचे मुद्रण मंडळाचे तेव्हाचे सदस्य डॉ. एस. एस. भोसले यांच्या निरीक्षणाखाली करावे असे ठरले होते. प्रकाशित पुस्तकाचे मुद्रण अत्यंत असमाधानकारक झाले असल्याचे प्रकाशन समारंभ पार पडल्यानंतर लक्षात आले. त्यामुळे मूळ पुस्तकाचे वितरण करण्याऐवजी लेखक श्री. शंकरभाई पटेल यांच्या संमतीने सुधारित मुद्रणप्रत मागवून ती छापण्याचा तेव्हाच्या मंडळाने निर्णय घेतला.

दुर्दैवाने मूळ पुस्तकाचे लेखक श्री. शंकरभाई पटेल यांचे निधन झाल्यामुळे हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे ज्येष्ठ सेनानी श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्याबरोबर विचारविनिमय करून प्रा. भगवंतराव देशमुख यांनी सुधारित मुद्रणप्रत मंडळाच्या स्वाधीन केली. ती माहितीच्या दृष्टिने शक्य तितकी निर्दोष व्हावी यासाठी श्री. गोविंदभाई श्रॉफ आणि प्रा. भगवंतराव देशमुख यांनी अपार परिश्रम घेतले. तसेच या दोघांनी या पुस्तकाची मुद्रितेही काळजीपूर्वक तपासून दिली. त्यासाठी कोणतेही मानधन न घेता त्यांनी मंडळास मदत केली याबद्दल मंडळ त्यांचे सदैव ऋणी राहील.

श्री. शंकरभाई पटेल आज हा ग्रंथ प्रकाशित होत असताना हयात नाहीत याबद्दल हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामातील त्यांच्या सहकाऱ्यांप्रमाणेच मंडळाच्या सदस्यांनाही अत्यंत दुःख होत आहे. शंकरभाईंच्या या आठवणी म्हणजे हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचा समग्र विश्वसनीय इतिहास आहे असे समजण्याचे कारण नाही. या लढ्यातील ज्या घटनांशी शंकरभाईंचा प्रत्यक्ष संबंध आला त्यांच्याबद्दल तपशीलवार साक्ष देण्यावर शंकरभाईंचा जास्त भर आहे. ते स्वतः या लढ्यात सहभागी झालेले असल्यामुळे विशेषतः औरंगाबाद जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांनी विस्ताराने लिहिणे साहजिक होते. स्वातंत्र्यलढ्याविषयी कुतूहल असलेल्या सर्वसामान्य वाचकाला त्याचप्रमाणे इतिहासाच्या अभ्यासकांना एक महत्त्वाचे साधन म्हणून हा ग्रंथ उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

**य. दि. फडके**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
३० एप्रिल १९९३

[अनुक्रमणिका]

# *आशीर्वाद : डॉ. रत्नाप्पा कुंभार*

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. त्याचवेळी भारत देशाची फाळणी झाली. स्वतंत्र भारताबरोबर स्वतंत्र पाकिस्तानचीही निर्मिती झाली. त्याच वेळेला ब्रिटिश सरकारने भारतातील ५६३ संस्थानांना स्वातंत्र्य जाहीर केले. स्वतंत्र झालेल्या भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याला धोका निर्माण झाला. १९४८ साली ही संस्थाने भारतात विलीन झाली. सर्वंकष स्वातंत्र्याला निर्माण झालेला धोका टळला. पण हैदराबाद संस्थान हे तसेच राहिले. त्यानंतर १९४८ साली केंद्र शासनाने पोलिस ॲक्शन घेतली. हैदराबाद संस्थानाची तीन राज्यांत विभागणी झाली. पण पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या गोवा-दीव-दमण या लहानशा प्रदेशाचा स्वतंत्र भारताच्या भूमीवर काळा डाग शिल्लक राहिला होता तोही केंद्र शासनाच्या कारवाईने नंतर पुसला गेला आणि संपूर्ण भारत स्वतंत्र झाला. मात्र स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानने काश्मीरचा लचका तोडला आणि आजपर्यंत तो प्रश्न गंभीर होऊन राहिलेला आहे. काश्मीरचा पाकिस्तानव्याप्त भाग सोडला तर भारताचे राजकीय स्वातंत्र्य पूर्णांशाने परिपूर्ण झालेले आहे. भारतीय स्वातंत्र्याची जी क्रांतिकारक चळवळ झाली ती चळवळ अभिनव पद्धतीची, मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासातील नवा आदर्श घालून देणारी अशीच होती. या क्रांतिकारक स्वातंत्र्य चळवळीच्या अखेरच्या पर्वात ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टॅन्क मैदानावर महात्मा गांधीजींनी आपल्या भारतीय बांधवांना ‘करेंगे या मरेंगे’ हा महान संदेश दिला आणि ब्रिटिशांना ‘छोडो भारत’ असा आदेश दिला. त्यामुळे सारी भारतीय जनता पेटून उठली. असंतोषाचा भडका, अन्याय्य व परकीय सत्तेचा जुलूम आणि दडपशाही पराकोटीला पोचल्याने असहकार आंदोलन सुरू करून भारतीय क्रांतिकारकांनी जवळजवळ एक पिढीच स्वातंत्र्ययज्ञात झोकून दिली. एका मागून एक अशी आत्मबलिदानाची मालिकाच सुरू झाली. थोर देशभक्त व क्रांतिकारकांचा असीम त्याग पाहून देशनिष्ठा आणि देशभक्तीने सारे देशबांधव प्रेरित झाले. स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सारी जनता जात-पात, धर्म, प्रदेश, भाषा असा कोणताही भेदाभेद न मानता एकदिलाने स्वातंत्र्यासाठी झटली. अनेकांनी तुरुंगवास भोगला, ब्रिटिशांकडून लाठ्या खाल्ल्या, गोळ्या झेलल्या, अमानुष छळही सोसला आणि अनेक थोर सुपुत्रांनी हौतात्म्य पत्करले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीची पहिली ठिणगी पडली ती संस्थानिकांच्या १८५७ साली झालेल्या बंडाने. त्यानंतर काही क्रांतिकारकांनी त्या ठिणगीमध्ये स्वतःच्या क्रांतिकार्याने आणि त्यागाने, बलिदानाने चांगली भर घातली. १८८५ साली काँग्रेसचा जन्म झाला. काँग्रेसच्या झेंड्याखाली स्वातंत्र्य चळवळीला संघटितपणाचा आकार येऊ लागला. मवाळ, जहाल अशी वळणे घेत काँग्रेसच्या कार्याची ज्योत तेवत राहिली, प्रखर होत गेली. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच’ अशी दैदीप्यमान घोषणा करणारे आणि त्याप्रमाणे प्रेरणा देणारे लोकमान्य टिळक यांचे दुर्दैवाने १९२० साली निधन झाले पण त्याच सुमाराला ‘भारताचे राष्ट्रपिता’ म्हणून सार्थरीतीने गौरविले जात असलेले महात्मा गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले आणि काँग्रेसची पुढील चळवळ त्यांच्या नेतृत्वाखाली वाढत गेली, प्रखर होत गेली. सन १८८५ ते १९३० या ४५ वर्षांच्या कालावधीत चळवळीतून निर्माण झालेल्या सामर्थ्याचे पर्यवसान २६ जानेवारी १९३० साली रावी नदीच्या काठी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेस अधिवेशनात ‘स्वातंत्र्य मिळविण्याची प्रतिज्ञा’ करण्यामध्ये झाले आणि त्या प्रतिज्ञेची पूर्तता करण्याचा लढा अधिकाधिक प्रखर होत गेला. त्या प्रखर लढ्याचे सार्थ पर्यवसान १५ ऑगस्ट १९४७ रोजी म्हणजे १९३० पासून अवघ्या १७

अनुक्रमणिका

वर्षांत प्रत्यक्ष स्वातंत्र्य मिळविण्याची प्रतिज्ञा पुरी करण्यामध्ये झाले आणि राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचा भारतीय जनतेचा एक महत्त्वाचा टप्पा पुरा झाला.

परंतु नाइलाजाने भारताचे स्वातंत्र्य जाहीर करीत असताना ब्रिटिशांनी देशातील ५६३ संस्थानांतील राजेशाही अबाधित ठेवली आणि त्यामुळे देशाचे सर्वंकष स्वातंत्र्यप्राप्तीचे स्वप्न अपुरे राहण्याचा धोका निर्माण झाला. तो धोका दूर करण्यासाठी 'भारताचे पोलादी पुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थाने विलीन करण्याच्या चळवळीला, त्या वेळचे गृहमंत्री या नात्याने सुरूवात केली आणि संस्थाने विलीनीकरणाच्या चळवळीने भारताचे सर्वंकष आणि संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याच्या दुसऱ्या महत्त्वाच्या टप्प्याच्या कार्याला प्रारंभ झाला. १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्याप्रमाणे पहिल्या टप्प्यातील अभिनव चळवळ झाली, त्याचप्रमाणे संस्थानांच्या विलीनीकरणाची चळवळही अभिनव पद्धतीची होती. तितकीच ती कठीण होती. पण 'पोलादी पुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कुशल नेतृत्वाने आणि तितक्याच खंबीरपणाने संस्थाने विलीन करण्याची चळवळ प्रखर होत गेली. भारतातील अनेक लहान-मोठी संस्थाने विलीन होत गेली. काही संस्थानांची संघराज्ये स्थापन झाली. या वेळेला निरनिराळ्या संस्थांनातील जनतेने अपूर्व त्याग केला, प्रखर चळवळ केली आणि संस्थाने विलीन करण्याची चळवळ यशस्वी होत गेली. या संस्थाने विलीन करण्याच्या चळवळीमध्ये दक्षिण भारतातील १८ संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन करण्याची मोठी जबाबदारी सरदार वल्लभभाई पटेल यांनी माझ्यावर सोपविली आणि ती जबाबदारी अनेकांच्या सहकार्याने आणि दक्षिणी संस्थानांतील जागृत, करारी, पुरुषार्थी संस्थानी प्रजाजनांच्या तितक्याच प्रभावी चळवळीने, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली आम्ही यशस्वीरीत्या पार पाडू शकलो. त्याबद्दल त्यांनी १९४९ साली जयपूर काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये आम्हा सर्व सहकाऱ्यांचा आणि दक्षिणी संस्थानांतील जनतेचा गौरव केला, याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

हैदराबाद संस्थानातील संस्थानी प्रजापरिषदेची चळवळ हे एक संस्थानी चळवळीच्या इतिहासातील धगधगते पान आहे. छत्रपतींचे कोल्हापूर संस्थान आणि निजामाचे हैदराबाद संस्थान यांना फार मोठी ऐतिहासिक परंपरा होती. त्यामुळे या दोन्ही संस्थानांतील संस्थानी स्वातंत्र्य-चळवळीला आगळे-वेगळे स्वरूप प्राप्त झाले होते. या संस्थानी चळवळीमध्ये कोल्हापूरची आम्ही मंडळी आणि हैदराबाद संस्थानातील चळवळ करणारी मंडळी यांचा अनेक वेळा निकटचा संबंध आलेला होता. या दोन्ही संस्थानांतील मंडळींना एकमेकांपासून प्रेरणा मिळत होत्या, दिशा मिळत होत्या. कोल्हापूर संस्थान हे एका स्वरूपाने सोप्या पद्धतीने विलीन झाले. पण हैदराबाद संस्थान विलीन करताना तुलनेच्या दृष्टीने अधिक त्याग करावा लागला, कष्ट भोगावे लागले. पण शेवटी केंद्र शासन आणि हैदराबाद संस्थानातील पुरुषार्थी जनता यांच्या एकरूपतेच्या प्रयत्नांनी हैदराबाद संस्थान विलीन झाले आणि त्याची लगतच्या महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र या तीन राज्यांत विभागणी झाली. हैदराबाद संस्थानच्या विलीनीकरणामुळे भारतातील पोर्तुगीज लोकांच्या ताब्यात असलेला गोवा-दीव-दमण हा छोटासा प्रदेश सोडून भारत देश संपूर्णपणे स्वतंत्र झाला आणि पुढे काही थोड्या काळाने गोवा-दीव-दमण हा भागही भारतीय संघराज्यात विलीन करून घेण्यात आला. हैदराबाद संस्थानातील चळवळीचा इतिहास स्वतंत्रपणे माझे मित्र, थोर स्वातंत्र्य सेनानी श्री. शंकरभाई पटेल यांनी, ज्या ग्रंथासाठी मी ही प्रस्तावना लिहीत आहे त्या 'हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम' या ग्रंथात लिहिलेला आहे. या ग्रंथामध्ये हैदराबाद संस्थानातील चळवळीचे सर्वांगीण स्वरूप, त्या चळवळीची प्रखरता, त्या चळवळीतील

अनुक्रमणिका

लोकांनी केलेला त्याग आणि केंद्र शासनाने घेतलेली अभिनव पोलीस ॲक्शन यांसंबंधीची साग्र माहिती देण्यात आलेली आहे. सदर ग्रंथ वाचताना, त्यामधील घटना समजून घेताना अंगावर रोमांच उभे राहतील अशा, रोमांचकारी प्रसंगांचे दर्शन घडून येते. हैदराबाद संस्थानी चळवळीची अंगेउपांगे सविस्तरपणे सदर ग्रंथात दिलेली असल्यामुळे त्या बाबतीत या ठिकाणी मी अधिक विस्ताराने लिहिण्याची जरूरी नाही. ग्रंथकार, थोर स्वातंत्र्य सेनानी श्री. शंकरभाई पटेल यांनी हा ग्रंथ लिहून केवळ हैदराबाद संस्थानी चळवळीसंबंधीच नाही तर एकूण भारतीय संस्थांनांतील चळवळीचे योग्य दर्शन घडविले आहे हे येथे नमूद करताना मला अतिशय आनंद वाटतो आणि श्री. शंकरभाई पटेल यांच्यासंबंधी नितान्त धन्यता वाटते.

अशा रीतीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील खऱ्या अर्थाने दुसरा टप्पा पूर्ण झालेला आहे आणि भारताला संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळाले आहे. पण महात्मा गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे भारताचे स्वराज्य आणि स्वातंत्र्य त्याचवेळी पूर्ण होऊ शकेल की, ज्यावेळी भारतातील खालच्या स्तरामधील दैन्यावस्थेत असलेल्या सर्व माणसांच्या डोळ्यातील अश्रू पुसले जातील आणि या भूमितलावर जन्माला येणाऱ्या प्रत्येक माणसाला राजकीय स्वातंत्र्याच्या हक्काबरोबर जगण्याचा हक्कही मिळेल.१९४७ साली भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर १९५० साली मानवजातीला साजणारी, शोभणारी संपूर्ण लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक शासनव्यवस्था निर्माण झाली आणि त्या शासनव्यवस्थेच्या वतीने लोकांचे दारिद्य दूर करणे, अज्ञान दूर करणे, आर्थिक आणि सामाजिक न्याय त्यांना मिळवून देणे म्हणजेच खालच्या थरांतील सर्व लोकांसह सर्वांना स्वावलंबनाने, स्वाभिमानाने, इतमामाने, निर्भयतेने जगण्याचा मूलभूत हक्क प्राप्त करून देण्याच्या शुभ कार्याला प्रारंभ झाला आणि तेव्हापासून आजपर्यंत त्या कार्याची पूर्ती करण्याचे प्रयत्न चालू आहेत. पण अद्याप सर्वांना जगण्याचा हक्क प्राप्त करून देण्याचे कार्य अपुरे राहिले आहे. ते पूर्ण करण्याचे काम लवकरात लवकर होण्याची आवश्यकता आहे. पण हे काम तितके सोपे नाही. या कामाची पूर्तता करण्यासाठी राष्ट्रीय ऐक्याची, जातीय सलोख्याची, सामंजस्याची, सर्वसामान्य लोकहिताच्या कळकळीची आणि स्वातंत्र्य मिळविताना केलेल्या व प्रत्यक्ष अंमलात आणलेल्या 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराची मनोभूमिका, सामूहिक सामाजिक उत्थापनाच्या स्वरूपामध्ये निर्माण होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी एका महत्त्वपूर्ण गोष्टीचे चिंतन होण्याची गरज आहे. ब्रिटिशांनी, फ्रेंचांनी, पोर्तुगीजांनी, डचांनी आमचा भारत देश जिंकला, गुलामगिरीत लोटला ते काही या परक्या लोकांच्या सामर्थ्याच्या जोरावर नव्हे तर आमच्या भारत देशातील अंतर्गत असलेले जाती, धर्म, पंथ, भाषा, प्रदेश, वेष या रूपाने जे मतभेद होते, भांडणे होती; त्या अंतर्गत भांडणांचा, तंट्यांचा कुशलतेने उपयोग करून घेऊन इंग्रजांनी भारत देशाला गुलाम केले आणि त्याच 'फोडा आणि झोडा' या नीतीने भारत देश बराच काळ गुलामीत ठेवला. महात्मा गांधीजींनी आणि काँग्रेस नेत्यांनी अंतर्गत फुटीरतेचा धोका ओळखला. निरनिराळ्या चळवळींतून भारतीयांना एकीची, सहकार्याची व फुटीरतेच्या धोक्याची प्रभावीपणे जाण आणून दिली. जागृती केली आणि 'करेंगे या मरेंगे' या त्यागाच्या भूमिकेतून गुलामगिरी हटविण्यासाठी आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सामूहिक उत्थापनाची किमया केली. भारतीयांच्या हाती दीड इंचाचा चाकू नसतानाही, ब्रिटिश लोकांचे रक्त न सांडता स्वतःचे रक्त सांडून, परमोच्च त्याग करून ब्रिटिशांना भारत देश सोडून जाण्यास भाग पाडले. भारतीयांनी मिळविलेल्या या स्वातंत्र्याचे स्वरूप कुणालाही अभिमान वाटावा, गौरव वाटावा अशाच आगळ्यावेगळ्या स्वरूपाचे आहे.

अनुक्रमणिका

दिनांक १४ आणि १५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री १२-०० वाजता दिल्लीच्या तख्तावर घडलेली घटना एवढी रोमांचकारी आहे की तिचा उल्लेख अभिमानाने करावा. १४ ऑगस्ट १९४७ ला रात्री १२-०० वाजता दिल्लीच्या तक्तावर उभे राहून ब्रिटिशांचे शेवटचे व्हॉईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनी त्यांच्या स्वतःच्या हाताने त्या ठिकाणी फडकत असलेले, ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता अशा ब्रिटिश साम्राज्याचे 'युनियन जॅक' हे निशाण उतरवले आणि सर्व भारतीयांच्या त्यागाने, बलिदानाने, कष्टाने तयार झालेले आणि सर्व भारतीयांच्या अस्मिता ज्यामध्ये एकवटल्या आहेत ते भारताचे शांततेचे प्रतीक असलेले तिरंगी निशाण फडकावले आणि भारत देश स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले. अशा पद्धतीने जगातील कोणत्याही देशामध्ये स्वातंत्र्य मिळविण्याची घटना घडलेली नाही. अखिल मानवजातीमध्ये ही घटना अतिशय गौरवाची आणि आगळ्यावेगळ्या स्वरूपाची आहे.

भारतीय स्वातंत्र्य अशा रीतीने जाहीर होत असताना आणखी एक महत्त्वाची व मौलिक घटना घडलेली आहे. भारत देश स्वतंत्र झाला त्यावेळी १५ ऑगस्ट १९४७ रोजी नवी दिल्लीमध्ये आणि अखिल भारत देशात आनंदाचा उत्सव साजरा होत होता. ज्यांनी स्वातंत्र्य मिळवून दिले, देशाला नवी दिशा दाखविली आणि जे खऱ्या अर्थाने राष्ट्रपिता झाले त्या पूज्य महात्मा गांधीजींनी या स्वातंत्र्य-उत्सवात भाग घ्यावा अशी पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू 'पोलादी पुरुष' सरदार वल्लभभाई पटेल, उत्तुंग स्वरूपाचे व्यक्तिमत्व असलेले मौलाना अबुलकलाम आझाद आणि इतर नेते मंडळींनी महात्मा गांधीजींना आग्रहपूर्वक विनंती केली. पण महात्मा गांधीजींनी 'तुम्ही आनंदाने उत्सव साजरा करा. मी तेथे असणार नाही' असे सांगितले. भारतीयांचा नवी दिल्ली येथे आणि देशभर स्वातंत्र्य उत्सव साजरा होत होता; पण महात्मा गांधीजी त्यावेळी कुठे होते? ते नवी दिल्ली येथे स्वातंत्र्य उत्सवात नव्हते तर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बंगाल प्रांतात नौखाली विभागात ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात हिंदू-मुसलमानांचे दंगे उसळले होते, जातीय विद्वेषाने हिंदू-मुसलमानांच्या रक्ताचे पाट वाहत होते त्या ठिकाणी स्वतः ते दंगे थांबविण्यासाठी ते चिखलातून, काट्याकुट्यांतून हिंडत होते. महात्मा गांधीजींच्या या कृतीने भारतीयांना कोणता संदेश दिलेला आहे याचा आजही तितक्याच तीव्रतेने विचार करण्याची, चिंतन करण्याची आवश्यकता आहे. त्या कृतीने महात्मा गांधीजींनी हा संदेश दिला आहे की, "स्वातंत्र्य उत्सवातील भारतीयांचा आनंद कायम टिकावयाला पाहिजे असेल, स्वातंत्र्याची खरी अनुभूती सर्वसामान्य लोकांना आणून द्यावयाची असेल आणि भारतीय स्वातंत्र्य यावच्चंद्र दिवाकरो टिकवावयाचे असेल तर भारत देशामध्ये जाती-जातींची भांडणे परवडणार नाहीत. जातीय सलोखाच राखावा लागेल. राष्ट्रीय एकतेची जोपासना करावी लागेल आणि त्या एकतेच्या, सहकार्याच्या भूमिकेतून सर्वसामान्य लोकांची प्रतिष्ठा राखावी लागेल." किती दूरदृष्टीच्या कृतीने दिलेला महात्मा गांधीजींचा तो संदेश होता याची आठवण आम्ही सर्व भारतीयांनी तितक्याच मनोभावनेने आजही ठेवण्याची आवश्यकता आहे.

पण आज काय परिस्थिती आहे? हे सारे, सारे आम्ही भारतीय विसरून गेलो आहोत. समाजजीवनाला प्रेम, आदर, निष्ठा, सामंजस्य या पुरुषार्थी सद्‌गुणांची आवश्यकता असते. या सद्‌गुणांचे संवर्धन भारतीयांच्या सामूहिक जीवनामध्येमहात्मा गांधीजींनी एवढ्या चांगल्या रीतीने केले की, या सद्‌गुणांचा भारतीयांचा स्थायीभावच बनून राहिलेला होता. पण आज प्रेमाची जागा द्वेषाने घेतली आहे, जातीय सलोख्याची जागा जातीय भेदाने घेतली आहे. द्वेष, मत्सर यांना ऊत आलेला आहे, सचोटी आणि प्रामाणिकपणाची जागा भ्रष्टाचाराने घेतली आहे. भ्रष्टाचार हा स्थायीभाव बनतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

अनुक्रमणिका

स्वराज्यपूर्व कालामध्ये या ज्या फुटीरतेच्या भावना होत्या आणि ज्या फुटीरतेचा फायदा घेऊन ब्रिटिशांनी, परकीयांनी आमचे स्वातंत्र्य हिरावून घेतले, आम्हाला गुलाम बनविले आणि प्रदीर्घ कालपर्यंत भारताला गुलामगिरीत ठेवले त्याच साम्राज्यशाहीची मनोवृत्ती असलेल्या परकीय सत्ता आज भारतामध्ये निर्माण झालेल्या फुटीरतेच्या भावनेला फुंकर घालून भारत देश अस्थिर करण्याचा, भारत देश तोडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत आणि ते त्यामध्ये यशस्वी होतील की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याचे चिंतन तितक्याच जाणीवपूर्ण रीतीने होण्याची आवश्यकता आहे. हे चिंतन योग्य रीतीने व्हावयाचे झाल्यास आपला भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, त्याचे महत्त्व आणि त्याचे स्वरूप समजून घेण्याची आवश्यकता आहे. त्या भारतीय चळवळीच्या इतिहासातून स्फूर्ती घेऊन स्वातंत्र्य चळवळीत निर्माण झालेल्या 'करेंगे या मरेंगे' ही त्यागमय भूमिका उत्थापनाच्या स्वरूपात आज आपल्या देशात निर्माण होण्याची आवश्यकता आहे.

इतिहासाची पुनरावृत्ती होते असे म्हणतात. त्याबाबतची अतिशय मार्मिक अशी इतिहासाची पुनरावृत्ती १९८५ साली झालेली आहे. ज्याप्रमाणे १८८५ सालापासून १९३० सालापर्यंत म्हणजे ४५ वर्षांच्या कालामध्ये स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव वाढत गेल्याने १९३० साली स्वातंत्र्यप्राप्तीची प्रतिज्ञा करण्यात आली आणि तिची परिपूर्ती पुढील १७ वर्षांत म्हणजे १९४७ साली झाली; त्याचप्रमाणे १९४७ ते १९८५ या ३८ वर्षांच्या कालात सर्वसामान्य लोकांना जगण्याचा स्वतःच्या हक्काची जी जाण आली त्याचे योग्य पर्यवसान १९८५ साली मुंबई येथे संपन्न झालेल्या काँग्रेस जन्मशताब्दी अधिवेशनामध्ये भारतीय समाजातील गरीबी हटविण्याची अर्थात 'सर्वांना जगण्याचा हक्क प्राप्त करून देण्याची' प्रतिज्ञा करण्यामध्ये झाले आहे. १९३० सालच्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते. १९८५ सालच्या काँग्रेस शताब्दी अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांचे नातू, सध्याचे पंतप्रधान माननीय ना. श्री. राजीवजी गांधी हे होते. १९३० सालापासून १७ वर्षांत म्हणजे १९४७ साली स्वातंत्र्यप्राप्तीची प्रतिज्ञा पूर्ण झाली. त्याचप्रमाणे १९८५ सालापासून १५ वर्षांत म्हणजे चालू २० वे शतक संपण्यापूर्वी 'गरीबी हटाव' अर्थात 'जगण्याचा हक्क मिळविण्याच्या' प्रतिज्ञेची परिपूर्ती करण्याची घोषणा करण्यात आली आहे आणि ती पुरी होऊ शकेल असा विश्वास वाटतो.

भारत देशाचा स्थायीभाव शांततेचा व मानवतेचा आहे. शांतता आणि मानवता ही भारत देशाची पूर्वापार बिरुदावली आहे. मानवी समाजाला उत्थापन देणारी, मानवी समाज संपन्न करणारी जी मौलिक स्वरूपाची तत्त्वे आहेत त्यांपैकी एकेका तत्त्वाचे दर्शन घडविणारे अवतारी पुरुष भारतीय इतिहासात निर्माण झाले आहेत. भगवान श्रीकृष्णांनी समाजातील अन्याय दूर करण्याचा संदेश, अर्जुनाला गीता सांगताना; सर्व मानवजातीला दिला आहे. चारित्र्य संपन्नतेचे उज्ज्वल दर्शन घडविण्यासाठी श्री रामप्रभूंचा अवतार झालेला आहे. समाजात समानता आणि समभाव निर्माण करण्याचा संदेश भगवान गौतम बुद्धांच्या अवतारी कार्यातून मानवी जीवनाला मिळाला आहे. अहिंसेचा संदेश भगवान श्री महावीरांनी दिलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी पराक्रम आणि पुरुषार्थ शिकविला आहे. या अवतारी पुरुषांच्या सद्‌गुणी संदेशाचा-मानवी तत्त्वज्ञानाचा-जणू काही आविष्कारच महात्मा गांधीजींच्या जीवनकार्यात व्यक्त झालेला आहे. या सर्व मानवी जीवनतत्त्वांचे आचरण करण्यासाठी माणसाच्या जीवनाला स्वाभिमान, स्वावलंबन, पराक्रम, पुरुषार्थ आणि मानवतेची पूजा या पंचसूत्री सद्‌गुणांची आवश्यकता असते. भारतीय स्वातंत्र्य-चळवळीमध्ये महात्मा गांधीजींनी या पंचसूत्री सद्‌गुणांचे संवर्धन, संगोपन केवळ व्यक्ती म्हणून व्यक्तीच्या दृष्टीने नव्हे तर समाजजीवनाच्या सामूहिक उत्थापनातून केले आहे आणि त्याचाच आविष्कार म्हणून भारतीय स्वातंत्र्याचा आगळ्या वेगळ्या स्वरूपात

उदय झालेला आहे. हे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी, मजबूत करण्यासाठी आणि सर्वसामान्य लोकजीवन उजळवण्यासाठी या सर्व सद्गुणांचा परिपोष आज समाजात होण्याची आवश्यकता आहे. आज पंजाबात काय चालले आहे? दार्जिलिंगमध्ये काय चालले आहे? सर्वच ईशान्य भारतात काय चालले आहे? तसेच भारताच्या इतर भागांतही काय चालले आहे? पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर भारताचा भाग अस्थिर होऊ निघाला आहे. बाह्य आणि अंतर्गत शक्ती या भारतातील परिस्थितीचा फायदा घेऊन त्यामध्ये अधिक तेल ओतून भारत देश कमकुवत करण्याच्या विशेष हेतूने प्रयत्न करीत आहेत. कारण शांतताप्रधान, मानवताप्रधान भारत देश मजबूत झाला, मोठा झाला तर साम्राज्यवादी शक्तींना त्यांच्या साम्राज्यवादाचे खेळ संपुष्टात येतील अशी सार्थ भीती वाटते. या बाह्य साम्राज्यवादी शक्ती आणि अंतर्गत हितसंबंधी शक्ती यांच्या संयुक्त प्रयत्नाने भारत देश अस्थिर होत चालला आहे. यामधून प्रभावीपणे मार्ग काढण्यासाठी भारत देश मोठा करण्याची, समर्थ करण्याची व या सर्व फुटीरतेच्या, अस्थिरतेच्या भावना काढून टाकण्यासाठी आणि या सर्व भारतविरोधी शक्तींशी मुकाबला करण्यासाठी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ‘करेंगे या मरेंगे’ ही त्यागाची, परमोच्च बलिदानाची मनोभूमिका भारतात निर्माण करण्याची आवश्यकता आहे. हे काम दिरंगाईवर टाकून चालणार नाही असाच आज बाका प्रसंग आहे; याची जाणीव ठेवून समाजातील समज असणाऱ्या, ज्यांचेवर जबाबदारी आहे त्या नेते मंडळींनी आणि सर्व संबंधितांनीही यासंबंधी तातडीने विचार आणि उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तोच आज यक्षप्रश्न बनून राहिलेला आहे.

काळाची ही गरज ओळखून, श्री. शंकरभाई पटेल यांनी या पार्श्वभूमीवर ‘हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम’ हे पुस्तक लिहून फार मोठे राष्ट्रीय कार्य केले आहे. आजच्या तरुण पिढीसमोर स्वातंत्र्याचा संग्राम व त्या वेळचा इतिहास आणि आदर्श त्यांच्या डोळ्यापुढे ठेवण्याची कामगिरी त्यांनी या पुस्तकाद्वारे केली आहे. त्याबद्दल माझ्यासारख्या स्वातंत्र्य सैनिकाला फार मोठे सात्त्विक समाधान लाभत आहे. खरा स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास फारच थोड्या लोकांना माहिती आहे. तो उजेडात आणण्याची आणि येणाऱ्या पिढीला सतत शिकविण्याची नितांत गरज आहे. पण तसे घडत नाही हे एका दृष्टीने देशाचे फार मोठे दुर्दैव आहे. श्री. शंकरभाईंनी हे कार्य करून त्याचे दुर्मिळ दर्शन या पुस्तकाद्वारे घडविण्याच्या केलेल्या प्रयत्नाबद्दल मला त्यांचेसंबंधी सार्थ अभिमान वाटतो. आताचा काल हा दुष्ट प्रवृत्ती व देशविघातक शक्तींचा संपूर्ण बीमोड करण्याचा कालखंड आहे. त्यासाठी प्रचंड त्याग करावा लागणार आहे. केवळ युवा शक्तीलाच नव्हे तर विचावंतांना, वयोवृद्धांना किंबहुना सत्प्रवृत्तीलाच हे आव्हान स्वीकारावे लागणार आहे. भारतीय जनता थोर आदर्शाची पूजक आहे, दुष्टांची संहारक शक्ती आहे. छत्रपती श्री शिवबांच्या आदर्शांकडे आपणाला पुनः जावे लागेल. महात्मा गांधीजी, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस आदि थोरांच्या मार्गाने स्वार्थत्यागाची व देशप्रेमाची कास कदापिही न सोडता दुष्ट प्रवृत्तींचा निःपात करणे हे आपले पहिले पवित्र कर्तव्य आहे. शेतकरी, कामगार, श्रमिक, कष्टकरी, देशप्रेमी व सुजाण आणि जाणत्या नागरिकांना आपली एकसंध फळी, संघटना आता पुनः बांधावी लागेल. स्वातंत्र्यलढ्यातील पुरुषार्थ, पराक्रम, स्वाभिमान, स्वावलंबीपणा व माणुसकी या पंचसूत्रीचा आदर्श पुढे ठेवून आगामी राष्ट्रीय प्रगतीची पाऊले टाकली पाहिजेत. ‘राष्ट्रहित’ हा सर्व धोरण व कृती याचा केंद्रबिंदू ठेवला तर या देशाला उज्ज्वल भवितव्य आहे.

श्री. शंकरभाई पटेल यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व प्रामाणिकपणे हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्रामाचा खरा इतिहास लिहून आजच्या तरुण पिढीसमोर जो आदर्श ठेवला आहे त्याचे मोल करता येणार नाही. त्यांच्या या

अनमोल कामगिरीबद्दल भारतीय जनता त्यांची सदैव ऋणी राहील. मीही तितक्याच मनोभावनेने त्यांना धन्यवाद देतो, त्यांचे अभिनंदन करतो आणि येणाऱ्या पिढीला त्यांच्या सदर ग्रंथातून पुरुषार्थी प्रेरणा मिळत राहोत अशा अपेक्षा व्यक्त करतो.

अनुक्रमणिका

## *अर्पण*

हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्रामाचे शिल्पकार आणि या संग्रामातील ज्येष्ठ सेनानी, माझ्या राजकीय जीवनातील आदरणीय गुरू, निष्ठावान लोकनेते **श्री. गोविंददासजी श्रॉफ यांना** –

**प्रिय गोविंदभाई,**

माझ्यासारख्या सामान्य माणसाला आपण जवळ केले; राजकीय जीवनातील सहकारी म्हणून विश्वसनीयांत माझी गणना केली; हैदराबादच्या स्वातंत्र्य-संग्रामातील एक सैनिक होण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आणले; या सर्व आठवणींनी माझे मन कृतज्ञतेने उचंबळून येते.

हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्रामात औरंगाबाद जिल्ह्यात घडलेल्या अनेक रोमहर्षक प्रसंगांचा मी एक जिवंत साक्षीदार! आज मी जराजर्जर झालो आहे. सारे जीवन उजळून टाकणाऱ्या स्वातंत्र्य संग्रामातील या माझ्या आठवणी.

आपणांविषयीच्या कृतज्ञतेने ठिबकणारे हे माझे आनंदाश्रू, निरपेक्ष प्रेमाने व अतीव भक्तिभावाने मी आपल्याच चरणी अर्पण करीत आहे. स्वीकार व्हावा.

औरंगाबाद
२ ऑक्टोबर १९८६ **शंकरभाई पटेल**

अनुक्रमणिका

## कै. श्री. शंकरभाई पटेल



जन्म : १७-११-१९१२ मृत्यू : २१-५-१९९१

## अनुक्रमणिका

# निझामी राजवट

हिन्दुस्थान हा खंडप्राय देश ब्रिटिश साम्राज्याचा मांडलिक बनला तेव्हापासून हिन्दुस्थानातील सर्वच्यासर्व देशी संस्थानांत, हैदराबाद संस्थानाला एक विशेष व आगळे स्थान प्राप्त झाले होते. हैदराबाद संस्थान इतर संस्थानांपेक्षा बरेच मोठे होते. शिवाय संस्थानिक निझाम गर्भश्रीमंत गणले जात होते. हैदराबाद संस्थानचे राजे निझाम हे हैदराबाद शहरात राहात असत. हैदराबाद हे राजधानीचे शहर असल्याने, राज्यकर्त्यांनी त्या शहराला अत्यंत सुंदर आणि प्रेक्षणीय बनविले होते. हिन्दुस्थानचे व्हाईसरॉय, निरनिराळ्या प्रांतांचे गव्हर्नर, ज्येष्ठ आणि वरिष्ठ श्रेणीतले ब्रिटिश अधिकारी व मुत्सद्दी यांच्या आदरसत्काराचे कार्यक्रम हैदराबाद शहरातच राबविले जाण्याचा पायंडा निझामाने आखून दिलेला होता. वेळोवेळी, निरनिराळ्या कारणपरत्वे नेत्रदीपक आदरसत्कार समारंभ साकार करण्यासाठी लक्षावधी रुपयांचा चुराडा केला जात असे. ठराविक मतांच्या आणि साच्यांच्या लोकांसमोर बहुतेक सर्वचेसर्व मोठमोठे सत्कार समारंभ आयोजित केले जात. हैदराबाद संस्थानची प्रजा गुण्यागोविंदाने आणि आनंदाने राहात असल्याचा देखावा दाखविण्याचा तो एक डाव होता. हैदराबाद संस्थानचे राजे निझाम गर्भश्रीमंत तसेच ब्रिटिश साम्राज्याचे सच्चे आणि इमानदार दोस्त समजले जात असत. ब्रिटिश साम्राज्याची निझामावर आगळ्या स्वरूपाची  कृपादृष्टी होती. ब्रिटिश साम्राज्याच्या ज्येष्ठतम अधिकाऱ्यांचे जेवढे आदरसत्कार करण्यात आले ते सर्व हैदराबादेतील आलीशान महालांत. आयोजित मेजवान्यांचा भरपूर समाचार घेणाऱ्या बड्या लाटसाहेबांना फेरफटका मारण्यासाठी अधूनमधून वेरूळ व अजिंठा येथील लेण्यांच्या भेटी आयोजित केल्या जात असत. तेथेही निझामाच्या राज्यकर्त्यांद्वारे पाहुण्यांचा त्यांना साजेल असाच आदरसत्कार, सरबराई बऱ्याच मोठ्या प्रमाणावर केली जात असे. भव्य सत्कार आणि मेजवान्यांनी भारावलेले पाहुणे, परत जाताना, हैदराबाद संस्थानातील नागरिक सुखासमाधानाने राहात असावेत असे अनुमान बांधीत असत.

हैदराबादचे राजे निझाम व त्यांची सरकारी यंत्रणा ज्या मंडळींना आयोजित सत्कार समारंभास बोलावीत असत, ती मंडळी निझामाचेच गोडवे गाणारी व जी हुजूर जी हुजूर म्हणून कुर्निसात करणाऱ्या प्रवृत्तीचीच असत; म्हणून संस्थानच्या सर्वसाधारण नागरिकांचे खरेखुरे जीवन या बड्या पाहुण्यांना दिसू शकत नसे. सदैव ऐषआरामात लोळणाऱ्यांना सर्वसाधारण प्रजाजनांच्या, बकाल व अर्धपोटी जगणाऱ्या जनतेच्या सुखदुःखाचे काय सोयरसुतक असू शकेल? ब्रिटिश साम्राज्याच्या राज्यकर्त्यांकडून निझामाला आपल्या संस्थानात, कोणतेही नियम ‘हम करेसो कायदा’ या वृत्तीने राबविण्याची मुभा मिळे. संस्थानात जवळपास हुकूमशाही पद्धतीचाच राज्यकारभार चालत होता. संस्थानची प्रजा निझाम आणि ब्रिटिश या दोन राजवटींच्या जात्यात भरडली जात होती.

हैदराबाद संस्थानात, मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटक असे तीन विभाग होते. मराठवाडा विभागात औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड आणि उस्मानाबाद या पाच जिल्ह्यांचा समावेश होता. योगायोगाने मराठवाडा विभागात आणि हैदराबाद संस्थानात हैदराबादनंतर, औरंगाबाद जिल्हा व शहर सर्वात मोठे होते. औरंगाबाद जिल्ह्यात जगप्रसिद्ध आणि अनमोल वेरूळ  व अजिंठ्याच्या लेण्या आहेत. वेरूळ  व अजिंठा लेण्यांतील शिल्प आणि चित्रकलेच्या अनमोल खजिन्याचा मालकी हक्कही निझामाला प्राप्त झाला होता. तसेच दौलताबादसारखा

अनुक्रमणिका

अजिंक्य म्हणून प्रसिद्ध असलेला किल्लाही इथे आहे. आजच्या काळात जगाच्या पर्यटकांच्या रोजनिशीत औरंगाबाद शहराचे नाव विशेषत्वाने नोंदविलेले असते. वेरूळ लेण्याच्या माथ्यावरील डोंगराळ भागात वसलेल्या खुलताबाद व त्याच्या परिसराचे हवामान स्वर्गासारखेच गणले गेले आहे. या गावालगतच डोंगराळ भागाच्या निवांत सपाटीवर निझामाने स्वतःच्या हवा पालटासाठी एक भव्य विश्रामगृह बांधले होते. निझाम स्वतः, त्याचे वंशज, निझामाच्या मर्जीतले ज्येष्ठ लोक, व्हाईसरॉय, गव्हर्नर व त्यांच्या इतकेच ज्येष्ठ अधिकारी व मुत्सद्दी यांच्या व्यतिरिक्त चिटपाखरूही या विश्रामगृहातच काय पण त्याच्या जवळपास देखील फिरकू शकत नसे.

निझामाच्या आमदानीच्या काळात, ज्यानी कोणी ह्या विश्रामगृहात प्रवेश मिळविला असेल त्याला प्रत्यक्ष राजमहालात प्रवेश केल्यासारखे वाटले असेल! दिलखुलास सरबराई आणि भरपूर पाहुणचार करणाऱ्या हैदराबाद संस्थानच्या निझामाइतकीच राजवटीचा कारभार चालवणाऱ्यांची मनोवृत्ती संकुचित होती. मनमुराद पाहुणचार करण्यापायी अमाप पैसा खर्च करणारे, संस्थानातील सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाबाबत मात्र उदासीन होते. बदलत्या काळाची त्यांनी चाहूल ओळखली नव्हती. त्याबरोबरच उद्याचा त्यांनी कधीकाळी विचारही केला नव्हता. प्राप्त परिस्थितीत उद्याचा विचार करण्याची पाळीही त्यांच्यावर आली नव्हती.

निझामाने काही ठराविक बोलघेवड्या लोकांना अधूनमधून निरनिराळे किताब व मानमरातब देऊन आपल्या दावणीत जखडून ठेवले होते. मुसलमानांमध्ये 'आजचे पाहा, उद्याचा कशाला विचार करायचा' ही विचारधारा रूढ झालेली होती. निझामाने निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या विभागांत फेरफटके मारून नजराणा या नावाखाली जनतेकडून अमाप संपत्ती हस्तगत केली. मात्र जनतेकडून ओढून घेतलेली संपत्ती जनतेच्या कल्याणासाठी, उन्नतीसाठी, विकासासाठी कधीकाळीही वापरली नाही. मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांतून नजराणा या गोंडस नावाखाली गोळा केलेला पैसा तसेच महसूल आदी यंत्रणेद्वारे एकत्रित केलेली संपत्ती, सर्वचीसर्व एकट्या हैदराबाद शहराच्या विकासाठी बेगुमानपणे खर्च केली. हैदराबादचे निझाम आणि त्यांची राज्ययंत्रणा जे काय करीत होती त्याचा सर्वसाधारण नागरिकांकडून कधीही विरोध केला गेला नाही. 'मुकी बिचारी कुणी हाका' अशा मेंढराप्रमाणे खाली मान घालून मराठवाड्यातील लोक मुकाट्याने त्यांच्या आयुष्याचे दिवस कंठीत होते.

मराठवाड्यातील जनतेला संत श्रेष्ठींचा वारसा मिळालेला आहे. संत ज्ञानेश्वर, जनार्दनस्वामी, संत एकनाथ आणि रामदासस्वामी यांचा वारसा व त्यांच्या महान शिकवणीची शिदोरी मराठवाड्यातील, विशेषेकरून औरंगाबादेतील नागरिकांच्या पाठीशी बांधलेली आहे. सहिष्णुता मराठवाड्यातील सर्वच्यासर्व मराठी भाषिक लोकांच्या अणूरेणूत ओतप्रोत भरलेली आहे. धर्मांधर्मांमध्ये भेदभाव न मानणारी मराठी भाषिकांची परंपरा आहे. आम्ही मराठवाड्यातील मराठी भाषिक शेकडो वर्षांपासून धर्मनिरपेक्षता मानत आलो. इतकेच नाही तर त्याचा आम्ही विचारपूर्वक अंगिकारही केलेला आहे. वेरूळच्या लेण्या आमच्या धर्मनिरपेक्षतेची साक्षच आहेत. वेरूळच्या लेण्या बौद्ध, हिन्दू आणि जैन या तीन निरनिराळ्या पंथांच्या गणल्या जाऊ शकतात. तरी त्या क्रमांक एक पासून क्रमांक ३४ पर्यंतच्या सर्वच्यासर्व लेण्या एकमेकाजवळ शेजारीशेजारी ठळकपणे उभ्या आहेत. यावरून हिंदू धर्माची सहिष्णूता स्पष्ट आणि ठळकपणे सहज डोळ्यात

अनुक्रमणिका

भरल्या वाचून राहात नाही. आजची धर्मनिरपेक्ष विचारधारा कितीतरी काळ आधीपासून अमलात आलेली होती, याचे दर्शन येथे घडते. वेरूळच्या लेण्यांच्या परिसराजवळ घृष्णेश्वराचे ज्योतिर्लिंग आहे. हिंदुस्थानात असलेल्या १२ ज्योतिर्लिंगांमध्ये घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग एक महत्त्वाचे ज्योतिर्लिंग गणले जाते. इतके असूनही निझामाची व त्याच्या राजवटीच्या अधिकाऱ्यांची मराठवाडा विभागाबाबतची संकुचित वृत्ती पदोपदी ठळकपणे दिसून येते. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, वेरूळ व अजिंठ्याच्या लेण्या, देवगिरी-दौलताबादचा किल्ला प्रत्यक्ष बघण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्याचे, मराठवाडा विभागाचे आणि हिंदुस्थान देशाच्या निरनिराळ्या विभागाचे लोक जेव्हा केव्हा येत असत तेव्हा त्यांची अमानुषपणे झडती घेतली जात असे, आणि त्यामुळे इच्छा असूनही, मोह आवरत नसतानाही अनेक इच्छुक लोक धाकदपटशा आणि झडतीच्या सत्राला कंटाळून येण्याचे बेत रद्द करीत.

हैदराबाद संस्थानच्या पुराणवस्तु खात्यामार्फत अजिंठा लेण्यांचे व त्यांतील अप्रतिम चित्रकलेचे, तसेच वेरूळच्या लेण्यांचे प्रदर्शन परदेशात भरवले गेले. आयोजित प्रदर्शनाद्वारे पाश्चात्य देशात एक विचारधारा निर्माण केली गेली. त्यासाठी लक्षावधी रुपयांचा चुराडा झाला; मात्र हिंदुस्थानातील लोकांसमोर अजिंठ्याच्या अमर चित्रकलेचे व वेरूळच्या असामान्य शिल्पाकृतींचे असे प्रदर्शन भरविले गेले नाही, आवश्यक तेवढी माहितीही पुरवली गेली नाही. अजिंठा गावापासून, अजिंठा गावाच्या परिसरात मोडत असलेल्या अजिंठा लेण्यांकडे नागमोडी वळणे घेत घेत जाणाऱ्या रस्त्यावर, वाघरा नदीच्या पात्रावर तसेच छोट्यामोठ्या नदीनाल्यांवर जे पूल बांधले गेले त्या पुलांवरून जेमतेम एकावेळी एक मोटार जाऊ किंवा येऊ शकेल असे पूल बांधून हैदराबाद संस्थानच्या निझामाने व त्याच्या राजवटीने त्यांच्या संकुचित वृत्तीचे प्रदर्शन करून उद्याचा स्वप्नातही विचार केला नसल्याची साक्ष पटवून दिली आहे. त्याच निझामाने अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या निर्मितीमध्ये मात्र फार मोठा मोलाचा वाटा उचलला. अलिगढ मुस्लिम विद्यापीठ, मुसलमान समाजाचे अनेक संत, दर्गा, मशिदी व शैक्षणिक संस्थांना निझामाने भरपूर पैसा दिला. हैदराबाद संस्थानातील एक नामवंत उच्च अधिकारी, सर सय्यद अली बिलग्रामी यांनी तर स्वतंत्र मुस्लिम मतदार संघाची मागणी रोखठोक शब्दांत जोरदार पद्धतीने मांडली व आपल्या या मागणीचा त्यांनी भरपूर पाठपुरावाही केला. मुस्लिम जमात ही अल्पसंख्यांक म्हणून गणलीच जाऊ नये, इतकेच नव्हे तर हिंदुस्थानात मुस्लिमांना महत्त्वाचे स्थान आहे व ते महत्त्वाचे स्थान दिले जावे याचाही या महाभागाने सातत्याने उद्‌घोष केला.

हैदराबाद संस्थानात निझामाने कितीतरी जहागिरदार, मनसबदार, रिसालदार, रुसूमदार निर्माण केले होते. त्याला जोडून खानबहादूर, राजा, रायबहादूर इत्यादी किताबांची मनमानेल तशी वाटणी करून अनेकांना जखडून ठेवले होते ही मंडळी निझामाविरुद्ध अगर निझामाच्या राजवटीविरुद्ध चुकूनही अवाक्षर काढीत नव्हती; इतकेच नव्हे तर लोकांना थोपवून ठेवत होती. ज्यांना खैरात मिळाली होती ते सर्व महाभाग 'निझाम हा परमेश्वराचा अवतार आहे. म्हणून त्याची मनोभावाने सेवा करणे सगळ्यांचे परम कर्तव्य आहे', असे सदोदित सांगत; इतकेच नव्हे तर सर्वसामान्याला तसेच सारखे पढवले जात असे, पढवलेला पाठ अधून मधून पाठांतरासारखा वदवून घेतला जात असे. जे काय घडत होते ते सामान्यांच्या हिताचे नाही असे स्पष्टपणे दिसत असताना निझामाकडून अधिक काहीतरी मिळवण्याच्या फंदात अडकलेल्याना खंत वा खेद वाटत नव्हत्या, उलट धन्यता वाटत होती.

अनुक्रमणिका

संस्थानाच्या शैक्षणिक विभागाचे डायरेक्टर सर मसुद यार जंग होते. हे जेव्हा केव्हा मराठवाड्यातील औरंगाबादेतील शासकीय आणि खाजगी शाळांना भेटी देत असत तेव्हा ते विद्यार्थ्यांना उद्देशून जपानचा विद्यार्थी व त्यांच्या राजाची एक कथा सांगत असत. जपानी विद्यार्थ्याने चोहोबाजूनी पेटलेल्या ज्वालांचा विचार न करता, प्रशालेच्या वरच्या माळ्यातील मुख्याध्यापकाच्या कार्यालयात लटकावलेले जपानच्या राजाचे चित्र सहीसलामत ठेवण्यासाठी पटकन गिळून टाकले. तेवढ्या अवधीत पेटलेल्या ज्वालांनी त्याला घेरले. त्या ज्वालांनी तो पार जळाला अन मेला. मुख्याध्यापकाच्या विनंतीवरून त्या विद्यार्थ्याच्या पोटाचे ऑपरेशन करण्यात आले तेव्हा जपानच्या राजाचे चित्र त्या विद्यार्थ्याच्या पोटात सापडले. 'विद्यार्थ्यांनो आपल्या राजाच्या जीवाला कधीकाळी धोका होणार नाही याची तुम्ही विशेषत्वाने काळजी घेतली पाहिजे. इतके करूनही धोका निर्माण झालाच तर आपण स्वतःची आहुती देऊ आणि आपल्या राजाचे-बन्देगान आली मीर उस्मान अली खान आला हजरतांचे प्राण वाचवू अशी प्रतिज्ञा करा'. अशा प्रकारची शिकवण शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी शाळेतच देत असत.

निझामाने आपल्या राजवटीचा सारा कारभार आपल्या इच्छेप्रमाणे अखंड चालत राहावा यासाठी उत्तर हिंदुस्थानातून फार मोठ्या प्रमाणात मुस्लिम अधिकाऱ्यांची निरनिराळ्या खात्यात वर्णी लावली होती. संस्थानातील बहुतेक वरिष्ठ अधिकारी मुस्लिमच होते. शाळा खात्यात संस्कृत, मराठी, गणित आदि विषय शिकविण्यासाठी हिंदु शिक्षकांच्या नेमणुका केलेल्या होत्या. पाटील पटवारी सहसा हिंदु जमातीचेच असत कारण परंपरेने ही वतने त्यांच्याकडे होती. पोलीस खात्यात व राज्याच्या लष्कर विभागात शेकडा नव्वद टक्के शिपायापासून कनिष्ठ व ज्येष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत मुस्लिमच घेतले जात असत. पोलीस, महसूल व न्याय विभाग एकमेकांच्या संगनमतानेच काम करत असत.

निझामाच्या राजवटीत मराठवाडा विभाग संपूर्णतया दुर्लक्षिलेला व सर्व प्रकारे वंचित असाच राहू दिला गेला. बीड व उस्मानाबाद हे जिल्हे असूनही, इतर जिल्ह्यांच्या तालुक्यापेक्षा अधिक खेडवळ दिसून येत. मराठवाड्यातील पाचही जिल्ह्यांतील हिंदुधर्मीय मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची अतोनात आबाळच होती. संस्थानच्या राजवटीचा सारा कारभार उर्दू भाषेतच होत असे. मुस्लिमांव्यतिरिक्त फार थोड्या लोकांना उर्दू भाषा अवगत होती, तुटक्या फुटक्या उर्दू भाषेत बोलता येत असे, मात्र लिहिता अगर वाचता येत नसे. शैक्षणिक क्षेत्रात उर्दू भाषेलाच प्राधान्य देण्यात आले होते. सरकारदरबारी सर्रास उर्दू भाषेचाच वापर केला जात असे. फक्त चौथीपर्यंत मराठी माध्यमाची सोय होती.

संस्थानचा सुलतान-राजा-निझाम हा मुस्लिम, म्हणून उर्दू भाषेची प्रगती करणे समजू शकते. मात्र उर्दू भाषेची लादालादी केवळ मराठी भाषिक जनतेची व त्यांच्या कच्च्याबच्च्यांची हेळसांड करण्याकरिताच केली जात होती, इतकेच नव्हे तर मराठी भाषिकांना मागे रेटून मुस्लिमांना पुढे ढकलण्याची घिसाडघाई केली जात होती. गेल्या दीडशे वर्षांपासून मराठवाड्यातील मराठी भाषिक जनता-निझामी राजवटीच्या जात्यात भरडून निघालेली सामान्य जनता-हवालदिल बनत गेल्याने स्वतःचे सत्त्व जवळपास विसरली होती. प्राप्त परिस्थितीत ज्यांना उर्दू भाषा अवगत करता आली त्यांपैकी काहींनी वकिलीचा पेशा स्वीकारला तर काही छोटेमोठे कारकून म्हणून नोकरी करू लागले. मराठी भाषेची सतत गळचेपी चालू होती. निझामी राजवटीच्या काळात मराठवाडा विभागात, मराठी भाषिकांच्या विभागात मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या छोट्याछोट्या संस्था

कायम करणे, कार्यरत करणे वरपांगी दिसते तितके सोपे काम नव्हते. याउप्पर हिरीरीने प्रयत्न करणाऱ्याला अनेक संकटांना तोंड द्यावे लागत असे. महत्प्रयासाने औरंगाबादेत श्री सरस्वतीभुवन शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. त्या संस्थेला व तिच्या विद्यार्थ्यांना कित्येक वर्षे एका जुनाट इमारतीत दिवस कंठावे लागले. त्या काळात शिक्षण संस्था चालविणारे जे लोक पुढे आले, त्यांनी त्यांच्या फावल्या वेळात शिक्षण संस्थाकडे थोडेफार लक्ष दिले. मराठी माध्यमातून मुलींसाठी वेगळी शाळा काढावी व ती समाजात रूजवावी या विचाराने भारावलेल्या कै. श्री. वसंतराव वसिष्ठ यांनी पुढाकार घेतला व औरंगाबाद येथे ‘शारदा मंदिर कन्या शाळा’ या नावाने १०-१५ मुलींच्या संख्येने प्रारंभ केला. त्या काळात मुलींना शाळेत पाठविण्याची विचारधारा समाजात रुजलेली नव्हती.

निझाम सरकारच्या शिक्षण विभागात मॅट्रिकपर्यंत शिक्षण देणारे जिल्ह्याच्या ठिकाणी एक सरकारी विद्यालय असे. यात ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण उर्दू माध्यमातून (काही ठिकाणी इंग्रजीतूनही) दिले जाई. मराठी माध्यमातूनही मराठी भाषिकांसाठी शिक्षणाची सोय असावी याचा निझाम राजवटीच्या शिक्षण खात्याने चुकूनही विचार केला नाही. मॅट्रिकपर्यंत उर्दू व इंग्रजी माध्यमातून शिक्षणाची सोय झाली. मात्र औरंगाबादेत तसेच मराठवाड्यातील पाचही जिल्ह्यांत मॅट्रिक परीक्षेसाठी परीक्षा केंद्र कायम करण्यात आले नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांना मॅट्रिक परिक्षेसाठी हैदराबादला जावे लागत असे. परीक्षेसाठी हैदराबादला जाणे-येणे बऱ्याच विद्यार्थ्यांच्या पालकांना झेपत नसे. कितीतरी पालकांना पोटाला चिमटा घेऊन त्यांच्या मुलाच्या हैदराबादला जाण्या-येण्यासाठी व्यवस्था करावी लागे. अशी परिस्थिती असतानाही परीक्षेचे केंद्र औरंगाबाद येथेच कायम केले जावे म्हणून प्रदीर्घ कालपर्यंत कोणीही प्रयत्न केला नाही. इंग्रजी माध्यमातून मॅट्रिक नंतर औरंगाबादेत व्यवस्था नसतानाही ती व्यवस्था व्हावी म्हणूनही आवश्यक तेवढा पाठपुरावा कोणी केल्याचे ऐकिवात नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा श्री. मालोजीराव भोसले हे वेरूळचे पाटील होते. तेथे त्यांचा अगदीच मोडकळीस आलेला पुरातन वाडा भग्न अवस्थेत आहे. छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबाला भेटण्यासाठी दिल्लीला जाताना औरंगाबादेतील आजही उभ्या असलेल्या दिल्ली दरवाजा मधूनच गेले होते. ही ऐतिहासिक घटना हैदराबाद संस्थानातील शैक्षणिक खात्याने प्रकाशित केलेल्या इतिहासाच्या क्रमिक पुस्तकांत नमूद केलेली नव्हती. ही एक मराठवाड्याच्या सच्च्या इतिहासाची शोकांतिका आहे. याचाही पाठपुरावा इतिहास विषयाच्या ज्येष्ठ प्राध्यापकांनी कधीही केला नाही. इतिहासकारांनी प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचा सखोल अभ्यास तर केलाच नाही, उलट हैदराबाद संस्थानच्या निझामाला आवडेल असाच इतिहास लिहून काढला. निझामाने नेमलेल्या इतिहासकारांनी जो काय खराखोटा इतिहास लिहिला तोच ग्राह्य मानून शिक्षण खात्याने मराठी भाषिकांच्या माथी मारला.

अन्यायाचा प्रतिकार करण्याची शिकवण युगायुगापासून चालत आलेली आहे. असे असतानाही निझामाच्या राजवटीत अन्यायाच्या जात्यामध्ये आमचे सर्वस्व भरडून निघत असतानाही मराठी भाषिकांच्या तोंडून कित्येक वर्षापर्यंत शब्द उमटला नाही. निझामी राजवटीत नागरिकांचे डोळे शाबूत होते; घसा तसा निरोगी आणि साफ होता, तरी तोंडावाटे शब्द उमटत नव्हता आणि त्याचा निझामी राजवट वारेमाप उपयोग करून घेत होती. मराठवाड्यातील बहुतेक मराठी भाषिकांचा स्वाभिमान जवळपास नष्टभ्रष्ट झाल्यासारखा होता. शेकडो वर्षांची दास्यत्वाची मरगळ अनेकांच्या जीवनात सतत नव्या जोमाने काठोकाठ भरत चालली

अनुक्रमणिका

होती. यामुळे निझामी राजवटीला मनमानेल तो कायदा सहजासहजी राबविता येत होता. राजवटीचे भाट, पैसे पैशाच्या आमिषाला भाळलेले, भाळणारे, काहीही न करता घरबसल्या मानमरातब मिळविणारे, लाचारीने निझामाचे, निझामाच्या राजवटीचे पाय धरणारे, पाय पुसणारे अशा भिडस्त, नेमस्त आणि मवाळांच्या हातात मराठवाड्यातील मराठी भाषिकांचे, सर्वसामान्य जनतेचे जीवन होते. त्यामुळे एक विचित्र प्रकारची मरगळ मराठवाड्यात अवतरली होती. सामान्य लोकांना लिहिता-वाचता येत नव्हते. ज्यांना ते येत होते त्यांना लिहिण्यावाचण्याची गोडी नव्हती. बोटावर सहज मोजता येतील इतकीच वृत्तपत्रे संस्थानाबाहेरून येत असत. वृत्तपत्र विकत घेऊन ते वाचणाऱ्यांचा आकडा बोटावर मोजण्याइतकाच होता. वृत्तपत्रांतील निरनिराळ्या बातम्या व लेख, चार भिंतीच्या आत, दारे-खिडक्या बंद करून कधीमधी चर्चिले जात असत. मराठवाड्यात एकही दैनिक नव्हते. मराठवाड्यातील जनता जणू खुल्या कारागृहात वावरत होती. पैसा आणि साधने यांची वानवा होती. जनतेचा स्वाभिमान, शिक्षण, विकास, उन्नती आणि पदोपदी लादला जात असलेला अन्याय याबाबत विचार करणारे सहज मोजता येऊ शकतील इतकेच विचारवंत औरंगाबादेत होते. मात्र ते जहाल, संघर्षवादी राजवटीच्या वतीने केला जात असलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उंचावणारे आहेत म्हणून, सामान्यांना त्यांच्या सावलीजवळ सुद्धा फिरकू न देण्याची, नेमस्त, मवाळ आणि मायबाप सरकारचे भाट आहोरात्र काळजी घेत होते. त्यामुळे गेल्या शेकडो वर्षापासून अन्यायाचे प्रहार सहन करता करता रक्तबंबाळ झालेली सामान्य जनतेची मने इच्छा असूनही, मनात सतत कालवाकालव होत असतानाही धीटपणे बोलू शकत नव्हती. लहान तोंडी मोठा घास घेणे योग्य होणार नाही असेच काहीतरी त्यांना वाटत असावे. शिवाय प्रामाणिकपणे आपल्या मनात सतत चालत असलेली कालवाकालव, भडभड सांगितली तर त्याची कोणीतरी दखल घेईल का? न्याय मिळेल का? अन्यायाचे परिमार्जन न होता घरादारावर नांगर तर फिरणार नाही ना? अशा अनेक विचारांचे काहूर त्यांच्या मनात माजत होते. त्यात पैशाचा अभाव, साधनांची दुर्मिळता. नागरिकांची मने भीतीपोटी गांगरून गेली होती. चार लोक कधी एकत्र बसून सुखदुःखाचा विचार करीत नव्हते. निझामी राजवटीचे भाट, खुषमस्करे, घरभेदी सारखे घिरट्या घालीत होते. आपला जिवाभावाचा कोण हे ओळखणे सोपे राहिले नव्हते. ताक फुंकून प्यायची वेळ आलेली होती. सर्वसामान्य लोक या अवस्थेने पार गांगरून गेले होते. तोंडातून शब्द उमटत नव्हते. पाय पुढे जाण्यासाठी धजत नव्हते. अन्यायाचा भस्मासुर त्यांना जाळीत होता. जे काय घडत होते ते जसेच्या तसे ज्याच्या त्याच्या मनातल्या मनात साचत होते. परिस्थितीचे गांभीर्य सारखे वाढतच चालले होते. प्राप्त परिस्थिती अनेक खाचखळग्यातून सारखी हेलकावे खात होती.

## संघर्षाची सुरूवात

फावल्या वेळात जे काय थोडेबहुत करता येईल ते करावयाचे व ते करताना त्याची झळ आपल्याला लागणार नाही, याची विचारपूर्वक आवश्यक तेवढी खबरदारी, नेमस्त, मवाळ सरकारधार्जिणे व सरकारचे हस्तक बनू पाहाणारे लोक घेत असत. याच सुमारास हैदराबाद संस्थानात काही विचारवंत नागरिकांनी अन्यायाविरुद्ध संघर्षाचा पवित्रा घेण्याचे ठरविले होते. हिन्दुस्थानातील संघर्षाचा तो एक पडसाद होता. त्या संघर्षात स्वामी रामानंद तीर्थ, अच्युतभाई देशपांडे, आनंद कृष्ण वाघमारे, राम कडेपूरकर, गोविंदभाई श्रॉफ, किशनदास गंगापूरवाला यांनी व हैदराबाद संस्थानच्या मराठवाडा विभागात मोडणाऱ्या इतर जिल्ह्यांतून काही मोजक्या मंडळींनी उड्या घेतल्या. मात्र जे घडले त्याचे एका शब्दानेही नेमस्त, मवाळ मंडळींनी तसेच त्यांच्या सभोवती पिंगा घालणाऱ्यांनी स्वागत केले नाही. चार भिंतीआडही त्याबाबत बोलले गेले नाही. मवाळांना-

अनुक्रमणिका

नेमस्तांना तो राजमार्ग आवडला नाही म्हणूनच कोणी बोलला नाही, हेच खरे! मराठवाडा विभागाची जनता बंदिस्त अवस्थेत पडून होती. शेजारी काय चालले आहे, काय घडते आहे याचीही जागरूक समंजस म्हणून मिरविणाऱ्यांनी दखल घेतली नाही. त्याबाबत वाच्यता केली नाही. सामान्यापर्यंत जाऊ दिले नाही. असंतोषाची आग आतल्या आत धुमसत होती. त्याचा स्फोट होऊ शकला नव्हता इतकेच. पदोपदी परिस्थिती गंभीर तसेच स्फोटक बनत चाललेली होती. प्राप्त परिस्थितीचे गांभीर्य, समाजात धुरीण व जागरूक म्हणून मिरविणाऱ्यांनी व त्यांच्या सभोवती मोहळाच्या माशासारखे फेरे मारणाऱ्यांनी, ओळखलेच नव्हते. निझामी राजवटीविरुद्धचा आवाज हवेत विरून जाईल, अन्यायाविरुद्धचे डाव पत्त्यांच्या बंगल्यासारखे कोसळून जमीनदोस्त होतील अशा विचारात ते गढून गेलेले असावेत. त्या महाभागांना जे काय घडत होते ते समजत होते; मात्र उमजत नव्हते.

निझामाने, त्याच्या राजवटीने व इस्लाम धर्माचा पुरस्कार करणाऱ्या राजवटीच्या ज्येष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांनी राज्याचा कारभार त्यांच्या निर्धाराप्रमाणे निर्धास्तप्रकारे सदोदित चालत रहावा याबाबत पुरेपूर खबरदारी घेतली होती. राजवटीच्या कारभारामध्ये होयबांचाच भरणा अधिक होता. संस्थानचा सुलतान मुस्लिम असल्याने, मुसलमानांना त्याचा पुरेपूर फायदा मिळाला पाहिजे ही विचारधारा दिवसेंदिवस वाढीस लागलेली होती. त्यामुळे संस्थानात राहणाऱ्या मुसलमानांच्या आशाआकांक्षा फोफावत गेल्या. हैदराबाद संस्थानाबाहेर निझामाच्या पैशावर जगणाऱ्यांचा त्यांना हवा तेवढा पाठिंबा मिळत गेला. त्यामुळे हैदराबाद संस्थानातील मुस्लिमांना काहीही करण्याचा जणू परवानाच मिळालेला होता. शिवाय त्यांनी केलेल्या कोणत्याही कृत्यांचा जाब विचारला जात नसे. पर्यायाने वाटेल तो धुडगूस घालण्याची त्यांना मुभा मिळालेली होती. अशा विचित्र अवस्थेतून मराठवाडा विभागातील मराठी भाषिक सर्वसामान्य जनता आपल्या आयुष्याचे दिवस कंठीत होती. हैदराबादेत कुंपणावर बसून शेळ्या हाकणारेही बरेच महाभाग होते. दोन्ही थडीवर हात ठेवता येतील अशी व्यवस्था करूनच ते महाभाग कुंपणावर बसलेले होते. आपले जे चालू आहे ते जसेच्या तसे चालू राहावे यासाठी मायबाप निझाम व त्यांच्या राजवटीला झुकते माप देण्याच्या भाषेतच ते बोलत असत. परिस्थितीने पलटा खाल्लाच तर उलटी छलांग मारण्याची व्यवस्थाही त्यांनी केलेली होती.

### संग्रामाची ठिणगी

औरंगाबाद शहरात एकटे एक इंटरमिजिएट कनिष्ठ महाविद्यालय, हैदराबादेतील उस्मानिया विद्यापीठाशी संलग्न असलेले कायम करण्यात आले. या कनिष्ठ महाविद्यालयात उर्दू माध्यमातूनच शिक्षण दिले जात असे. उर्दू भाषिक मुस्लिम आणि नाइलाजास्तव उर्दू भाषा अवगत करून शिक्षण घेणाऱ्या अन्य विद्यार्थ्यांची संख्या शंभर दीडशे होती. प्रयत्न करूनही ज्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी इतरत्र जाण्याइतकी सांपत्तिक ताकद नव्हती त्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाला रामराम ठोकावा लागे. औरंगाबादेतील इंटरमिजिएट महाविद्यालयाचा वर्धापन दिन साजरा करण्याचे ठरले. प्राचार्यांनी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांची एक अनौपचारिक बैठक घेतली. केवळ नाममात्र संमती मिळविण्यासाठी प्राचार्यांनी कार्यक्रमाचा तयार केलेला आराखडा मांडला. उपस्थित प्राध्यापक मंडळींनी त्यांना पाठिंबा दिला. वर्धापन दिनाचे उद्घाटक म्हणून हैदराबाद संस्थानचे प्रधानमंत्री सर अकबर हैदरी यांचे नाव निश्चित करण्यात आले. योगायोगाने प्राचार्याने निवडलेला, ठरविलेला वर्धापनाचा दिवस विजया-दशमीलाच येत होता, तरी

त्याच दिवशी वर्धापनदिन साजरा करावयाचे मान्य करण्यात आले. सदर बैठकीत महाविद्यालयाचे बहुतेक सर्वचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते. मात्र त्यापैकी एकाही प्राध्यापकाला सीमोल्लंघन आठवले नाही. अगर आठवले असले तरी चांदीच्या तुकड्यासाठी त्यांच्या तोंडाला खीळ बसली होती. त्यांना बंदेगान आली आला हजरत यांची निझामीराजवट व प्राचार्य यांना नाराज करावयाचे नव्हते. सारेचे सारे चुपचाप बसून राहिले. सर्वांनी एक आवाजात 'मुनासिब है' बोलून टाकले. कार्यक्रम ठरला. ठरलेल्या कार्यक्रमाचा महाविद्यालयाच्या कानाकोपऱ्यात बोलबाला झाला. काही विद्यार्थ्यांत कार्यक्रमाच्या अनुषंगाने गटागटाने आपआपसात याबाबत साधकबाधक चर्चा झाली. दोन तासांच्या अवधीत काही विद्यार्थ्यांनी दसरा हा समस्त हिंदू समाजाचा प्रमुख सण म्हणून आणि सीमोल्लंघन हे विजयादशमीचे एक प्रमुख अंग म्हणून, त्याला डोळ्यांआड न करता महाविद्यालयाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमावर, सर्वच्या सर्व हिंदु विद्यार्थ्यांनी बहिष्कार टाकावा यासाठी; बहुतेक सर्व विद्यार्थ्यांची मने वळविण्यात यश संपादन केले. काही घरभेद्यांनी विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या चर्चेचा इत्थंभूत वृत्तांत काही प्राध्यापकांना सांगितला तेव्हा त्या प्राध्यापकांचे धाबे दणाणले. विद्यार्थ्यांसमवेत आपली ससेहोलपट होऊ नये, आपण नामानिराळे राहावे म्हणून आणि आपण अत्यंत प्रामाणिक आहोत याची साक्ष पटवून देण्यासाठी या प्राध्यापकांनी त्यांना समजलेली बातमी तिखटमीठ लावून प्राचार्यांसमोर सादर केली. प्राचार्यांनी प्राप्त परिस्थितीचा गंभीरपणे विचार केला. काही ठराविक प्राध्यापकांसमवेत विचारविनिमय केला. महाविद्यालयाची तातडीने बैठक घेतली गेली. महाविद्यालयातील हिंदु विद्यार्थ्यांची मने वळवून त्यांना बहिष्काराच्या कार्यक्रमापासून परावृत्त करण्याचे जबाबदारीचे काम हिंदु प्राध्यापकांच्या माथी मारले गेले. त्या बरोबरच महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रो. इब्राहिम, प्रो. तैय्यब यांनाही पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना बहिष्कारापासून परावृत्त करण्याच्या कामी जमेल ते करावयास प्राचार्यांनी सांगितले. त्याशिवाय असेही सांगितले की, 'जे विद्यार्थी बहिष्कारामध्ये सहभागी होतील त्या विद्यार्थ्यांना दिली जात असलेली फी माफीची सवलत, बर्सरी आणि इतर सवलती तडकाफडकी काढून घेतल्या जातील. प्रमुख विद्यार्थी पुढाऱ्यांना महाविद्यालयातून कायमचे काढून टाकण्यात येईल व त्या विद्यार्थ्यांना हिंदुस्थानातील कोणत्याही महाविद्यालयात पुढे केव्हाही प्रवेश मिळू शकणार नाही याबाबत आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जाईल.'

महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांची मने वळविण्याच्या, बहिष्काराच्या कार्यक्रमापासून परावृत्त करण्याच्या कामाला ताबडतोब प्रारंभ केला. प्रथम गटागटाने विद्यार्थ्यांना गाठून त्यांची मने वळविण्यावर भर दिला गेला. प्राध्यापक जीव तोडून जे सांगत होते, विद्यार्थी ते सर्व ऐकत होते. मात्र प्राध्यापकांच्या विनविण्याचा काडीमात्र उपयोग झाला नाही. विद्यार्थ्यांनी केलेल्या निर्धारापासून ते तसूभरही मागे सरकत नाहीत असे दिसून येताच प्राध्यापक मंडळींनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून कायमचे काढून टाकण्याच्या, फी व बर्सरी रद्द करण्याच्या धमक्या दिल्या. राज्याच्या पंतप्रधानाचा अवमान करणाऱ्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना शासन शिक्षा ठोठावील, विद्यार्थी शिक्षणाला कायमचे मुकतील, पालकांची स्वप्ने विरून जातील, विद्यार्थी कायमचे बेकार म्हणून वणवण भटकतील वगैरे वगैरे. प्राध्यापकांच्या विनंतीचा, धमक्यांचा विद्यार्थ्यांनी काहीच विचार केला नाही. समोर येणाऱ्या आपत्तीचाही विचार केला नाही. केलेल्या करारी निश्चयापासून जराही ते मागे सरले नाहीत. त्यानंतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या पालकांना गाठून जे काय सांगता येईल तेवढे सांगितले. विद्यार्थ्यांची मने बहिष्कारापासून परावृत्त करण्याची जबाबदारी पालकांवर टाकण्यात आली. औरंगाबाद शहराच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात वर्धापन दिन, दसरा, सीमोल्लंघन, बहिष्कार, पालकांची जबाबदारी व विद्यार्थी हाच चर्चेचा विषय बनला होता पण विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांची विनंतीही धुडकावून लावली.

अनुक्रमणिका

महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शहरातील नेमस्त-मवाळ सरकारधार्जिण्या महाभागांनी विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाचा कैवार येऊन पालकांवर दडपण आणण्याचा प्रयत्न केला. अशांततेचा डोंब उसळण्याची भीती बोलून दाखविली. हैदराबाद संस्थानच्या पंतप्रधानांचा आदरसत्कार करणे नागरिकांचे कर्तव्य असल्याचे ठासून सांगताना, त्यांना दसरा, सीमोल्लंघन तितकेसे महत्त्वाचे वाटले नाही, याचेच अनेकांना वाईट वाटल्यावाचून राहिले नाही. शहरात रामायण घडले असताना विद्यार्थ्यांची पाठ थोपटणारा, विद्यार्थ्यांची बाजू घेणारा औरंगाबादेत एकही पुढारी विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी आपण होऊन पुढे आला नाही. विद्यार्थ्यांच्या मनोधैर्याला, करारी निश्चयाला सुरुंग लावण्याचा प्रयत्नच कित्येक करीत होते.

परगावचे काही विद्यार्थी वार लावून महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. त्यांपैकी काहीजण ॲड. श्री. रेणूकादासराव देशमुख यांच्याकडे सकाळी अगर सायंकाळी वार लावलेला म्हणून जेवायला जात असत. त्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात घडलेला, घडत असलेला वृत्तांत श्री. रेणूकादासरावांना सांगितला. ऐकलेल्या वृत्तांताने श्री. रेणूकादासराव क्षणभर भारावून गेले. जेवण आटोपल्यावर बहिष्काराचे आंदोलन छेडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या म्होरक्यांबरोबर वार्तालाप करण्याची त्यांची इच्छा असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. वार लावून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अमाप उत्साह भरला. त्यांनी पायपीट करून, बहिष्कार टाकण्याचा निर्धार केलेल्या ३२ विद्यार्थ्यांच्या गाठीभेटी घेतल्या व सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ३२ विद्यार्थ्यांसमवेत श्री. रेणूकादासराव वकील यांचे घर गाठले. ११ विद्यार्थी-म्होरक्यांचाही त्यात समावेश होता. ते सारे देशमुख यांच्या कार्यालयात गेले. विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून दिला व आपला निर्धार अटळ असल्याचे एका दमात सांगितले. विद्यार्थ्यांचा निर्धार किती करारी आहे याची शहानिशा करण्यासाठी श्री. देशमुख साहेबांनी निरनिराळ्या प्रश्नांचा भडिमार करून विद्यार्थ्यांना गांगरवून टाकण्याची खटपट केली; संकटांची कल्पना दिली. काही काळ शिक्षणाचे मातेरे होण्याची भीती बोलून दाखविली तरी विद्यार्थी आपल्या निर्धारापासून जराही मागे हटले नाहीत. विद्यार्थ्यांच्या कडव्या निर्धाराने श्री. देशमुख प्रभावित झाले, भारावून गेले "आता मागे पाऊल टाकणे नाही. समोर येणाऱ्या संकटांचा विचार करू नका. ३२ विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय करून महाविद्यालयाची फी, बर्सरी इतकी रक्कम मी देईन. मी तुमच्या पाठीशी उभा आहे." असे ते म्हणाले. तेवढ्यात प्रो. इब्राहिम, तैय्यब यांच्या समवेत प्रा. सोमण शास्त्री, प्रा. गणेशराव थत्ते, प्रा. कुलकर्णी व प्रा. पं. वंशीधरजी, श्री. रेणुकादासराव देशमुख यांच्या कार्यालयात दाखल झाले. सर्वप्रथम प्रो. इब्राहिम यांनी, तेथे उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना बहिष्कारापासून परावृत्त करण्याची कळकळीची विनंती श्री. रेणूकादासराव यांना केली. प्रो. तैय्यब आणि त्यांच्या पाठोपाठ प्रा. थत्ते, प्रा. कुलकर्णी आणि प्रा. सोमण शास्त्री यांनीही तशीच विनंती केली. क्षणभर विद्यार्थी गांगरून गेले. त्यांच्या मनात सारखी कालवाकालव होऊ लागली, जवळपास दोन मिनिटे कोणीच काही बोलले नाही. श्री. देशमुख वकील काय बोलतात याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष होते. दोन मिनिटांच्या शांततेला वाचा फोडली ती श्री. रेणूकादासराव यांनी "आपण सर्व माझ्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक विद्वान आहात. मी एक साधा वकील आहे. तुम्ही शिल्पकार आहात, सरस्वतीचे उपासक आहात. या विद्यार्थ्यांना उद्याचे नागरिक तुम्हीच बनविणार आहात. तुम्हा मंडळींना तुमच्याच वृत्तीचा विसर पडलेला दिसतो. दसरा, सीमोल्लंघन याचा तुम्हाला विसर पडला आहे हे सांगण्याची पाळी माझ्यावर आली आहे याचेच मला मनस्वी दुःख होत आहे. बहिष्कार टाकण्याच्या निर्धाराने उचललेले पाऊल मागे घ्या असे मी कोणत्या तोंडाने या विद्यार्थ्यांना सांगू? हैदराबाद राज्याचे पंतप्रधान पहिल्यानेच येथे येत आहेत, त्यांचा आदरसत्कार मनोभावाने केला गेला पाहिजे याबाबत दुमत असूच शकत नाही. तरी, हिंदु लोकांचा विजयादशमीचा सण व सीमोल्लंघनाचे

अनुक्रमणिका

महत्त्व दृष्टीआड कसे करता येऊ शकेल? या विद्यार्थ्यांनी तुम्हाला जागे केले आहे. आता तुम्ही झोपेचे सोंग घेऊ नका. विद्यार्थ्यांची दिशाभूल करू नका. या विद्यार्थ्यांना तुम्ही धमक्या दिल्या आहेत, त्यांच्या शैक्षणिक जीवनामध्ये तुम्ही लोक ज्या अडचणींचे डोंगर उभे करणार आहात याची मी नोंद घेतली आहे. मी त्यांच्या पाठीशी उभा आहे. सभ्यपणाचा प्रकार म्हणून मी तुम्हा लोकांना माझ्या घराबाहेर जायचे सांगितले नाही. कृपा करून आता माझा अधिक वेळ घेऊ नका." मोठी आशा धरून आलेली प्राध्यापक मंडळी वकीलसाहेबांचे हे सडेतोड उत्तर ऐकून जड अंतःकरणाने त्यांच्या घराबाहेर पडली.

श्री. रेणुकादासराव यांनी विद्यार्थ्यांकडे वळून विचारले, 'तुमच्यापैकी इंग्रजी भाषेवर कोणाचे प्रभुत्व आहे? तारेचा मजकूर इंग्रजीत कोण चांगला लिहू शकेल?' इंग्रजी लिहिण्याचा सराव नसल्याने उपस्थित विद्यार्थ्यांपैकी कोणीही पुढे येऊ धजला नाही. विद्यार्थ्यांची असमर्थता श्री. देशमुखांच्या लक्षात आली. श्री. देशमुख वकीलांनी जवळ उभ्या असलेल्या विद्यार्थ्याला सांगितले, 'जा समोरच्या घरातून शंकरला बोलावून आण.' श्री. देशमुखांनी सर अकबर हैदरी यांना पाठवावयाच्या तारेचा आशय सांगितला. मी तारेचा मजकूर स्वच्छ व सुवाच्य अक्षरात लिहिला: 'आम्ही आपले हार्दिक स्वागत करणे हे आमचे आद्य कर्तव्य समजतो. परंतु दसरा आणि सीमोल्लंघन विसरू शकत नाही. कृपया आपल्या आगमनाचा दिवस बदलून उपकृत करावे.' हा मजकूर श्री. देशमुख यांना आवडला, त्यांनी तो मान्य केला. लागलीच तातडीची जवाबी तार श्री. देशमुख यांच्या नावाने पाठविण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता पंतप्रधान सर अकबर हैदरी यांच्या खाजगी सचिवाची तार आली. श्री. रेणूकादासराव देशमुख, वकील यांच्या विनंतीप्रमाणे पंतप्रधान सर अकबर हैदरी यांचा औरंगाबादेतील कार्यक्रम एक दिवस पुढे ढकलण्यात आला आहे, अशा आशयाचा मजकूर तारेत लिहिलेला होता. श्री. रेणूकादासराव देशमुख वकिलांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी अशा रीतीने आपल्या निर्धाराची हैदराबादच्या राजवटीला पहिली सलामी दिली.

हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीच्या विभागात आणि ब्रिटीशांच्या अमलाखाली असलेल्या सर्व संस्थानांत बहुतेक कार्यक्रमांच्या शेवटी 'गॉड सेव्ह दी किंग' हे गीत म्हटले जाई व त्या गाण्याच्या प्रारंभापासून तो थेट शेवटचा शब्द उमटेपर्यंत प्रत्येक सभा समारंभासाठी जमलेल्या लोकांना शांतपणे दृष्टी खाली करून उभे राहावे लागे. त्याच धर्तीवर हैदराबाद संस्थानच्या मीर उस्मान अलीखान याचे राज्य सतत टिकावे व त्याला दीर्घायुष्य लाभावे अशा आशयाचे एक गीत सर्व शाळा व महाविद्यालयांच्या प्रार्थनेच्यावेळी म्हणवून घेतले जात असे.

हैदराबाद या राजधानीच्या आलीशान शहरात श्री. वामनराव नाईक, बॅ. रामचंद्र नाईक, गानू आदी नेमस्त आणि मवाळ विचार धारेचे लोक राहात असत. अधून मधून नाईक कुटुंबातील, कोरटकर कुटुंबातील मंडळी धार्मिक व सामाजिक उत्सवाच्या निमित्ताने संस्थानातील निरनिराळ्या शाळांच्या सभागृहात आपले विचार मांडीत असत. निझामी राजवटीचा, मुस्लिम धार्जिण्या मनोवृत्तीचा वरवंटा जनमानसावर सारखा फिरवला जात होता. जनमानसाचा स्वाभिमान पार दबून गेला होता. सर्व प्रकारे सर्रास मुस्कटदाबी, गळचेपी चालू असताना अन्यायाला कंठ फुटत नव्हता. निझामी राजवटीच्या मनमानेल तशा कारभाराने संस्थानची प्रजा हवालदिल बनली होती. उद्या येणारा दिवस काय वाढून घेऊन येतो या काळजीने लोकांना शांत झोप येत नसे.

अनुक्रमणिका

सर्वत्र स्मशान शांतता पसरली असताना शासनाचे खुशमस्करे, भाट, चुगल्या खाणारे मात्र काहीही घडत नसताना खोटेनाटे सांगून अर्धमेल्या जनतेला सतावून सोडत असत.

हैदराबाद या राजधानीच्या शहरात बड्याबड्यांनी मौनव्रत स्वीकारले होते. मराठवाडा विभागातील औरंगाबाद आदी जिल्ह्यांत आणि शहरांतही दुसरे काय असू शकणार? श्री. वामनराव, रामचंद्र नाईक, विनायकराव कोरटकर यांच्या आगमनाने औरंगाबाद शहरातील काही मवाळ नेमस्ताचे ध्येयधोरण अंगिकारलेल्या जेष्ठ वकीलमंडळीत काही प्रमाणात सामाजिक व धार्मिक उत्सव साजरे करण्याची प्रथा जन्म पावली. धार्मिक सामाजिक उत्सावांतही सहभागी होणाऱ्यांची संख्या मोजकीच होती. उत्सवाच्या प्रसंगी बोलताना तोलूनमापूनच बोलले जात असे. समारंभाला अध्यक्ष सहजासहजी मिळत नसे. योगायोगाने अध्यक्ष मिळालाच तर तो काय बोलणार हे समारंभापूर्वी सरकारला लेखी कळवावे लागे.

ताई महाराजांच्या खटल्यानिमित्त लोकमान्य टिळक औरंगाबादेत आले होते; तेव्हा पासून गणेश उत्सव हा एक धार्मिक आणि सामाजिक उत्सव म्हणून येथे साजरा केला जाऊ लागला. जॅक्सनच्या खुनाचे धागेदोरे औरंगाबादेत सापडले. जॅक्सनचा खून करणारा हुतात्मा अनंत कान्हेरे हा मूळचा कोकणातला. तो औरंगाबादला आपल्या मामाकडे राहत असे. अन्यायाची मनस्वी चीड श्री.अनंत कान्हेरे यांच्या बलिदानाने सिद्ध झाली.

राष्ट्रीयत्वाचे वारे हैदराबाद संस्थानाबाहेर, औरंगाबाद शहरापासून, अदमासे १०० किलोमीटर अंतरापासून, ते थेट मुंबई शहरापर्यंत वाहात होते. मात्र राष्ट्रीयत्वाच्या वाऱ्याची साधी झुळुकही औरंगाबाद शहारातील नागरिकांच्या मनाला स्पर्श करू शकली नाही. जे काय संस्थानाबाहेर, शेजारी घडत होते त्याचे यथार्थ दर्शन मराठवाड्यातील जनतेला झाले नाही. येथील जागरूक, समंजस म्हणवून घेणाऱ्यांना राष्ट्रीयत्वापेक्षा हैदराबाद संस्थानचा राजा सुलतान बंदेगान आली निझाम अधिक प्यारा होता. त्या महाभागांना राष्ट्रीयत्वाच्या झोतात दिपून जायचे नव्हते. अंधारात राहणे त्यांना मान्य होते हेच खरे. येनकेन प्रकारे मराठवाड्यातील जनता अंधारातच ठेचाळत होती.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, तो मी मिळवीनच' ही लोकमान्य टिळकांची आरोळी मराठवाड्यातील जनतेला बरीच वर्षे समजली, उमजली नाही. स्वराज्याचा अन्वयार्थ सर्वसामान्य जनतेला कित्येक वर्षापर्यंत समजूच शकला नाही. ज्यांना समजला उमजला होता त्यांनी तो जनमानसापर्यंत जाऊच दिला नाही. या विभागातील, शहरातील सर्वसाधारण प्रजा अंधश्रद्धेने पार भारावलेली होती. संस्थानिकांच्या विशिष्ट पद्धतीच्या कारभाराने सामान्य जनता भयभीत झालेली होती. त्यात शेकडा पंचाण्णव टक्के जनता अक्षरशत्रू होती. लोकमान्य टिळक मराठी भाषिक होते. तरी त्यांचे सूत्र, त्यांची शिकवण मराठी भाषिकांनी स्वतः तर आत्मसात केलीच नाही. इतरांनाही करू दिली नाही.

## खादीचा विटाळ

महात्मा गांधीचा चरखा, टकळी व त्याचे महत्व अनेकांना समजले नाही. चरखा, खादी, स्वतः कातलेल्या सुताची खादी तयार करून तिचा वापर करण्याची योजना औरंगाबादेत, मराठवाड्यात रूजू शकली नाही. खादीचा प्रसार व खादीचाच वापर व्हावा यासाठी बाबू रूपनारायणजी यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. प्रथम त्यांनी औरंगाबाद शहरात चार ठिकाणी सूतकताईची केंद्रे स्थापन केली. त्या कार्याला आणि प्रयत्नांना नाममात्र प्रतिसाद मिळाला.

कालांतराने औरंगाबादेत राजकीय परिवर्तनाबाबत श्री. आनंद कृष्ण वाघमारे, श्री. अच्युतभाई देशपांडे, श्री. गोविंदभाई श्रॉफ तसेच श्री. चंद्रगुप्त चौधरी, श्री. विठ्ठलभाई चौधरी, श्री. व्ही. डी. देशपांडे, श्री. हबिबुद्दीन, श्री. इफ्तेकार ही मंडळी विद्यार्थ्यांबरोबर, कामगारांबरोबर संपर्क साधून विचारांची देवाणघेवाण करू लागली. प्राप्त परिस्थितीत खादीचा प्रसार व विद्यार्थ्यांबरोबर चर्चा सत्र सुरू करण्याचे प्रयत्न केले गेले. श्री. जयप्रकाशजी नारायण यांच्या समाजवादाचा ओनामा या विषयांतर्गत विद्यार्थ्यांची बौद्धिके घेतली जाऊ लागली. महत्प्रयासाने औरंगाबाद शहरात जेमतेम ५० विद्यार्थ्यांचे बौद्धिक नियमितपणे घेतले जाऊ लागले. काही विद्यार्थी नियमित तर काही विद्यार्थी अधूनमधून येत असत; तरी विद्यार्थी बौद्धिकामध्ये रस घेऊ लागले, शंका कुशंका विचारल्या जाऊ लागल्या, खुल्या दिलाने चर्चा होऊ लागली. अशा प्रकारे राष्ट्रीयत्वाची विचारधारा, विद्यार्थ्यांद्वारे जनमानसात रुजविण्याच्या कार्याला प्रारंभ झाला.

पंडित मोतीलालजी नेहरू यांच्या पुण्यतिथीदिवशी श्री.गोविंदभाई यांनी खादीचा प्रसार व प्रचार करण्याच्या उद्देशाने खादी फेरी काढण्याचे ठरविले होते. खादी फेरीच्या कार्यक्रमात श्री. गोविंदभाई यांनी मला सहभागी करून घेतले होते. औरंगपुरा विभागातील एकनाथ मंदिराच्या आवारात श्री. कर्वे गुरुजी राहात असत. श्री. कर्वे गुरुजींचा आशीर्वाद घेऊन त्यांच्याच घरापासून खादीच्या विक्रीचा शुभारंभ करण्याचे श्री. गोविंदभाई यांनी ठरविले. सकाळी सात वाजता, खादीचे विविध प्रकार बरोबर घेऊन श्री. गोविंदभाई, व्ही. डी. व मी श्री. कर्वे गुरुजींच्या घरात प्रवेश केला. श्री. कर्वे गुरुजींनी गहिवरलेल्या अंतःकरणाने श्री गोविंदभाईंचे स्वागत केले. त्यावेळी त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहात होत्या. सौ. कर्वे काकूंनीही प्रेमभराने स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. खादी विक्रीचा प्रारंभ झाला तो श्री. कर्वे गुरुजींच्या घरापासूनच. एकनाथ मंदिराच्या आवाराखालच्या व वरच्या माळ्यावर बरीच कुटुंबे राहात असत. त्यापैकी बहुतेक लोक सरकारी कर्मचारी होते. श्री. कर्वे गुरुजींच्या दारातून बाहेर पडलो. त्यावेळी त्यांच्या आजूबाजूच्या बहुतेक कुटुंबियांच्या घराचे दरवाजे आतून बंद केलेले दिसून आले. बंद दाराची कडी वाजवली व ‘दार उघडा, आम्ही खादी विक्रीसाठी आलो आहेत.’ असे आम्ही मोठ्याने सांगितले. बहुतेकांनी साधा प्रतिसादही दिला नाही. दार न उघडताच आतून सांगितले, ‘नको रे बाबा, तुमची ती पांढरी अशुभ टोपी, आम्हाला खादी घ्यायची नाही. खादी विकत घेऊन सरकारचा रोष ओढवून घ्यायचा नाही. आम्हाला विकत श्राद्ध नको.’ पाणी विभागाचे इंजिनियर श्री. रामकृष्ण यांनी मात्र शंभर रूपयांची खादी घेतली. औरंगपुरा विभागातून फक्त पाच कुटुंबियांनी खादी विकत घेतली. दिवसभर पायपीट करून सायंकाळपर्यंत पंधराशे रुपये किंमतीची खादीची विक्री झाली. खादी विकत घेण्यासाठी लोकांच्या मनाची तयारी नव्हती. लोकांनी सरकारचा धसका घेतलेला होता. खादी परिधान करणारा सरकारी अधिकारी व कर्मचारी सहज ओळखता येत असे. त्यामुळे इच्छा असूनही काही लोक

सरकारच्या डोळ्यात सलू नये म्हणून खादी विकत घेत नसत, परिधान तर करीतच नसत. वकील, डॉक्टर, व्यापारी आदी नागरिक खादी वापरण्याचे टाळीत असत. खादीची टोपी तर कधीच परिधान केली जात नसे. हैदराबाद संस्थानच्या शासनकर्त्यांनी त्यांच्या मनमानेलशा धोरणाची लादालादी करून सामान्य नागरिकांना त्रस्त अन् हवालदिल केले होते. याची खरीखुरी साक्ष खादी विक्रीच्या निमित्ताने मिळाली.

श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. आनंदराव वाघमारे व श्री. अच्युतभाई देशपांडे यांच्याकडे मी जणू गुरुत्वाकर्षणाने ओढला गेलो. मी गोविंदभाईंबरोबर जवळीक करण्याचा भरपूर प्रयत्न केला परंतु त्यांच्या मनाचा कधीच ठाव घेता आला नाही. जेव्हा केव्हा मी गोविंदभाईकडे जायचो तेव्हा तेव्हा ते मला विचारावयाचे, 'काय काम आहे?' त्यांनी मला काम सांगावे व मी ते काम पार पाडावे असे वाटायचे परंतु ते माझ्याबरोबर खुल्या दिलाने कधीच बोलत नसत. बहुतेक वेळा ते त्यांच्या विचारात गर्क असत. मी त्यांच्या मनात भरलो नसावा. माझ्या विषयी त्यांच्या मनात काही शंका कुशंका असावी. ते मला सरकारधार्जिणा समजत आसावे. मी हेरगिरी करीत असेन असा त्यांचा समज झाला आसावा. मी आपल्यापरीने त्यांच्या जवळ जाण्याचा भरपूर प्रयत्न करीत होतो, तरी आमच्या दोघांमधील दूरत्वाची दरी काही केल्या कमी होत नव्हती. काय केले म्हणजे ते मला आपला समजतील यासाठी मी सतत धडपडत होतो. श्री. गोविंदभाईबद्दल माझ्या मनात नितांत आदर होता. त्यांना मी इतरांपेक्षा निराळे समजत होतो. त्यांच्या डोळ्याला डोळा लावणे मला शक्य नव्हते.

सौ. आशाताई वाघमारे या पूर्वाश्रमीच्या श्रीमती हरणाबाई. त्यांच्यामुळे मी आनंदरावांकडे जाऊ लागलो. परंतु श्री. आनंदरावांबरोबर खुल्या दिलाने बोलण्याचा कधीच प्रसंग आला नाही. तसेच त्यांच्या तोंडून काही ऐकावयालाही मिळाले नाही. नेहमी ते आपल्या विचारांत दंग असत. मला त्यांचे आकलन झाले नाही. श्रीमती हरणाबाईंच्या सांगण्यावरून ते मला 'शंकरलाल' या नावाने ओळखत असावेत. मला स्वतःचे घर नव्हते. खिशात पैसे नव्हते. नोकरी करावयाची माझी इच्छा नव्हती. पैशाअभावी व्यापार करता येऊ शकत नव्हता. मी माझ्या आयुष्यात बऱ्याच हालअपेष्टा भोगल्या आहेत. मला सरकारी नोकरी करावयाची नव्हती, उपाशीपोटी राहाता येऊ शकत नव्हते. मी कोणाच्या तरी आधारासाठी भटकत होतो. योगायोगाने प्रो. इब्राहिम यांनी, औरंगाबादचे जिल्हाधिकारी श्री. बरकतराय यांच्या पत्नीचा खाजगी सचिव म्हणून नोकरी मिळवून दिली. माझ्या व माझ्या वडिलांच्या पोटाची खळगी भरण्याचा प्रश्न सुटला. श्रीमती बरकतराय यांच्या निरनिराळ्या कामासाठी मला जवळपास दररोज तीन चार तास जिल्हाधिकारी श्री. बरकतराय यांच्या 'गुलशन महाल', या बंगल्यात राहावे लागल्याने जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील प्रमुख अधिकाऱ्यांची अन् कारकुनांची व माझी ओळख झाली; जवळीक झाली. श्रीमती बरकतराय यांच्या खास कामानिमित्त मला मधूनमधून जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात जावे लागे. त्यामुळे थोड्या अवधीत मी एक विशेष व्यक्ती असल्याचे समजले जाऊ लागले. कामानिमित्त अधिक वेळ बंगल्यात राहावे लागले तर जिल्हाधिकारी यांच्या मोटारीत मला घरी पोहचवले जाऊ लागले. जिल्हाधिकारी यांच्या बंगल्यातील व कार्यालयातील माझ्या जाण्यायेण्याबाबतचे वृत श्री. वाघमारे यांना श्री. बाजीराव शिंदे यांच्याकडून कळाले. माझ्याबाबत, मला जराही सुगावा लागू न देता, काही ठोकताळे श्री. आनंदराव वाघमारे यांनी बसविले. मला वाचनाची आवड असल्याचे श्री. वाघमारे यांना परस्पर समजले. त्यांनी व श्री. अच्युतभाई देशपांडे यांनी काही पुस्तके वाचावयास दिली. पुस्तकांच्या वाचनाने मी विचार करू लागलो. हिंदुस्थानच्या नेत्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्यासाठी मी हर प्रकारचे प्रयत्न केले. योगायोगाने मला फैजपूर आणि मुंबई येथे अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाला जाता आले.

अनुक्रमणिका

बहुतेक भारतीय नेत्यांचे जवळून दर्शन घेता आले; त्यामुळे माझ्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटू लागले. देशासाठी, देशबांधवासाठी स्वातंत्र्यासाठी जमेल ते काम करावे, याच्या ऊर्मी माझ्या मनात उफाळून आल्या. अखिल भारतीय काँग्रेसचा तिरंगा ध्वज, त्याची प्रतिष्ठा, ध्वजारोहणाचा कार्यक्रम ठरलेल्या वेळेप्रमाणेच करावयाचे महत्त्व इत्यादी गोष्टींनी मी भारावून गेलो. औरंगाबादेतील, मराठवाड्यातील जनतेचे मी देणे लागत होतो, हे मला मनोमन पटले. भारतीय नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी, सर्वसाधारण नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी जे काय केले तसेच मी औरंगाबादेतील, मराठवाड्यातील सामान्यासाठी करावे असेच सतत वाटू लागले फैजपूरच्या अधिवेशनात मला श्री. बाळासाहेब खेर यांच्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. माझ्याकडे सोपविलेले काम मी अत्यंत चोख बजावत गेलो. मी श्री. बाळासाहेब खेर यांची मर्जी संपादन केली. मी केलेल्या कामगिरीच्या निमित्ताने श्री. खेर यांनी 'टाईम्स ऑफ इंडिया'चा बातमीदार म्हणून मला काम मिळवून दिले. काही काळ छोट्याछोट्या बातम्यांपलीकडे जाऊ शकलो नाही . बातमीदार म्हणून मी काम केलेले नसल्याने, मला त्या कामाचे मर्म समजायला थोडा वेळ लागला. श्री. मुतन्ना नावाचे औरंगाबाद येथील पॉवर हाऊसचे मुख्य अधिकारी होते. त्यांचे व इतर अधिकारी, कर्मचारी यांचे कधीच बनत नसे. एकदा थोड्याशा बेपर्वाईमुळे डिझेलच्या टाकीला आग लागली व ती जोमाने भडकली; आग लवकर आटोक्यात आणता आली नाही. मी पाठवलेली ती बातमी 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रात पहिल्या पानावर झळकली. त्या प्रकरणाच्या तपासासाठी हैदराबाद येथून वरिष्ठ अधिकारी आले. आग का लागली याबाबतची रीतसर तपासणी केली गेली. सदैव सर्वांबरोबर हिडीसफिडीस करणारे श्री. मुतन्ना यांचा पारा उतरला. 'टाईम्स'चा मी बातमीदार म्हणून त्यानी माझा धसकाच घेतला. शहरातील बहुतेक अधिकारी वर्गात बातमीदार म्हणून या घटनेनंतर मी ओळखला जाऊ लागलो.

औरंगाबादेतील गणेश उत्सवाने शहरात एक आगळे स्थान मिळविले होते. जवळपास ४० गणेश मंडळांद्वारे आरास, देखावे उभे करून शहरातील नागरिकांना आकर्षित केले होते. तसेच जवळपास ११ गणेश मंडळांच्या मेळ्यांनी बाल-बालिकांच्या वैयक्तिक व सामूहिक सुरेल आवाजाला, गोड संगीताचा साज देऊन जनमानसाला मंत्रमुग्ध केले होते. मेळ्यांच्या गीतांचा आशय केवळ धार्मिक राहिला नव्हता, त्यात सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय विचार ऐकू येऊ लागले होते. मेळ्यांच्या संमेलनाची रात्र कधी संपून गेली याचे भान नागरिकांना, बाल-बालिकांना राहात नसे. औरंगाबादेतील गणेश उत्सव औरंगाबाद जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाडा विभागात गाजला. गणेश उत्सवाच्या शेवटच्या तीन-चार दिवसाचे कार्यक्रम व विसर्जनाची मिरवणूक बघण्यासाठी निरनिराळ्या तालुक्यातून व जिल्ह्यातून लोक येत असत. समाजपरिवर्तनाच्या प्रत्यक्ष कार्याचा श्रीगणेशा औरंगाबादेतील गणेश मंडळानेच केला होता. समाजपरिवर्तन, राष्ट्रीयत्व, एकात्मता, सर्वधर्मसमानता या विचारांच्या गाण्याचे गीतकार होते श्री. कर्वे गुरुजी. दत्तोपंत पद्माकर बुवा, बापूराव हरसूलकर, व्यंकटेशराव धारवाडकर, शंकरलाल पुरवार, यमुनाबाई केळकर इत्यादींनीही त्यांच्या गीताद्वारे बरेच काही सांगितले. दिशा दाखविली. गणेश भक्त मंडळ, हनुमान बाल गणेश मंडळ, बलभीम गणेश मंडळ व रोहिदास गणेश मंडळाचे मेळे बरेच गाजले. गणेश भक्त मंडळ, हनुमान बाल गणेश मंडळ, रघुवीर गणेश मंडळ आणि छत्रपती गणेश मंडळाद्वारे सादर करण्यात येणाऱ्या देखाव्यांत सारखी चढाओढ लागलेली दिसून येत असे. त्यासोबत भारत विजय गणेश मंडळाद्वारे व्याख्याने आयोजित केली जात. लोकमान्य टिळक यांना अभिप्रेत असलेला गणेश उत्सव केवळ धार्मिक उत्सव न राहाता एक विशेष प्रकारचा सामाजिक उत्सव बनला होता. छत्रपती गणेश मंडळाद्वारे सादर केलेल्या महात्मा गांधी व बॅ. महमंद अली जिना यांच्या ऐतिहासिक

भेटीच्या देखाव्याने एक आगळे स्वरूप प्राप्त केले होते. काही जात्यंध मुस्लिमांनी त्या देखाव्याला कडाडून विरोध केला. तलवारी-बंदुका बाहेर पडल्या. वातावरण तापले. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी वेळीच त्याची दखल घेतली म्हणून हिंदु-मुस्लिमांची दंगल झाली नाही. महात्मा गांधी व कायदे आझम बॅ. महंमद अली जिना यांच्या ऐतिहासिक भेटीची छायाचित्रे पूर्वी अनेक दैनिकात, पाक्षिकात छापली गेली असल्याचे जातीयवादी मुस्लिमांना पटवून दिले गेले. त्यामुळे जातीय दंगलीचे गालबोट औरंगाबादला त्यावेळी लागले नाही. तो ऐतिहासिक देखावा उभा केला तो सर्वपरिचित, चित्रकार श्री. पुंडलिकराव रांजणगावकर यांनी. त्या देखाव्यासाठी श्री. बाबुराव जाधव, नानासाहेब जेधे, हिरू जगताप आणि मी साह्य केले होते. त्या देखाव्याच्या कल्पनेचा जनक मी होतो. जवळपास दोन तास मुस्लिमांनी हैदोस घातला होता. दंगलीचे स्वरूप दिसू लागले होते. थव्याथव्यांनी फिरणाऱ्या आबालवृद्धांनी व महिलांनी आपआपली घरे गाठली. धावपळ सुरू होती. सुदैवाने वातावरण शांत झाले.

आपआपल्या घरांची दारे, खिडक्या लावून घरात बसल्या बसल्या अनेकजण घरातल्या मंडळींना सांगत होते. 'परिस्थितीचा विचार न करता काही लोक, काही तरी वेडेवाकडे करतात अन् अकारण अशांतता निर्माण करून वातावरण गढूळ करतात'. समाजाच्या धुरिणांनी शेलक्या शब्दांचा आहेर दिला. कौतुक मात्र केले नाही. औरंगाबाद शहरात गणेशाच्या स्थापनेपासून तो थेट श्रीच्या विसर्जनाचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडत आला. औरंगाबाद जिल्ह्याच्या पैठण नगरीत मात्र जात्यंध, आडदांड मुस्लिमांनी एका वर्षी श्रींची विसर्जनाची वाजत गाजत चाललेली मिरवणूक अधेमधेच अडवली. नेहमीचा रस्ता बदलण्यास सांगून पेचप्रसंग निर्माण केला. श्रींच्या विसर्जनाची मिरवणूक पुढे सरकू दिली नाही. जात्यंध, आडदांड मुस्लिमांचा निषेध नोंदविण्यासाठी पैठणच्या नागरिकांनी श्रींचे विसर्जन केले नाही. थेट हैदराबादपर्यंत हे गाऱ्हाणे नेण्यात आले परंतु निझामाने अन् त्याच्या जातीयवादी राज्यकर्त्यांनी अनेक वर्षे मिरवणुकीस परवानगी दिली नाही.

एकदा औरंगाबाद शहर व जिल्ह्यातील सर्वप्रकारच्या हस्तकलेच्या वस्तूंचे एक प्रदर्शन भरविण्याचे श्री. गोविंदभाई यांनी त्यांच्या मित्रमंडळीबरोबर विचारविनिमय करून ठरविले. शहरातील प्रतिष्ठित नागरिक श्री. राय छोटेलालजी टंडन यांचे आशीर्वाद व सहकार्य देण्याचे आश्वासन मिळविले. प्रदर्शन भरविण्याचा उद्देश होता, शहरातील व जिल्ह्याच्या सर्व तालुक्यातील निरनिराळ्या व्यवसायात काम करणाऱ्या कलावंतांच्या, कामगारांच्या वस्तू जनतेसमोर मांडाव्यात व त्याला प्रसिद्धी प्राप्त करून द्यावी. त्या कलाकारांच्या कलाकुसरीच्या वस्तूंचे कौतुक केले जावे व त्यांची विक्री व्हावी. त्यासोबत शिवणकामाचे विविध प्रकार, लोकरीच्या विणकामाचेही विविध प्रकार, चित्रकला, शिल्पकला, छायाचित्रे इत्यादींचा समावेश प्रदर्शनात करण्याचे ठरविले होते. श्रीमती आशाताई यांच्यासमवेत शहरातील निरनिराळ्या मोहल्ल्यातील महिलांना भेटून त्यांनी तयार केलेल्या अगर इतरांनी तयार केलेल्या हस्तकलेच्या वस्तू मिळवून एकत्रित करण्याचे काम श्री. गोविंदभाई यांनी माझ्याकडे सोपविले होते. शहरातील कलावंतांनी, कारागिरांनी, महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. त्या कामात सौ. मोतीबेन पटेल यांचे बरेच सहकार्य मिळत गेले. मिळविलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंची आवश्यक त्या माहितीसह व्यवस्थित मांडणी श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या सराफा विभागातील पाठशाळेच्या आवारात केली गेली. सदर प्रदर्शनाचे उद्‌घाटन मराठवाडा विभागाचे सुभेदार मौलवी गुलाम अहमद खान यांच्याच हस्ते करावयाचे, श्री. राय छोटेलाल टंडन यांच्या सूचनेवरून ठरविण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्याबाबत निमंत्रण देण्यासाठी श्री. छोटेलालजी टंडन यांच्यासमवेत श्री. गोविंदभाई

अनुक्रमणिका

श्रॉफही गेले. मौलवी गुलाम अहमद खान, सुभेदार यांनी प्रदर्शनाचा उद्देश व त्यात ठेवण्यात आलेल्या निरनिराळ्या वस्तूंबाबत खोलवर विचारपूस करता करता, त्यात आक्षेप असणारे तर काही नाही ना? तसेच प्रदर्शनाचा उद्देश राजकीय तर नाही ना? यासंबंधी खात्री पटवून घेतल्यानंतरच प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्याचे मान्य केले. या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या चार महिन्यांपूर्वी त्यांना एका प्रकरणात सरकारतर्फे साक्ष द्यावी लागली होती. त्यावेळी परमेश्वराची शपथ घेण्याचे त्यांनी मान्य केले नाही. ‘मी ईश्वर अल्ला मानीत नाही. मानवधर्म हाच माझा धर्म आहे.’ असे भर कोर्टात सांगणारे सुभेदार मौलवी गुलाम अहमद खान निझामी राजवटीच्या राज्यकर्त्यांनी आखून दिलेल्या चौकटीबाहेर जाऊ शकले नाहीत. त्यांना निझाम राजवटीला जराही नाराज करावयाचे नव्हते व सुभेदार म्हणून नोकरी करावयाची होती, ती टिकवून ठेवायची होती. राज्यकर्त्यांबरोबर इमाने इतबारे वागण्यामुळे त्यांना ‘मनसबजंग’ हा बहुमानाचा किताब मिळाला. प्रदर्शनाच्या निमित्ताने श्री. गोविंदभाईनी शहरातील निरनिराळ्या व्यवसायातील कारागीर, कलाकार, कामगार महिला आणि विद्यार्थ्यांचा फार मोठा गट एकत्र आणला. मी प्रदर्शनाच्या कामात सहभागी होऊ शकलो, प्रदर्शनाच्या कामात एकरूप झालो म्हणून अनेक वेळा मला श्री. गोविंदभाई बरोबर बोलता आले. माझे विचार त्यांच्या समोर मांडता आले. त्यामुळे श्री. गोविंदभाई यांच्या बरेच जवळ जाऊ शकलो होतो. तरीही श्री. गोविंदभाई यांनी त्यांच्या मनाचे बरेच कप्पे बंदिस्त ठेवले होते. त्यामुळे त्यांचे विचार अनेकांना बराच काळ समजले-उमजले नाहीत. मी कधीही कोणत्याही कामाचा कंटाळा आल्याचे सांगितले नाही. माझ्यावर सोपविलेले काम मी माझ्या पद्धतीने लवकरात लवकर पार पाडण्यासाठी सारखी धडपड करीत असल्याचे श्री. वाघमारे यांनी अत्यंत बारकाईने न्याहाळले, जवळून पाहिले. मला न कळत मी त्यांचा विश्वास संपादन केला.

**

अनुक्रमणिका

# महाराष्ट्र परिषद

निझामी राजवटीच्या अन्यायी धोरणांचा वरवंटा मराठवाड्यातील हिंदु-मराठी भाषिकांवर भरवेगाने फिरू लागला. मराठी माध्यमातून शाळा काढण्याचा अर्ज प्रथमदर्शनीच नकारांनी निकालात काढला जाऊ लागला. सातत्याने पाठपुरावा केला तर तात्पुरती परवानगी दिली जाई व त्या शाळेचा विस्तारच होणार नाही यासाठी निरनिराळे अडंगे उभे केले जात. हैदराबादेतील श्री. गोविंदराव नानल आणि श्री. काशिनाथराव वैद्य यांनी १९३५ मध्ये ‘महाराष्ट्र परिषद’ नावाची एक संस्था कायम करण्याचा प्रयत्न केला. अनेक अडीअडचणींचा सातत्याने सामना करीत करीत महाराष्ट्र परिषद स्थापन करण्याची परवानगी मिळाली. महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन १९३७ च्या जून महिन्यात श्री. गोविंदरावजी नानल वकील यांच्या अध्यक्षतेखाली परतूड या जहागीर असलेल्या गावात घेण्याचे निश्चित करण्यात आले. परतूड येथे भरणाऱ्या महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाला नेमस्त, मवाळ तसेच निझाम राजवटीबरोबर मिळतेजुळते घेऊन काम करू इच्छिणाऱ्यांचीच भाऊगर्दी मोठ्या प्रमाणावर होईल याची जाण ठेवून श्री. आनंदराव वाघमारे, श्री. व्ही. डी. देशपांडे, श्री. विठ्ठलभाई चौधरी व श्री. चंद्रगुप्त चौधरी यांनी एकत्र बसून, विचारविनिमय करून एक राजकीय पत्रक तयार केले. ते पत्रक जहाल विचारधारांनी ओतप्रोत भरलेले होते. पत्रक छापायचे कोठे व कोणता छापखाना छापील या बाबतचा पेचप्रसंग समोर आला. ते पत्रक तयार केले जात असताना मी श्री. आनंदराव वाघमारे यांच्या घरी जात-येत होतो; मात्र काही तरी गुपित काम चालू असल्याचे समजून मी चटकन निघून जात असे. एकदा श्री. आनंदराव वाघमारे यांनी मला त्यांच्या घरात बसवून घेतले व तयार केलेल्या पत्रकाचे हस्तलिखित वाचावयाला दिले. मी पत्रक वाचत असतानाच श्री. देशपांडे, श्री. चौधरी तेथे आले. तेवढ्यात मी ते हस्तलिखित पत्रक वाचून काढले. श्री. आनंदराव वाघमारे मला उद्देशून म्हणाले, ‘शंकरलाल, हे पत्रक तुझ्या नावाने स्वाक्षरीने, मुंबईला जाऊन तेथे छापून आणावयाची कामगिरी आम्ही तुझ्यावर सोपविण्याचे ठरविले आहे. आहे का तुझी तयारी?’ मी चटकन होकार दिला. ‘तुझ्या नावाने छापलेल्या या पत्रकामुळे कदाचित तुला अटक केली जाईल. पोलिसांचा जाच होईल’ वाघमारे म्हणाले. ‘काय व्हायचे असेल ते होऊ द्या. तुम्ही तयार केलेल्या या पत्रकामुळे जनमानसात थोडीफार तरी खळबळ माजेल. विचाराला चालना मिळेल. जनतेतली मरगळ जाईल’ मी म्हणालो. ‘तुमच्या नावाने हे पत्रक छापले गेले की, हैदराबादचे जुलूमी शासन एका दमात तुम्हा सर्वांना अटक करील. मग, आम्हाला मार्गदर्शक म्हणून कोणी राहाणार नाही. स्वखुषीने माझी तयारी आहे. सांगा पत्रक छापावयासाठी मुंबईला केव्हा जायचे?’ ‘आजच्याच रात्रीच्या गाडीने,’ सर्वांनी एका सुरात सांगितले. प्रवासासाठी, पत्रक छापण्यासाठी आवश्यक तेवढे पैसे व पत्रकाचे हस्तलिखित माझ्या हातात देताना श्री. आनंदराव वाघमारे म्हणाले, ‘शंकरलाल, करोडगिरीच्या नाक्यावर प्रत्येक व्यक्तीच्या सर्व सामानाची झडती घेतली जाते. म्हणून मनमाडकडून इकडे येताना, गाडीतल्या लोकांचा डोळा चुकवून, आगगाडीने नगरनाका ओलांडताच पत्रकाचा गठ्ठा शिताफीने डब्याच्या दाराबाहेर ढकलून दे. तसे करताना चुकून कोणाच्या लक्षात आलेच, तर आपल्या पुस्तकांचे पार्सल पडले; म्हणून नाटकी हळहळ करण्याची परकाष्ठा कर. औरंगाबादच्या रेल्वे स्टेशनवर उतरल्याबरोबर हिंदू तांगेवाला गाठून नगरनाक्याजवळील रुळाच्या बाजूने कुठेतरी पडलेला पत्रकाचा गठ्ठा उचलून तो तांग्यात ठेवून घरी जायचे.’ श्री. वाघमारे यांनी दिलेल्या सूचनांची पुरेपूर पूर्तता करून मी पत्रकांचा गठ्ठा सुखरूप आणला. परतूडच्या परिषदेत ते राजकीय पत्रक उपस्थितांना द्यायचे काम माझ्याकडे सोपविले असल्याने, परिषदेच्या प्रास्ताविकाला प्रारंभ होण्यापूर्वी मी

अनुक्रमणिका

त्या पत्रकाच्या प्रती सर्वांना दिल्या. जणू काय ते पत्रक माझेच आहे असे समजून काहींनी माझे कौतुक केले तर काहींना ते पत्रक झोंबले. पत्रक अवेळी, अनाठायी असल्याच्या प्रतिक्रिया अनेकांच्या चेहऱ्यावर उमटत होत्या. त्या मला सहज न्याहाळता आल्या. हैदराबादेतील आणि मराठवाड्यातील काही नेमस्त, मवाळ, सरकारधार्जिण्या लोकांच्या कपाळावर आठ्या पडत होत्या. काही लोक अधूनमधून माझा चेहरा न्याहाळत होते. श्री. आनंदराव वाघमारे, श्री. गोविंदभाई, श्री. व्ही. डी. देशपांडे, श्री. चंद्रगुप्त चौधरी, श्री. विठ्ठलभाई आदींची व माझी ओळख नसल्यासारखा अधिवेशनाच्या परिसरात, अधिवेशनाचा समारोप होईपर्यंत मी वावरलो. औरंगाबादला आल्यावर पोलिस खात्याने व गुप्तहेर खात्याने माझ्यावर निरनिराळ्या प्रश्नांचा भडिमार करून भंडावून सोडले. 'पत्रकाखाली माझे नाव आहे इतकेच! पत्रकातील मजकुराइतका चांगला मजकूर मला लिहिताच येत नाही. मला साधा निबंधही लिहिता येत नाही. येथील पुढाऱ्यांची व माझी घनिष्ट मैत्री नाही. त्यांचा माझ्यावर विश्वास असेल, असे मला वाटत नाही. मला त्या पत्रकाबाबत काहीही माहिती नाही. ते पत्रक कोणी लिहिले, कोणी छापले, कुठे छापले याबाबत कांहीही माहीत नाही.' इतके सांगून झाल्यावर माझ्या घराची कसून झडती घेण्यात आली. मला, माझ्या वडिलाना अनेक प्रकारच्या धमक्या दिल्या गेल्या. उठल्या-बसल्या पोलिस शिपाई-अधिकारी माझी विचारपूस करण्यासाठी माझ्या घरी घेऊ लागले. मी माझ्या निश्चयापासून जराही ढळलो नाही. परतूडहून परत आल्यावर दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर मी श्रीमती बरकत रॉय यांच्याकडे जाऊ लागलो. मागच्या आठ दिवसात आलेल्या वीसपंचवीस पत्रांची उत्तरे लिहिण्यासाठी तर काहीना स्मरणपत्रे, शुभेच्छांची पत्रे लिहिण्यासाठी मला बराच वेळ गुलशन महाल बंगल्यात राहावे लागले. उशिरापर्यंत थांबावे लागल्याने, मला जिल्हाधिकारी यांच्या खाजगी गाडीतून माझ्या घरी पोचवले गेले. मी जिल्हाधिकारी यांच्या खाजगी मोटारीत जातो-येतो म्हणून पोलिसांचा ससेमिरा थंडावला.

परतूड येथील महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाच्या कार्यक्रमात मी सहभागी व्हावे असे मला वाटत होते; तरी मी स्वतः होऊन श्री. वाघमारे आणि श्री. गोविंदभाईंच्या घरी जाण्याचे टाळत गेलो. माझी त्यांच्याबरोबर जवळीक आहे असे मला कोणालाही दिसू द्यायचे नव्हते. शिवाय मी राजकारणात रापलेला नव्हतो. शासकीय खात्याने नागरिकांपैकी काही लोक गुप्तहेर म्हणून नेमलेले होते. शहरात काही घडत नसताना पैशाच्या आमिषाने काही पांढरपेशातील महाभाग खोट्यानाट्या कपोलकल्पित गोष्टी गुप्तचर खात्याला अधून मधून सांगत असत. 'गुलशन महालात' माझ्या जाण्यायेण्याबाबत, जिल्हाधिकारी यांच्या मोटारीत जाण्याबाबत काही महाभागांनी अनेक तर्क-वितर्क वर्तविले. सरकारचा, जिल्हाधिकाऱ्यांचा मी हेर असल्याचेही सांगितले गेले. माझ्याबाबत गैरसमज पसरविण्यासाठी बऱ्याच कंड्या पिकविल्या गेल्या. माझ्यापासून जरा जपूनच राहावयाचा इशारा श्री. आनंदराव वाघमारे आणि श्री. गोविंदभाई यांना देण्यात आला. योगायोगाने त्यांनी त्या सल्लागारांच्या सल्ल्यावर विश्वास ठेवला नाही आणि मला विश्वासास अपात्र ठरविले नाही.

त्याच सुमारास मी विषमज्वराने आजारी पडलो. पंधरा दिवसानंतर ज्वर कमी झाला. कमालीचा अशक्तपणा आलेला होता. जराही परिश्रम सहन करता येत नव्हते. बिछान्यावर पडून होतो. मी आजारी असल्याबाबत श्रीमती राणी दयाकुंवर बरकत राय याना कळवू शकलो नाही. श्री. आनंदराव वाघमारे श्री. गोविंदभाई बरोबर माझी जवळीक असल्याचे औरंगाबादेतील काही तथाकथित मवाळ, नेमस्त सरकारजमा झालेल्या मंडळींना त्यांच्या पदरी बांधून घेतलेल्या काही बोलघेवड्या भाटांना कळाले होते. त्यांना त्यांचे समाजातील स्थान व सरकारची मेहेरनजर टिकवून ठेवावयाची होती. त्यासाठी त्या महाभागांनी मी, श्री. आ.

कृ. वाघमारे आणि श्री. गोविंदभाई यांचा दूत आहे. कॉंग्रेसचा हेर म्हणून मी घरात प्रवेश मिळविला आहे. असे अत्यंत कळकळीच्या आणि तळमळीने भरलेल्या शब्दात श्री. बरकत राय यांना आवर्जून सांगितले. श्री. बरकत राय हे जिल्हाधिकारी असूनही थोडेसे गोंधळून गेले. प्राप्त परिस्थितीचे गांभीर्य ओळखून श्री. व श्रीमती बरकत राय यांनी प्रो. इब्राहिमद्वारे माझी कसून चौकशी करवून घेतली.

विषमज्वरामुळे मी बराच अशक्त झालो होतो. संपूर्ण विश्रांतीचा, डॉ. मुजुमदार यांनी सल्ला दिलेला असताना मी राणी बरकत राय यांचे काम करू लागलो. दुसऱ्या खादी फेरीत दिवसभर वणवण फिरलो. दुसऱ्या दिवशी अंगात ताप भरला. पुन्हा विषमज्वराने आजारी पडलो. मी त्या आजारातून उठेन असे कोणालाही वाटत नव्हते. मला रक्त आणि गोल्ड इंजेक्शन दिले तर मी वाचू शकेन असे डॉक्टर मुजुमदार यांनी सांगितले. त्या काळात रक्ताच्या पेढ्या नव्हत्या. रक्तदान केले जात नव्हते, माझे आई-वडील साठीवर गेलेले होते. भरपूर प्रयत्न करूनही रक्त देणारा दाता मिळाला नाही. एके दिवशी सायंकाळच्या सुमारास माझे डोळे थिजल्यासारखे वाटू लागले. नाडीचे ठोके मंदगतीने पडू लागले. हातपाय गारठून गेले. हळूहळू शरीरातील ऊब कमीकमी होऊ लागली. आईवडिलांचे, जवळच्या आप्तांचे धाबे दणाणले. सगळेच देवाची आराधना करू लागले. सगळ्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहात होत्या. त्याच सुमारास श्रीमती राणी बरकत राय त्यांच्या जिवाभावाच्या मित्रमैत्रिणीसह माझी प्रकृती पाहाण्यासाठी आल्या. माझी अवस्था पाहून त्यांना स्वतःला दुःख आवरता आले नाही. डॉ. मुजुमदार म्हणाले, 'रक्त आणि गोल्ड इंजेक्शन मिळाले तर प्राण वाचवता येऊ शकेल.' श्रीमती राणी बरकत राय यांचे मित्र श्री. सैय्यद अली यांनी त्यांच्या पत्नी श्रीमती सिराजकडे पाहिले. त्यांनी रक्तदानासाठी त्यांचा हात डॉक्टर पुढे सरकविला. डॉ. मुजुमदार म्हणाले. 'यासोबत गोल्ड इंजेक्शन हवे आहे. शहरात ते मिळत नाही. लष्कराच्या दवाखान्यात मिळू शकेल.' श्रीमती बरकत राय, खुलदाबाद गेस्ट हाऊसचे प्रमुख अधिकारी सैय्यद अली, तातडीने मिलिटरीचे डॉ. कॅ. गोळे यांच्याकडे गेले. आजाऱ्याची अवस्था सांगितली. डॉ. कॅप्टन गोळे यानी चार सशक्त जवान, गोल्ड इंजेक्शन आणि इथर औषधी बरोबर घेतली व अवघ्या अर्ध्या तासात त्यांच्या समवेत श्रीमती बरकत राय माझ्या घरात दाखल झाल्या. डॉ. कॅ. गोळे आणि डॉ. मुजुमदार यांनी विचार विनिमय केला. रक्तासमवेत गोल्ड इंजेक्शन दिले गेले. तब्बल चार तासानंतर माझ्या शरीरात ऊब येऊ लागली. मी डोळे उघडले. तोपर्यंत श्रीमती बरकत राय; मित्रमैत्रिणींसह माझ्या बिछान्याजवळ बसल्या होत्या. रात्री अकराच्या सुमारास डॉ. कॅ. गोळे यांनी डॉ. मुजुमदार यांना हळूच सांगितले, 'आता रोगी बचावला आहे. आता काही धोका संभवत नाही.' माझ्या त्या विषमज्वराच्या आजाराने मी सर्वांच्या जवळ जाऊ शकलो. जगलो नसतो तर मला हैदराबाद मुक्तिसंग्रामात प्रत्यक्ष सहभागी होता आले नसते.

तब्बल ४५ दिवसांच्या विश्रांतीनंतर मी घराबाहेर पडलो. प्रथम गुलशन महालात जाऊन श्रीमती राणी दयाकुंवर बरकत राय यांना भेटलो. माझ्या त्या जीवघेण्या आजारातून, मृत्यूच्या दाढेतून त्यांनीच मला बाहेर ओढून काढले होते. अर्ध्या तासानंतर त्यांनी मला त्यांच्या मोटारीत बसवून घरी पोहोचवले. मोटार सुरू होण्यापूर्वी त्यांनी माझ्या औषधोपचारासाठी दोनशे रुपये माझ्या हातात दिले. भरपूर विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. मी अधूनमधून श्रीमती बरकत राय यांच्याकडे जात असे.

अनुक्रमणिका

## सिगारेट व कै. वाघमारे

श्री. आनंदराव वाघमारे यांनी बोलावले असल्याचा निरोप चार दिवसानंतर मिळाला. मी रात्री आठ वाजता किराणा चावडीजवळील त्यांच्या घरी गेलो. औपचारिक गप्पागोष्टी झाल्यावर श्री. वाघमारे म्हणाले 'शंकरलाल, तू इतका नीटनेटका राहतोस, सिगारेट ओढतोस का? ओढत नसशील तर आजपासून सिगारेट ओढावयाचे सुरू कर. औरंगाबाद जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या बंगल्यात वावरणाऱ्या तुझ्यासारख्यांनी भारीत भारी स्टेट एक्सप्रेस ५५५ सिगारेट ओढली पाहिजे. योगायोगाने विना आयासप्रयास तुला कलेक्टरच्या बंगल्यात जाता येते. तुझे त्या बंगल्यात जाणेयेणे सतत चालू ठेव. आता औरंगाबादेत, जिल्ह्यात सत्याग्रहाचे पर्व सुरू केले जाणार आहे. पोलिस विभाग आणि महसूल विभाग एकमेकांबरोबर संलग्न असतात. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्यावतीने लवकरच सुरू करण्यात येणाऱ्या सत्याग्रहपर्वाबाबत कलेक्टर यांच्या कार्यालयात काय काय शिजते आहे, कलेक्टर पोलिस विभागाद्वारे काय काय करणार आहे; याबाबतची आवश्यक तेवढी माहिती मिळवावयाची कामगिरी व जबाबदारी आम्ही तुझ्यावर सोपविणार आहोत; सोपविलीच आहे. तुझ्यावर आम्ही विसंबून राहाणार आहोत. तुझ्याकडे सोपविलेली कामगिरी तू पार पाडशील याची मला बालंबाल खात्री आहे. यानंतर तुझीमाझी भेट फक्त रात्री. तीही ९ नंतर. समोरच्या दाराने याउप्पर या घरात कधीच यायचे नाही. मागल्या दारानेच यायचे जायचे. पोलीस, गुप्तचर खात्याचे लोक, हेरगिरी करणारे महाभाग आपण कोणकोण कुठे जातो येतो याबाबत शोधाशोध करीत सारखे फिरत असतात. भोळ्या भाबड्यांना गाठून आपला ठावठिकाणा मिळवीत असतात. उद्यापासून घराबाहेर पडताना तुझ्या कोटाच्या खिशात ५५५ 'स्टेट एक्सप्रेसचा डबा ठेवत जा.' सिगारेट खरेदीसाठी श्री. आनंदराव वाघमारे यांनी मला पन्नास रुपये दिले.

'तुला आवश्यक वाटेल तेव्हा तू मला, गोविंदभाईंना शिव्या दिल्यास तरी चालेल. जे शक्यतेतले नाही तेच आम्ही करतो आहोत. सगळ्यांना घेऊन आम्ही मरणार आहोत. राजा तो राजाच असतो. राजा ईश्वराचा अंश असतो. निझामी राजे दयाळू आहेत. असेच आणखी काही सांगितले तरी चालेल. तू आमचा नाहीस. आमची ध्येयधोरणे तुला मान्य नाहीत. तू आमचा विरोधक आहेस; असेही वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ अधिकारी आणि छोट्या कारकुनांसमोर परखड शब्दांत बोलण्याची तुला मुभा आहे. अच्छा! मी तुला जे काही सांगणे आवश्यक होते ते सर्व सांगितले आहे. उद्यापासून प्रारंभ कर. ५५५ विकत घे. राजरोस खिशात ठेव. गोविंदभाई सुपारीचे खांडही कधीकाळी तोंडात टाकत नाहीत हे मला माहीत आहे. म्हणून तू सिगारेट ओढावी किंवा नाही या विचारात स्वतःला गुंतवू नकोस.' ठरल्याप्रमाणे मी श्री. वाघमारे यांच्या घराच्या मागच्या दाराने बाहेर पडलो. प्रथम धावणी मोहल्यातील मारुतीचे दर्शन घेतले आणि घरी गेलो.

५५५ स्टेट एक्सप्रेस सिगारेट विकत घेण्यासाठी श्री. आनंदराव वाघमारे यांनी चांगले पन्नास रुपये मला दिले होते. ते जसेच्या तसे माझ्या कोटाच्या खिशात होते. सिगारेट विकत घ्यायचे मी ठरविलेही होते. मात्र ५५५ एक्सप्रेस सिगारेट नेमकी कोणत्या दुकानात मिळते याची मला माहिती नसल्याने मी सिगारेटचा टिन विकत घेऊ शकलो नाही. मी गुलशन महालात गेलो त्यावेळी माझ्याजवळ सिगारेटचा टिन नव्हता. माझे काहीतरी कुठेतरी चुकल्यासारखे मला सारखे वाटत होते. त्यासोबत श्री. आनंदराव वाघमारे यांनी सांगितलेली कामे पार पाडता येतील का; याचे मलाच उत्तर मिळू शकत नव्हते. मी काँग्रेसचा हेर म्हणून ओळखला गेलो, पकडलो गेलो तर श्रीमती राणी बरकत राय यांना काय वाटेल? किती वाईट वाटेल अशा

अनुक्रमणिका

विचारात मी गढून गेलो. अनेक प्रकारच्या शंकाकुशंकांचे काहूर माझ्या डोक्यात थैमान माजवत होते. माझे डोके भणाणून गेले होते. डोक्याच्या शिरा ताडताड उडत होत्या. मला काय होत होते ते माझे मलाच धड समजत नव्हते. श्रीमती राणी बरकत राय यांच्या नावाने आलेल्या पत्रात विशेष असे काही नव्हते. सौ. बरकत राय यांची बालविधवा भाची श्रीमती चंदा त्यांच्याच जवळ राहात होती. तिचा व माझा परिचय झालेला होता. आम्ही दोघे सुखदुःखाच्या गोष्टी अधूनमधून बोलत असू. मी माझ्याच विचारात गढून गेलो असल्याने न कळत मी माझे डोके दोन्ही हातांनी धरून टेबलाजवळ बसलो होतो. श्रीमती चंदा माझ्या खुर्चीच्या मागे उभी राहिली आणि माझ्या कानात अत्यंत हळूवार शब्दांत म्हणाली, 'मामीजींनी तुम्हाला बोलावले आहे.' माझी तंद्री तुटली. मी स्वतःला सावरून घेतले अन लागलीच श्रीमती राणी साहेबांसमोर उभा राहिलो. 'हे पाहा पटेल, औरंगाबाद नगरपरिषदेच्या ज्या स्त्रिया सडकांची साफसफाई करतात, त्यांच्या बालबालिकांच्या संगोपनासाठी शहागंजच्या आठवडी बाजाराजवळ नव्याने बांधलेल्या 'क्रीश'नावाच्या इमारतीचे उद्‌घाटन प्रिन्सेस निलोफर यांच्या शुभहस्ते करावयाचे ठरविले आहे. त्या उद्‌घाटन समारंभाची कार्यक्रमपत्रिका तयार करा आणि ती कार्यक्रम पत्रिका तातडीने छापून आणा'. मी माझ्या टेबलाजवळ आलो. तेव्हा मी बराच गांगरून गेलो होतो. माझ्या आयुष्यात समारंभाची कार्यक्रम पत्रिका तयार करण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. डोक्यातले विचारांचे काहूर अद्याप शमले नव्हते. मी स्वतःला सावरण्याची बरीच लटपट केली. अर्ध्या तासाच्या अवधीत कार्यक्रमपत्रिकेबाबत मी चार शब्दही लिहून काढू शकलो नाही. त्याच सुमारास श्रीमती राणी बरकत राय ह्या श्री. राय बरकत राय व इतर काही वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत मोटारीतून बाहेर गेल्या. मी एक दीर्घ सुस्कारा सोडला. माझे डोके दुखत असल्याचे मी श्रीमती चंदादीदी जवळ सांगितले. माझ्या डोक्याला लावण्यासाठी तिने अमृतांजन चटकन आणून दिले. पाच मिनिटांनंतर चहा आणून दिला. श्री. व श्रीमती बरकत राय गुलशन महल बंगल्यात नव्हत्या असे पाहून, मला सिगारेट ओढाविशी वाटते; असे श्रीमती चंदादीदीजवळ भडभड बोलून गेलो. 'इतकेच ना! एकच काय चांगल्या चारपाच सिगारेटी मामाजींच्या डब्यातून आणून देते,'असे सांगून तिने ५५५ च्या पाच सिगारेट व काड्यांची डबी आणून माझ्या समोर ठेवली. 'मागच्या अंगणात हौदाजवळ तुम्ही सिगारेट ओढू शकता' असेही तिने मला सांगितले. मागच्या अंगणात मी सिगारेट पेटवली. चार सहा झुरके घेतल्यावर जवळच असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात गेलो. माझ्या डाव्या हातात सिगारेट होती. महसूल व पोलीस खात्याशी संबंधित असलेल्या खात्याच्या कारकुनाकडे गेलो; ५५५ चा विशेष प्रकारचा वास, त्याने चटकन ओळखला. त्याच्या तोंडाला पाणी सुटल्यासारखे दिसले. तो त्याची जीभ त्याच्या ओठावरून फिरवू लागला. 'सांगा मी आपली काय सेवा करू?' असे तो विनम्रपणे बोलला. चटकन मी त्याला एक सिगारेट दिली. त्याने शुक्रिया म्हणून मला नमस्कार केला. मी पेटवलेल्या काडीला सिगारेट लावून त्याने एकामागून एक तीन चार झुरके घेतले. कार्यालयाच्या मोठ्या हॉल मध्ये ५५५ चा विशेष सुगंध दरवळला. शेजारच्या कारकुनाला दिसणार नाही अशा प्रकारे मी त्यांच्याकडे आणखी एक सिगारेट सरकवली. तेवढ्यानेच मी त्याला भारावून टाकले असावे असे त्यांच्या हावभावावरून आणि 'शुक्रिया, शुक्रिया' या शब्दांवरून समजले 'शासकीय समारंभाच्या काही निमंत्रणपत्रिका मला पहावयास मिळतील कां?' मी विचारले. 'हो हो एकच काय बऱ्याच पत्रिका पाहता येतील.' तो म्हणाला आणि सरबराई खात्याच्या कारकुनाकडून त्याने शासकीय समारंभाच्या पत्रिकांचा गठ्ठाच आणून माझ्या समोर ठेवला. त्या गठ्ठ्यातून मी दोन निमंत्रणपत्रिका निवडल्या. 'मी निवडलेल्या दोन पत्रिका थोड्या वेळाने परत आणून दिल्या तर चालेल, का?' मी विचारले.'थोड्या वेळानेच काय सायंकाळपर्यंत आणून दिल्या तरी चालेल', असे त्याने सांगितले. निमंत्रणपत्रिकेचा मजकूर, स्थळ, वेळ, समारंभाचे उदघाटक व अध्यक्ष यांच्या नावात फेरफार करून श्रीमती

राणी बरकत राय यांना अभिप्रेत असलेल्या पत्रिकेचा नमुना आराखडा तयार केला. माझ्या डोक्यावरचा ताण बराच कमी झाला. माझ्या मनातली कालवाकालवही बरीच कमी झाली. मी समाधानाचा सुस्कारा सोडला. मला हायसे वाटू लागले. अत्यंत प्रसन्न अंतःकरणाने मागच्या अंगणातून मी गुलशन महालातील माझ्यासाठी मांडून ठेवलेल्या टेबलाजवळ गेलो. नेमक्या त्याच सुमारास समोरच्या दारातून सौ. बरकत राय व कलेक्टर श्री. बरकत राय यांच्या समवेत, प्रो. इब्राहिम, डॉ. जठार, इंजिनियर काझीम हुसेन व इतर अधिकारी 'गुलशन महाल' च्या विस्तीर्ण हॉलमध्ये दाखल झाले. मी तयार केलेला उद्‌घाटन कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकेचा नमुना श्रीमती बरकत राय यांच्या हातात दिला. त्यानी तो नमुना प्रा. इब्राहिम यांना दिला. आळीपाळीने, निमंत्रण पत्रिकेचा नमुना उपस्थितांनी बघितला. नमुना पत्रिकेप्रमाणे निमंत्रणपत्रिका छापून घ्यायचे सर्वांनी ठरविले. 'क्रीश' या नव्याने बांधलेल्या वास्तूचा उद्‌घाटन सोहळा मानमरातबाने प्रसन्न वातावरणात प्रिन्सेस निलोफर यांच्या शुभहस्ते पार पडला.

जनाना हॉलमधील महिला मेळाव्याला तसेच टाऊन हॉल येथील हस्तकला व औद्योगिक प्रदर्शनाला प्रिन्सेस निलोफर यांच्या सदिच्छा भेटीचा कार्यक्रम शासकीय पातळीवर ठरविण्यात आला होता. वेळात वेळ काढून प्रिन्सेस निलोफर यांनी औरंगपूरा, विभागातील 'बलवंत मोफत वाचनालया'ला सदिच्छ भेट द्यावी यासाठी संस्थेचे अध्यक्ष व सेक्रेटरी डॉ. गणपतराव वैद्य व श्री. ज. प. मुळे यांनी भरपूर प्रयत्न केले, मात्र त्यांना होकार मिळाला नाही.

प्रिन्सेस निलोफर यांच्या आगमनप्रसंगी रेल्वेच्या डब्याजवळ मी एक छायाचित्र काढले होते. त्या छायाचित्राची मोठी प्रत चांगल्या सुशोभित फ्रेममध्ये बसवून टाऊन हॉल मधील प्रदर्शनाच्या मुख्य द्वाराजवळ भरपूर प्रयत्नांती मी ठेवू शकलो होतो. ते छायाचित्र प्रिन्सेस निलोफर यांच्या डोळ्यात भरल्यासारखे दिसले. ते चित्र आवडल्याचे प्रिन्सेसनी त्यांचे खाजगी सचिव श्री. राज यांना सांगितले. त्या छायाचित्राचा चित्रकार म्हणून सुभेदार गुलाम अहमद खान यांनी मला श्री. राजसमोर उभे केले. 'प्रिन्सेसला तुमचे हे छायाचित्र आवडले आहे. तुमची काय अपेक्षा आहे?' असे त्यांनी मला विचारले, 'केवळ कौतुक हीच माझी अपेक्षा आहे.' मी म्हणालो. तेवढ्या अवधीत ते छायाचित्र सुभेदार यांनी श्री राजच्या हातात दिले. प्रदर्शन बघून झाल्यावर प्रिन्सेसना मोटारीत बसविले गेले. मोटारीची दारे बंद करण्यात आली, मोटार सुरू झाली. मोटार पुढे सरकणार तेवढ्यात श्री. राज यांनी सुभेदार खानद्वारे मला मोटारीजवळ बोलावून सांगितले; 'तुमचे हे चित्र प्रिन्सेसना फार आवडले आहे. प्रिन्सेसच्या वतीने मी तुम्हाला शुभेच्छा देतो, आभार मानतो.' मोटार गेल्यावर सुभेदार मला उद्देशून म्हणाले, 'तुम्ही नशीबवान आहात,' औरंगाबादेतील शासकीय पातळीवर आयोजित कार्यक्रमाला सदिच्छा भेट देऊन प्रिन्सेस निलोफर खुलदाबादेतील शासकीय विश्रामगृहाकडे रवाना झाल्या. तेथे त्यांचा दोन दिवस मुक्काम होता.

सायंकाळी ७ वाजता माझी व डॉ. वैद्य व श्री. मुळे यांची भेट झाली. काही विशेषप्रकारचे प्रयत्न करून प्रिन्सेस निलोफर यांना वाचनालयात आणता येऊ शकेल का? असे मला डॉ. वैद्य यांनी विचारले. मी क्षणभर विचार केला. मला तोडगा सुचला. सकाळच्या घटनेच्या शिदोरीवर प्रिन्सेसचे खाजगी सचिव श्री. डॉ. राज यांची भेट घेऊन त्यांना आग्रहाची विनंती करून प्रिन्सेसना बलवंत मोफत वाचनालयात आणता येऊ शकेल असे मला मनोमन वाटले. मी चटकन म्हणालो, 'तुम्ही मला अगदी थोड्या वेळात खुलदाबादला घेऊन जाऊ

शकला तर मी माझ्यापरीने डॉ. राज यांची मनधरणी करून त्यांच्यातर्फे प्रिन्सेसचा होकार मिळवू शकेन' त्यावर श्री. मुळे चटकन म्हणाले, 'बलवंत मोफत वाचनालयाची इमारत, आजूबाजूचा परिसर प्रिन्सेसच्या भेटीसाठी योग्य नसल्याचे सुभेदार यांचे मत बनलेले आहे.' 'असू द्या. मी सर्व जुळवून घेऊ शकेन. तुम्ही काळजी करू नका. विचार करीत वेळ घालवू नका. चटकन खुलदाबादला जायचे तेवढे ठरवा' डॉ. गणपतराव यांच्या मोटारीत आम्ही तिघे खुलदाबादच्या शासकीय विश्रामगृहात दाखल झालो. त्यावेळी प्रिन्सेस स्नानगृहात होत्या. प्रिन्सेसचे खाजगी सचिव डॉ. राज विश्रामगृहासमोरील बागेत बसलेले होते. आम्ही, डॉ. राज यांच्या भेटीसाठी आलो असल्याचे कळविण्यात आले. आम्हाला बोलावले गेले. आम्ही त्यांच्या जवळ जाताच डॉ. राज म्हणाले, 'तुमच्या वाचनालयाच्या भेटीबाबत जबाबदारी घ्यायला सुभेदार तयार नाहीत. प्रिन्सेसच्या भेटीसाठी तुमच्या वाचनालयाचा परिसर असुरक्षित आहे असे सुभेदार यांनी सांगितले आहे.' आम्हा तिघांचा हुरूप कोणी तरी हिरावून घेत असल्यासारखे वाटू लागले. मनाचा हिय्या करून मी म्हणालो, 'डॉ. राज, जवळपास आपल्याइतकीच, प्रिन्सेसबाबत जबाबदारी आमचीही आहे. बलवंत वाचनालयाची इमारत लहान आहे, तरी त्या इमारतीत सहज पाचशे महिला बसू शकतील. शहरातील सुशिक्षित, मराठी भाषिक व त्यांच्या समवेत सौ. राणी बरकत रायही असतील. प्रिन्सेसच्या स्वागतासाठी एकत्रित होणाऱ्या महिलांची निराशा होऊ नये, त्यांना प्रिन्सेसचे स्वागत करता आले तर त्यांची मने आनंदाने भरून निघतील. त्या परिसरात कोणतीही गैर गोष्ट होणार नाही, होऊ दिली जाणार नाही; याची आम्ही ग्वाही देतो. केवळ पाच मिनिटांसाठी प्रिन्सेसनी बलवंत मोफत वाचनालयाला भेट देण्याबाबत प्रिन्सेसचा होकार मिळवून आम्हाला उपकृत करावे,' तुम्ही येथे बसा. मी प्रिन्सेसबरोबर विचारविनिमय करून काय ठरते ते तुम्हाला सांगतो.'असे सांगून थोड्या वेळानंतर डॉ. राज प्रिन्सेसच्या भेटीसाठी विश्रामगृहात गेले. दहा मिनिटांनी परत आले आणि म्हणाले, 'उद्या सायंकाळी शासकीय महाविद्यालयाच्या कार्यक्रमानंतर आपल्या संस्थेला केवळ पाच मिनिटांसाठी सदिच्छा भेट देण्याचे प्रिन्सेसनी मान्य केले आहे. सदिच्छा भेटीचा कार्यक्रम प्रिन्सेसना साजेल अशाच प्रकारे पार पाडावयाची जबाबदारी तुमची आहे. प्रिन्सेसनी आपल्या संस्थेस भेट देण्याचे मान्य केले असल्याचे तातडीने सुभेदार साहेबांना कळवा. कार्यक्रम शांतपणे व्यवस्थित प्रकारे पार पडेल याबाबत आवश्यक तेवढी खबरदारी घ्या.'

आम्ही आनंदाने भारावून गेलो. प्रसन्न मनाने आम्ही औरंगाबादला परत आलो; तेव्हा रात्रीचे साडेनऊ वाजले होते. डॉ. गणपतराव वैद्य, मी व मुळे सुभेदारांच्या भेटीसाठी त्यांच्या बंगल्यावर गेलो. बलवंत मोफत वाचनालयाला प्रिन्सेसच्या भेटीबाबत डॉ. राज यांनी होकार दिल्याचे वृत्त सुभेदारांना डॉ. गणपतराव वैद्य यांनी सांगितले. सुभेदारांनी मलाच धारेवर धरले. 'तुम्ही बालिश आहात. नादान आहात. प्रिन्सेसचा कार्यक्रम म्हणजे भातुकलीचा खेळ नाही. काहीही वेडेवाकडे होणार नाही; याची सर्वस्वी जबाबदारी तुमच्यावर आहे.' प्रिन्सेसच्या भेटीबाबतचा डॉ. राज यांचा निरोप सुभेदार यांना देऊन आम्ही तिघे आपापल्या घरी गेलो. प्रिन्सेसच्या भेटीबाबत होकार मिळवावयाचा होता तो मिळाला होता. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाबाबत डॉ. वैद्य व मुळे यांना माझ्या सहकार्याची आवश्यकता वाटली नाही. म्हणून त्यांनी माझ्याबरोबर बोलणी केली नाहीत. योजनाबद्ध व्यवस्था केली गेली तरच बलवंत मोफत वाचनालयाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल; असे मला वाटत होते. सरकारी अधिकारी प्रिन्सेसना घेऊन येतील असे डॉ. वैद्य व मुळे यांना वाटत होते. शासकीय महाविद्यालयाचा कार्यक्रम आटोपून प्रिन्सेस केव्हा बाहेर पडणार हे कळावयाला कोणतेच साधन नव्हते; तरी त्याचा विचार केला गेला नाही. प्रिन्सेस शासकीय महाविद्यालयात दाखल झाल्याची वेळ व तेथील कार्यक्रम आटोपून तेथून बलवंत मोफत वाचनांलयाकडे प्रयाण करण्यापूर्वी किमान दहा मिनिटे आधीची वेळ,

अनुक्रमणिका

जबाबदार माणसाद्वारे डॉ. वैद्य यांना मला कळविता यावी यासाठी दोन लोक माझ्याबरोबर संपर्क साधण्यासाठी महाविद्यालयात पाठवावयाचे ठरविलेले असूनही कोणीच आले नाही. मी कावराबावरा होऊन गेलो. मी सारखा मागेपुढे, आजूबाजूला पहात होतो. मला माझ्याबरोबर संपर्क साधणारा कोणीच दिसला नाही. महाविद्यालयाचा कार्यक्रम संपावयाच्या बरोबर दहा मिनिटेपूर्वी, सुभेदारांनी पुढील कार्यक्रमासाठी पुढे जाण्यास खुणेनेच सांगितले. मला घेण्यासाठी मोटार पाठविण्याचे आश्वासन स्वतः डॉ. वैद्य यांनी दिले असतानाही मोटार आली नाही. कोणी सायकलस्वारही माझ्याजवळ आला नाही. माझी भंबेरी उडाली. मी मधल्या आडमार्गाने धावत-पळत बलवंत मोफत वाचनालयाजवळ गेलो. धापा टाकीतच पाच मिनिटांच्या अवधीत प्रिन्सेस येणार असल्याचे मी डॉ. गणपतराव वैद्य यांना सांगितले. पाच मिनिटांनी प्रिन्सेस आल्या. त्यांचे यथायोग्य स्वागत करण्यात आले. अटीतटीचा सामना करून प्रिन्सेसच्या भेटीबाबत होकार मिळविला होता. प्रिन्सेसच्या सदिच्छा भेटीचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. बलवंत मोफत वाचनालयाचा तो कार्यक्रम शहरभर गाजला. बलवंत मोफत वाचनालयाच्या छापील वार्षिक अहवालात व्यवस्थित पार पडलेल्या त्या कार्यक्रमाचे सर्वचे सर्व श्रेय डॉ. वैद्य आणि मुळे यांनी त्यांच्याकडे वळवून घेतले. माझ्या नावाचा, माझ्या परिश्रमाचा, धावपळीचा एका शब्दानेही अहवालात उल्लेख केला गेला नाही. निझामी राजवटीचे राज्यकर्ते निरनिराळ्या प्रकारे मानहानी, अवमान करतात. समाजात फावल्या वेळात काहीतरी करावयासाठी पुढे सरसावलेले काही महाभाग दुसऱ्याने केलेल्या कामाचे श्रेय, जनतेच्या डोळ्यात धूळ फेकून, आपल्याकडे ओढून घेतात. याचा मी जागताबोलता जिवंत साक्षीदार आहे. अत्यंत आत्मीयतेने समाजाचे, मानवतेचे ऋण फेडता आले ते फेडावे या विचाराने भारावून जीवाचे रान करणाऱ्या माझ्यासारख्याला वाळीत टाकतात याचे मनस्वी दुःख झाल्यावाचून राहात नाही.

५५५ च्या जादूची कहाणी, जशी घडली, तशीच्या तशी मी श्री. आनंदराव वाघमारे यांना सांगितली. ती ऐकून श्री. वाघमारे यांना समाधान वाटले असावे असे मला त्यांच्या चेहेऱ्यावर उमटलेल्या भावावरून दिसले. तसे पाहाता त्यांच्या चेहेऱ्यावर हास्य मला कधीच दिसले नाही. गंभीर विचारांची छटा सदोदित त्यांच्या चेहेऱ्यावर दिसायची. 'शंकरलाल, हैदराबाद स्टेट कॉंग्रेस, महाराष्ट्र परिषद व आम्हा सर्वांवर तुला घेता येईल तेवढे तोंडसुख तू घेत जा. जराही कसर ठेवू नकोस. तू निझामी राजवटीचा एक सच्चा हितचिंतक आहेस व आमचा कडवा विरोधक आहेस या नाटकाची छाप बसविण्याची खटपट कर.' हे त्यांचे शब्द कानात सारखे घुमायचे.

**

अनुक्रमणिका

# १९३८ चा सत्याग्रह

निझामी राजवटीचा मुस्लिमधार्जिणा सूर हिंदू मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या कानात शिरू लागला होता. मराठी भाषिकांवर अन्याय होत असल्याचे विद्यार्थ्यांना समजू लागले होते, पदोपदी जाणवू लागले होते. त्याच सुमारास निझामी राजवटीने वंदे मातरम् गीतावर बंदीचा फतवा काढला. वंदे मातरम् गीतावरील बंदीच्या फतव्याचा निषेध नोंदविण्यासाठी उस्मानिया विद्यापीठाच्या वसतिगृहातील सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रार्थना हॉलमध्ये सामुदायिकरीत्या 'वंदे मातरम्' हे गीत एक राष्ट्रगीत म्हणून म्हणायला सुरूवात केली. हैदराबादेतील उस्मानिया विद्यापीठाच्या वसतिगृहातील घटना औरंगाबादेतील इंटरमिजिएट कॉलेजच्या वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांच्या कानावर पडताच येथील हिंदू विद्यार्थ्यांनी सामुदायिकरीत्या 'वंदे मातरम्' गीत म्हणणे सुरू केले. जात्यंध मुस्लिम विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्' गीताबाबतचा त्यांचा विरोध महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे नोंदविला. प्राचार्यांनी सारासार विचार न करता तडकाफडकी 'वंदे मातरम्' गीतावर बंदीचा आदेश काढला. विद्यार्थी वसतिगृहात कधीही, कोणीही 'वंदे मातरम्' गीत म्हणू नये असा फतवा काढण्यात आला. फतव्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात आली. प्राचार्यांचा आदेश धुडकावून लावला पाहिजे असे बहुतेक सर्व हिंदू विद्यार्थ्यांना मनोमन वाटत होते. प्राचार्यांच्या अन्याय्य आदेशाविरुद्ध विद्यार्थ्यांनी सामुदायिक उपोषण सुरू केले. प्राचार्यांनी व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना उपोषणापासून परावृत्त करण्याचा अतोनात प्रयत्न केला. मात्र ठाम निर्धाराच्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही अटीवर उपोषण सोडले नाही. बदलत्या काळाची चक्रे भर वेगाने उलटसुलट फिरू लागली. उस्मानिया विद्यापीठाच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी ताबडतोब दडपशाहीचा मार्ग स्वीकारला व 'वंदे मातरम्'हे गीत कोणीही म्हणू नये; असा फतवा काढला. जे विद्यार्थी विद्यापीठाच्या आदेशाचा भंग करतील. त्यांना अनेक प्रकारचे दुष्परिणाम सतत भोगावे लागतील अशी तंबीही दिली गेली. 'वंदे मातरम्' गीतावर बंदी लादून उस्मानिया विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी अजाणपणे हिंदू विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रीय विचारधारेला बळकटी आणली. अन्यायाला वाचा फोडण्यासाठी बरेच विद्यार्थी जोमाने, त्वेषाने पुढे सरसावले. भीतभीत आयुष्याची वाटचाल करणारे, दचकून पाऊल टाकणारे विद्यार्थी, श्री. वाघमारे, गोविंदभाई, चौधरी, देशपांडे, वाळूजकर, वैशंपायन, अच्युतभाई यांच्या आजूबाजूस फिरकू लागले. बऱ्याच विद्यार्थ्यांनी निझामी राजवटीच्या अन्यायी धोरणाविरुद्ध सत्याग्रह करून जेलमध्ये जावे लागले तर जाण्याची त्यांची तयारी असल्याचे बोलून दाखविले.

## स्टेट कॉँग्रेसवर बंदी

हैदराबाद संस्थानात हैदराबाद स्टेट कॉँग्रेस ही संस्था अस्तित्वात येण्यापूर्वीच तिच्यावर बंदी लावण्यात आली. हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचा जन्म झाल्यावर ती निझामाची कर्दनकाळ ठरेल असेच जणू काय निझामाला, निझामाच्या राजवटीला, जात्यंध मुस्लिमांना वाटत असावे. निझामाला राष्ट्रीय कॉँग्रेस-हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचा अन्वयार्थ, उलगडला नाही. साम्राज्यवादी ब्रिटिशांच्या नुसत्या इषाऱ्यावर कठपुतळीप्रमाणे नाचावयाचे इतकेच काय ते त्याला आत्मसात करता आले. हैदराबाद स्टेट कॉँग्रेसवर निझामी राजवटीने अनेक नादानपणाचे आरोप लादण्यात जराही कसर बाकी ठेवली नाही. हैदराबाद स्टेट कॉँग्रेसच्या वास्तववादी ध्येयधोरणाबाबत, हैदराबादच्या राष्ट्रीय विचारप्रणालीच्या लोकांनी जेवढे सांगता येईल तेवढे

अनुक्रमणिका

वेळोवेळी सांगितले; अनेक प्रकारचे खुलासे सादर केले; बंदी उठवली जावी म्हणून विनंती अर्ज दाखल करून आवाहनही केले; परंतु निझामाला, त्याच्या राजवटीच्या अधिकाऱ्यांना समज आलीच नाही आणि निझामी राजवटीने आपली वाकडी चाल सोडली नाही. राष्ट्रीय विचार करणाऱ्यांना गप्प बसून चालणार नव्हते. निझामी राजवटीने लादलेल्या बंदीच्या आदेशाविरुद्ध पाऊल उचलल्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता; म्हणून लादलेल्या बंदीच्या आदेशाचा भंग करणे क्रमप्राप्त झाले होते.

'वंदे मातरम्' गीतावर लादलेला बंदीचा आदेश, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या पाठोपाठ काही विद्यालयातील विद्यार्थ्यांनाही तीक्ष्ण हत्याराच्या जखमेसारखा झोंबला. संस्थानातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी संप पुकारला तेव्हा या विद्यालयीन विद्यार्थ्यांनीही त्यांना साथ दिली. 'वंदे मातरम्' चळवळीची रणगर्जना पहिल्याने औरंगाबादेतील लोकांच्या कानावर आदळली, अनेकांची मने प्रफुल्लित झाली तर काही मंडळींनी त्याचा धसका घेतला.'वंदे मातरम्' चळवळीने राष्ट्रीय विचाराला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध विद्यार्थी त्वेषाने पुढे सरसावले. समाजातील लब्धप्रतिष्ठितांनी आपल्या तकलादू मानमरातबासाठी आतापर्यंत वाळीत टाकलेल्या राष्ट्रीयत्वाची जाण बाळगणाऱ्यांना साथीदार सापडले. 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीतावर निझामाच्या राजवटीने बंदी लादल्याने मराठवाडा विभागातील राजकीय विचारांच्या पुरस्कारासाठी धीरोदात्त विद्यार्थ्यांची सेना मिळू शकली. 'वंदे मातरम्' चळवळीत सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांच्या जीवनाची दाणादाण होऊ पाहात असताना घरच्याच महाभागांनी त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्यांच्या शिक्षणात खंड पडू पाहात असताना समाजातील तथाकथित धुरीण गाढ झोपा काढीत होते. संस्थानाबाहेरील रावसाहेब पटवर्धन, आपटे गुरुजी, पुर्वार गुरुजी आणि प्रामुख्याने नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु श्री. केदार यांनी मदतीचा हात पुढे केला, विद्यार्थ्यांची पाठ थोपटली, शिक्षणात खंड पडू दिला नाही. 'वंदे मातरम्' विद्यार्थी चळवळीचे पर्व हैदराबाद मुक्तिसंग्रामाला उजाळा आणणारे असेच होते. 'वंदे मातरम्'चा लढा जवळपास दीड वर्षे चालला. त्या अवधीत लढाऊवृत्ती, सैनिकी बाणा, राजकीय जाणीव, राष्ट्रीयत्वाची भावना आणि प्रामाणिक कणखर निष्ठा बाळगणाऱ्या अशा तरुण कार्यकर्त्यांची सेना नकळत तयार झाली आणि आपण होऊन जोमाने, त्वेषाने, जिद्दीने पुढे सरसावत गेली. 'वंदे मातरम्' चळवळीने प्राप्त केलेले उग्र स्वरूप नेमस्त, मवाळ मंडळींना पेलवत नव्हते.'वंदे मातरम्' चळवळ बंद करण्याचे पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सांगितल्याची कंडी पिकविण्यात आली. ही गोष्ट खरी समजून काही तरुणांचा तेजोभंग झाला; तर पंडितजींनी, 'चळवळ बंद करा' असे सांगितलेच नसेल असेही काहीना वाटत होते. खऱ्याखोट्याची शहानिशा करून घेण्यासाठी औरंगाबादचे श्री. स. कृ. वैशंपायन व श्री. व्ही. डी. देशपांडे यांनी पंडित जवाहरलाल यांना गाठले. 'वंदे मातरम्' चळवळ कशी चालली आहे ते सविस्तर सांगितले तेव्हा 'आगे बढो' असे पंडित जवाहरलालजींनी सांगितले. चळवळ बंद करण्याचे आपण कधीच सांगितले नाही असेही ते म्हणाले. हैदराबाद संस्थानात १९३८ च्या सत्याग्रहपर्वाने स्वातंत्र्य-आंदोलनाला नवे वळण मिळवून दिले. सत्याग्रहाच्या रूपाने जनतेची मरगळ गेली व जागृती निर्माण झाली. सत्याग्रहाचे पहिले केंद्र हैदराबादेत तर दुसरे केंद्र औरंगाबादेत होते. औरंगाबादमधील पहिल्या सत्याग्रही तुकडीचे नेतृत्व श्री. माणिकचंद पहाडे यांच्याकडे सोपविण्यात आले होते. मराठवाड्यातील बऱ्याच विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालयाच्या शिक्षणाला रामराम ठोकला होता. त्यांनी स्वतः होऊन सत्याग्रही म्हणून आपापली नावे नोंदविली होती. औरंगाबाद शहर व जिल्हा सत्याग्रहपर्वाचे मुख्य संघटक होते श्री. गोविंदभाई श्रॉफ. त्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीने सत्याग्रहपर्वाची व त्यासाठी आवश्यक त्या यंत्रणेची निर्मिती व विभागणी केली होती. कार्यकर्त्यांचा संच त्यांच्या हाताशी होता. सत्याग्रह मोहिमेबाबत आवश्यक ती पत्रके व पत्रकांचा

मजकूर श्री. आनंदराव वाघमारे, श्री. स. कृ. वैशंपायन, श्री. व्ही. डी. देशपांडे हे तयार करीत असत. पत्रके डुप्लिकेटर मशिनवर तयार करावयाचे काम श्री. चंपालाल नागोरीकडे सोपविले होते. तयार केलेली पत्रके घरोघरी पोचविण्याची खबरदारी श्री बाबुराव जाधव आणि शहा भगिनी करीत असत. पत्रकाचा मजकूर कोण लिहितो, पत्रके कोण व कोठे छापतो, पत्रके घरोघर नियमित कोण वाटतो याबाबत माहिती गोळा करण्यासाठी गुप्तचर खात्याच्या मंडळींनी, त्यांच्या हस्तकांनी कसोशीने प्रयत्न केले. मात्र त्यांना काही केल्या सुगावा लागू शकला नाही; इतकी कडेकोट गुप्तता राखली गेली होती. विद्यार्थी व तरुण वर्गाचे मनोधैर्य वाढविण्याची महत्त्वाची कामगिरी पार पाडीत होते श्री. कर्वे गुरुजी. शहरातील पांढरपेशा नागरिकांच्या गांठीभेटी घेण्याचे काम श्री. लक्ष्मणराव वाळूजकर सांभाळीत असत. लोकांच्या गाठीभेटी घेऊन, त्यांचे खचलेले मनोधैर्य वाढविले गेले. मरगळ हळूहळू कमी कमी होत गेली. सत्याग्रहपर्वाला थोडेसे अनुकूल असे वातावरण निर्माण होत गेले. सर्वसाधारण नागरिकांच्या मनात शासनाच्या दंडेलीबाबत भीती कमी कमी होऊ लागली. जुलमी, जात्यंध मुस्लिमधार्जिण्या निझामी राजवटीविरुद्ध असंतोषाचा वणवा पेटविला व तो भडकविला श्री. गोविंदभाई, माणिकचंद पहाडे, दत्तोपंत पाठक, स. कृ. वैशंपायन, व्ही. डी. देशपांडे, अच्युतभाई देशपांडे, कर्वे गुरुजी, आनंदराव वाघमारे, लक्ष्मणराव वाळूजकर, अच्युत खोडवे, सखाराम मंडलिक, रतिलाल व विद्यार्थी विद्यार्थीनींनी.

सत्यागृहाच्या पहिल्या तुकडीत श्री. माणिकचंद पहाडे यांच्या समवेत पैठणचे गुलाबचंद नागोरी, माजलगावचे श्री. कौसलसिंग व विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून वैजापूरचे श्री. मनोहर सोनदे यांची निवड करण्यात आली होती. सत्याग्रहाची पूर्वतयारी म्हणून श्री. माणिकचंद पहाडे यांनी त्यांच्या काकाजी, पत्नी, भाऊ व परिवारातील मंडळींना, नांदगाव येथे भेटून यावयाची आपली इच्छा श्री. गोविंदभाईजवळ बोलून दाखवली. दडपशाहीचा पवित्रा स्वीकारणाऱ्या निझामी राजवटीविरुद्ध औरंगाबादचे गांधीवादी खादीधारी श्री. माणिकचंद पहाडे हे वाघासारखी डरकाळी फोडतील, निझामी राजवटीवर वाघासारखी झेप घेऊ शकतील असे बहुतेक काँग्रेसच्या पुढाऱ्यांना  कार्यकर्त्यांना मनोमन वाटत होते. काही नेते श्री. पहाडे यांना 'टायगर' म्हणून संबोधीत असत. श्री. पहाडे आपल्या कुटुंबियांना भेटण्यासाठी नांदगावला गेल्याची माहिती श्री. गोविंदभाईशिवाय इतर कोणालाही नव्हती. तरी श्री. पहाडे यांनी त्यांच्या घरात प्रवेश केलाही नव्हता तो पर्यंत निझामी राजवटीने श्री. माणिकचंद पहाडे यांच्यावर औरंगाबाद जिल्ह्यात प्रवेशबंदीचे फर्मान काढल्याचे वृत्त हैदराबाद रेडिओद्वारे जनतेच्या कानावर आदळले. अवघ्या चोवीस तासांच्या आत औरंगाबाद जिल्ह्याच्या सर्वच्यासर्व सरहद्दी निझामी पोलिस व लष्कराने व्यापून टाकल्या. औरंगाबादच्या प्रत्येक सडकेलगतच्या नाक्याला कडेकोट लष्करी तळाचे स्वरूप  आल्याचे दिसत होते. औरंगाबादच्या सर्वच्यासर्व सरहद्दीवर कडेकोट लष्कराचा वेढा व कडक बंदोबस्त करण्यात आल्याचे वृत्त श्री. पहाडे यांना बऱ्याच नातलग व चाहत्यांकडून कळाले. या पेचप्रसंगाने श्री. पहाडे निराश झाल्यासारखे दिसू लागले. आप्तांच्या भेटीचा मोह आवरला असता तर बरे झाले असते असेही त्यांना वाटल्यावाचून राहिले नाही. प्राप्त परिस्थितीत सुखरूप औरंगाबादेत लवकरात लवकर कसे दाखल व्हावे याच एका विचारात ते गढून गेले होते. त्यांच्या चेहऱ्यावर निराशेची लकेर डोकावू लागली होती. सर्व प्रकारची खबरदारी राखली गेली; गुप्तता राखली गेली तरी घरभेद्याने त्याचा स्वार्थ साधला, याचेच त्यांना राहून राहून वाईट वाटले. स्वतःच्या घरात जिवाभावाच्या आप्तमित्रांसमवेत श्री. पहाडे बसलेले होते. श्री. पहाडे यांनी त्यांनी काय सांगायचे असेल ते सांगावे असे सर्वांना वाटत होते. मात्र ते अवाक्षर तोंडावाटे काढीत

नव्हते. औरंगाबाद शहरास सुखरूप कसे दाखल होता येईल हाच एकमेव विचार त्यांच्या मनांत घोळत होता. पहिले सत्याग्रही बनण्याचा मिळालेला बहुमान हिरावून घेतला जात असल्याबद्दल त्यांना वाईट वाटत होते.

औरंगाबाद शहरातील पहिल्या सत्याग्रहाची आखणी व अंमलबजावणी करणारी पुढारी मंडळी बरीच हताश बनली होती. ठरल्या दिवशी व वेळी सत्याग्रह सुरू झाला नाही तर निझामी राजवटीच्या बेताल नंग्यानाचाला उधाण येईल. स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यात आणि विद्यार्थ्यात नैराश्याचे वारे शिरेल. महत्प्रयासाने साठवलेले मनौधैर्य कच खाईल. विद्यार्थ्यांचा मनोभंग होईल. विद्यार्थ्यांच्या तसेच सामान्य नागरीक व गावकरी यांच्या मनात उफाळून आलेली अन्यायाविरुद्धची चीड, जशीच्या तशी कायम राहणार नाही आणि म्हणून वाटेल ते करावे लागेल ते करून ठरल्या दिवशी व वेळी सत्याग्रह केला जावा या विचारात नेते मंडळी गढून गेली होती. निझामी राजवटीने उभा केलेला पेचप्रसंग तसा साधा अन सोपा नव्हता. आणिबाणीचा पेचप्रसंग आ वासून सर्वांसमोर उभा होता. पहिल्याच सलामीस हैदराबाद स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह औरंगाबादेत होऊ शकला नाही तर राजवटीला आपले दडपशाहीचे धोरण अधिकच तीव्र करण्यास मोकळीक लाभणार होती.

हैदराबाद संस्थानात जे जे घडले होते, घडत होते ते सर्व जसेच्या तसे महात्मा गांधी यांना कळविण्याची कामगिरी काही राष्ट्रीय विचारांच्या व्यक्तींनी स्वीकारली होती. घडलेल्या व घडत असलेल्या घटनांची नोंद घेऊन, महात्मा गांधींनी हैदराबाद स्टेट काँग्रेसद्वारे सत्याग्रहपर्व सुरू करण्याला होकार दिला. मात्र सत्याग्रहाची मोहीम पहिल्याच सलामीत बारगळली तर हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पुढारी, कार्यकर्ते लेचेपेचे आहेत असेच समजले जाईल याचेच सर्वांना वाईट वाटत होते.

हैदराबाद स्टेट काँग्रेसने हैदराबाद संस्थानात जबाबदार राज्यपद्धती आणावी म्हणून सत्याग्रहाची मोहीम सुरू करायचे ठरविले, त्यासाठी महात्मा गांधींचा होकार व आशीर्वाद मिळविला. याबाबतची माहिती औरंगाबादेतील ज्येष्ठ नागरिकांना, वकील, डॉक्टर इत्यादींना काँग्रेसच्या जबाबदार लोकांनी त्यांच्या घरोघर जाऊन सांगितली होती. संघर्षाचा धसका घेणाऱ्या, नेमस्त, मवाळ, सरकारधार्जिण्या व निझामाला दैवत समजणाऱ्यांनी महात्मा गांधीच्या होकाराची, आशिर्वादाची पर्वा केली नाही. साधी दखलही घेतली नाही. याचा अर्थ त्या महाभागांना महात्मा गांधींचा सल्ला नको होता; मायबाप निझामच हवे होते.

प्राप्त परिस्थितीचा विचार करून हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या नेत्यांनी अत्यंत गुप्तता राखून, त्यांच्या नियोजित कामाला प्रारंभ केला. खबऱ्यांचे घरभेद्यांचे जाळे वाढत गेले. तुंबड्या भरावयासाठी बरेच लोक अनेक प्रकारच्या खटपटी-लटपटी करू लागले. सुरक्षिततेसाठी प्रत्येकाची तपासणी करावी लागली. छुपे रुस्तूम दबा धरून बसलेले होते. सत्याग्रह मोहिमेचा श्री गणेशा करण्यासाठी हवे तसे वातावरण नव्हते, सामान्यांचा हवा तेवढा पाठिंबा नव्हता. काही लोक कार्यकर्त्यांच्या तंगड्या ओढायचे काम करीत होते. झुळझुळ वाहाणाऱ्या वाऱ्यावरही विश्वास ठेवता येत नव्हता. अशा विचित्र अवस्थेत औरंगाबाद शहरात व जिल्ह्यात सत्याग्रहाचा पवित्रा घेण्याचे ठरविले गेले होते.

अनुक्रमणिका

प्रसंग व परिस्थिती अत्यंत विचित्र आणि बरीच कठीण होती; तरी त्यातून मार्ग काढणे आवश्यक बनलेले होते. वाटेल तो मार्ग अवलंबून नियोजित कार्यक्रम राबविणे अत्यंत आवश्यक बनले होते. पुढारी मंडळींच्या विश्वासातले लोक, विद्यार्थी विद्यार्थिनी मोजक्याच होत्या. बंदेगान आलीचे बंदेच अधिक होते. निझामाच्या सैतानी राजवटीच्या भीतीने, प्रतिष्ठित म्हणून टेंभा मिरविणारे महाभाग स्टेट कॉँग्रेसच्या बड्या वा छोट्या कार्यकर्त्यांच्या सावलीजवळही फिरकत नव्हते. समाजातील सुशिक्षित, पांढरपेशा नागरिकांचा, व्यापाऱ्यांचा पाठिंबा मिळणे शक्यतेतले नव्हते. साधनांची, पैशाची वानवा होती. सत्याग्रह सुरु करावयाचा पवित्रा कोणत्याही परिस्थितीत बदलावयाचा नाही, मागे घ्यायचा नाही व पहिले सत्याग्रही म्हणून श्री. पहाडे यांनीच सत्याग्रह करावा असेच कार्यकर्त्यांना वाटत होते. परंतु श्री. पहाडे यांनी औरंगाबादेत यायचे कसे किंवा त्यांना येथे कोणी, कसे आणावयाचे याबाबत तोडगा समोर येत नव्हता. श्री. पहाडे यांना सुखरूप आणण्याबाबत बरेच काही बोलले गेले. वेळोवेळी बैठकी घेतल्या गेल्या. वाटेल ते झाले तरी श्री. पहाडे यांनीच पहिले सत्याग्रही म्हणून सत्याग्रह करावयाचे एकमताने ठरले. पसरलेल्या नैराश्यावर उत्साहाने पगडा बसविला. उत्साह निर्माण झाला खरा परंतु मूळ प्रश्नावर तोडगा सापडला नाही. श्री. पहाडे यांना औरंगाबादेत सुखरूप आणावयाचे काम सोपे नव्हते. बरेच अवघड आणि कठीणच होते. श्री. पहाडे यांना औरंगाबादला कसे आणायचे? कोणत्या मार्गाने आणायचे? कुणी आणायचे? कोणत्या वाहनात आणायचे? या कामातील धोके स्पष्ट होते. नांदगावला कोणाला पाठवावयाचे? हा एक प्रश्नच होता. त्यातल्या त्यात कोणी कार्यकर्ता तयार झालाच तर तो नांदगावला पोहोचावयाचा कसा? वाटेल ते करून पाठविलेला कार्यकर्ता नांदगावला पोहोचला तर त्याने श्री. पहाडे यांना पोलिसाच्या व निमलष्कराच्या कडेकोट बंदोबस्तातून सहीसलामत औरंगाबादला आणावयाचे म्हणजे निव्वळ स्वप्नरंजनासारखेच होते. त्यातल्या त्यात औरंगाबादेतील कोणा एकाच्या मोटारीतून आणावे तर आख्या औरंगाबाद शहरात चारपाच मोटारी होत्या. त्या मोटारींचे ड्रायव्हर सारे मुसलमानच! आवश्यक तेवढा डोक्याला ताण देऊनही सुखरूप मार्ग सापडलाच नाही. सुखरूप मार्गाचा शोध करावयाचा विचार करीत कार्यकर्ते बराच वेळ बसून राहिले. अशा प्रकारच्या पेचप्रसंगात सर्व कार्यकर्ते व पुढारी मंडळी अडकली होती. अशा आणीबाणीच्या वेळी, हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचे एक हितचिंतक श्री. रावसाहेब पटवर्धन श्रीमंत व्यापाऱ्यासारखे वेषान्तर करून, सतत हळूहळू चालत असलेल्या घोड्याच्या टांग्यातून पानदरीब्याच्या कोपऱ्यावरील मशीदीजवळून चालले होते. मी धावणी मोहल्यातील मारुतीच्या दर्शनासाठी सडकेच्या एका बाजूने मान खाली घालून चाललो होतो. मला थोपवून त्यांनी विचारले, डॉ. काळे कुठे राहतात? मी त्यांना कधीच पाहिलेले नव्हते, तरी मी त्यांना डॉ. काळे यांच्या घरी घेऊन गेलो. तेव्हा त्यांनी माझे नाव विचारले व आभार मानले. ठरल्याप्रमाणे मी मारुतीचे दर्शन घेतले व तेथून मागच्या दाराने श्री. वाघमारे यांच्या घरात गेलो. तेथे श्री. गोविंदभाई, श्री. वाळूजकर, श्री. अच्युतभाई देशपांडे, राम कडेपूरकर व श्री. स. कृ. वैश्यपायन बसलेले होते. जोधपुरी फेटा - कोट घातलेल्या एका व्यक्तीला मी डॉ. काळे यांच्या घरी पोहोचवून आलो असल्याचे त्या सर्वांना सांगितले तेव्हा तेच रावसाहेब पटवर्धन असावेत असे श्री. अच्युतभाई देशपांडे यांनी सांगितले. स्नान, चहा, फराळ आटोपून श्री. रावसाहेब पटवर्धन मागच्या दाराने श्री. वाघमारे यांच्या बैठकीत आले. मला तेथे पाहाताच ते चटकन् म्हणाले, 'अर्ध्या तासापूर्वी यांनीच मला डॉ. काळे यांच्या घरी नेऊन सोडले'. प्रास्ताविक बोलणी झाल्यावर श्री. रावसाहेब यांनी विचारले, 'श्री. पहाडे यांना परत आणावयाचा काही तोडगा सापडला का?' 'आतापर्यंत बराच विचार विनिमय केला. सुरक्षित तोडगा काही सापडला नाही'. असे त्यांना सांगण्यात आले. श्री. रावसाहेब पटवर्धन यांना औरंगाबादेतील प्राप्त परिस्थितीबाबत श्री. वाघमारे, श्री. कडेपूरकर, श्री. गोविंदभाई यांनी सांगितले. साधकबाधक गोष्टींबाबत

ऊहापोह झाल्यावर श्री. रावसाहेब पटवर्धन यांनी एक तोडगा सुचविला : ‘श्री. अण्णासाहेब वाळूजकर वैद्य आहेतच. त्यांनी ते राजवैद्य असल्याचे सांगायचे. त्यानी एखाद्या श्रीमंत घरातल्या चिरंजीवासारखा दिसेल असा तरुण बरोबर येऊन मोटारीतून देऊळगावराजा गावात जायचे. नांदगांवहून श्री. पहाडे यानी या पूर्वीच येऊन तेथे थांबावयाचे. तेथून श्री. पहाडे यांना त्याच मोटारीत दडवून आणावयाचा प्रयत्न करावयाचा. त्यावेळी श्री. पहाडे हे फार भयंकर आजाराने पछाडलेले असल्याचे सोंग वठवावयाचे’. हा तोडगा सर्वांना आवडला. मात्र वरवर अतिशय सहज, सोपा वाटणारा हा तोडगा प्रत्यक्षात आणणे तितके सोपे काम नव्हते. उलट बरेच कठीण होते. त्यात मोटारीचा महत्त्वाचा प्रश्न होता. ड्रायव्हरचा प्रश्न सर्वात अवघड होता. देऊळगावराजाला जायचे कामही कठीण होते. श्री. पहाडे यांना वाघरूळच्या नाक्यावरील कडेकोट बंदोबस्ताची फळी फोडून सुखरूप औरंगाबादला आणावयाचे काम बऱ्याच जिकिरीचे आणि अत्यंत बिकट होते. तरीही त्या अवघड कामासाठी क्षणाचाही विलंब न लावता श्री. लक्ष्मणराव वाळूजकर यांनी होकार दिला. श्री. रावसाहेब पटवर्धन यांना हायसे वाटले. त्यांच्या चेहऱ्यावरील गंभीर भाव पटापट बदलत गेले. श्री. रावसाहेबांनी व आनंदराव वाघमारे यांनी श्री. वाळूजकरांबरोबर जाण्यासाठी माझी निवड केली. परिस्थितीचे, बिकट प्रश्नाचे गांभीर्य मला समजावून सांगितले. प्रसंग तसा बाका असल्याचे पटवून दिले. प्रारंभालाच अपयशी ठरू नये म्हणून आवश्यक त्या सूचना दिल्या. सर्व काही सांगून झाले. एकाला आणण्याच्या कामात आम्ही दोघे अडकणार नाही याची खबरदारी घेण्याबाबत बरेच सांगितले. मला राजस्थानी युवकासारखा पोशाख परिधान करायला सांगितले. जवळच्या आप्तापैकी एका वयोवृद्ध स्त्रीच्या उपचारासाठी राजवैद्याला बरोबर घेऊन देऊळगावराजा या गावाला जायचे असल्याचेच बेडरपणे, जराही न डगमगता ज्याला त्याला सांगावयाचे सांगण्यात आले. जे जे करावयाचे होते त्याबाबतची रंगीत तालीम झाली. पहिली तालीम व्यवस्थित पार पडली. शिकवलेला धडा व्यवस्थित गिरवून घेतला गेला. मला जे करावयाचे सांगण्यात आले होते ते ऐकून, मी मनाचा निर्धार केला. उत्साहाने मी भारावून गेलो. मनातल्या कप्प्यात खोलवर मात्र काहीतरी बोचत होते. माझ्यावर सोपविलेल्या कामगिरीत मी उणा तर पडणार नाही ना? माझ्या माथी अपयशाचे खापर तर फुटणार नाही ना? सत्याग्रह करण्यापूर्वी आमच्यासह श्री. पहाडे यांना अटक तर होणार नाही ना? माझ्यामुळे औरंगाबादचे पहिले सत्याग्रही पकडले गेले असा आरोप माझ्या माथी मारला मारला तर जाणार नाही ना? अशा विचारचक्रात मी काही वेळ अडकलो होतो. श्री. लक्ष्मणराव वाळूजकर यांच्या समवेत मी जायचे निश्चित झाल्यावर मोटारीची शोधाशोध करायचे कामही श्री. वाघमारे व श्री. गोविंदभाई यांनी माझ्यावरच सोपविले. त्यानंतर श्री. रावसाहेब म्हणाले, ‘मोटार ठरविताना सपशेल खोटे बोलावे लागले तर बोला. थोडे अधिक पैसे द्यावे लागले तरी संकोच करू नका. मोटार अधेमधेच बंद पडणार नाही अशीच निवडा. निवडलेली मोटार मंदगतीने चालली तरी चालेल. तुमच्या गावात सर्वचे सर्व ड्रायव्हर मुसलमानच आहेत. त्यापैकी थोडासा मध्यम वयाचाच ड्रायव्हर शक्य तो मिळवावयाला चुकू नका. ड्रायव्हरबरोबर मिळते घ्या. त्यांच्या जेवणाची व्यवस्था करावयाला विसरू नका. या उप्पर अधिक काही सांगावयाचे नाही. तुम्ही तुमच्या कामाला लागा’ लागलीच मी मोटारीच्या शोधात शहागंज, जिन्सी, मोंढा, नबाबपुरा विभागात विचारपूस केली. अंगुरीबाग विभागात एक्रामुद्दीन नावाच्या ड्रायव्हरजवळ मोटार असल्याचे समजल्याने त्याची भेट घेतली. त्याची ती कामचलाऊ मोटार होती. एक्रामुद्दीन तसा तर्कटबाज नसल्याचे त्याच्या बोलण्यावरून जाणवले. देऊळगावराजाला जाण्यायेण्याचे दोनशे रुपये भाडे ठरले. आजारी वृद्ध आई, औषोधोपचार म्हणजे नेककाम व यथायोग्य भाड्याची रक्कम पदरी पडणार म्हणून तो ठरल्यावेळी सुपारी मारुती रस्त्यावरील रामेश्वर मंदिराजवळ आला. तत्पूर्वी प्रसंगाच्या गांभीर्याची उजळणी करण्यात आली. सगळ्यांचा आशिर्वाद घेऊन मी श्री. लक्ष्मणराव वाळूजकरांसमवेत रामेश्वर मंदिराजवळ ऊभ्या असलेल्या मोटारीत

बसलो. एक्रामुद्दीनने मोटार सुरू केली. त्यावेळी सायंकाळचे साडेसात वाजले होते. त्या दिवशी रोजच्या पेक्षा अधिक गडद अंधकार पडला असल्यासारखे वाटले.

मोंढा ओलांडताच रस्त्यालगत असलेली ओळखीची झाडे मागे पडू लागली. मोटारीबाहेरचा गारवा झोंबू लागला. ड्रायव्हर आत्मविश्वासाने पण धिम्या गतीने मोटार चालवीत होता. श्री. आण्णासाहेब कसल्यातरी विचारात गुरफटलेले असल्यासारखे वाटत होते. आम्हा तिघांपैकी कोणीच कोणाशी बोलत नव्हते. मोटारीने चिकलठाणा गाव ओलांडताच गारवा अधिकच वाढू लागला. गार वारा अंगाला सारखा झोंबत होता. सर्वत्र काळोख पसरलेला होता. मोटारीच्या दिव्यामुळे प्रकाशाचा एक पळता तुकडा रस्त्यावर दिसायचा तेवढाच. मोटारीची घरघर कानावर सारखी आदळत होती. आम्ही दोघे आपसातही बोलत नव्हतो, असे पाहून काही तरी बोलायचे म्हणून एक्रामुद्दीनने सुरुवात केली. आम्हा दोघांना काहीतरी बोलायला भाग पाडले.

“सर्दी कसरतसे बढती जा रही है” एक्रामुद्दीन.

“जी हां” एव्हढ्या एका त्रोटक शब्दाने आण्णासाहेबांनी उत्तर दिले. त्यानंतर कोणीच बोलले नाही. मोटारीचा घरघर आवाज तेवढा कानावर आदळत होता. तेवढ्यात मोटारीने करमाड गांव ओलांडले. दूरवर चंद्रमौळी झोपड्यांतील मिणमिण जळत असलेले लुकलुकणारे दिवे अधूनमधून दिसत होते. पुन्हा एखादा गाव जवळ येत असल्यासारखे वाटू लागले. अर्ध्या पाऊण तासानंतर शेकटा गावात मोटार थांबली.

“साब चाय लेंगे?” एक्रामुद्दीनने विनम्रपणे विचारले.

“नही, आप ले सकते है” अण्णासाहेब सहज बोलून गेले.

‘इस दर्गाहके सामने आनेजानेवालोने कुछ देरतक यहां रूकना लाजमी समझा जाता है. ऐसा आम रिवाज है.’ एक्रामुद्दीन.

‘ठीक है, आप रूकीये, हमे कोई एतराज नही है.’ श्री. वाळूजकरांनी ड्रायव्हर एक्रामुद्दीनला उद्देशून सांगितले.

पंधरावीस मिनिटानंतर मोटार सुरू झाली. मोटारीच्या घरघरीशिवाय एखाद दुसऱ्या पक्ष्याचा फडफडणारा आवाज तेवढा ऐकू यायचा. रस्त्यालगतची छोटीछोटी गावे व लहानग्या झोपड्या पार करीत मोटार जालना शहरात दाखल झाली. ड्रायव्हरने आवश्यक तेवढे पेट्रोल मोटारीत भरून घेतले. ऑईल, पाणी तपासून पाहिले. बाजूला उभे राहून एक्रामुद्दीनने भराभर विडीचे झुरके घेतले. मोटार देऊळगावराजाच्या मार्गाने जाऊ लागली. आम्ही दोघे आपल्या विचारात होतो. ड्रायव्हर त्याचे काम करीत होता. त्याला कशाचीच काळजी नव्हती. आमच्या सोबतीला मौन धारण केलेला काळोख होता; गंभीर शांतता होती आणि मोटारीची असह्य घरघर होती.

अनुक्रमणिका

अंदाजे साडेनऊच्या सुमारास आमची मोटार वाघरूळच्या नाक्यावर थांबवावी लागली. मोटार पुढे नेणे शक्य नव्हते. पोलिसांनी रस्त्यावर एक अगडबंब लोखंडी साखळी बांधली होती. सभोवती पोलिसांचे थवेच्या थवे दिसत होते. मोटार थांबताच आठदहा सशस्त्र पोलिसांनी मोटारीला गराडा घातला. त्यातल्या चार पोलिसांनी मागेपुढे डोकावून आत किती लोक आहेत याचा अंदाज घेतला. कसून तपासणी केली. ड्रायव्हरचे नाव गाव विचारून ते टिपून घेण्यात आले. त्यानंतर आम्हा दोघांची नावे, राहाण्याचे गाव, मोहल्ला विचारला गेला. तोही टिपून घेण्यात आला. आम्ही कुठे व कशासाठी जातो आहोत याबाबतही जरा करड्या आवाजात विचारले गेले. प्रश्नांचा भडिमार संपला.

'मी राजवैद्य आहे. देऊळगावराजाला यांच्या वयोवृद्ध मामीची प्रकृती चिंताजनक आहे. मामीचा मुलगा जयपूरला असतो. त्याला यायला उशीर लागणार आहे. मुलगा येईपर्यंत आवश्यक ती हेमगर्भाची मात्रा देऊन यांच्या मामीला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे.' इतके सर्व आण्णासाहेबांनी सांगितले. माझ्या डोळ्यात अश्रुधारा वाहात असल्याचा मी देखावा केला. 'वैद्यमहाराज, माझ्या मामींना वाचवा' इतके मी कातर आवाजात बोललो. पुनरपी डोळ्यात तरंगत असलेले अश्रू पुसण्यासाठी मी माझ्या डोळ्यांना रुमाल लावताच श्री. आण्णासाहेब वाळूजकरांनी माझ्या पाठीवर हात फिरवीत सांगितले, 'धीर धरा, घाबरू नका, परमेश्वरावर विश्वास ठेवा. कर्ता करविता परमेश्वर आहे. सगळे काही नीट होईल'.

आमच्या बोलण्याने व नाटकी आविर्भावाने पोलिसांवर चांगली छाप बसली. माझी मामी खरंच आजारी असेल असेच त्यांना वाटले. आम्हाला पढवलेल्या नाटकांची रंगीत तालीम आम्ही दोघांनी चांगलीच रंगवली असे आम्हा दोघास वाटू लागले. आमच्या मोटारीला गराडा घालून उभ्या असलेल्या शस्त्रधारी पोलिसांनाही आमची दया आली.

"ठीक है! हकीम साहब और आप दवा दारूके लिये जा सकते है! मगर याद रखिये वापसीमें किसीको लाना मत; समझे?" एका पोलिस जमादाराने खडसावूनच सांगितले. थोडीशी दमदाटी केली आणि रस्त्यावर लावलेली जाडजूड लोखंडी साखळी मोकळी करायचे दुसऱ्या एका शिपायाला सांगितले. दोनचार शिपायांनी ती अगडबंब लोखंडी साखळी बाजूला सारून रस्ता मोकळा केला. ड्रायव्हरने तत्परतेने मोटार चालू केली. आमची मोटार हळूहळू पुढे सरकू लागली. मोटार देऊळगावराजा गावाकडे वाटचाल करू लागली. अजमासे एक तासात मोटार देऊळगावराजा गावात धडकली. गावात गेल्यावर आम्ही आमची मोटार श्री. माधवराव बक्षी यांच्या वाड्याच्या एका बाजूला उभी केली. त्यावेळी रात्रीचे अकरा वाजले होते.

आम्ही दोघे मोटारीतून बाहेर पडलो. एक्रामुद्दीनकडे वळून मी सांगितले, "एक्रामुद्दीन मियां, अब आप बाजारमें जाकर पहले खाना खा लो! खाना खाकर आप आरामसे यहाँ आ जाईए; तब तक हकीमसाब मरीज की तबीयतका मायना कर लेंगे, और मरीजको दवा देंगे. दुवा करो मरीजकी तबीयत सुधर जाय. यह लो." असे सांगून मी त्यांच्या हातात पाच रुपयांची नोट ठेवली. पैसे हातात पडताच ड्रायव्हर मोटारीतून उतरून बाजाराकडे निघून गेला. त्याने किमान एक तासभर परत येऊ नये म्हणून श्री. बक्षीच्या धाकट्या भावाने, ड्रायव्हरला समजू नये अशा पद्धतीने त्यांच्या मर्जीतला आणि विश्वासातला एक माणूस पाठवला. ड्रायव्हरचे जेवण झाल्यावर परत यायची घाई केली तर त्या माणसाने ड्रायव्हरला गप्पागोष्टीत रंगवावे व थांबवून ठेवावे;

असा कार्यक्रम ठरवून मी व श्री. आण्णासाहेब वाळूजकर श्री. माधवराव बक्षी यांच्या वाड्यात शिरलो. समोरच्या ओसरीवर श्री. माणिकचंद पहाडे बसलेले पाहून हायसे वाटले. आनंदाने स्फुरण चढले. मी व आण्णासाहेब औरंगाबादहून इथे कसे कसे आलो हे श्री. आण्णासाहेब वाळूजकरांनी श्री. पहाडे यांना सांगितले. श्री. पहाडे यांना येथून मोटारीतून औरंगाबादला जाण्याबाबत आधी ठरविलेल्या कार्यक्रमाचा थोडक्यात तपशील सांगितला. त्यानंतर श्री. माणिकचंद पहाडे शांतपणे म्हणाले, "आण्णासाहेब, तुम्ही सांगाल तसं मी वागायला तयार आहे. माझ्याबाबत तुम्ही काहीही काळजी करू नका. मी तुमच्या मोटारीत असूनही नसल्यासारखा राहीन. तुम्ही निर्धास्त असा." श्री. पहाडे यांना मागच्या सीटमागील डिकीमध्ये एका वळकटीत झोपवावयाचे. वळकटीवर चोहोबाजूनी चादरी टाकावयाच्या व तसे करून वळकटी झाकावयाची, ही श्री. माधव बक्षी यांची सूचना श्री. पहाडे यांच्यासह सर्वांना आवडली. त्यानंतर श्री. पहाडे यांनी डिकीमागे आडवे पडून पाहिले. तेथून उठताना त्यांनी चटकन् सांगितले, 'तुम्ही आता माझी काळजी करू नका. डिकीमध्ये निर्जीव माणसासारखे पडून राहाणे मला नीट जमण्यासारखे आहे. आता तुम्ही पुढच्या तयारीला लागा.'

श्री. माधव बक्षींनी एक मुद्याची गोष्ट सांगितली, "सत्याग्रहपर्वासाठी पत्रकं रोजच्या रोज काढली पाहिजेत. त्यासाठी डुप्लिकेट मशीन, शाई, कागद आणि काँग्रेसचे चरखाधारी झेंडेही तुम्हाला बरोबर न्यायला हवेत."

इतके सर्व साहित्य मोटारीत न्यावयाचे कसे, या प्रश्नाबाबत विचारविनिमय केला. त्या साहित्यापैकी एकही वस्तू पोलिसांच्या नजरेत आली तर सगळा प्रकार फसणार होता. तरी त्या आवश्यक वस्तू बरोबर नेणे अतिशय महत्त्वाचे बनले होते. श्री. बक्षींनी एक कल्पना सांगितली; ती मलाही आवडली. त्या कल्पनेप्रमाणे आम्ही कामाला लागलो. प्रथम मोटारीच्या इंजिनवरील वरच्या लोखंडी गजाला डुप्लिकेटर मशिन तारेने पक्के बांधले. शाई, कागद, कापडी झेंडे मागच्या सीटखाली दाबून ठेवले. त्यावर चादर टाकली. इतके सर्व व्यवस्थित करायला एक तास लागला. त्यानंतर एक जाड सुताडा डिकीमध्ये पसरला. त्यावर श्री. पहाडे पाय आखूड करून आडवे झाले. 'जेव्हा केव्हा मोटार थांबवली जाईल तेव्हा आणि विशेष करून वाघरूळच्या नाक्यावर थोडा वेळ श्वास रोखायचा, खोकला आलाच तर टॉवेलच्या साहाय्याने दाबावयाचा' असे श्री. वाळूजकरांनी सुचविले.

"मी मोटारीत नाही असेच तुम्ही गृहीत धरा." श्री. पहाडे म्हणाले. 'तुम्हाला ठसका आलाच तर मी जोरजोरांनी खोकायला प्रारंभ करीन आणि मी तुमच्या आवाजाला दाबून टाकीन.' श्री. वाळूजकरांनी सांगितले, आता आपण एकमेकांची काळजी करीत बसू नये. वेळ प्रसंग जसा सामोरा येईल तशी त्यातून सहीसलामत निभावण्याची खटपट करू; असे आण्णासाहेबांनी सांगितले. तेवढ्यात ड्रायव्हर एक्रामुद्दीन समोरून येताना दिसला. श्री. आण्णासाहेबांनी विषयाला बगल दिली. रोग्याच्या निदानाबाबत व अधूनमधून रोग्याला द्यावयाच्या औषधाबाबत बोलावयाला प्रारंभ करून ड्रायव्हरकडे कानाडोळा केला. श्री. वाळूजकरांनी बोलणे आटोपते घेतले. आजूबाजूस उभे असलेल्यांना दिलासा देण्यासारखे काहीतरी बोलले. श्री. माधव बक्षींच्या पाठीवरून हात फिरवीत सांगितले, "आता तुम्ही तुमच्या मनाला आवरलं पाहिजे. परमेश्वराची आराधना करा. तोच तुमची आमची सुटका करील. भरवसा ठेवा. सकाळपर्यंत उतार पडेल. यदाकदाचित् बरे वाटलेच नाही तर आम्ही उद्या याच मोटारीतून परत येऊ." असे आश्वासन श्री. वाळूजकर यांनी दिले. आमच्या नाटकाचा दुसरा अंक व्यवस्थित पार पडला. ड्रायव्हर एक्रामुद्दीनकडे बोट करून मला खुणावले. मी लागलीच

ड्रायव्हरला जरासे बाजूला नेले अन् सांगितले, "मरीजकी हालत फिलहाल थोडी अच्छी है! बुढापा है! जडीबूटीका असर देरसे होता है. इसपर भी मरीजकी हालत काबूमें न आ सकी तो कल फिर आना पडेगा." "खुदा बन्दे को जैसा रखे वैसे रहना पडता है." एक्रामुद्दीनला उद्देशून आण्णासाहेब बोलले.

"सही है, खुदा चाहे तो सबकुछ ठीक हो जायगा" एक्रामुद्दीन सहज बोलून गेला.

उद्या कदाचित् पुन्हा यावे लागेल. मोटारीचे भाडे मिळेल असे एक्रामुद्दीनला वाटले. त्यावरून त्याने रोग्याची आस्थापूर्वक विचारपूस केली. आमचे आपापसात निरोप देऊन झाले. श्री. बक्षींनी बालाजीचा प्रसाद म्हणून पेढ्याची एक छबडीच एक्रामुद्दीनजवळ दिली. आमची मोटार सुरू झाली. धूर आणि धुराळ्याची उधळपट्टी करीत आमची मोटार वाघरूळकडे झेप घेऊ लागली.

अंदाजे रात्री एक वाजण्याच्या सुमारास त्या ओळखीच्या जाडजूड लोखंडी साखळी समोर आमची मोटार थांबली. वाघरूळच्या चौकीवरल्या आठ दहा पोलिसांनी मोटारीला गराडा घातला. जमादाराचा ड्रायव्हरवर विशेष रोख असल्यासारखे वाटले. त्याला दमदाटी करून आम्हा दोघांबाबत विशेषत्वाने माहिती विचारली गेली. ड्रायव्हर सांगेल ती माहिती खरीखुरी असल्याबाबत शहानिशा करून घेण्यासाठी जमादार त्वेषाने पुढे सरसावला. बाकीच्या पोलीस शिपायांनी आपले डोके मोटारीत खुपसून आम्हा दोघांचे चेहेरे न्याहाळले. एक्रामुद्दीनची पुन्हा फेरतपासणी करण्यात आली. पोलिसांच्या ड्यूट्या बदलल्याने आम्हा सर्वांना बराच त्रास झाला. बरीच विचारपूस करण्यात आली. ड्रायव्हर मुसलमान आहे तो निदान धोकादायक काम करणार नाही. आजाऱ्याच्या औषधपाण्याचे कारण खरे असावे असे त्यांना वाटू लागले. आम्हाला जालन्याच्या रस्त्याकडे जाऊ देण्यात त्यांचे एकमत होत असतानाच एक पोलीस धावतपळत मोटारजवळ आला. क्षणभर दमछाटी केल्यावर त्यांने सांगितले, 'इस मोटार को मत जानेदो, बडे साब इसी मोटारसे औरंगाबाद जाना चाहते है!' क्षणभर आमच्या शरीरातील हवा निघून गेल्यासारखे आम्हा दोघांना वाटले. माझ्या सर्वांगाला दरदरून घाम फुटला. सगळ्या आणाभाका एकाच वेळी आठवल्या. डोक्यात विचाराचे थैमान सुरू झाले. श्री. माणिकचंद पहाडे यांना सुखरूप औरंगाबादला नेण्यासाठी निघालो. एक तासापूर्वी श्री. पहाडे सुखरूप होते. आता आम्ही त्यांच्यासमवेत पोलिसांच्या ताब्यात जाणार; असे स्पष्ट चित्र डोळ्यांना दिसू लागले. भोवळ आल्यासारखे वाटू लागले. डोके चक्रावून गेले. काही, काही सुचत नव्हते. बाका पेचप्रसंग आ वासून उभा होता. समोर आलेल्या पेचातून सुटकेचा मार्ग डोळ्यांना दिसत नव्हता. काही एक सुचत नव्हते. श्री. पहाडे यांना सुखरूप औरंगाबादला न्यायचे लांबच राहिले. आपण आपल्याच हाताने त्यांना पोलिसांच्या हवाली, करायचे? मी श्री. आण्णासाहेबांच्या चेहऱ्याकडे पाहिले. दोन्ही हातात डोके धरून, डोळे मिटून आण्णासाहेब बसले होते. त्यांच्या मनातले विचार कळायला मार्ग नव्हता. चेहऱ्यावरून कल्पना येत नव्हती. अशा विचित्र परिस्थितीत अर्धा तास कधी निघून गेला ते समजले नाही आम्ही तेथून सहीसलामत सुटावे म्हणून गणरायाची मनोभावाने प्रार्थना करीत होतो तेथून मुक्त व्हावयाची आम्ही वाट पाहात होतो. थंडीच्या कडाक्यात आमच्या मोटारीसभोवती गराडा घालून उभे असलेले पोलीस शिपाई त्यांच्या 'बडे साब'च्या आगमनाची आतुरतेने वाट पाहात उभे होते. जाणारा प्रत्येक मिनीट तासासारखा वाटत होता. पंचेचाळीस मिनिटे मोठ्या अस्वस्थतेत पार पडली. लांबून दुसरा जमादार आस्ते कदम चालत चालत आमच्या मोटारीजवळ आला आणि ड्रायव्हरला म्हणाला, 'बडे साब की तबियत नासाज है। अब आप जा सकते हैं' इतके सांगून तो आमच्याकडे वळून अत्यंत

नम्रपणे म्हणाला, 'आपको खामखा यहाँ ठहरनेकी जहमत उठानी पडी, बडे साबने आपका शुक्रिया अदा करनेको कहा है, शुक्रिया कबूल कीजिये।' इतके सांगून झाल्यावर त्या जमादाराने आमची मोटार जाऊ देण्यास सांगितले. लोखंडी साखळी काढली गेली. मोटारीचे इंजिन सुरू झाले आणि सलाम आदाब घेत-देत आमची मोटार वाघरूळ नाक्याच्या कडेकोट पोलीस बंदोबस्तातून बाहेर पडली. आम्ही दोघांनी सुस्कारे सोडले. आमचा जीव खाली पडला. मोठे संकट टळले. आम्हाला पुन्हा स्फुरण चढले. 'आम्हा दोघांना हायसे वाटत होते. तेवढ्यात मोटारीने ४-५ फर्लांग इतके अंतर ओलांडले होते तोच एका विचित्र आवाजाने आम्ही दचकलो. एक भले मोठे घुबड फडफड आवाज करीत मोटारीच्या समोरच्या भागावर आदळले. घुबडाला जबरदस्त जखम झाली असावी. घुबडाच्या रक्ताचे शिंतोडे समोरच्या काचेवर दिसत होते. एक अस्सल शिवी हासडून ड्रायव्हर आमच्याकडे जराशी मान वळवून म्हणाला. "साब वो उल्लू मर गया, मैने उसे बचानेकी बहोत कोशिश की मगर आखीर वह अपनी मौतसे मर गया।' 'खैर जाने दिजिये, अफसोस करनेकी जरुरत नही है। उसे बचानेकी आपने कोशिश की है, हमने अपनी आखोंसे देखा है। शायद उसकी मौत आ गई थी' इतके सांगून मोटारीचा वेग वाढवावयासाठी त्याला आम्ही सांगितले.

घडत गेलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावण्यात आणि उरलेल्या प्रवासाबाबत विचार करण्यात अजमासे अर्धा पाऊण तास निघून गेला. आमची मोटार जालना शहराच्या मध्यभागी असलेल्या पेट्रोल पंपाजवळ जाताच ड्रायव्हरने मोटार थांबवली. तेव्हा आम्ही भानावर आलो. ड्रायव्हर त्याच्या मोटारीत पेट्रोल घेत असताना रात्री गस्त घालणाऱ्या पोलिसांचे पथक तेथे आले. विचारपूस, वरपांगी तपासणी झाल्यावर काँग्रेसवाल्यांना इरसाल शिव्या हासडल्या गेल्या. तेवढ्यात ड्रायव्हरने मोटारीचे इंजिन सुरू केले. हळूहळू मोटार जालना शहराबाहेर पडली, त्यावेळी आम्हाला आमचा हुरूप वाढीला लागला असल्यासारखे वाटू लागले. उघड्यावरचा गार वारा आम्हाला झोंबू लागला. रस्ता तसा इथून तिथून निर्मनुष्य होता. ड्रायव्हरला परत जायची ओढ होती. लवकरात लवकर औरंगाबादला आम्हाला जायचे होते. मोटारीने चांगला वेग धरला होता. बदनापूर, शेकटा, करमाड, चिकलठाणा अशी गावे ओलांडून मोटार औरंगाबाद शहरातील रामेश्वर मंदिराजवळ थांबली तेव्हा सकाळचे पाच वाजले होते. रस्त्यावर सर्वत्र सामसूम होती. अधून मधून कुत्री भुंकत होती. रामेश्वर मंदिराशेजारच्या घरात श्री. पहाडे यांना ठेवावयाचे आधीच ठरले होते. त्या घरासमोर उभे राहून मी एकामागून एक आरोळ्या दिल्या. दाराची कडी वाजवली. प्रतिसाद मिळाला नाही. घरातले लोक सुखासमाधानाने गाढ झोपी गेले असावेत. भरपूर प्रयत्न करूनही कोणीच जागा झालेला दिसेना. घरातल्या मंडळींची झोपमोड करण्यासाठी बरीच धडपड केली. काही उपयोग झाला नाही. येथे येईपर्यंतचा प्रवास निर्विघ्नपणे पार पडला. आता काय करावे ते तडकाफडकी सुचेना. पुन्हा पेच प्रसंगाला तोंड देण्याची पाळी आली. पुनरपी आरोळ्या दिल्या. कडी वाजवून झाली. घरातून आवाज आलाच नाही. आमच्या आतापर्यंतच्या खटाटोपाची चाहूल कुणा घरभेद्याला, सरकारच्या भाटाला लागली अन् त्याने पोलिसांना वर्दी दिली तर काय होईल? या विचाराने आम्ही पुनरपी विचारात पडलो. इतक्यात 'जागते रहो' जागल्याची आरोळी कानावर आदळली. मोटार चालविण्याच्या परिश्रमाने एक्रामुद्दीन वैतागला होता. आता त्यालाही झोप आवरत नव्हती. तो स्वतः होऊन म्हणाला 'हकिम साब आप दो घंटे मोटारमें आराम कीजिये, सवेरा होते ही लोग जाग जायेंगे। मैं यह मोटार यहीं छोडकर अपने घर जाता हुं, सुबह मेरी मोटार ले जाऊंगा।' ठीक है, हम दोनो आपका शुक्रिया अदा करते है,' श्री. अण्णासाहेबांनी सांगितले. मोटारीच्या किल्या एक्रामुद्दीनने बरोबर घेतल्या अन् तो अंगुरीबागकडे वळला. पाच मिनिटात तो आमच्या हष्टीआड झाला. त्यावेळी रस्त्यावर या टोकापासून त्या टोकापर्यंत

शुकशुकाट होता. आता मोटारीत असे कुठवर बसून राहावयाचे? काही कळत नव्हते. मोटारीत असे बसून राहाणे धोक्याचे होते. त्यात श्री. पहाडे तब्बल पाच तासापासून मोटारीच्या डिकीत अवघडून पडलेले होते. त्यांचे सर्वांग अवघडल्याने जड झाले असावे. त्यांचा जीव गुदमरत असावा. तेथून त्यांना बाहेर काढणे जरूरीचे होते. एखाद्या सुरक्षित ठिकाणी त्यांना तात्काळ पोहोचविणे आवश्यक होते. तेवढ्यात जागल्याने 'जागते रहो'ची पुन्हा आरोळी दिली. आजूबाजूला समोरून मागून कोणीही येत नसल्याचे पाहून श्री. वाळूजकरांनी श्री. माणिकचंद पहाडे यांना डिकीबाहेर यायला सांगितले. श्री. पहाडे डिकीतून बाहेर आले. त्यांचे सर्व कपडे आणि सर्वांग धुळीने माखलेले होते. तिकडे दुर्लक्ष करून श्री. पहाडे मोटारीबाहेर येताच चादरीने त्यांचे तोंड व शरीर झाकून घेतले. मी पुढे झालो. माझ्या अगदी मागोमाग श्री. पहाडे व त्यांच्या मागे श्री. आण्णासाहेब वाळूजकर, आम्ही तिघे भराभर पावले टाकीत खाराकुव्यातील 'लक्ष्मी खुशाल' यांच्या बोळात प्रवेश केला. त्यावेळी सकाळचे साडेपाच वाजले असावेत. कडाक्याच्या थंडीमुळे सर्वत्र सामसूम होती, म्हणूनच श्री. पहाडे यांना 'लक्ष्मी खुशाल' यांच्या वाड्यात नेता आले. थोड्याशा परिश्रमाने वाडा उघडला गेला. झटकन श्री. पहाडे आत शिरले व त्यांनी वाड्याचे दार आतून बंद केले.

आण्णासाहेब व मी मोटारीजवळ परत आलो. तीन खेपात डुप्लिकेटर मशिन, शाई, कागद, झेंडे वगैरे सामान त्याच वाड्यात नेले. जीव खाली पडला. पोलिसांची कडेकोट फळी फोडून आम्ही श्री. पहाडे यांना सुखरूप औरंगाबादेत आणू शकलो यामुळे आमची मने आनंदाने बहरून गेली होती. आमच्यावर सोपविलेल्या कामाचा वृत्तांत श्री. वाघमारे व श्री. गोविंदभाई यांना सांगण्यासाठी आम्ही आतुर झालो होतो.

दुसऱ्या दिवशी आधी ठरल्याप्रमाणे श्री. पहाडे यांना 'लक्ष्मी खुशाल' यांच्या वाड्यातून श्री. दिगंबरदास चौधरी यांच्या बंगल्यात पोहोचवले गेले. दुसऱ्या दिवशी काय काय काम करावयाचे त्याबाबत रात्री बोलणी झाली होती. कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता. कार्यक्रमाची निश्चित वेळही ठरविण्यात आली होती. दुसरा दिवस उजाडला श्री. पहाडे औरंगाबादी आल्याचे वृत्त मोजक्याच लोकांना माहीत होते. सकाळचे दहा वाजेपर्यंत अत्यंत गुप्तता राखण्यात आली होती. सकाळी १० च्या सुमारास सौ. वेणीबेन चौधरी व सौ. जरीवाला यांनी त्यांच्या कपाळावर कुंकुम तिलक लावला. गळ्यात पुष्पहार घातला. पंचारतीने ओवाळले. हार्दिक आशीर्वाद दिला. त्यानंतर क्षणाचाही विलंब न लावता श्री. पहाडे यांनी आपले शरीर खादीच्या कपड्यात लपवून मोंढा विभागाच्या मागच्या बोळातून जुना मोंढा विभागात प्रवेश केला. मोंढ्याच्या मध्यभागी उभे राहून त्यांनी आपल्या तोंडावरची खादीची शाल ओढली आणि नेहमीच्या आवेशपूर्ण आवाजात 'हैदराबाद स्टेट काँग्रेस झिंदाबाद'ची गर्जना केली. श्री. पहाडे यांचीच वाट पाहात असलेले श्री. गुलाबचंद नागोरी (पैठण), श्री. कौसलसिंग (माजलगाव) व वैजापूरचे श्री. मनोहर सोनदे विद्यार्थी प्रतिनिधी हे त्यांच्या जवळ आले. सर्वांनी एका आवाजाने हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या जोरदार घोषणा देऊन मोंढा विभाग निनादून टाकला. काही व्यापारीही श्री. पहाडे व इतर सत्याग्रहींच्या सभोवती उभे झाले. श्री. पहाडे यांनी आपल्या खड्या आवाजात स्टेट काँग्रेसचे पत्रक वाचायला प्रारंभ केला. व्यापाऱ्यांबरोबर हमाल, व्यापारानिमित्त आलेले गावकरी एकत्र आले. पहिल्या नियोजित सत्याग्रहाचा प्रारंभ श्री. पहाडे यांनीच केला. सत्याग्रहाच्या पहिल्या पर्वाचा श्रीगणेशा व्यवस्थित पार पडला. हैदराबाद स्टेट काँग्रेसची चळवळ सत्याग्रह सुरू होण्यापूर्वीच जमीनदोस्त करून टाकण्यासाठी निझामाच्या सैतानी राजवटीने अंगिकारलेले सर्व प्रयत्न अपयशी ठरविण्यात हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या औरंगाबादेतील ज्येष्ठ नेत्यांचा पुढाकार होता. औरंगाबाद जिल्ह्यात श्री. पहाडे यांच्यावर प्रवेशबंदी,

तीही फर्मानाद्वारे लादली होती. श्री. पहाडे यांना औरंगाबादेत प्रवेश करता येऊ नये म्हणून कडेकोट बंदोबस्त करण्यात आला होता. पोलिसांच्या छावण्या उभ्या केल्या होत्या. पोलिसांची व निमलष्कराची कडेकोट फळी फोडून श्री. माणिकचंद पहाडे सुखरूप औरंगाबादेत आले अन् त्यानीच 'पहिले सत्याग्रही' म्हणून हैदराबाद स्टेट काँग्रेसचे रणशिंग फुंकले. 'पहिले सत्याग्रही' म्हणून मान मिळविला. श्री. माणिकचंद पहाडे यांनीच ठरल्याप्रमाणे ठरल्या दिवशी व वेळी सत्याग्रहाचा प्रारंभ केल्याची बातमी सोसाट्याच्या वाऱ्याच्या वेगाने शहरभर पसरली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा मात्र प्रथम या वार्तेवर विश्वास बसला नाही. पोलिसांना बनविण्याचाच हा प्रकार असावा असे त्यांना प्रथम वाटले. एवढ्या कडेकोट बंदोबस्ताची फळी फोडून श्री. पहाडे औरंगाबादेत येण्याची त्यांना शक्यताच वाटत नव्हती. परंतु जेव्हा पोलिसांच्या विश्वासातील खास व्यक्तींनी, पहाडे स्टेट काँग्रेस झिंदाबादच्या घोषणा देऊन निझामी राजवटीविरुद्ध 'गरळ' ओकत असल्याचे सांगितले तेव्हा त्यांना वस्तुस्थिती उमगली. पोलिसानी धावपळ केली आणि श्री. पहाडे यांच्या समवेत इतर तीन सत्याग्रहींना रीतसर अटक केली.

आराम खुर्चीत बसून फावल्या वेळात राजकारणाच्या ऐसपैस गप्पा मारणाऱ्या नेमस्त मवाळ, सरकारधार्जिण्या मंडळीना मात्र श्री. माणिकचंद पहाडे, निझामी राजवटीने उभारलेली कडेकोट बंदोबस्ताची फळी फोडून कसे व कोणत्या मार्गाने आले हे समजू शकले नाही. हैदराबाद स्टेट काँग्रेसने सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या मोहिमेची ही एक गोष्ट आहे. सत्याग्रहपर्वाच्या उसळत्या अन् धगधगत्या काळातील अशा बऱ्याच गोष्टी आहेत. सत्याग्रहपर्वाच्या चैतन्यमय आठवणी मनाला चटका लावतात. सत्याग्रहपर्वातले मोलाचे क्षण जिवंत असले तरी त्यातले रोमहर्षक चैतन्य आता संपत चालले आहे. त्या ऊर्मीच्या सगळ्या चित्रांचे ठोकळे होऊन पडले आहेत. त्या चित्रांच्या ठोकळ्यांची अडगळ मनाच्या तळातल्या कप्प्यात साचली आहे.

१९३८ च्या सत्याग्रहाचे लोण बोलता बोलता औरंगाबाद जिल्ह्याच्या पैठण, गंगापूर, वैजापूर, कन्नड, सिल्लोड, अंबड व जालना तालुक्यात पोहोचले. वैजापूर येथे डॉ. अंबर्डेकर, लखीचंद संचेती, रूपचंद संचेती, रंगीलदास भाटीया, लाला बिंदा प्रसाद; पैठणला शंकरराव खांदाट, तात्यासाहेब महाजन वैद्य, तांबोळी, रमणिक पटेल; जालन्याला मदनलाल चौबिशिया, बिहारीलाल भक्कड, सदाशिवराव निरखी; अंबडला रामचंद्रराव अष्टपुत्रे, पंडीतराव पेडगावकर, लक्ष्मणराव देशमुख; सिल्लोडला आबासाहेब महाजन, धोंडूसिंग हजारी, होनसिंह हजारी तर कन्नडला मिश्रीलाल पहाडे हे चळवळीत सहभागी झाले.

औरंगाबाद शहर व जिल्हा परिसरातून सहज बोटावर मोजता येतील इतक्याच मोजक्या वयस्कर लोकांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसने, महात्मा गांधीजींच्या आशीर्वादाने सुरू केलेल्या सत्याग्रहपर्वात स्वखुषीने उडी घेतली. परंतु, भावी जीवनाचा व समोर येणाऱ्या हालअपेष्टांचा जराही विचार न करता, हैदराबाद राजवटीच्या जात्यंध व जुलमी कार्यपद्धतीविरुद्ध बंड पुकारण्याच्या निर्धाराने अनेक विद्यार्थ्यांनी मात्र स्वतःला सत्याग्रहपर्वात झोकून दिले आणि त्यामुळे सामान्य नागरिकांत जागृती निर्माण झाली. विद्यार्थी आंदोलनाने नवे व तेजस्वी पर्व सुरू केले.

विद्यार्थ्यांच्या सहभागाने हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रह मोहिमेला अल्पावधीत औरंगाबाद जिल्ह्यात आगळे स्थान प्राप्त झाले. जनमानसात कित्येक वर्षांपासून खोलवर रुजलेली मरगळ नष्ट होऊ

लागली. नवनवी आशेची किरणे उदयाला येऊ लागली. अशा परिस्थितीत हैदराबाद संस्थानात आर्य समाजाने धार्मिक हक्कांसाठी आंदोलन सुरू करावयाचा निर्णय जाहीर केला. हैदराबादेतील आर्य समाजाच्या मदतीसाठी हिंदुस्थानाच्या कानाकोपऱ्यातून आर्य समाजाच्या संस्थांनी व घटकांनी यावे असे एकमताने ठरविण्यात आले. आर्य समाजाच्या आंदोलनाची केंद्रे मुख्यत्वेकरून गुलबर्गा, बीदर, उस्मानाबाद ही मान्य करण्यात आली होती. हिंदू महासभेने देखील निर्माण झालेल्या परिस्थितीचा भरपूर फायदा घेण्यासाठी, आंदोलनात उडी घेतली होती. हिंदूमहासभेच्या स्थानिक सत्याग्रहींची संख्या तितकी मोठी नव्हती. औरंगाबाद शहरात हिंदूमहासभेचे धड कार्यालयही नव्हते. कार्यालयाचा फलकही लावलेला नव्हता. काही लोक हिंदूमहासभेचे सभासद असल्याचे एकांतात सांगत. सरकार दरबारी अगर जनमानसात हिंदू महासभेची स्थानिक पक्ष म्हणून प्रतिमा नव्हती. बाबू नावाचा एक तरुण हिंदूमहासभेचा प्रमुख कार्यकर्ता असल्याचे सांगत असे. त्या पक्षाची सारी भिस्त पुणेकरांवर होती. तरी आर्य समाजाच्या पाठोपाठ हिंदूमहासभेने सत्याग्रह आंदोलनात उडी घेतल्याचा डांगोरा पिटला. आर्य समाज व हिंदूमहासभेच्या लोकांनी छेडलेल्या सत्याग्रह मोहिमेमुळे गोंधळ व संभ्रम निर्माण झाला. त्या दोन्ही पक्षांचे बहुतेक सत्याग्रही हैदराबाद संस्थानातले नव्हते. त्या दोन्ही पक्षांचे ध्येयधोरण हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या ध्येयधोरणापेक्षा भिन्न होते. आर्य समाजाचे जथ्थे एकामागून एक औरंगाबादेत येऊ लागले. औरंगाबादेचे मध्यवर्ती कारागृह फार थोड्या अवधीत खचाखच भरले. कॅम्प जेलचा विभागही भरत आला. मध्यवर्ती कारागृह व कॅम्प जेलमध्ये काही हिंदूमहासभेचे लोकही होते. त्यांच्या त्या सत्याग्रह आंदोलनाबाबत उलटसुलट बोलले जाऊ लागले. निरनिराळे तर्क वर्तविले जाऊ लागले. हैदराबाद संस्थानाचा निझाम हा मुस्लिम आहे. तो नको म्हणून आर्य समाज व हिंदूमहासभेने सत्याग्रह सुरू केला आहे. आर्य समाज व हिंदूमहासभा ह्या दोन्ही संस्था इस्लाम व मुस्लिम विरोधक आहेत. 'इस्लाम खतरेमें है' असे सांगितले जाऊ लागले. हैदराबाद स्टेट काँग्रेसने तयार केलेली जनता आंदोलनाची बैठक जातीयतेच्या आरोपाने डागाळली जाऊ लागली. हैदराबाद स्टेट काँग्रेसही जातीयवादी असल्याचा आरोप लादण्याची नामी सुवर्णसंधी हैदराबाद संस्थानाच्या जात्यंध राजकर्त्यांना आर्य समाज व हिंदूसभेने उपलब्ध करून दिली. अशा परिस्थितीत हैदराबाद स्टेट काँग्रेसने सुरू केलेले सत्याग्रहाचे आंदोलन स्थगित करण्याचा सल्ला महात्मा गांधींनी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या पुढाऱ्यांना दिला. महात्मा गांधींनी दूरवर, खोलवर विचार करून सल्ला दिला आहे असे मान्य करून, महात्मा गांधींची आज्ञा शिरसावंद्य मानून स्टेट काँग्रेस सत्याग्रहपर्व ताबडतोब स्थगित करण्यात आले.

त्याच सुमारास 'वंदे मातरम् आंदोलन' सुरू होते. वंदे मातरम्‌वरील बंदीचा निषेध नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रभात फेऱ्या काढल्या आणि त्यांच्या मनात जोमाने उफाळून आलेला असंतोष त्यांनी व्यक्त केला आणि शाळा-कॉलेजवर बहिष्कार टाकला, आपल्या शिक्षणावर पाणी सोडले. या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली नगरचे श्री. रावसाहेब पटवर्धन, येवल्याचे आपटे गुरुजी, खामगावचे पुरवार गुरुजी आणि नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु श्री. केदार यांनी. 'वंदे मातरम्' चळवळीत सहभागी झालेल्या बहुतेक विद्यार्थ्यांच्या जीवनाचे प्रवाह पार बदलून गेले. कित्येक विद्यार्थ्यांना अनंत प्रकारच्या संकटांना सामोरे जावे लागले. हे कटू सत्य नाकारता येणार नाही. वंदे मातरम् बंदीमुळे विद्यार्थीचळवळीचे जे अपूर्व पर्व घडले त्याची भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनीच नोंद करायला हवी. वंदे मातरम् आंदोलन अदमासे एक वर्ष चालले. वंदे मातरम् चळवळीने औरंगाबाद शहरातील वातावरण पार ढवळून काढले. अन्यायाविरुद्ध तुटून पडण्याची ताकद जनमानसात निर्माण केली. 'वंदे मातरम् कृति समिती'ने पंडित जवाहरलाल यांना भेटावे असे ठरले होते. विद्यार्थी आनंदित झाले. ठरल्याप्रमाणे भेट झाली. पंडितजींनी चळवळीला आशीर्वाद

दिला. नंतर वर्ध्याला काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक चालू असताना औरंगाबादेतील विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी श्री. स. कृ. वैशंपायन व श्री. व्ही. डी. देशपांडे यांनी पंडित जवाहरलाल यांची भेट घेतली. पंडित जवाहरलाल यांनी चळवळीला पाठिंबा दिला. श्रीमती सरोजिनी नायडू मार्फत कृतिसमितीच्या सदस्यांनी महात्मा गांधी यांची भेट घेतली. गांधीजींनी त्रिपुरा अधिवेशनानंतर वंदे मातरम् विद्यार्थी आंदोलनाबाबत हैदराबाद संस्थानाचे प्रधान मंत्री सर अकबर हैदरी यांच्याबरोबर पत्रव्यवहार सुरू केला. या पत्रव्यवहारात, वंदेमातरम्वरील बंदी उठविण्याचा महात्माजींनी आग्रह धरला पण प्रतिसाद मिळाला नाही. हिंदू व मुस्लिम विद्यार्थ्यांमध्ये उस्मानिया विद्यापीठाच्या आडमुठेपणाच्या धोरणामुळे निर्माण झालेली तेढ कायम होती. माफीनाम्याशिवाय प्रवेश नाकारला गेला. विद्यार्थ्यांत फूट पडली, उस्मानिया विद्यापीठाने वंदेमातरम् गीत म्हणण्याचा अधिकार धुडकावून लावला. विद्यापीठाने स्वीकारलेले आडमुठेपणाचे धोरण बऱ्याच विद्यार्थ्यांना चांगलेच झोंबले. काहींनी माफीनामा सादर न करता शिक्षण सोडले. आपापल्या विभागातील राजकीय पक्षात हे विद्यार्थी दाखल झाले. अशा प्रकारे बरेच विद्यार्थी राजकीय आंदोलनात सहभागी झाले. स्वातंत्र्य आंदोलनास विद्यार्थ्यांनी नवे रूप, नवे चैतन्य प्राप्त करून दिले.

किती तरी विद्यार्थ्यांच्या जीवनाचे तीनतेरा झाल्यावर वंदे मातरम् गीतावरची बंदी उठविण्यात आली ती १९४१ मध्ये. मध्यंतरी श्री. आ. कृ. वाघमारे, श्री. गोविंदभाई, श्री. डी. एल. पाठक, श्री. स. कृ. वैशंपायन, श्री. हबीबुद्दीन, श्री. रतिलाल जरीवाला यांना अटक करताना सर्वांच्या घराच्या कसून झडत्या घेण्यात आल्या व त्यांना निरनिराळ्या तुरुंगात ३ वर्षांसाठी डांबण्यात आले.


सत्याग्रह स्थगित झाल्यानंतर महात्मा गांधी व हैदराबाद संस्थानचे पंतप्रधान सर अकबर हैदरी यांच्यात पत्रव्यवहार सुरू झाला. १० एप्रिल, १९३९ रोजी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहींची सामुदायिक सुटका करण्यात आली. मात्र हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी जशीच्या तशी कायम होती.

विद्यार्थ्यांत उफाळून आलेले चैतन्य त्यांच्या अणुरेणूत भरलेले होते. मरगळ पार नाहीशी झाल्यासारखे वाटत होते. आता राष्ट्रीयत्वाची जोपासना आणि संगोपन यांची आवश्यकता होती. इतक्यावर सर्व संपलेले नव्हते. हैदराबाद संस्थानातील मराठवाडा विभागाला बराच मोठा पल्ला गाठायचा होता. संघटनेवर व सभासमारंभावर बंदी जशीच्या तशीच कायम असल्याने मराठवाड्यातील कार्यकर्त्यांची व आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची एक सभा मनमाड येथे घेण्यात आली. त्या बैठकीला कार्यकर्त्यांबरोबर जवळपास चारशेवर सत्याग्रही आले होते. सत्याग्रह आंदोलनात सहभागी झालेले विद्यार्थी व नागरिक तावूनसुलाखून तयार झालेले, करारी विचाराने परिपक्व बनले होते. हैदराबाद स्टेट काँग्रेस जनमानसात कायम उभी करण्याचा त्यांचा निर्धार होता. आपला निर्धार अमलात आणण्यासाठी, आलेल्या आपत्तीबरोबर झुंज देण्याची त्यांच्या मनाची तयारी होती.

औरंगाबाद शहरात व जिल्ह्यात पुष्कळसे लोक महात्मा गांधीना 'उपकारकर्ता' समजून होते. पंडित जवाहरलाल नेहरूंना 'देवदूत' समजत होते. त्या दोघांचा प्रत्येक आदेश शिरसावंद्य मानला जाई. हैदराबाद स्टेट काँग्रेस नावाची संघटना हैदराबाद संस्थानच्या राज्यकर्त्यांना मान्य नव्हती. राज्यकर्त्यांचा कडवा विरोध पाहून काही मंडळीनी हैदराबाद स्टेट काँग्रेसचे नाव बदलून टाकावयाचा विचार सुरू केला. हैदराबाद स्टेट


काँग्रेसचे नाव बदलण्याची बहुतेकांची इच्छा नव्हती; तयारीही नव्हती. हैदराबाद स्टेट काँग्रेसचे नाव बदलण्याबाबत स्थायी समितीने विचार करावा असेही सुचविले जाऊ लागले. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या नावात योग्य तो बदल केला तर बंदीचा हुकूम मागे घेतला जाईल, मात्र नव्या नावाने अस्तित्वात येणाऱ्या संस्थेने हैदराबाद संस्थान बाहेरच्या कोणत्याही संस्था अगर संघटनेबरोबर कोणतेही सबंध ठेवू नयेत; असे राज्यकर्त्यांद्वारे सांगितले जाऊ लागले.

हैदराबाद स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते मूग गिळून गप्प बसावयाच्या मनःस्थितीत नव्हते. सरकारची टोलवाटोलवी त्यांना समजत होती. सरकारने बोलायचे एक मात्र करायचे दुसरे याचा कार्यकर्त्यांना वेळोवेळी अनुभव येत होता. आता ठरविलेल्या ध्येयधोरणापासून तसूभरही माघार घेणे नाही; सरकारी ध्येयधोरणांचा उघड उघड कडवा विरोध करावयाचा असेच मनोमन ठरविले गेले होते. हैदराबाद संस्थानाच्या वरिष्ठ राज्यकर्त्यांबरोबर हैदराबाद स्टेट काँग्रेस संघटनेवर लादलेल्या बंदी हुकूमाबाबत स्टेट काँग्रेसच्या नेत्यांनी केलेला पत्रव्यवहार प्रकाशित करण्यात आला. त्यात प्रामुख्याने राज्यकर्त्यांनी वेळोवेळी केलेला वचनभंग नमूद केलेला होता. हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी काढून घेण्यात सारखी दिरंगाई केली जात होती. दिरंगाईच्या धोरणामुळे तापलेले वातावरण पार बदलून जाईल, असेच राज्यकर्त्यांना वाटत होते. धरसोडीचा पवित्रा स्वीकारून विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम, गोंधळ निर्माण करण्याच्या कामात सरकारला यश येत होते. विद्यार्थ्यांच्या मनात माजलेला गोंधळ महात्मा गांधीनी ताडला होता. विद्यार्थ्यांच्या मनात घोळत असलेल्या विचारांची महात्मा गांधीना पूर्ण जाणीव होती. बंदी उठविण्यासाठी सत्याग्रह, तोही सामुदायिक करावा असे त्यांना वाटत नव्हते. सामुदायिक सत्याग्रहामुळे अधिक गुंतागुत होण्याचीच शक्यता होती. म्हणून सामुदायिक सत्याग्रह सुरू करावयाला महात्मा गांधी अनुकूल झाले नाहीत. सत्याग्रह सुरू करणे धोक्याचेच होते. महात्मा गांधींचा अहिंसेवर संपूर्ण विश्वास होता, म्हणून ज्यांचा अहिंसेवर पूर्ण विश्वास आहे अशा कार्यकर्त्यांची महात्मा गांधी जातीने चाचणी घेऊ लागले. सत्याग्रह सुरू करण्यापेक्षा रचनात्मक कामावर त्यांनी विशेष भर दिला आणि रचनात्मक कार्य सुरू करण्याचा सल्ला दिला. हैदराबाद संस्थानच्या जनतेचे खरे कल्याण करणे अभिप्रेत असेल तर कार्यकर्त्यांपैकी काहीनी आपल्या बलिदानासाठी सिद्ध झाले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.



कै. स्वामी रामानंद तीर्थ व कै. दिगंबरराव बिंदू

अनुक्रमणिका



सत्याग्रह
(डावीकडून सर्वश्री माणिकचंदजी पहाडे, गुलाबचंदजी नागोरी व केवलसिंहजी)




सत्याग्रहींची जेलमधून सुटका झाल्याप्रसंगी

अनुक्रमणिका

# वैयक्तिक सत्याग्रह

१० सप्टेंबर, १९४१ रोजी स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैदराबाद सरकारला एक पत्र पाठवले. हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवावयाचे कबूल करूनही नवनव्या युक्त्या क्लृप्त्यांचा वापर करून बंदी चालू ठेवली आहे म्हणून सरकारच्या धोरणाचा निषेध म्हणून ते स्वतः व त्यांचे काही सहकारी यांनी सविनय कायदेभंग करण्याचा निर्णय घेतला आहे. असे या पत्रात म्हटले होते. ११ सप्टेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ यांना अटक करण्यात आली. स्वामीजींना निझामाबादच्या कारागृहात डांबण्यात आले. त्यानंतर महात्मा गांधींच्या पूर्व परवानगीने श्री. अच्युतभाई देशपांडे, औरंगाबाद, बीडचे श्री. हिरालाल कोटेचा, मोतीलाल मंत्री व उस्मानाबादचे श्री. देवराम चौहान यांनी सविनय कायदेभंग करण्यासाठी सत्याग्रह केला. त्या सर्वांना १५ महिने स्थानबद्ध म्हणून कारागृहात डांबण्यात आले. हैदराबाद स्टेट काँग्रेस व वंदे मातरम् चळवळीमुळे औरंगाबाद शहर व जिल्ह्यात विद्यार्थी आंदोलन खोलवर रुजले होते. महात्मा गांधींनी सामुदायिक सत्याग्रहाचा पवित्रा बदलून सविनय कायदेभंग वैयक्तिकरीत्याच करावयाचा सल्ला दिला. संबंधितांना जबरदस्त हादरा बसला. उत्साहाने भारावलेल्या विद्यार्थ्यांच्या मनाचा कोंडमारा झाला. परिस्थिती व वातावरण सारखे हेलकावे खात होते. पलटा घेत होते. पदोपदी महात्मा गांधीकडे जाणे शक्य नव्हते. मार्गदर्शक, कर्णधार पुढारी जवळपास नव्हता. कार्यकर्त्यांना, विद्यार्थ्यांना ओके ओके वाटत होते. जिवाचे रान करून महत्प्रयासाने अन्यायाला वाचा फोडणारी यंत्रणा सज्ज करण्यात आली होती. ती यंत्रणा विस्कळीत होत होत कोलमडायला लागली होती. सर्वत्र अंधार पसरण्याचा रागरंग दिसू लागला होता. त्यावेळी श्री. लक्ष्मणराव उर्फ आण्णासाहेब वाळूजकर हे एकटे एक नेते निझामी राजवटीच्या नजरेतून सुटले होते. परिस्थितीने गांजलेले, आर्थिक कुंचबणेने सदासर्वकाळ घेरलेले, हाडाची काडे झालेली अशी त्यांची अवस्था असतानाही त्यांनी आपल्या सहकाऱ्यांची उमेद ज्योतीसारखी सतत तेवत ठेवण्यासाठी जीवाचा आटापिटा केला! काबाडकष्ट केले; पायपीट केली. औरंगाबाद जिल्ह्याचा कानाकोपरा पिंजून काढला. हैदराबाद स्टेट काँग्रेस, मानवतेचा खरा पिता महात्मा गांधी, तरुणांची मने जिंकणारा देवदूत पंडित जवाहरलाल नेहरू यांचे विचार जनतेच्या मनात ठसविण्याचा आटोकाट प्रयत्न केला ते श्री. लक्ष्मणराव ऊर्फ आण्णासाहेब वाळूजकर आज भल्याभल्यांना माहीत नाहीत. आंदोलनात सहभागी झालेल्या अनेकांनाही त्यांची आठवणही होत नाही. असा आहे आजच्या बदलत्या काळाचा महिमा!

१९३७ ते १९४१ या कालावधीत औरंगाबाद शहरातील निझामी राजवटीच्या वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांच्याबरोबर मैत्री करून, सरकारी कार्यालयांत फेरफटके मारीत मारीत काँग्रेस संघटनेचा गुप्त हेर म्हणून काम करावयाची कामगिरी आनंदराव वाघमारे यांनी माझ्यावर सोपविली होती. माझ्यावर सोपविलेली कामगिरी मी इमानदारीने पार पाडू शकलो यातच मला धन्यता वाटते. मात्र माझ्यावर सोपविलेल्या कामाची रूपरेषा व मी केलेले कार्य ज्यांना उमजले समजले नाही असे काही हिंदू अधिकारी, वकील व व्यापारी मला सरकारचा हेर, बगलबच्चा समजत, तर काही काँग्रेसचे अपरिपक्व कार्यकर्ते मला सरकारजमा झालेला समजून माझ्या बरोबर बोलताना वागताना दबकूनच वागत, बोलत असत. कधी कधी तर टाळाटाळ करीत असत. मी जे करत होतो, ज्यांच्या आज्ञेवरून करत होतो त्याचा गौप्यस्फोट मला करता येत नव्हता. म्हणून मला बऱ्याच गोष्टी गिळाव्या लागल्या. मी शासनाचा हेर नसताना कार्यकर्तेच मला हेर समजू लागले. जीवघेण्या संशयाचे घाव मला सहन करवत नव्हते. बरेचसे कार्यकर्ते संशयी नजरेने माझ्याकडे बघू लागले. माझ्या काळजाला

छिद्रे पडत असल्यासारखे मला वाटू लागले. तरी मी त्याची पर्वा केली नाही. जे काय चालले होते तिकडे लक्षच दिले नाही. मी माझ्यावर सोपविलेली कामगिरी, माझा जीव धोक्यात टाकून चोखपणे बजावली याचे कौतुक केले गेले असते तर माझ्या मनात आनंद उफाळून आला असता. मात्र तसे झाले नाही. जीव धोक्यात घालून महत्त्वाची कामगिरी बजावणारे लोक, कार्यकर्ते बोटावर मोजण्याइतके होते, मात्र झालेल्या कामाचे श्रेय ओढून ताणून आपल्याकडेच घेणारे बरेच होते.

औरंगाबादची नेते मंडळी सुटल्यावर, महाराष्ट्र परिषदेची संघटना लहान लहान खेड्यापर्यंत, तांड्यापर्यंत पसरविण्याची कामगिरी नेटाने व वेगाने करण्यात आली. पुढील कार्य, कार्याची दिशा व पद्धत लोकांना समजावून सांगितली गेली. जवळपास सर्व तालुक्यात पूर्णवेळ काम करणारे कार्यकर्ते आणि सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या जीवघेण्या समस्या व प्रश्नांबाबत संस्थानिकाने स्वीकारलेल्या आडमुठ्या आणि जात्यंध धोरणांचा बीमोड करण्यासाठी विभागीय कार्यालये कायम करण्यात आली. औरंगाबादच्या नेत्यांवर औरंगाबादसह मराठवाड्यातील सर्वच्या सर्व कार्यकर्त्यांचा व जाणत्या नागरिकांचा, सामान्य लोकांचा विश्वास होता. मराठवाड्यातील सर्व लोक औरंगाबादेतील नेत्यांच्या पावलावर पाऊल टाकतील असेच चित्र दिसत होते म्हणून प्रत्येक क्षेत्रात औरंगाबादेतील नेत्यांनी, विद्यार्थ्यांनी, कार्यकर्त्यांनी प्रथम झेप घेणे जरूरीचे बनले होते. इतकेच नव्हे तर ते क्रमप्राप्तही होते. कार्यक्रम राबविण्यासाठी मदतनीस म्हणून काही कार्यकर्ते, विद्यार्थी मराठवाड्याच्या काही भागात पाठविले गेले. श्री. लाला बिंदाप्रसाद उस्मानाबादला, श्री. मनोहर सोनदे जालन्याला, श्री. अनंत भालेराव व श्री. रघुनाथराव रांजणीकर परभणी-नांदेडला पूर्णवेळ संघटक म्हणून पाठविण्यात आले. श्री. व्ही. डी. देशपांडे नांदेडचे संघटक झाले. श्री. नागनाथ परांजपे काही दिवस बीडला व नंतर हैदराबाद आणि तेलंगणात गेले. श्री. स. कृ. वैशंपायन यांच्याकडे हैदराबाद सोपविण्यात आले. श्री. जगन्नाथराव बर्दापूरकर विद्यार्थी आघाडीचे संघटक म्हणून हैदराबादला गेले. चळवळीचा व्याप आणि क्षेत्र सारखे वाढत गेले. वैजापूरला रतिलाल जरीवाला, विश्वनाथ मास्तर, कमलाकर देशपांडे; कन्नडला मिश्रीलाल पहाडे, जालन्याला मनोहर सोनदे, विठ्ठलराव जोशी, रामराव गुंजकर, हणमंत बेंडे, राधाकिशन लाला, उत्तमचंद सेठिया, बद्रीनारायण बारवाले, हरि सावजी, गोपी किशन; पैठणला गुलाबचंद नागोरी, शंकरराव खांदाट, तात्यासाहेब महाजन; भोकरदनला काशीनाथ देशपांडे, माणिकराव देशपांडे; सिल्लोडला नागोराव पाठक, आबासाहेब महाजन, गुलाबसिंग दीक्षित, धोंडूसिंग हजारी; गंगापूरला रामगोपाल नावंदर, कुमावत आदी कार्यकर्ते जोमाने कामाला लागले.

औरंगाबाद शहरात कार्यकर्ते अपेक्षेपेक्षा अधिक वाढले होते. श्री. चंद्रगुप्त चौधरी सारखे धडाडीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. सौ. आशाताई वाघमारे, चंदा जरीवाला, प्रमिला पारनेकर, सौ. प्रतिभा वैशंपायन, सौ. तारा परांजपे, सौ. राजकुंवर काब्रा, कुसुम जोशी, चंदा भागवत, मधुबाला, कुमूद, रमण, शहा भगिनी, कुसुम निंभोरकर, बाबूराव जाधव, नाना जेधे, द्वारकादास पटेल, काशीनाथ नावंदर, सैयद मकदूम, असदुल्ला, गिरजाशंकर, माणिक कापडिया, गोवर्धन कापडिया, पन्नालाल गंगवाल, पाटणी, केशरचंद, भीमराव कुलकर्णी इत्यादी त्यांना सोपविलेले काम तडकाफडकी व चोख प्रकारे पार पाडीत असत. चंपालाल नागोरी पत्रके छापण्याचे काम व्यवस्थितपणे पार पाडीत असत. हैदराबाद संस्थानाबाहेर ब्रिटिश सरकारबाबत संताप आणि तिरस्कार तीव्र झाला होता. वाटेल ते सहन करावयास जनता तयार झाली होती. नेमक्या त्याच सुमारास महात्मा गांधींनी 'चले जावची'ची घोषणा दिली. 'चले जाव' आंदोलनास प्रारंभ झाला. ९ ऑगस्ट

१९४२ रोजी मुंबईत भरलेल्या ऐतिहासिक अधिवेशनात ब्रिटिशांना अनुलक्षून 'आधी तुम्ही चालते व्हा' हा ठराव एकमताने संमत केला गेला. ९ ऑगस्टला ब्रिटिश सरकारने महात्मा गांधी आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या बहुतेक सर्व पुढाऱ्यांना अटक करून तुरुंगात डांबले. तुरुगांत जाताना महात्मा गांधींनी जनतेला 'करा अथवा मरा' हा चैतन्यपूर्ण संदेश दिला. १९४२ च्या आंदोलनाने अत्यंत अल्पशा काळात शासनाला निरनिराळ्या प्रकारे जेरीस आणण्याचे सतत प्रयत्न केले. जनतेकडूनही चांगली मदत मिळू लागली. या आंदोलनाचे पडसाद हैदराबाद संस्थानातही उमटले. निझामाचे सरकार गोरगरिबांचे मारेकरी समजले जाऊ लागले. अवाक्षर न बोलणारे गावकरी, शेतकरी 'रुमणे हाती घ्या' असे सांगू लागले.

हैदराबाद संस्थानचे हैदराबाद हे राजधानीचे शहर सोडून, सर्वत्र असंतोषाची आग धुमसत होती. राष्ट्रीय विचारांच्या पुढाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी राज्याचा बेलगाम, जोरजुलूम, दडपशाही व जात्यंध ध्येयधोरणाचा कायमचा नायनाट करण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. अशा परिस्थितीतही हैदराबाद शहरातील नेमस्त व मवाळ विचारांचे श्री. काशिनाथराव वैद्य आदी धुरीण सरकारबरोबर जुळते घेण्याबाबत बोलत होते. 'आग लावणे सोपे असते परंतु आग विझविणे फार कठीण असते, तुम्हाला राजकारण समजत नाही,' अशा कानपिचक्या लोकांना देत होते. श्री. वैद्य आदींचे चेले पाठपुरावा म्हणून काहीतरी बोलत होते. निझामाइतकाच मवाळ नेमस्तांबाबत तिटकारा विद्यार्थ्यांना, कार्यकर्त्यांना वाटू लागला होता. सामान्य नागरिकांच्या मनात धुमसणारी आग ज्वालाग्राही बनू पाहात होती. स्टेट काँग्रेसचे पुढारी गजाआड अडकलेले होते. नेमक्या त्याच सुमारास श्री. काशिनाथराव वैद्य, श्री. रामाचारी, श्री. जनार्दन देसाई यांचे त्रिकूट स्वतंत्र हैदराबाद-आझाद हैदराबादची चळवळ सुरू करण्याचे, मनसुबे करीत होते. त्या अनुषंगाने त्यांनी प्रयत्नही सुरू केले होते. हैदराबादेतील तरुण मंडळींनी, विद्यार्थी आंदोलनातल्या विद्यार्थ्यांनी, मराठवाड्यातल्या कार्यकर्त्यांनी मवाळ नेमस्तांचे 'आझाद हैदराबाद' बाबतचे स्वप्न साकार होण्यापूर्वीच त्याची पाळेमुळे खणून काढली.

१९४४-४५ च्या काळात आंध्र, कर्नाटकच्या बरोबरीने महाराष्ट्र परिषदेनेही जोमाने काम करायला प्रारंभ केला.

हैदराबाद स्टेट काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन १६, १७ जून १९४७ ला मुशीराबाद येथे झाले. त्या ऐतिहासिक अधिवेशनात नेमस्त, मवाळ, सरकारधार्जिण्यांचा विरोध विचारात न घेता हैदराबाद संस्थानात जबाबदार राज्यपद्धती व हिंदी संघ राज्यात विलिनीकरण हे दोन ठराव आवाजी मतदानाने संमत केले गेले. त्या अधिवेशनाला मराठवाडा विभागाचे बहुतेक पुढारी आणि कार्यकर्ते आणि आंदोलनात सहभागी झालेले विद्यार्थी उपस्थित होते.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात प्रारंभापासूनच हैदराबाद मुक्तिसंग्रामाबाबत चक्रे फिरू लागली. अधिवेशनात मुक्तिसंग्रामाबाबत प्रश्न उभा केला तो मराठवाड्यातील नेत्यांनीच. अधिवेशनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या, विद्यार्थ्यांच्या, पुढाऱ्यांच्या मनात नवी ज्योत तेवू लागली. शरीराच्या अणुरेणूत स्फुरण संचारले. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या अधिवेशनाची सांगता होण्यापूर्वीच स्टेट काँग्रेस नेत्यांना अटक करण्याचे धोरण अवलंबिलेले असल्याबद्दलच्या बातम्या अधिवेशनात धडकल्या. क्षणभर गोंधळ निर्माण झाला.

घाईगर्दीने, जमेल ती खबरदारी घेऊन, हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पुढारी, कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि सरकारच्या डोळ्यात सतत सलत असलेले कार्यकर्ते व विद्यार्थी भूमिगत झाले. जमेल त्या मार्गाने मराठवाड्यातून, औरंगाबादेतून आलेले पुढारी, कार्यकर्ते हैदराबाद शहराबाहेर पडले. काहींनी हैदराबाद राज्याच्या सरहद्दीही ओलांडल्या. मराठवाड्यातील पुढारी व कार्यकर्ते आपापल्या गावी पोहोचण्यापूर्वीच त्यांना अटक करण्याबाबतची वारंटे येऊन धडकली होती. अटक करण्यासाठी पोलिसांची यंत्रणा सर्व शक्तीनिशी सरसावली होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून, बहुतेक कार्यकर्ते पोलिसांच्या हातावर तुरी देऊन लपूनछपून, आपापल्या गावी गेले.

हैदराबाद स्टेट काँग्रेसचे मध्यमवर्ती कार्यालय मुंबईत हलविण्यात आले. महाविद्यालयीन व उच्च शिक्षणानिमित्त श्री. स. कृ. ऊर्फ भाऊसाहेब वैशंपायन बरीच वर्षे मुंबईत होते. त्यांना मुंबईची बरीच माहिती होती. कृति समितीचे एक सदस्य म्हणून हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयाचा कारभार त्यांच्याकडे सोपविला गेला.

अनुक्रमणिका

# १९४७ चा सत्याग्रह

जुलै १९४७ च्या दुसऱ्या आठवड्याच्या प्रारंभी श्री. गोविंदभाई यांनी शेरवाणी पायजमा परिधान करून हैदराबादेतील नबाब जहागीरदार असल्याचा देखावा करीत औरंगाबादेजवळील चिकलठाणा रेल्वे स्टेशन गाठले. तेथून ते अत्यंत गुप्तता राखून औरंगाबादेतील त्यांच्या घरात दाखल झाले. सर्वप्रथम त्यांनी श्री. कर्वे गुरुजींची भेट घेतली व आशीर्वाद घेतला. पुढील कार्यक्रमाबाबत श्री. माणिकचंद पहाड्यांबरोबर ऊहापोह केला. १ ऑगस्टला लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त जाहीर सभा घेण्याचे व प्रभातफेऱ्या काढण्याचे निश्चित करण्यात आले. तालुक्याच्या निरनिराळ्या गावांत बैठकी घेण्याचेही ठरले होते. ७ ऑगस्टला औरंगाबाद शहरात, तालुक्याच्या गावांत तसेच खेडेगावांत प्रभात फेऱ्या काढण्याचे विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आले. सायंकाळी श्री. पहाडे यानी गुलमंडी चौकात सत्याग्रह करून, सत्याग्रह आंदोलनाचा प्रारंभ करावा; त्या पाठोपाठ, तालुक्याच्या गावांत व निरनिराळ्या खेडेगावांत विद्यार्थ्यांनी, गावकऱ्यांनी आळीपाळीने सत्याग्रह करावा. सुरू केलेल्या सत्याग्रह पर्वाला कोणत्याही परिस्थितीत खंड पडू नये यांची खबरदारी विद्यार्थी व गावकऱ्यांनी घ्यावी असा सल्ला देण्यात आला. आवश्यक तेवढी चर्चा झाली. कार्यक्रम राबविण्याचा आराखडा निश्चित करण्यात आला.

दोन दिवसांनंतर आवश्यक तेवढी खबरदारी घेऊन डॉ. गोपाळदास श्रॉफ व श्री. ललित मोहन वकील यांनी मोटारीतून श्री. गोविंदभाईंना दौलताबाद स्टेशनवर नेले व मनमाडकडे जाणाऱ्या रात्रीच्या गाडीत चढविले. रात्रीच्या अंधाराचा, रेल्वे स्टेशनवरील टिमटिम्या दिव्यांचा त्याना फायदा घेता आला.

निझामी राजवटीने धरपकडीचे सत्र अवलंबिले होते. १९३८ च्या काळातले पहिले सत्याग्रही श्री. पहाडे यांच्यावर पोलिसांचा, गुप्तहेर खात्याचा मुख्य कटाक्ष होता आणि १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी जाहीर सभेच्या रूपाने साजरी करणे तर अगत्याचे होते. आवश्यक तेवढी खटपट करूनही जाहीर सभेसाठी प्रमुख वक्ता मिळू शकला नाही. नाईलाजाने श्री. पहाडे यांनाच प्रमुख वक्ता म्हणून जनतेसमोर उभे राहावे लागले. शहरातील सुशिक्षित, धुरीण मंडळींच्या घरी खेटे मारले, परंतु जाहीर सभेचा अध्यक्ष बनण्यासाठी कोणी होकार दिला नाही. लोकमान्य टिळक पुण्यतिथीबाबत परिस्थितीने उभा केलेला पेचप्रसंग लक्षात घेऊन, श्री. सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे शिक्षक श्री. अंबादासराव जोशी यांची कन्या कुसूम हिची त्या सभेची अध्यक्षा बनण्याची इच्छा असल्याचे श्री. पहाडे यांच्यासमोर मांडले. श्री. पहाडे यांनी मनापासून कौतुक केले व मान्यता दिली. श्री. पहाडे हे प्रमुख वक्ते होते. त्यांच्या समवेत दुसऱ्या एका वक्त्याची आवश्यकता होती. मी भूमिगत पद्धतीनेच काम करावे असेच मला सांगण्यात आले होते. मी हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचा कार्यकर्ता असूनही निव्वळ नाटकी पद्धतीने माझा कॉँग्रेसच्या संघटनेबरोबर काडीमात्र संबंध नसल्याचे सोंग वठवीत होतो. सरकारी अधिकाऱ्याबरोबर मी जे काय बोलत असे त्यातला काही भाग काही लोकांनी लपूनछपून ऐकला होता. त्याचे भांडवल करून काही महाभागांनी माझी जनमानसातली प्रतिमा डागाळून टाकली होती. माझे सहकारी मित्र माझ्याकडे संशयी नजरेने पाहात होते. माझे खरे स्वरूप माझ्याच सहकाऱ्यांना, नागरिकांना पटवून द्यावेसे वाटू लागल्याने त्या जाहीर सभेत बोलता आले तर बोलावे असा माझा विचार मी श्री. पहाडे यांच्यासमोर मांडला. श्री. पहाड्यांनी त्याला मान्यता दिली.

अनुक्रमणिका

सुपारी मारुती रस्त्यालगत असलेल्या गोकुळनाथ मंदिराच्या परिसरातील गोकुळनाथ मोहल्यात लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. सभेला काही नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मिळून ३०० वर लोक उपस्थित होते. जे लोक सभेला आले नाहीत, त्यांच्या कानावर लाऊडस्पीकरमुळे जाहीर सभेत जे काय बोलले गेले ते आदळले असावे.

हैदराबाद स्वातंत्र्याचा लढा १९४२ च्या 'चले जाव'च्या धर्तीवर लढवावा लागेल. 'करा किंवा मरा' हेच धोरण आपणाला अंगिकारावे लागेल. 'जनतेच्या स्वातंत्र्यासाठी निकराची झुंज देताना बलिदान करावयाची तयारी ठेवावी लागेल. उंटावरून शेळ्या हाकणाऱ्यांच्या फंदात अडकू नका' अशा आशयाचे माझे जळजळीत छोटेसे भाषण अनेकांना झोंबले, काहींना आवडले. विद्यार्थ्यांनी व श्री. पहाडे यांनी माझी पाठ थोपटली. माझ्याबाबतचा गैरसमज जसा फोफावला होता, तसाच झपाट्याने विरून गेला. लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या जाहीर सभेचे अध्यक्षस्थान कुसूम जोशीने स्वीकारून भल्याभल्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले अन् औरंगाबाद जिल्हा स्टेट काँग्रेसची शान राखली. त्याच रात्रीच्या गाडीने श्री. माणिकचंद पहाडे नांदगावला गेले. जाण्यापूर्वी जिल्हा कार्यालयाचा कारभार त्यांनी श्री. लाला बिंदा प्रशादकडे सोपविला. दोन ऑगस्टला श्री. नागोराव पाठक यांना अटक करून औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहात कोंबले गेले. त्या दिवशी कारागृहात ते एकटे एक राजकीय कैदी होते.

श्री. लाल बिंदा प्रशाद यांच्या आदेशाप्रमाणे मी श्री. रामगोपाळ नावंदर यांच्या समवेत गंगापूरच्या तांदूळवाडी व तुर्काबाद या दोन गावांत जाहीर सभेत बोललो. तेथेही महात्मा गांधीचे 'चले जाव', 'करा अगर मरा' या बाबतच बोललो.

श्री. माणिकचंद पहाडे यांना ७ ऑगस्ट पूर्वीच अटक केली जाऊ नये यासाठी ते नांदगावला गेले होते. श्री. गोविंदभाई यांनी आखून दिलेला व सांगितलेला कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी श्री. लाला बिंदा प्रशादवर आली होती. काँग्रेसच्या कार्यालयात दातावर मारण्यासाठी एकही पैसा नव्हता. श्री. बिंदा प्रशादचा शहरातील व्यापारी व नागरिकांबरोबर हवा तेवढा परिचय नव्हता. दोन दिवस खटपट करूनही त्यांना निधी म्हणून पैसे मिळविता आले नाहीत. पोकळ आश्वासने तेवढी मिळाली. निधी गोळा करणे सोपे काम नव्हते. दोन तीन दिवस कसे झपाट्याने निघून गेले तेही श्री. लालाजींना समजले नाही. पैशाचा अभाव आणि निधी गोळा करणे हे एक अवघड काम बनल्याने काँग्रेसचे कार्यकर्ते, संघटक निराशेच्या गडद छायेत गुरफटले होते. सुटकेचा मार्ग कोणालाच दिसत नव्हता. निधी गोळा करणे अत्यंत अगत्याचे बनले होते. निधीअभावी सर्वच्या सर्व कामे रद्द करावी लागतील या विचाराने बहुतेक लोक निराश झाले होते. निधी गोळा करण्याचा कोणता तरी तोडगा शोधून काढण्यासाठी श्रीमती आशाताई यांच्या संमतीने त्यांच्याच घरी निवडक कार्यकर्त्यांची बैठक बोलावली. पोलिस माझ्या पाळतीवर असल्याने मी त्या बैठकीला जाण्याची प्रथमदर्शनी टाळाटाळ केली. श्री. लालाजींचा तातडीचा निरोप आला म्हणून लपून छपून गल्ल्याबोळांतून मी श्रीमती आशाताईंच्या घरी, मागच्या दाराने गेलो, त्यावेळी तेथे श्रीमती आशाताई, श्री. लाला बिंदा प्रशाद व श्री. मिश्रीलाल पहाडे बसलेले होते. सर्वांचे चिन्ताक्रांत चेहरे पाहून मला धसका बसला. ७ ऑगस्टच्या कार्यक्रमासाठी पैसा नाही, प्रयत्न करूनही निधी जमला नाही. काय केले म्हणजे निधी मिळेल? असे बोलून झाले. सातआठशे रुपये तडकाफडकी कसे मिळणार व कोण स्वखुषीने आणून देणार? विवंचनेतून सुटकेचा मार्ग समोर आला नाही. दोन तास निघून गेले.

अनुक्रमणिका

आर्थिक कोंडी फुटू शकली नाही. सौ. आशाताई म्हणाल्या, 'घाबरू नका. मला तोडगा सापडला आहे.' मला उद्देशून सौ. आशाताई म्हणाल्या, 'हे पहा शंकरभाई, वेळ थोडा आहे. काम पुष्कळ आहे. तू तुझ्या गळ्यातल्या सोन्याच्या साखळीच्या मोबदल्यात ओळखीच्या व्यापाऱ्याकडून सातआठशे रुपये अनामत म्हणून आण. आपली मोहीम संपल्यावर मी, लालाजी तुला ती अनामत रक्कम काँग्रेस कार्यालयातून मिळवून देऊ. तू माझ्यावर विश्वास ठेव'. लागलीच लालाजींनीही तसे आश्वासन दिले. 'शंकरभाई, आता अधिक विचार करू नकोस, ऊठ लाग कामाला, वेळ थोडा आणि नाटक मोठे आहे'. सौ. आशाताई व श्री. लालाजींच्या सूचनेवरून मी तेथून तडक मागच्या दाराने गल्ल्याबोळी ओलांडून श्री. मुरलीधरजी सिकचीकडे गेलो. मी माझी सोन्याची साखळी त्यांच्या हातात ठेवली व तिच्या मोबदल्यात आठशे रुपये देण्याची विनंती केली. त्यांनी जराही संकोच न करता मला आठशे रुपये दिले. हातात पडलेली रक्कम घेऊन मी सौ. वाघमारे यांचे घर गाठले. मिळालेले आठशे रुपये मी त्यांच्या हातात दिले. सौ. वाघमारे व श्री. लालाजींनी आपसात ठरवून आठशे पैकी चारशे रुपये माझ्या हातात दिले व ७ ऑगस्टच्या व इतर कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य आणावयासाठी मला मुंबईला जायचे आहे; असे सांगितले. मी रात्रीच्या गाडीने मुंबईला जाण्यासाठी निघालो. ५ ऑगस्टला सकाळी साडे आठला मुंबईला बोरीबंदर स्टेशनवर उतरलो. तेथून क्रॉफर्ड मार्केट जवळील सरदारगृहात गेलो. श्री. आनंदराव वाघमारे, श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. दिगंबरराव बिन्दू आणि श्री. स. कृ. वैशंपायन यांना भेटलो. ७ ऑगस्टच्या सत्याग्रहासाठी छोटे मोठे कापडी व कागदाचे तिरंगी झेंडे, फंड गोळा करण्यासाठी पावती पुस्तके, आवश्यक ती पत्रके इत्यादी साहित्य घेऊन जाण्यासाठी आलो असल्याचे सांगताच श्री. वैशंपायन म्हणाले, 'बरोबर आवश्यक तेवढे पैसे आणले आहेत का? पैसे आणले असतील तरच हवे असलेले साहित्य मिळवून देता येईल'. 'आवश्यक तेवढे पैसे माझ्याबरोबर आणले आहेत.' असे मी सांगताच श्री. बिंन्दू म्हणाले, 'भाऊसाहेब, प्रथम शंकरलालला तोंड, हातपाय तर धुऊन घेऊ द्या. चहा-फराळ झाल्यावर काय बोलायचे ते बोला'. तोंड, हातपाय धुतले; चहा फराळ घेतला. मला कोणकोणते साहित्य हवे होते त्याची यादी व पैसे श्री. भाऊसाहेब वैशंपायनजवळ दिले. दुपारी चार वाजता साहित्याचा एक गठ्ठा श्री. वैशंपायन यांनी मला दिला. आदल्या रात्रीच्या प्रवासाची दगदग व त्यानंतर पुन्हा रात्रीचा प्रवास करण्यापेक्षा एक दिवस विश्रांती घेऊन दुसऱ्या दिवशी परत जाण्याचा सल्ला गोविंदभाईंनी दिला. ६ ऑगस्टच्या रात्रीच्या गाडीने मी औरंगाबादला जाण्यासाठी निघालो. मनमाड आल्यावर औरंगाबाद रेल्वे स्टेशन जवळ करोडगिरी नाक्यावर प्रवाशांचे सर्व सामान तपासले जाते, झडती घेतली जाते याची आठवण झाली. मी मनमाड ते औरंगाबाद पर्यंतचा प्रवास रेल्वेच्या डब्याच्या दाराजवळ बसून केला. प्रवाशांची चढउतार सारखी चालू होती; डब्याचे दार उघडे होते. मध्यरात्रीनंतरची वेळ होती. हवेतला बोचरा गारठा सर्वांगाला सारखा झोंबत होता. नाइलाजास्तव मला उघड्या दाराजवळच बसणे जरूरीचे होते. गाडीच्या इंजिनने नगर नाका ओलांडताच, इतर प्रवाश्यांच्या लक्षात येणार नाही अशा पद्धतीने मी माझ्या जवळचा गठ्ठा पायाने दाराबाहेर लोटला. माझ्या पायाजवळ पडलेला गठ्ठा गाडीबाहेर पडल्याचे कोणाच्याच लक्षात आले नाही. थंडीपासून बचावासाठी बहुतेकांनी आपला चेहरा पांघरुणाने झाकून घेतलेला होता. कडाक्याच्या थंडीमुळे हातपाय गारठलेले होते. अंगात हुडहुडी भरली होती. औरंगाबाद रेल्वे स्टेशनबाहेर आल्याबरोबर, सर्वप्रथम मी कचरू तांगेवाल्याची शोधाशोध केली. तो मला दिसताच मला हायसे वाटले. त्याने मला तांग्यात बसविले व तांगा करोडगिरीच्या आवारात जाताच या तांग्यात एकच प्रवासी आहे व काहीही सामान नाही; हे लक्षात येऊनही करोडगिरीच्या नाकेदाराने तांग्यात मागे पुढे काहीच नसल्याचे समाधान करून घेण्यासाठी त्याचे तोंड खुपसले अन् तांगा नेण्यास परवानगी दिली. कचरूने त्याचा तांगा करोडगिरीच्या आवाराबाहेर काढताच तांगा नगर नाक्याकडे नेण्यासाठी मी त्याला सांगितले. कचरूने

अनुक्रमणिका

घोड्याला सतत पिटाळीत आपला तांगा नगर नाक्याजवळ आणून उभा केला. मी व कचरू चटकन् तांग्याबाहेर पडलो. नगर नाक्याजवळून रुळाच्या दक्षिण भागाने अदमासे शंभरावर पावले पुढे गेलो असू. एका काटेरी झुडपात एका कागदात गुंडाळलेले बोचके नजरेत भरले. तेच बोचके आपले आहे; असे मी कचरूला म्हटले. काटेरी झुडपात अडकलेले ते बोचके त्याने ओढून बाहेर काढले अन् तांग्यात त्याच्या पायाशीच ठेवले. प्रातःकाळचा अंधुकसा प्रकाश. आता दिवस उजाडात असल्यासारखा वाटू लागला. रस्त्यावर तशी वर्दळ नव्हती. कचरूने त्याच्या घोड्याला विश्रांती मिळालेली असल्याने पुन्हा जोराने पिटाळले. लष्कर, बारापुल्ला, कोतवालपुरा, खडकेश्वर ते औरंगपुरा व बाराभाईचा कोपरा गाठला. माझ्या घरासमोर तांगा उभा करून त्याने ते कागदात गुंडाळलेले बोचके वर माडीवर आणून दिले. तो परत गेल्यावर मी कागदाचे झेंडे, दोन पावती पुस्तके माझ्या कोटाच्या आतल्या खिशात कोंबली. तोंड धुतले, चहा घेताना ते बोचके अडगळीच्या ठिकाणी ठेवले. सकाळचे आठ वाजले होते. गल्ल्याबोळातून धावत पळत मी सौ. आशाताईंच्या घरात मागच्या दाराने शिरलो. मी माझ्या कोटाच्या खिशात कोंबून आणलेले साहित्य त्यांच्यासमोर ठेवले. ‘शाब्बास शंकरभाई’ म्हणून त्यानी माझी पाठ थोपटली. सौ. आशाताईंनी त्यांच्या विश्वासातल्या विद्यार्थ्यांसमवेत कागदी व कापडी झेंडे जिल्हा काँग्रेस कार्यालयात पाठवले आणि मला चहासाठी स्वयंपाकगृहात बोलावले. मी चहा घेत असताना त्यांनी माझ्या कानात सांगितले, ‘दुपारी ३ वाजता श्री. माणिकचंदजी पहाडे यांना चिकलठाणा रेल्वे स्टेशनवरून आणावयाची व श्री. तुकारामपंत देव वकील यांच्या घरी पोहोचविण्याची जबाबदारी तुलाच पार पाडावयाची आहे. आता तू इथेच थोडी विश्रांती घे’. रात्रीच्या प्रवासानंतर थोडी विश्रांतीची मलाही गरज होती. मी. सौ. वाघमारे यांच्या बैठकीत आडवा झालो. सुमारे दहा वाजता अचानक मला जाग आली. सौ. वाघमारे बाहेर जाण्याच्या तयारीत होत्या. मी घोटभर पाणी प्यालो सौ. आशाताई वाघमारे समवेत त्यांच्या घरातून राजा बाजारात श्री. प्रभाकर भालेराव यांच्या ओट्याजवळ पोहोचलो, इतक्यात जिल्हा काँग्रेस कार्यालयातून ‘हैदराबाद स्टेट काँग्रेस झिंदाबाद’, ‘महात्मा गांधी झिंदाबाद’, ‘स्वामी रामानंद तीर्थ झिंदाबाद’ च्या घोषणा देत पन्नासावर विद्यार्थी तिरंगी झेंडे हातात धरून भराभर बाहेर पडू लागले. विद्यार्थी दोन दोनच्या रांगेने उभे झाले तोच रांगेच्या समोरील विद्यार्थ्यांनी तिरंगा झेंडा उंच धरला आणि घोषणा दिल्या. तेवढ्यात पोलिस शिपायांचे पथक धावत-पळत आले आणि त्यांनी त्यांच्या हातातल्या काठ्या धडाधड सडकेवर आपटायला प्रारंभ केला. शिपायाबरोबरच्या इन्स्पेक्टरनी विद्यार्थ्यांना थोपवून ठेवले. तोच विद्यार्थ्यांनी जोरजोराने आवेशपूर्ण घोषणा द्यायला प्रारंभ केला. विद्यार्थ्यांच्या हातातला तिरंगा ध्वज हिसकावून घेण्यासाठी हमरीतुमरी झाली. शिव्यांचा वर्षाव झाला. काही केल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या हातातला तिरंगा झेंडा हिसकावून घेऊ दिला नाही. पोलिस इन्स्पेक्टर व पोलिस शिपायी चवताळून विद्यार्थ्यांवर तुटून पडले. पोलिसांनी विद्यार्थ्यांना बेदम चोपून काढले. काही विद्यार्थी काठ्यांच्या माराने जमिनीवर आडवे पडले. सडकेच्या दोन्ही बाजूच्या घरातील लोक जे काय घडत होते ते पाहात होते; मात्र ‘विद्यार्थ्यांना असे मारू नका ‘असे एकानेही एका शब्दातही सांगितले नाही. काही विद्यार्थी जीव वाचविण्यासाठी श्री. पन्नालाल गंगवाल व संग्रामसिंह चव्हाण यांच्या बोळीत शिरले. तेथून पोलिस शिपायांनी विद्यार्थ्यांना गुराढोरासारखे मारीत पिटीत ओढीतच आणले. लाठीधारी पोलिसांनी लाठीमाराचे नियम व संकेत झुगारून विशीतल्या विद्यार्थ्यांना बेभानपणे मारपीट केली. लाठीच्या फटक्याने काही विद्यार्थी कळवळून ओरडले, ‘अगं आई ग, मेलो, मेलो’ काही धडाधड कोसळत गेले. लगतच्या घरात राहाणाऱ्यांनी मात्र कोणाही विद्यार्थ्याला घरात शिरू दिले नाही. विद्यार्थ्यांच्या अंगावर लाठीचे वळ उमटले होते. सायंकाळी गुलमंडी चौकात असेच काही घडणार नाही ना? सायंकाळची ही रंगीत तालीम तर नाही ना?

अनुक्रमणिका

असे विचार मनात येऊ लागले. काही वेळाने पोलिसांच्या पथकांनी सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांना गुराढोरासारखे ओढीत, धक्के मारीत किराणा चावडी पोलिस चौकीत नेले.

डोळ्यादेखत, दिवसाढवळ्या शहर वस्तीत घडलेल्या प्रकाराचे दडपण मनावर असताना, अगदीच विचित्र मनःस्थितीत मी चिकलठाणा रेल्वे स्टेशनवर गेलो आणि श्री. पहाडे यांना लपूनछपून केळी बाजाराच्या कोपऱ्यावर श्री. तुकारामपंत देव वकील यांच्या घरात दाखल केले. त्यावेळी दुपारचे चार वाजले असावेत. सायंकाळचे साडे पाच वाजण्याच्या सुमारास, पुढे मी व माझ्या पाठोपाठ श्री. पहाडे असे श्री. देव वकील यांच्या घराबाहेर पडलो अन् लगेच दुर्गंधीने खचाखच भरलेल्या शेजारच्या बोळीत शिरलो. श्री. पहाडे यांनी त्यांचा चेहरा खादीच्या शालीखाली झाकून घेतला अन् भराभर पावले टाकीत गट्टाणी इमारतीच्या मागच्या दाराने डॉ. सीमंत यांच्या गुलमंडी चौकातील ओट्यावर येऊन तोंडावरची शाल भरकन काढली अन् 'महात्मा गांधी की जय', 'हैदराबाद स्टेट काँग्रेस झिंदाबाद'च्या घोषणा वाघाच्या डरकाळ्यांप्रमाणे दिल्या व पत्रक वाचावयास प्रारंभ केला. समोरच्या इमारतीजवळून श्री. रघुनाथ भाले यांनी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून करारी आवाजात 'महात्मा गांधी झिंदाबाद'च्या घोषणा दिल्या. महात्मा गांधी, स्वामी रामानंद तीर्थ व हैदराबाद स्टेट काँग्रेस झिंदाबादच्या घोषणांनी वातावरण निनादून गेले. टाळ्यांच्या कडकडाटात जनतेने श्री. पहाडे व श्री. भाले यांचे स्वागत केले. श्री. पहाडे गुलमंडी परिसरात दाखल होण्यापूर्वी, सुमारे दोन तास अगोदर साराचा सारा गुलमंडीचा परिसर लोकांनी व्यापला होता. सुपारी मारुती मंदिरापासून तो थेट मेवाड टी हाऊस पर्यंतच्या सर्व घरांचे माळे आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनी खचाखच भरले होते. गट्टाणी इमारती जवळील व समोरील सडकेवर विद्यार्थ्यांचे, नागरिकांचे थवेच्या थवे भरपूर गर्दी करून श्री. पहाडे यांचे स्वागत करण्यासाठी तिष्ठत उभे होते. अधूनमधून शिरस्त्राणधारी पोलिस शिपायी त्यांच्या हातातील जाडजुड काठ्या सडकेवर उभ्या असलेल्या नागरिकांच्या पायाजवळ खटाखट आपटीत होते. त्यानंतर कंबरेला लटकविलेल्या तरवारीसह घोडेस्वारांची वर्दळ सुरू झाली. एका मागून एक पंचविसावर घोडेस्वारांनी त्या परिसरात फेरे मारावयास प्रारंभ केला. त्यापैकी पुष्कळांनी आपले घोडे नागरिकांपर्यंत नेले. कित्येक वेळा घोडेस्वारांच्या घोड्यांचा टापा नागरिकांना लागतालगता राहिल्या. त्यानंतर घोडेस्वारांनी त्यांचे घोडे नागरिकांवर उधळत नेले. घोड्याच्या टापा लागू नयेत म्हणून नागरिकांमध्ये रेटारेटी झाली. त्या रेटारेटी मुळे काही चेगंरले, काही लोकांच्या पायांना दुखापती झाल्या; तरी नागरिक न डगमगता उभे होते. पोलिसांच्या दंडेलीचा त्यांच्यावर काहीही परिणाम झालेला दिसत नव्हता. जमलेल्या जनसमुदायात चलबिचल होती; रेटारेटी होत होती तरी रेसभर कोणी मागे सरकत नव्हता. सडकेवर उभे असलेले नागरिक जणू आपापले पाय रोवून उभे होते. श्री. पहाडे यांनी त्यांचे पत्रक अर्धेअधिक वाचून काढले होते. गुलमंडीचा परिसर स्त्री-पुरुषांनी खचाखच भरलेला होता; तरी तेथे गोंधळ नव्हता; आरडाओरड नव्हती. गुलमंडी चौकात निर्भर शांतता होती. तेवढ्यात दोन जीप व पोलिसांनी भरलेली व्हॅन तेथे धडकल्या. त्या आवाजाने शांतता भंग पावली. डोळ्याचे पाते लवते न लवते इतक्यात पोलिस व्हॅनमधील आडदांड पोलिस शिपाई श्री. पहाडे यांच्या पर्यंत धावत पळत गेले आणि त्यांनी त्यांना धक्काबुकी करीत करीत जनावरासारखे ओढीत पोलिस व्हॅन पर्यंत नेले, तेव्हा काही जात्यंध पोलिस शिपायानी तर कहरच केला. एका शिपायाने श्री. पहाडे यांच्या कंबरेवर जोरदार लाथ मारली. श्री. पहाडे सडकेवर कोसळले, आजूबाजूच्या शिपायांनी त्यांना बुटाच्या पायांनी तुडविले, वरून काठ्यांचे प्रहार केले. त्याच सुमारास श्री. रघुनाथ भालेला पोलिसांनी काठ्यांनी बेदम चोपून काढीत बुटाच्या पायाच्या लाथा मारल्या. श्री. पहाडे व श्री. रघुनाथ भाले यांच्यावर केला जात असलेला अमानुष प्रकारचा अत्याचार जनसमुदायाने अश्रू

भरलेल्या डोळ्यांनी पाहिला. काही अधिकाऱ्यांनी श्री. पहाडे व श्री. रघुनाथ भाले याना पोलिस व्हॅनमध्ये कोंबले तेव्हाही काही शिपायी निर्दयपणे त्यांना बुटांच्या लाथा मारीतच होते. पोलिस व्हॅनचे दार बंद करेपर्यंत लाथा मारल्या जात होत्या. वरून काठ्याही मारणे चालूच होते. त्यानंतर ती पोलिस व्हॅन व तिच्या पाठोपाठ पोलिस अधिकारी बसलेल्या दोन जीपगाड्या चौक पोलिस ठाण्याकडे गेल्या.

'अत्यंत अमानुष क्रूर अत्याचार' इतकेच शब्द जनमानसातून उमटत होते. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांचे डोळे पाणावलेले होते. 'यह अत्याचार बंद करो, यह अत्याचार बंद करो,' अशी जोरदार आरडाओरड करणारे श्री. माणिक कापडिया, सैय्यद मकदूम, रमणलाल, नवनीत बादशहा यांना पोलिस शिपायांनी मारपीट करीत कुत्र्यांमांजरासारखे ओढीत, हिसके देत देत चौक पोलिस ठाण्यात नेले व ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांसमोर उभे केले. पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना झोडपून काढताना, 'गद्दार', 'नमक हराम' अशा शिव्याही हासडल्या. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहींना, गुलमंडी परिसरात जवळपास ७ हजारांवर स्त्री-पुरुषांनी डबडबलेल्या डोळ्यांनी अंतःकरणापासून निरोप दिला. सत्याग्रहींनी केलेला त्याग, भोगलेला अमानुष अत्याचार वाया जाणार नाही असेच जणू काही तरी त्यांना वाटत असावे!

श्री. माणिकचंद पहाडे औरंगाबाद शहरातच वकिली करीत होते. त्यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या आदेशावरून निझामी राजवटीच्या जुलमी धोरणाचा निषेध करण्यासाठी सत्याग्रह केला म्हणूनच त्यांना पोलिसांनी अत्यंत अमानुष प्रकारे मारले, झोडपले, बुटाच्या पायांनी तुडविले म्हणून त्याचा निषेध नोंदविण्यासाठी शहरातील वकिलांच्या गाठीभेटी घेण्यासाठी काँग्रेस कार्यालयाने पाठविलेल्या आदेशाप्रमाणे श्री. काशीनाथ नांवदर यांनी शहरातील बऱ्याच ज्येष्ठ वकिलांच्या जातीने गाठीभेटी घेतल्या. परंतु त्यांपैकी एकानेही कोर्टावर बहिष्कार टाकावयाची तयारी दाखविली नाही. काहींनी शाब्दिक सहानुभूती मात्र बोलून दाखविली. मात्र प्रत्यक्ष बहिष्कार टाकावयास कोणीच धजले नाही. ज्येष्ठ वकिलांच्या दारासमोर बहिष्काराला होकार मिळेपर्यंत धरणे धरावयाचे, उपोषण करावयाचे असे ठरले. त्यात कमल भोरे, प्रमिला पारनेरकर, चंदा भागवत, कुसूम जोशी निंभोरकर, सौ. प्रतिभा वैशंपायन, सांडू कऱ्हाळे, राधाकृष्ण सेवेकर, दत्ता पाडळकर, रमणलाल, नवनीतलाल, भीमराव कुलकर्णी, मधुबाला, कुमुद, रमण शहा इत्यादींचा समावेश होता. त्या सर्वांना बरेच कटू व मनाला झोंबणारे शब्द ऐकावे लागले. बरेच दुःखदायक अनुभव आले. सौ. प्रतिभा वैशंपायन, प्रमिला पारनेरकर, कुसून निंभोरकर जोशी, चंदाताई भागवत यांनी श्री. हनुमंतराव वैष्णव यांच्या दारासमोर धरणे धरले होते. श्री. वैष्णव चिडले, रागावले, रागाच्या भरात बोलले. "राजकारण कळतं का नाही? काय पोरखेळ चालवलाय? मुकाट्यानं आपापल्या घरी जा. वेळ पडल्यास मी तुमच्या छातीवर पाय ठेवूनही कोर्टात जाईल." अशा शेलक्या शब्दात श्री. वैष्णव यांनी विद्यार्थिनींचा पाणउतारा केला. योगायोगाने श्री. वैष्णव हे श्री. वैशंपायन कुटुंबाचे कायदा विषयक सल्लागार होते. आज परिस्थिती बदलली असली तरी, भारताच्या कानाकोपऱ्यात साधे खट् वाजले तरी त्याची नोंद घेऊन कोर्टावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेणाऱ्या वकिलसंघाच्या आवारात श्री. पहाडे यांचे तैलचित्र तर राहोच पण साधे छायाचित्र लावण्याची इच्छा होऊ नये, आजपर्यंत भल्याभल्यांना ही इच्छा होऊ नये या सारखा दैवदुर्विलास आणखी कोणता असू शकेल? ज्या गुलमंडी चौकात जातीयवादी जुलमी राजवटीचा निषेध करण्यासाठी, नागरिकांच्या हक्कासाठी श्री. पहाडे यांनी सत्याग्रह केला व जुलमी पोलिसांनी त्यांना अमानुष प्रकारे मारहाण केली, लाथा मारल्या, पायानी तुडविले त्या गुलमंडी चौकात त्यांचा अर्धपुतळा नाही तो नाही, किमान गुलमंडी चौकास 'माणिकचंद पहाडे

अनुक्रमणिका

चौक' असे संबोधण्याबाबतही कोणी काही हालचाल करीत नाही. औरंगाबाद लीगल सोसायटीने स्थापन केलेल्या विधी महाविद्यालयाला श्री. माणिकचंद पहाडे यांचे नाव देण्याचे मान्य करूनही, माणिकचंद पहाडे ऐवजी एम्. पी. लॉ. कॉलेज ते म्हणून जनमानसात रूजविले जावे या सारखी वाईट, मनाला अत्यंत यातना देणारी घटना तरी कोणती असू शकेल? चवताळलेल्या वाघासारखी ज्यांनी जात्यंध जुलमी राजवटीविरुद्ध झेप घेतली त्यांना टायगर पहाडे संबोधण्याऐवजी त्यांच्या नावाची मनमानेल तशी चिरफाड केली जाते; ही एक अनिष्ट प्रथा समाजात होत्याचे नव्हते करणारी मंडळी रूढ करीत आहेत. दोन पिढ्यांनी उघड्या डोळ्यांनी बघितलेला, अनुभवलेला इतिहास जिथल्या तेथे राहू नये. घडलेला इतिहास जशाचा तसा पुढच्या पिढ्यांना सांगितला जावा; शिकविला जावा; खोट्याचे खरे करणाऱ्यांना नव्हत्याचे होते बनवू पाहाणाऱ्याना वाव दिला जाऊ नये; आयत्या पिठावर रेघोट्या ओढणाऱ्या महाभागांना वेळीच आवरले जावे; स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढ्यात सहभागी होऊन ज्यांनी सर्वस्व पणाला लावले, रक्त सांडले. त्यांच्या आठवणी जिवंत राहाव्या; शाळेतली मुले मुली रोजच्या रोज पाट्या पुसतात त्या प्रमाणे हैदराबाद मुक्ती संग्रामाची पाटी पुसली जाऊ नये असे वाटते.

हैदराबाद स्टेट काँग्रेसने अंगिकारलेला मुक्तिसंग्रामाचा लढा, केवळ सत्याग्रह-पर्वापर्यंत मर्यादित ठेवून चालणार नाही, असे जवळ जवळ सर्वांनाच वाटत होते. १९४२ च्या 'चले जाव'च्या धर्तीवर लढा लढवावा लागेल असे बोलले जाऊ लागले. वेषांतर करून, भूमिगत राहूनच समोर येईल त्या प्रसंगाला तोंड द्यावे लागणार होते. हैदराबाद मुक्तिसंग्राम भूमिगत लढा बनला होता. मराठवाडा विभागाची बहुतेक सरहद्द महाराष्ट्र राज्याच्या सरहद्दीला जोडलेली होती. मराठवाडा विभागाचे नागरिक केवळ मराठी भाषिक म्हणून शेजाऱ्याकडे बघत नव्हते; मोठा भाऊ म्हणून बघत होते. मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांपैकी औरंगाबाद जिल्ह्यावर निझामी राजवटीचा विशेष कटाक्ष होता. निझामी राजवटीने औरंगाबाद शहर व जिल्ह्यातील नागरिकांची कोंडी करून भयंकर छळ सुरू केला होता. सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन भयग्रस्त केले होते. अत्याचार पराकोटीला पोहोचला होता. अनेकांच्या घरादारावर नांगर फिरवून सतावून सोडले जात होते. स्त्रियांची विटंबना केली जात होती. गोरगरीब स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे काढले जात होते. मराठवाडा विभागाच्या औरंगाबाद शहर व जिल्ह्यालगतच्या महाराष्ट्राने मात्र जे काय घडत होते त्याची विशेष दखल घेतली नाही. बंगालमधील लढ्याचे यथार्थ वर्णन महाराष्ट्रातील अन् भारतातील सर्वच्या सर्व वर्तमानपत्रांतून ठळक शीर्षकांसह छापले गेले. मात्र हैदराबाद संस्थानातील लढ्याला अशी प्रसिद्धी मिळाली नाही. शेजाऱ्यांपैकी श्री. रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, बाळासाहेब भारदे, अनंतराव भारदे, स्वामी सहजानंदजी यांच्या शिवाय इतर कोणीही, मराठवाड्यातील नागरिकांच्या मदतीसाठी पुढे आले नाहीत. हैदराबाद मुक्तिसंग्राम हा केवळ हैदराबाद संस्थानातील नागरिकांच्या स्वातंत्र्याचा लढा नव्हता तर तो लढा भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी, सार्वभौमत्वासाठी होता; याचा विचार केला गेला नाही.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कृतिसमितीचे व मुक्तिसंग्रामाचे ज्येष्ठ पुढारी निरनिराळ्या घडामोडी करीत करीत निझामी राजवटीच्या धरपकडीच्या जाळ्यातून सहीसलामत सटकून मुंबई प्रांताच्या मुंबई या राजधानीच्या शहरात कसेबसे दाखल झाले. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या या सर्वच्यासर्व पुढाऱ्यांना मुंबईच्या सरदारगृहात आश्रय घ्यावा लागला. तेथूनच मुंबईतील पुढाऱ्यांच्या, व्यापाऱ्यांच्या, धनिकांच्या गाठीभेटीसाठी वणवण पायपीट करीत फिरावे लागले. काही लोकांच्या जेमतेम गाठीभेटी झाल्या; परंतु त्या भेटींद्वारे मदत, आसरा व निधी मिळाला नाही. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यालयासाठी भाड्याचीही जागा मिळाली नाही.

अनुक्रमणिका

अशा विचित्र परिस्थितीत मुंबई शहरात राहाणे शक्य नव्हते. आशेचा शब्द कानावर येत नव्हता. मुंबईकरांच्या मदतीशिवाय मुंबईत राहाता येऊ शकत नव्हते. आवश्यक ते साहाय्य मिळावे म्हणून भटकंती करण्यात पुढाऱ्यांच्या खिशातले पैसे संपत आल्याने, हैदराबाद-मुक्तिसंग्राम निकराने लढविण्याचा निर्धार केलेल्या पुढाऱ्यांची मने गांगरून गेली. मुंबईत पैशाशिवाय पाऊल ठेवता येत नाही. पैशाचा जीवघेणा प्रश्न सोडवायचा कसा, त्या विवंचनेने पुढारी मंडळी हवालदिल झाली.

स्वामी रामानंद तीर्थ, श्री. गोविंदभाई श्रॉफ इत्यादी हैदराबाद - मुक्तिसंग्रामाबाबत जाण ठेवणाऱ्यांनी श्री. जयप्रकाश नारायण यांना प्राप्त परिस्थितीचे यथार्थ वर्णन पत्राद्वारे कळविले. मुंबई शहरात घडत असलेल्या घडामोडींचे वृत्त समजताच श्री. जयप्रकाश नारायण यांनी त्यांचा आधी ठरविलेला कार्यक्रम तडकाफडकी रद्द केला आणि ते जातीने मुंबईला येत असल्याची अगत्याची तार त्यांच्या निकटवर्तियाला व स्वामी रामानंद तीर्थ यांना त्यांनी पाठविली. तारेप्रमाणे श्री. जयप्रकाश मुंबईत दाखलही झाले. प्रथम श्री. जयप्रकाश नारायण, त्यांच्या सहकारी मित्रासह स्वामी रामानंद तीर्थ यांच्या समवेत हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या पुढाऱ्यांना भेटले. अर्धा तास ऊहापोह झाला; चर्चा झाली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून, सर्वप्रथम श्री. जयप्रकाशजीनी मुंबई प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष श्री. स. का. पाटील यांच्याबरोबर संपर्क साधून बोलणी केली व हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यालयासाठी मुंबई प्रांतिक काँग्रेसच्या इमारतीची जागा मिळवून दिली. श्री. स. का. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, त्यांच्याच कार्यालयात मुंबई शहरातील निवडक दानशूर, व्यापारी आणि सामाजिक व राजकीय पुढाऱ्यांबरोबर एक बैठक आयोजित केली गेली आणि सदर बैठकीतच गोणपाट व्यापारी संघटनेद्वारे स्टेट काँग्रेसला निधी मिळवून दिला गेला.

या बैठकीनंतर हैदराबाद स्टेट काँग्रेसने आखलेल्या पुढील कार्यक्रमाबाबत विचारविनिमय करताना, स्वामीजींना उद्देशून श्री. जयप्रकाश नारायण म्हणाले, 'स्वामीजी, मुंबई शहर एक मायानगरी आहे. या अवाढव्य शहराच्या मायानगरीत तुम्ही दररोजच काय पण आजन्म पायपीट करीत फिरलात तरी तुमची कोणी दखल घेणार नाही. इथल्या कार्यपद्धतीप्रमाणे खिशात एक पैसा नसला तरी पैसा आहे असे सोंग वठवून मोटरीतूनच फिरले पाहिजे. तुम्ही पायपीट करीत भव्य बंगल्याच्या फाटकाजवळ गेलात तर बंगल्याचा दरवान तुमची दखल घेणार नाही; फाटकाचे दार मोकळे करणार नाही. पर्यायाने तुम्हाला बंगल्यात प्रवेश करता येणार नाही; मात्र तुम्ही मोटारीतून गेलात तर तुमची मोटार फाटकाजवळ जाताच दरवान विनम्रपणे अभिवादन करून फाटकाची जाडजूड लोखंडी दारे मोकळी करील. मोटारीत फिरूनच तुम्हाला निरनिराळ्या विभागातील लोकांच्या गाठीभेटी घ्याव्या लागतील. तुम्ही कोण? कशासाठी आला आहात? तुमचे ध्येयधोरण व तुमचे उद्देश काय आहेत? हे सारे लोकांना समजावून सांगावे लागेल'. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी श्री. जयप्रकाश नारायण यांनी त्यांच्या इष्टमित्रांची व मुंबईतील प्रमुख कार्यकर्त्यांची ओळख करून दिली. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यालयाचा कारभार मुंबई शहरात सुरू झाला.

माध्यमिक शाळेत शिकत असताना श्री. द्वारकादास पटेल याला श्री. गोविंदभाईंबद्दल नितांत आदर वाटत होता. त्याने त्यापरीने खटपट करून श्री. गोविंदभाईंशी जवळीक केली होती. अधूनमधून श्री. गोविंदभाईंच्या तोंडून जे काय ऐकले होते ते त्याच्या मनात बिंबले होते. श्री. गोविंदभाई यांच्या विचाराने, कार्यपद्धतीने तो भारावून गेला होता. श्री. गोविंदभाई यांनी अंगिकारलेल्या जनजागृती व नागरी स्वातंत्र्याच्या

अनुक्रमणिका

कार्यात आपणही सहभागी व्हावे असेच त्याला वाटू लागले होते व त्यासाठी त्याने माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थि-विद्यार्थिनींना आपल्या घरी एकत्र आणून त्यांच्याबरोबर ऊहापोह केला आणि हैदराबाद स्टेट काँग्रेसने अंगिकारलेल्या कार्यात प्रत्यक्ष व हस्ते परहस्ते सहकार्य करावयाचा विचार त्यांच्यात रुजविला. विद्यार्थि-विद्यार्थिनींच्या मनात तोच एक विचार सारखा डोकावू लागला. गिरजाशंकर ऊर्फ हिन्दुस्थान, नाना जेधे, भीमराव कुलकर्णी, वसंत निंभोरकर, कमल भोरे, चंदा भागवत, कुसूम जोशी, मधुबाला, कुमुद व रमण, शहा भगिनी व शहा बंधू इत्यादी मंडळी कामाला लागली. कुसूपारक मोहल्यातच शहा बंधू भगिनींचे घर सर्वांचे कार्यालय बनले. अधूनमधून त्यांच्या बैठकी, चर्चा होत असत व कार्यक्रमांची अंमलबजावणीही तेथूनच होत असे. १९४७-४८ च्या धगधगत्या काळात शाळकरी मुलामुलींनी बरीच महत्त्वाची व मोलाची कामगिरी आपण होऊन अंगिकारली आणि स्वीकारलेली कामगिरी व्यवस्थित पार पाडली. निझामी पोलिसांच्या पाशवी दर्शनाने कोणाच्याही मनात चलबिचल झाली नाही. निझामी राजवटीचा कारभार जोरजुलूम, दडपशाही व अत्याचाराच्या मार्गाने चालला होता. जीवन असुरक्षित वाटू लागले होते. जात्यंध मुस्लिम हातात नंग्या तलवारी, बरछ्या घेऊन सडकेकर मिरवत असत. गुंडागर्दी वाढीला लागली होती. घराबाहेर पडलेली व्यक्ती सुखरूप घरात येईल याची खात्री नव्हती. शहरभर गावगुंडांचा नंगानाच, धांगडधिंगा, दंडेली, लुटालुटीचे प्रकार घडत होते. 'हिज मॅजेस्टी निझाम पाईंदाबाद', 'इस्लाम खतरेमे है' अशा घोषणा, त्याही नंग्या तलवारी हातात घेऊन, दिल्या जात होत्या. काही नागरिक घाबरले, त्यांपैकी काहींनी स्थलांतर केले. त्याच सुमारास श्री. द्वारकादास पटेलची देऊळगाव कॅम्पवर रवानगी करण्यात आली व कृतिसमितीचे कार्य श्री. काशिनाथ नावंदरकडे सोपविण्यात आले. औरंगाबाद शहरात व जिल्ह्याच्या निरनिराळ्या गावात प्रभातफेऱ्या व सत्याग्रहाचा कार्यक्रम राबविला जात होता. सत्याग्रहींना कारागृहात डांबले जाऊ लागले. त्यांना निरोप देण्यासाठी शहरातील अनेक नागरिक करारी मनाने उपस्थित राहू लागले. शहरातील बऱ्याच नागरिकांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या चळवळीबाबत सहानुभूती बोलून दाखविली. मला त्यातले बरेच बोलघेवडेच वाटले ; प्रत्यक्ष सत्याग्रह करण्यास ते धजले नाहीत. कार्यक्रमाबाबतची पत्रके नियमित घरोघर पोहोचती केली जात होती, परंतु पत्रकातील कार्यक्रम राबविण्यासाठी फारसे नागरिक मैदानात आले नाहीत. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्याच बळावर स्टेट काँग्रेसचे कार्य रेटून पुढे नेले जात होते. औरंगाबाद शहराच्या निरनिराळ्या मोहल्यात गटसभा घेतल्या जात, प्रभात फेऱ्या काढल्या जात, तसेच सत्याग्रहही केला जाई. नित्य नवनव्या कार्यक्रमाने औरंगाबाद शहराचे वातावरण ढवळून निघाले. वातावरण सारखे तापत ठेवण्यात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भरपूर परिश्रम घेतले. स्टेट काँग्रेसच्या लढ्याचे स्वरूप लोकांच्या डोळ्यात भरू लागले; मात्र पोलिसांना आणि जात्यंध मुस्लिमांना हे जहरी काढ्यासारखे वाटू लागले. जात्यंध मुस्लिम मनमुराद शिवीगाळ करू लागले. 'इस्लाम खतरेमे है' याच घोषणा देऊ लागले. एकट्या दुकट्याला गाठून भरदिवसा लूटमार करू लागले. दडपशाहीने सामान्याला सतावून सोडले जाऊ लागले. पोलिसांच्या अंगात सैतान अवतरला. पोलिस सत्याग्रहींवर व प्रभात फेऱ्यांवर तुटून पडू लागले. असे सारे औरंगाबाद शहरात दिवसाढवळ्या घडत असता नेमस्त, मवाळ मंडळी आणि इतर लाचार, सरकारधार्जिणे लोक आपआपल्या घरात दारे खिडक्या लावून बसत होते.

९ ऑगस्टला रात्री ९ वाजता गंगापूर तालुक्यातील तांदुळवाडी गावात सत्याग्रह चळवळीबाबत जाहीर सभा घेण्याचे ठरले होते. श्री. रामगोपाल नावंदर यांनी मला त्या सभेसाठी प्रमुख वक्ता म्हणून बोलविले होते. वाहनाची सोय नसल्याने मला जवळपास १० किलोमीटर पायपीट करीतच जावे लागले. गावाच्या मध्यभागी

अनुक्रमणिका

शाळेजवळच्या पटांगणात गावकरी जमले होते. मी साडेनऊ वाजता तेथे पोहोचलो. सभेच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. गावकऱ्यांनी 'महात्मा गांधी की जय', 'स्वामी रामनंद तीर्थ की जय', 'हैदराबाद स्टेट कॉँग्रेस झिंदाबाद'च्या एकामागून एक घोषणा दिल्या. मी आपल्या भाषणात म्हणालो, 'गावकरी मित्रांनो, तुम्ही किती दिवस गप्प बसणार? सहनशीलता कुठवर सांभाळायची? आपली घरेदारे जमीनदोस्त करण्यासाठी सैतानी निझामी राजवट तिच्या जुलमी शक्तीचा पाशवी प्रहार करते आहे. आपल्या अंगातील मरगळ झटकून आपल्या सुरक्षिततेसाठी आपण कचखाऊ धोरण झिडकारून नेटाने, जोमाने प्रतिकार करावयासाठी आपल्या सर्व शक्तिनिशी घराबाहेर पडणे अत्यंत आवश्यक बनले आहे. राष्ट्रपिता महात्मीजींच्या 'चले जाव' या सूत्राचाच आपण वापर केला पाहिजे. निझामी राजवट तुमची आमची शत्रू बनलेली आहे. शत्रू बरोबर दोन हात करण्यासाठी, शत्रूचा पाडाव करण्यासाठी कंबर कसा.' अधून मधून लोक टाळ्या वाजवीत होते.

याच सुमारास एका मागून एक मुस्लिम निर्वासितांचे तांडे औरंगाबाद शहरात येऊ लागले. जेथे कोठे मोकळी जागा दिसेल तेथे निर्वासित लोक त्यांचे बस्तान बसवू लागले. निर्वासित स्वतःला रझाकार संबोधू लागले. रझाकार हा शब्द औरंगाबादेतील जनतेच्या कानावर सतत आदळू लागला. शहरातील लब्धप्रतिष्ठित मुस्लिम स्वतःला रझाकाराचे नेते म्हणवून घेऊ लागले. त्या बड्या नेत्यांच्या पाठोपाठ गावगुंड, आडदांड, इरसाल मनोवृत्तीचे छोटे मोठे जात्यंध मुस्लिम त्यांच्या घरात दडवून ठेवलेल्या तलवारी, सुरे हातात घेऊन भर रहदारीच्या सडकेवर दिवसाढवळ्या नंगानाच करीत जनतेत घबराट पैदा करू लागले. त्यात शहराचे मान्यवर वकील काझी हमीदुद्दीन, काझी खैरोद्दीन यांनी पुढाकार घेतला होता. काझी हमीदुद्दीन रझाकरांचे सरसेनानी तर काझी खैरोद्दीन त्यांचे सिपहेसालार बनले होते. हिंदु जनतेला, दिसेल त्या हिंदूला ते गद्दार, निमकहराम म्हणत होते. १० ऑगस्ट रोजी भर दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास काही जात्यंध मुस्लिम गावगुंडांनी मला शहागंज विभागातील श्री. कचरदास बाकलीवाल यांच्या घरासमोर घेरले व दमदाटी, मारपीट करून माझ्या कोटाच्या खिशातले रु. ४८६ बळजबरीने हिसकावून घेतले. मदतीसाठी मी भरपूर जोरजोराने आरडाओरड केली; तथापि जवळच्या तीनचार इमारतीतून कोणीही धावून आले नाही. काय करावे ते सुचेनासे झाले होते. इतक्यात श्री. कचरदास बाकलीवाल यांच्या शेजारी राहात असलेले श्री. रामकुंवर काकाणी यांच्या हनुमानदास या मुनीमाने मला त्यांच्या घरात बोलावून घेतले व मला धीर दिला. शहरात रोज नवनव्या प्रकारची गुंडागर्दी केली जाऊ लागली. गुंडांची गुंडगिरी सतत वाढत गेली. बाराभाईंच्या चौरस्त्यावर श्री. बसध्ये बंधूंच्या दुकानाच्या दक्षिणेला एक पानपट्टीचे दुकान होते; त्याने तेवढ्या विभागात घबराट निर्माण केली होती. त्या विभागातून घरगुती कामानिमित्त जाणे येणे सुरक्षित राहिले नव्हते. सिल्लेखाना ते पैठण गेटपर्यंत बहादूर खान, दिलावर खान व कसायाच्या चौधरी कुटुंबियांनी हैदोस घालून दिवसाढवळ्या त्या रस्त्यावर जाणे येणे नकोसे केले होते. हाजी मिया चौधरीने रझाकारांची वर्दी घालून भयंकर घबराट पैदा केली होती. वातावरण भयंकर स्फोटक बनले होते. शहरातील बहुतेक मुसलमान-त्यात बोहरा समाजही सहभागी बनलेला-निझामाचे तेच खरे वंशज, वारस असल्यासारखे वागत होते. त्यांनी कोणताही धांगडधिंगा केला तरी पोलिस त्यांना चकार शब्दाने बोलत नव्हते, अटकाव करीत नव्हते. नेमस्त आणि मवाळ धोरणाचे वारस नुसत्या शिळोप्याच्या गप्पा मारीत होते. १३ ऑगस्टला दुपारी अडीच वाजता सौ. आशाताई वाघमारे यांच्या घरी १५ ऑगस्टच्या कार्यक्रमाबाबत विचारविनिमय करण्यासाठी काही निवडक कार्यकर्त्यांची बैठक श्री. बिंदाप्रशाद यांनी बोलविली होती. पोलिसांचा कानाडोळा, गुंडांची गुंडगिरी, मारहाणीची शक्यता लक्षात घेऊन बैठकीला जाऊच नये असे मी मनोमन ठरविले होते. तेवढ्यात दोन वाजता श्री. गिरजाशंकर भावसार यांच्या द्वारे मी त्या

अनुक्रमणिका

बैठकीस आलेच पाहिजे असा निरोप मिळाला. नाइलाजास्तव मनाचा हिय्या करून गल्लीबोळातून धावणी मोहल्यातील मागच्या दाराने मी सौ. आशाताईंच्या घरात गेलो. त्यावेळी सौ. आशाताई, लाला बिंदाप्रशाद व श्री. मिश्रीलाल पहाडे माझीच वाट पाहात बसले असल्याचे सौ. आशाताईने सांगितले.

पंधरा ऑगस्ट, स्वतंत्र भारताचा पहिला स्वातंत्र्य दिन कसा साजरा करावयाचा याबाबत आम्ही बोलणे केले. बराच वेळ बोलणी झाल्यावर कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यात आली. पाच वाजण्याच्या सुमारास मी परत जाण्यासाठी निघण्यापूर्वी, सौ. आशाताईंच्या घरी वार लावून राहणाऱ्या विद्यार्थ्यांद्वारे, घराच्या समोर व आजूबाजूस पोलिस नसल्याची खात्री करून घेतल्यावर मी घराबाहेर पडलो. शेजारचे एक घर ओलांडले तेवढ्यात साध्या वेषातील जमादार व पोलिसांनी मला थोपविले व मला त्यांनी अटक केल्याचे सांगितले. पोलिस जमादार, पोलिस शिपाई मला अटक करूच शकत नाहीत असे मी सांगताच त्यांनी मला हातातील काठ्यांनी अडविले. ‘थांबा, मी पोलिस इन्स्पेक्टर बोलावतो’ पोलिस जमादाराने सांगितले आणि त्यांनी दोन शिपायांना पोलिस चौकीकडे पिटाळले. प्राप्त परिस्थितीचा व संधीचा फायदा घेण्यासाठी मी तहान लागल्याचा बहाणा केला. ‘या घरातून पाणी पिऊन येऊ का?’ असे मी जमादाराला विचारले. ‘आप पानी पिने के लिए इस घरमें जा सकते है। पानी के बहाने भागने की कोशीश मत करो। अब आप सहीसलामत भागकर जा नही सकते।’ असे जमादाराने सांगितले. ‘जमादार साब आप ठीक कहते है। मैं सहीसलामत भाग नही सकता। सही मानो मैं भागना नही चाहता। मुझे सही प्यास लगी है। मै पानी पीकर जल्दी वापस आता हूँ।’ मी म्हटले. मी शेजारच्या घरात शिरलो. घरातले लोक मला चांगले ओळखत होते. ‘मला तहान लागली आहे. प्यायला पाणी द्या’ असे मी श्री. ताराचंद सेठ यांना सांगितले. त्यांनी तांब्या भरून आणावयास त्यांच्या मुनीमाला सांगितले. मी मुनीमाच्या मागोमाग मधल्या घरात गेलो. श्री. ताराचंदजी माझ्या मागोमाग मधल्या घरात येताच, अगदी हळूच त्यांच्या कानाजवळ तोंड नेऊन मी म्हणालो, ‘मला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिस बाहेर उभे आहेत. पाणी पिण्याचे निमित्त करून मी तुमच्या घरात आलो आहे. मी तुमच्या मागच्या दाराने बाहेर पडताच मी पळालो म्हणून आरडाओरडा करीतोपर्यंत मी मागच्या बोळीतून पोलिसांना गुंगारा देऊ शकेन’. मात्र माझी ती योजना त्यांना मानवली नाही. त्यांनी साफ नकार दिला. मला उभ्या असलेल्या पोलिसांच्या स्वाधीन झाल्याशिवाय पर्याय नव्हता. इतक्यात श्री. बिंदाप्रशाद व श्री. मिश्रीलाल पहाडे घरातून सडकेवर येताच समोरून पोलिस शिपायासमवेत पोलिस इन्स्पेक्टर आले. त्यांनी आम्हा तिघांना अटक करून चौक पोलिस ठाण्यात नेले.

रात्रीचे जेवण झाल्यावर आम्हा तिघांना चौक पोलिस ठाण्याच्या दुसऱ्या माळ्याच्या उजव्या बाजूच्या खोलीत ठेवण्यात आले. रात्री १० वाजता रात्रीच्या ड्युटीवर नियुक्त केलेले सबइन्स्पेक्टर श्री. महमूदअली खान पोलिस ठाण्यात आले. त्यांचा व श्री. बिंदाप्रशाद यांचा जुना परिचय होता. त्या दोघांची भेट झाली. गप्पा झाल्या. माझ्या कोटाच्या खिशात स्टेट-काँग्रेस-निधी म्हणून गोळा केलेले आदमासे तीनशे रुपये होते. मनगटावर भारीपैकी घड्याळ, सोन्याच्या पट्ट्यासह होते. उजव्या हाताच्या बोटात दोन सोन्याच्या अंगठ्या होत्या. दोन पावती पुस्तके होती. पावती पुस्तकात निधी देणाऱ्यांची नावे होती. ती पावती पुस्तके पोलिसांनी जप्त केली तर निधी देणाऱ्यांची चांगलीच ससेहोलपट केली जाईल; नाही नाही ती विचारपूस करून त्यांना भंडावून सोडले जाईल; या विचाराने मी बराच अस्वस्थ होतो. झोपण्याचा प्रयत्न करूनही काही केल्या डोळा लागेना. मी सारखा कुशी बदलत होतो. श्री. बिंदाप्रशाद व श्री. मिश्रीलाल पहाडे यांना डुलक्या येत होत्या. श्री. महमूद अली खान वर आले अन् थोड्या वेळाने ते ठाण्याबाहेर पडले. वरच्या माळ्यावर आम्हा तिघाशिवाय

कोणीच नव्हते. मी माझी अडचण श्री. बिंदाप्रशाद यांना सांगितली. श्री. बिंदाप्रशाद यांनी माझे घड्याळ, घड्याळाचा सोन्याचा पट्टा, दोन अंगठ्या, तीनशे रुपये व पावती पुस्तके रुमालात व्यवस्थित गुंडाळली. रात्रीच्या दोनच्या सुमारास सबइन्स्पेक्टर महमूद अली खान आमच्या खोलीत आले तेव्हा मी व बिंदाप्रशाद जागेच होतो.

'लाला मै तो सोचा था आप सो गये होंगे' श्री. महमूदअली सहज बोलले.

'हम वैसे सो ही गये थे! अभी अभी जाग आ गई' श्री. बिंदाप्रशाद म्हणाले अन् त्यांनी त्यांच्या शेरवाणीच्या खिशात कोंबून ठेवलेल्या, रुमालात बांधून ठेवलेल्या वस्तू श्री. महमूद अली जवळ दिल्या व हळूच सांगितले, 'अब आप राऊंडपर जायेंगें तब कुछ बहाना करके यह मेरे दोस्त शंकरलाल के वालिदके हवाले करने की तकलीफ कीजिये' 'ठीक है!' असे सांगून त्यांनी ते रुमालात बांधलेले सामान त्यांच्या जाडजूड ओव्हर कोटाच्या खिशात कोंबले. थोड्या वेळाने ते त्यांच्या राऊंडवर निघून गेले. सब इन्स्पेक्टर महमूद अली माझ्या घरी गेले. घराच्या दाराची कडी जोरजोरानी वाजवत वाजवत, जोरजोरानी आरडाओरड केली. माझ्या घराची झडती घेण्यासाठी ते आले असल्याचे ऐकून माझे वडिल बरेच घाबरले. त्यांच्या तोंडून शब्द उमटेनासे झाले. तेवढ्यात महमूद अलीनी रुमालात बांधलेल्या वस्तू माझ्या वडिलांना देताना सांगितले, 'आप आपके फरजंद की मुलाकत के लिये अदालतमे आ सकते है' इतके सांगून महमूद अली घराबाहेर पडले.

पोलिस चौकीचे अधिकारी राऊंडवर गेले होते. रात्रीच्या चार वाजण्याच्या सुमारास मला जोराची लघवी लागल्याने मी वरून खाली आलो. त्या वेळी तेथे बंदुकधारी शिपाई उभा होता 'मैं पेशाबके लिये जाना चाहता हूँ!' मी पोलिस शिपायास सांगितले. 'जाईये' इतकेच त्याने सांगितले. मी लगेच पोलिस ठाण्याच्या मागच्या बाजूला गेलो. ठाण्याच्या फाटकाजवळ शिपायाचा पहारा नव्हता. नीरव शांतता होती. कडाक्याची थंडी पडलेली होती. रस्त्यावर चिटपाखरू दिसत नव्हते. पोलिस ठाण्यातून सहज सटकता येऊ शकत होते. प्राप्त संधीचा फायदा घेऊन तेथून सटकण्याचा मी विचार केला. लघवीला गेलो. परत आलो तरी मला कोणी हटकले नाही. पहारेकऱ्यांना झोप आवरत नव्हती. ठाण्यातून सटकण्याचा माझा विचार मी हळूच श्री. बिंदाप्रशाद यांच्या कानात सांगितला. ते थोडेसे विचारात पडले. त्यांच्या तोंडून होकार अगर नकार बाहेर पडण्यापूर्वीच श्री. मिश्रीलाल पहाडे यांनी 'जाऊ नका. तुम्ही गेलात तर आमची पिटाई केली जाईल' असे सांगितले. पोलिसांच्या ताब्यातून सटकण्याची दुसरी संधीही मला हातची गमवावी लागली. पळून जाण्याचे विचार मला मनातल्या मनातच ठेवावे लागले.

दुसऱ्या दिवशी दुपारच्या सुमारास माझी व माझ्या वडिलांची कोर्टाजवळ भेट झाली. रात्री पोलिस इन्स्पेक्टर घरी कसे आले, काय काय आरडाओरड केली, मी पाठविलेल्या वस्तू इन्स्पेक्टर साहेबानी त्यांच्या हातात कशा दिल्या, हा घडलेला प्रकार माझ्या वडिलांनी मला सांगितला. थोड्या वेळाने त्याच पोलिस इन्स्पेक्टरनी आम्हा तिघांसमवेत माझ्या वडिलांना चहा दिला. नंतर थोड्या वेळाने आम्हा तिघांना पोलिस व्हॅन मधून औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती कारागृहात नेण्यात आले. औरंगाबादेच्या कारागृहात गेल्यावर, आम्हा तिघांची कसून झडती घेण्यात येऊन जेलच्या रजिस्टरमध्ये आमची, आमच्या नावागावासह नोंदणी करण्यात आली. कारागृहाच्या दुसऱ्या दाराशी उभ्या असलेल्या जेलच्या शिपायाने दाराचे कुलूप उघडले. मोठ्या

दारातील छोटे दार उघडले. त्या छोट्याशा दारातून आम्हा तिघांना आत सोडले तेव्हा आमच्या बरोबर दुसरा एक जेलचा शिपायी होता. कारागृहाच्या आणखी दोन मोठ्या दारातून, वॉर्ड नंबर ८ मध्ये आम्हाला नेण्यात आले. तो वॉर्ड राजकीय कैद्यासाठीच राखून ठेवला होता. त्यावेळी त्या वॉर्डात श्री. नागोराव पाठक हे एकटे एक राजकीय कैदी होते. आदल्या दिवशी पानदरिबा किराणा चावडी येथे सायंकाळच्या सुमारास व रात्री चौक पोलिस ठाण्यात घडलेल्या घटनामुळे मी बराच बैचेन होतो. मनात एकामागून एक विचार सारखी गर्दी करीत होते. काय होते आहे ते माझे मलाच धड कळत नव्हते. रात्रभर मला झोप आली नाही. त्यात वॉर्डातला घाणेरडा वास आणि मच्छरांचा व ढेकणांचा सुळसुळाटही ताप देत होता.

आम्ही कारागृहात अडकून पडलो होतो. स्वतंत्र भारताचा स्वातंत्र्याचा व सार्वभौमत्वाचा पहिला दिवस व त्या दिवसाचा आगळा सोहळा आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहू शकत नव्हतो. याचेच मनस्वी दुःख वाटत होते. ह्रदयाला इंगळ्यांच्या चाव्यासारख्या यातना होत होत्या. स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते, त्यांचे काम व्यवस्थित पार पाडीत होते. विद्यार्थी आणि इतर याजकडून खेड्यापाड्यात सत्याग्रह केला जात होता. औरंगाबाद शहरातून आणि औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्याच्या गावांतून कारागृहात दाखल करण्यात येणाऱ्या सत्याग्रहींद्वारे बाहेर जे काय घडत होते ते ऐकावयास मिळत होते. १५ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट पर्यंतचा काळ सत्याग्रहींनी जोमाने गाजविला. वॉर्ड नंबर आठ गच्च भरला. सप्टेंबरअखेर पर्यंत औरंगाबादच्या मध्यवर्ती कारागृहाचे राजकीय कैद्यांसाठी राखून ठेवलेले वॉर्ड राजकीय कैद्यांनी भरून गेले. कैद्यांमध्ये औरंगाबाद जिल्ह्याबरोबर मराठवाडा विभागातील बीड, परभणी, नांदेड आणि उस्मानाबादच्या सत्याग्रहींचाही समावेश होता. राजकीय कैद्यांची विभागणी तीन प्रकारे करण्यात आली होती. स्थानबद्ध, शिक्षा झालेले व शिक्षा न झालेले. (Under trial) आम्ही सर्वचेसर्व राजकीय कैदी होतो. हैदराबाद स्टेट काँग्रेस हीच आमची संघटना होती. स्थानबद्ध कैदी इतरांपेक्षा निराळे असल्याचे बोलले जाऊ लागले. शिक्षा न झालेल्यांनी स्थानबद्धांच्या वार्डात जाऊ नये असे उघड उघड सांगितले जाऊ लागले. स्थानबद्ध ज्येष्ठ राजकीय कैदी असतात असा आभासही निर्माण केला जाऊ लागला. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहींमध्ये भेदभाव स्पष्टपणे दिसू लागला. त्यानंतर शिक्षा झालेले व शिक्षा न झालेल्यांना एकत्र ठेवण्यात येऊ लागले. काही सुखवस्तू शिक्षा झालेल्या अन् शिक्षा न झालेल्या राजकीय कैद्यांच्या घरून गोड व चविष्ट पदार्थ येऊ लागले. ते राजकीय कैदी वार्डातील इतर कैद्यांचा डोळा चुकवून, आजूबाजूचे लोक गाढ झोपले असताना चोरून लपून त्यांच्या त्या गोड व चविष्ट पदार्थांचा समाचार घेऊ लागले. वार्डातील शेतकऱ्यांच्या काही मुलांना अचानक जाग आल्याने जो काय गुपचूप प्रकार रात्री केला जात होता तो त्यांनी लक्षपूर्वक न्याहाळला. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. असे पदार्थ आपल्याला कोण आणून देईल? आपल्याला तसे पदार्थ का मिळू नयेत? असे अधूनमधून त्यांना सतत वाटू लागले. काहींना त्या पदार्थांचा मोह आवरता आला नाही. त्यांनी आपसात संगनमत केले व प्रसंगावधान राखून अगदी बिनबोभाट पद्धतीने ते मिठाईचे पदार्थ फस्त केले. कारागृहात आल्यावरही काही श्रीमंत व सुखवस्तू लोक श्रीमंतीचे चोरून प्रदर्शन करून, गोरगरीब लोकांना डिवचतात अशा कानपिचक्याही त्यांनी द्यायला प्रारंभ केला. श्री. लाला बिंदाप्रशाद हे पट्टीचे सिगारेट ओढणारे होते. ते त्यांची सिगारेटची तलफ भागविण्यासाठी, लपूनछपून संडासात बसून सिगारेट ओढू लागले. सिगारेटचा धूर व वास लपू शकला नाही. गावकऱ्यांना त्यांच्या विडीची तलफ सतावू लागली. त्यांना कारागृहात विड्या मिळणे शक्यतेतले नव्हते. काही चाणाक्ष गावकरी बोलू लागले, लालाजीना सिगारेट मिळू शकते. आम्हाला साध्या विड्या का मिळत नाहीत? विड्यासाठी हाकाटी सुरू झाली. विडीची सवय आहे. विडी ओढल्याशिवाय परसाकडे होत नाही. पोट फुगलेले राहाते. आंबट ढेकर

अनुक्रमणिका

येतात. असे बरेच काही सांगितले जाऊ लागले. विड्याची जोरदार मागणीही रेटून पुढे येऊ लागली. विड्या दिल्या नाही तर माफी मागून घरी जाण्याबाबतही रोखठोक शब्दात सांगितले जाऊ लागले. समोर येणाऱ्या बिकट परिस्थितीचा विचार करून श्री. बिंदाप्रशाद यांनी सिगरेटचा मोह आवरता घेतला आणि तडकाफडकी सिगरेट ओढणे कायमचे बंद केले. त्याचा परिणाम चांगलाच झाला. वार्डावार्डात निर्माण झालेले गढूळ वातावरण पुनरपि स्वच्छ झाले. एक आठवड्यानंतर खेड्यातून आलेल्या बहुतेक सत्याग्रहींना सपाट्याने परसाकडी होऊ लागल्या. हवेतील गारठा कमालीचा वाढला होता. त्यात भर पडली थंडीतापाच्या लागणीची. प्रत्येक वॉर्डात दहा बारा सत्याग्रहींना कडाडून थंडी आणि सडकून ताप भरला, थंडीतापाच्या लागणीने कारागृहात सत्याग्रहींना हैराण केले. त्यावेळी कारागृहाच्या शासकीय दवाखान्यात थंडीतापावरील औषधींचा तुटवडा होता. थातूरमातूर करून कारागृहाचे सरकारी डॉक्टर वेळ मारून नेत होते. हिवतापाने सत्याग्रहींना ग्रासून टाकले होते. त्यावेळी आवश्यक त्या औषधीऐवजी कारागृहाचे डॉक्टर अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच कडूलिंबाचा पाला व काड्यांचा उकळून तयार केलेला काढा औषध म्हणून बाटल्यातून देत होते. जे काय काळेबरे केले जात होते त्याचे बिंग फुटले. डॉक्टर व जेलच्या अधिकाऱ्यांबरोबर सत्याग्रहींची बरीच बाचाबाची झाली. खडाजंगी उडाली. आवश्यक ती उपयुक्त औषधी दिली नाही तर उपोषण सुरू करण्याची धमकी देण्यात आली. जेलच्या अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. त्यांनी धडपड करून काही प्रमाणात औषधी गोळा केली. रोग्यांच्या मानाने गोळा केलेली औषधी अपुरी पडू लागली. पुष्कळसे सत्याग्रही तापाने त्रस्त झाले होते. तापावर उपचार करण्यासाठी घरी जावयाचे पालुपद बोलून दाखविले जाऊ लागले. घरी परत जाण्याची भाषा जोर धरू नये म्हणून श्री. गुलाबचंद नागोरी व श्री. बिंदाप्रशाद समवेत मी कारागृहातील डॉक्टर व वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून सांगितले की, आजारी सत्याग्रहींना आवश्यक ती औषधी द्यावी, त्यांना आजारातून बरे करावे, त्यांची प्रकृती सुधारावी यासाठी औरंगाबाद शहरातील काही नागरिकांकडून आवश्यक ती औषधी मिळविता येऊ शकेल. त्यासाठी जेलच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांबरोबर टेलिफोनवर संपर्क साधण्यासाठी परवानगी द्यावी. परिस्थितीचे अवलोकन करून शहरातील श्री. शंभूदयाल शर्मा व बजरंगलाल टिबडीवाला यांच्या बरोबर टेलिफोनवर बोलण्याची परवानगी मिळाली. श्री. लाला बिंदाप्रशाद व श्री. गुलाबचंद नागोरी यांची व श्री. शर्मा आणि श्री. टिबडीवाला यांची तितकीशी जवळीक नव्हती म्हणून त्या दोघांनी मीच बोलावे असे सांगितले. श्री. शंभूदयाल शर्मा बरोबर मी टेलिफोनवर बोललो. 'शंभूदयालजी इस समय जेल में लगभग सौ से अधिक सत्याग्रही बुखार और जाडेसे बीमार हैं, आप और बजरंगलालजी हर प्रकारकी चेष्टा करके जल्दी से जल्दी बल्के दो तीन घंटेमे जाडा, बुखार, पेचीश आदीपर उपयुक्त दवाईयाँ जेलतक पहुँचाने की मेहेरबानी करके उपकृत करें!'

'देखो शंकरलालजी, हिम्मत रखो। हम आपकी सेवामें आवश्यक दवाईयाँ तुरंतही रवाना करते है। और किसी प्रकारकी आवश्यकता सामने आई तो बिना संकोच आप बताना।' असे श्री. शंभूदयालजीनी टेलिफोनवर सांगितले. टेलिफोनवर श्री. शंभूदयाल शर्मानी मला जे काय सांगितले त्याचा भावार्थ मी श्री. नागोरी व श्री. बिन्दाप्रशाद यांना सांगितला. 'दवाईयां घंटा दो घंटे में यहाँ आ जायेंगी!' असे मी जेलच्या अधिकाऱ्यासमवेत असलेल्या डॉक्टरनाही सांगितले.

अवघ्या दोन तासाच्या आत आवश्यक त्या औषधी आल्या. औषधींचा त्वरित वापर सुरू करण्यात आला. थंडीतापाच्या आजारातून बहुतेकांची तीन-चार दिवसांत सुटका झाली. त्यानंतर जेलच्या अधिकाऱ्यांनी

अनुक्रमणिका

सत्याग्रहीना त्रस्त करण्यासाठी कच्च्या भाकरी, कडू भाजी, करपलेले वरण देण्याला प्रारंभ केला. तपासाअंती एकदा भाजीमध्ये पपईची पाने टाकल्याचे आढळले. सत्याग्रहींनी त्या दिवशी जेवण घेण्याचे नाकारले. कारागृहातील सत्याग्रहींचा संताप अनावर झाला होता. त्यांनी जेवावयाचे नाही असेच निश्चित केले. जेलच्या अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. धावपळ सुरू झाली. सत्याग्रहींना सदाकदा सतावणारे, त्रास देणारे, त्रस्त करणारे स्वतःच घाबरले, त्रस्त झाले. सत्याग्रही उपोषण सोडावयाला तयार नव्हते. कारागृहाच्या नियमाप्रमाणे कारागृहातील कोणत्याही कैद्याला फार वेळ उपाशी ठेवता येत नाही. सर्वच्या सर्व अधिकाऱ्यांची घाबरगुंडी उडाली. जिल्हाधिकारी, पोलिसांचे प्रमुख अधिकारी, सिव्हिल सर्जन यांनी प्राप्त परिस्थितीचा आढावा घेऊन ताज्या भाकऱ्या व भाजी तयार करविली व सकाळचे जेवण आठ तासानंतर दिले.

ह्या प्रकारानंतर काही निवडक सत्याग्रहींच्या देखरेखीखाली भाकऱ्या भाजल्या जाऊ लागल्या, तसेच भाजी अगर वरणाला फोडणी दिली जाऊ लागली.

अनुक्रमणिका

# कारागृहातून पलायन

ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत औरंगाबाद शहर व जिल्हा तसेच मराठवाड्यातील इतर चार जिल्ह्यांसमवेत तेलंगण आणि कर्नाटक विभागांतून सत्याग्रही औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आल्याने, मध्यवर्ती कारागृह खचाखच भरल्यावर कॅम्प जेलचा विभागही सत्याग्रहींनी तुडुंब भरला. दोन्ही कारागृहांची व त्यात खचाखच भरलेल्या सत्याग्रहींची व्यवस्था करताकरता कारागृहाच्या अधिकाऱ्यांची सतत त्रेधातिरपीट उडू लागली.

मी पुढाकार घेतला म्हणून आजारी सत्याग्रही आजारातून मुक्त झाले. मी भरपूर औषधांचा साठा औरंगाबादेतील नागरिकांच्या मदतीने मिळवू शकलो तसेच काही वादग्रस्त प्रश्नांची उकल करण्यात श्री. गुलाबचंद नागोरी व श्री. बिंदाप्रशाद या दोघांनी भरपूर पुढाकार घेतला; त्यामुळे आम्हा तिघांना जेलच्या मुख्य कार्यालयात जाता येता यायचे, खेरीज वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वेळोवेळी बोलताही येऊ लागले. सत्याग्रहींच्या केवळ भेटीसाठी आलेल्या त्यांच्या नातलगांच्या भेटी जुळवून देता येऊ लागल्या. सौ. आशाताई अधूनमधून खेड्यापाड्यांतील महिलांबरोबर यायच्या, त्यावेळी त्या आमच्यापैकी काही लोकांनाही भेटत असत. औरंगाबाद कारागृहाच्या बाहेर नित्य नवे जे जे घडत होते त्यातले बरेचसे कारागृहात दाखल होणाऱ्या सत्याग्रहींद्वारे समजत असे. त्यामुळे कारागृहाच्या चार भिंतीत पडून राहाणे कसेसेच वाटायचे. जेलमधून बाहेर कसे पडता येईल हाच एक विचार माझ्या डोक्यात घोळत होता. त्याच वेळेस, बाहेर अत्यंत आवश्यकता असल्यामुळे, मी, नागोराव पाठक व खोत यांनी आणखी काहीजणांसह जमेल त्या मार्गाने जेलमधून बाहेर पडावे, असा निरोप मिळाला. त्याच सुमारास प्रथम श्रीनिवास खोत व जीवनराव बोधनकर यांनी जेलमधून निसटून जाण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या होत्या. त्यांनी कारागृहाच्या बहुतेक वार्डांचा तसेच बागेच्या परिसराचा कानाकोपरा जातीने पाहिला. कारागृहाच्या कोणत्याही भागाला भगदाड पाडणे अतिशय अवघड काम असल्याचे दिसले. बागेतून काटेरी तारेचे कुपंण व त्या उघड्या भागावर सतत पहारा असल्याने तो मार्गही असुरक्षित असाच वाटला. शिपाई बहुतेक मुसलमान होते. काही इतर जमातीचे होते पण त्यांच्यावर विसंबून कारागृहाच्या मुख्य दारातून फंदफितुरी करून सटकणे धोक्याचेच होते, शिवाय जेलच्या अधिकाऱ्यांची घरे जेलच्या परिसराला लागूनच होती; त्यामुळे तेथेही शिपायांचा पहारा असे. पाहाणी करण्याचे काम जीवनराव बोधनकरांनी विशेषत्वाने केले कारण जेलच्या डॉक्टरच्या मुलीला शिकविण्याचे काम त्यांनी स्वीकारले होते त्या निमित्ताने त्याना बाहेर जावयास मिळत होते.

कारागृहाच्या भिंती किती तरी भक्कम आणि मजबूत होत्या. मागच्या भिंतीवर तीन ठिकाणी सशस्त्र शिपायांचा आहोरात्र पहारा होता. मध्यभागी सशस्त्र पोलिसांची चौकी होती. चारी कोपऱ्यांचे पहारेकरी अधूनमधून एकमेकाना साद देत असत. कारागृहाच्या दक्षिणेकडे एका खोलीत बरेचसे अडगळीचे सामान अस्ताव्यस्त खचाखच भरलेले होते. त्या खोलीच्या भिंतीवर श्री. खोत यांनी टिकावाने भगदाड पाडण्याचा प्रयत्न केला परंतु, हे भगदाड जेलरच्या घरासमोर निघाले असते म्हणून त्यांनी तो प्रयत्न सोडून दिला. जेलमधील एक दीर्घ शिक्षा भोगणारा वॉर्डन खोतांच्या ओळखीचा होता त्याच्याकडून त्यांनी टिकाव मिळविला होता. मागची भिंत, भिंतीला लागून असलेले सर्व वॉर्ड आणि वॉर्डांलगतचे संडास वगैरे सर्व श्री. जीवनराव

बोधनकर व श्री. श्रीनिवास खोत यांनी जातीने बारकाईने पाहिले. मध्यभागातल्या संडासाला तीन झरोके होते. झरोके तसे भयंकर मजबूतच होते. जाड लाकडाच्या चौकटीत जाड लोखंडी गज आरपार बसविलेले होते. शिवाय चौकटीच्या दर्शनी भागावर जाड लोखंडी जाळी जाड लोखंडी खिळ्यांनी घट्ट बसविलेली होती. तीच एक जागा कारागृहाबाहेर पडण्यासाठी सोयीची वाटत होती. त्या संडासाच्या छतावरच सशस्त्र पोलिसांचा पहारा होता. सोयीची जागा सापडल्याच्या आनंदात सशस्त्र पोलिसांचा पहारा नजरेआड पडला. ती जाड लोखंडी जाळी टिकावाने उपसून तोडून काढण्याच्या कामाला प्रारंभ झाला. तीन चार दिवसांच्या प्रयत्नांनी जाळी उचकटली गेली. पलीकडे असलेले लोखंडी गज कापण्यासाठी मात्र बाहेरून सामान मागविणे आवश्यक होते. सौ. आशाताई द्वारे श्री. लक्ष्मीनारायण यांना, आमच्या बरोबर जेलमध्ये असलेल्या त्यांच्या मेव्हण्याच्या भेटीच्या निमित्ताने बोलावले. जालन्याचे श्री. राधाकिशन लाला हे लक्ष्मीनारायणचे मेव्हणे होते. आमच्या कामासाठी लागणारे साहित्य लाला लक्ष्मीनारायण यानी कसे आणायचे व कसे स्वाधीन करायचे याबाबतची कल्पना श्री. राधाकिशन लाला यांनी लिहून काढली. लिहून काढलेली ती चिठ्ठी भेटीच्या वेळी प्रसंगावधान राखून मोठ्या शिताफीने श्री. लक्ष्मीनारायण यांना दिली.

आम्ही सुरू केलेला खटाटोप आम्हा चौघांशिवाय इतर कोणाला कळू नये, यासाठी आम्ही भरपूर खबरदारी घेत असू, तोडफोडीचा कारभार आम्ही मध्यरात्रीनंतर दररोज दोन तास जेमतेम करीत असू. श्री. जीवनराव हे संडासाच्या दाराशी पहारा देण्याचे काम करीत. मी त्यांच्या कामात आतून मदत करीत असे. कणखर लाकडी चौकटीला खालीवर भोक पाडून लोखंडी गज त्यात आरपार बसविलेले होते, त्यामुळे लोखंडी गज लाकडी चौकटीतून उपसून काढणे अशक्य होते. अर्धा इंच लोखंडी गज कापून काढण्याचे भयंकर जिकिरीचे तसेच फार अवघड काम होते. गज कापल्याशिवाय त्या झरोक्याद्वारे बाहेर पडता येऊ शकणार नव्हते. ते लोखंडी गज ॲसिडने खंगून टाकण्यासाठी व खंगलेले गज कापण्यासाठी डालडा तुपाच्या डब्यात ॲसिडची बाटली अन् करवतीच्या पात्या खाली ठेवून डबा पूर्ववत झाकून आणावयाची कामगिरी श्री. राधाकिशन लालांनी श्री. लक्ष्मीनारायणकडे सोपविली. श्री. लक्ष्मीनारायण व श्री. बाबूराव जाधव बेमालूम वेषांतर करून, डालडा तुपाचा डबा घेऊन भेटीसाठी आले. त्यांच्या समवेत सौ. वाघमारे होत्या. त्यांनी तो डाल्डाचा डबा माझ्या हातात देताना अत्यंत कळकळीच्या शब्दात सांगितले, 'शंकरभाई ह्या डब्यातले तूप आजाऱ्यासाठीच वापरावयाची काळजी घ्या'. ते सांगताना त्यांनी त्यांचे डोळे पुसावयालाही कमी केले नाही. आमच्या आजूबाजूच्या जेलच्या कर्मचाऱ्यांना व पोलिस शिपायांना तो डबा डालडा तुपाचाच डबा असेल असे, सौ. आशाताईनी त्यांच्या त्या नाटकी हावभावाने पटवून दिले. त्यामुळे तो डबा सरळ मला आत नेता आला. सायंकाळपर्यंत त्या डालडा तुपाबाबत बरेच चर्वण झाले. 'कोणी एकाने तूप मागितले. तुपाचा डबा आणवला गेला. उद्या कोणी लोणी मागेल. परवा आणखी काही हवे असे सांगितले जाईल' असे टोमणे एकामागून एक कानावर आदळत होते. जे काय कानावर पडत होते ते सर्व मुकाट्याने सहन करावे लागत होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करून तोडफोडीचे कामकाज व्यवस्थित पार पडले तर बाहेर कोणी जायचे याची एक अनौपचारिक यादी श्री. बिन्दाप्रशाद यांनी तयार केली होती. बाहेर पडणाऱ्यात श्री. नागोराव पाठक, श्रीनिवास खोत, बाबुराव काळे, लक्ष्मण पवार, बद्रीप्रसाद उपाध्याय, राम पाठक आणि माझा समावेश केलेला होता.

त्याच सुमारास जेलच्या अधिकाऱ्यांनी आडमुठेपणाचे धोरण स्वीकारून सत्याग्रहींना काहीही कारण नसताना मनमुराद त्रास द्यायला प्रारंभ केला होता. वेळोवेळी सत्याग्रहींत आणि अधिकाऱ्यांत खटके उडत

होते. सत्याग्रहींना भयभीत करण्यासाठी कारागृहाच्या आवारात एका सराईत गुन्हेगाराला किटकिटीमध्ये जखडून, पाण्यात भिजविलेल्या वेताने फटके मारण्याचा प्रकार अमलात आणला गेला. वेताच्या फटक्यामागून फटक्याने त्या कैद्याच्या शरीरातून रक्ताच्या चिळकांड्या उडू लागल्या. जमिनीवर रक्त सांडू लागले, सत्याग्रही घाबरले. 'वेडेवाकडे काही कराल तर तुमचीही अशीच गत केली जाईल' असे एकट्यादुकट्या ग्रामीण भागातून आलेल्या सत्याग्रहीला सांगितले जाऊ लागले, गर्भगळित करण्यात येऊ लागले. जेवणावरून अधूनमधून कॅम्प जेलच्या परिसरात तणाव निर्माण होत होता. जेवणावरून तणाव होऊ नये म्हणून मध्यवर्ती कारागृहातून ॲड. गौतम यांना कॅम्प जेलमध्ये पाठविण्यात आले. कारागृहाबाहेर पडावयाची खटपट केली जात असून जमल्यास त्यांनाही बाहेर पाठविले जाईल, असे श्री. बिन्दाप्रशाद यांनी ॲड. गौतम यांना दोन दिवसापूर्वीच सांगितले होते. अतिउत्साह आणि हाती घेतलेले काम लवकरात लवकर पार पाडावयाच्या धडपडीत अचानक ॲसिड वॉर्डच्या कोपऱ्यात सांडले. ॲसिडचा वास वॉडभर पसरला. जो तो, कशाचा वास आहे हेच विचारू लागला. ब्लिचिंग पावडरचा वास असल्याचे सांगून श्री. बिन्दाप्रशाद यांनी प्रसंगावधान राखून वेळ निभावून नेली. संडासाच्या झरोक्याचे दणकट लोखंडी गज कापावयाचे काम सुरू झाले. दररोज रात्री १ ते ३ पर्यंतच काम केले जाई. ती बहुतेक सर्वांच्या झोपेची वेळ असे.

याच सुमारास कारागृहाच्या नित्याच्या जेवणाने वैतागलेले सत्याग्रही टोळक्याटोळक्याने माफी मागून घरी जाण्याबाबत बोलू लागले. गोलटगावचे किसन पाटील हे त्यांच्या कुटुंबातील सहा मुलांसह कारागृहातच होते. श्री. किसन पाटील यांचे मोठे कुटुंब होते. कुटुंबियांपैकी कारागृहात असलेल्यांचा व गोलटगावात असलेल्या काहीजणांचा तोंडवळा एकमेकांशी मिळताजुळता होता. कारागृहात असलेल्यांपैकी चौघांनी घरी जायचे व भेटीसाठी आलेल्यांनी कारागृहात राहावयाचे अशी योजना त्यांनी मनोमन, कोणालाही न कळू देता आखली व प्रत्यक्ष अंमलातही आणली. बाहेरून आत कोण कोण आले आणि आतून कोण कोण बाहेर पडले हे इतर कोणाच्या लक्षातही आले नाही. ही बेमालूम अदलाबदल बिनबोभाट झाली. कारागृहातून गोलटगावला जाणाऱ्यांनी आठ दिवस गावात राहावयाचे व परत भेटीसाठी येताना एक बैलगाडीभर ऊस आणि पाच सहा डबे भरून काकवी बरोबर आणावयाची, असे ठरले. ठरल्याप्रमाणे आठ दिवसानंतर गोलटगावला गेलेली चार मुले, एक बैलगाडीभर ऊस व एका बैलगाडीत काकवी भरलेले सहा डबे घेऊन परत आले. शिरस्त्याप्रमाणे श्री. किसन पाटील गोलटगावकर कुटुंबियांची गाठभेट झाली. भेटीचा कार्यक्रम सुरू असताना त्या मुलांपैकी कोण कोण बाहेरून आले ते लक्षातही आले नाही. सर्वजण थोडा वेळ एकत्र बसून एकमेकांशी बोलले. आतून बाहेर पडणारी चार मुले 'आम्ही आमच्या नातलगांसाठी ऊस व काकवी आणली आहे तेवढी त्यांना देऊ द्या' असे सारखे सांगत होती; मात्र तिकडे कोणीच लक्ष दिले नाही. काही केल्या ऊस व काकवी कारागृहात नेण्यासाठी अधिकारी तयार होत नव्हते. बाचाबाची झाली. अधिकारी हमरीतुमरीवर आले. 'आमच्यासाठी आणलेल्या वस्तू आम्हाला मिळाल्याच पाहिजेत, त्या आम्ही आत नेऊ' या त्यांच्या म्हणण्यास कारागृहाचे अधिकारी होकार द्यायला तयार नव्हते.श्री.गुलाबचंद काका यांनी मध्यस्थी करावी म्हणून श्री. किसन पाटील यांनी त्यांना विनंती केली. मध्यस्थी करावयास श्री. गुलाबचंद यांनी साफ नकार दिला. हो ना चा तो घोळ दोन तास चालला. मनाचा हिय्या करून मी व बिन्दाप्रशाद यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. 'आलेला ऊस व काकवी आम्ही आमच्या हाताने सर्वांना वाटू' असे आश्वासन देऊन आम्ही ऊस व काकवी आत घेतली व त्याचे वाटपही केले. मात्र आम्ही जे केले ते चांगले केले नाही असे काहीजणांनी सांगितले व आम्ही देऊ केलेला ऊस

व काकवी घेतली नाही. आम्हीही त्याची दखल घेतली नाही. श्री. किसन पाटील गोलटगावकर यांनी उत्तम प्रकारे राबविलेल्या अदलाबदलीच्या कार्यक्रमाने मी मात्र भारावून गेलो.

दसऱ्याचा सण जवळ आलेला होता. या सणाच्या दिवशी सर्वांना गोड पक्वान्नांचे जेवण मिळावे अशी आम्ही काही जणांनी मागणी सुरू केली. 'गोड जेवण नियमांत बसत नाही' म्हणून अधिकाऱ्यांनी अंग झटकले. आमच्या सत्याग्रहींपैकीही काहीजणांनी आमची टिंगल केली. 'आम्ही आमच्या खर्चाने बाहेरून सामान मागवितो; आम्हाला दसऱ्याच्या दिवशी वेगळा स्वयंपाक करू द्या.' अशी आम्ही नंतर मागणी केली. बऱ्याच खटपटीनंतर, वेगळा स्वयंपाक करण्याची व साहित्य बाहेरून मागविण्याची परवानगी मिळाली. आम्ही केलेल्या प्रयत्नांची चार दोन ज्येष्ठ सत्याग्रहींनी निर्भर्त्सना केली व आम्ही करणार असलेले वेगळे जेवणाचे पदार्थ ते खाणार नाहीत; असे त्या मंडळींनी सांगितले.

मी आमच्यावतीने जेलमधून श्री. शंभूदयाल शर्मा यांच्या बरोबर टेलिफोनवर दसऱ्याच्या सणानिमित्त कारागृहात गोड जेवण करण्याबाबत सविस्तर बोललो. माझे बोलणे ऐकले तेव्हा एका क्षणाचाही विलंब न लावता जेवण करण्यासाठी लागणारे आवश्यक ते सामान त्वरित पाठविण्याचे त्यांनी आश्वासन दिले. श्री. शंभूदयाल शर्मा यांनी श्री. बजरंगलाल टिबडीवाला व इतर व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन, अदमासें अडीच हजार सत्याग्रहींना एक वेळच्या जेवणासाठी पुरे पडेल इतके सामान भाजीपाल्यासह पाठविले. आधी ठरल्याप्रमाणे वेगळा स्वयंपाकही केला गेला; मात्र चार दोघांनी ते जेवण घेतले नाही.

विजयादशमीच्या रात्री त्या झरोक्याचे गज कापण्याचे काम आमच्या बरेच आटोक्यात आले. ॲसिडचा मात्र अपेक्षित उपयोग होऊ शकला नाही. करवतीच्या पात्यांनीच मोठ्या कष्टाने ते काम करण्यात आले. आता कारागृहातून बाहेर पडल्यावर तेथून सहीसलामत व वेगाने दूरच्या सरहद्दीबाहेर पडण्यासाठी मोटार मिळविण्याचे काम श्री. लक्ष्मीनारायण लालाकडे देण्याचा आम्ही विचार केला आणि त्यांना तसे सांगताच, ती जबाबदारी त्यांनी चटकन् स्वीकारलीही. प्रवासासाठी आवश्यक तेवढे पैसे, काचेची व मिरचीची भुकटी, अत्यंत सावधगिरीने आम्हाला मिळाली होती व आम्ही ती जतन करून ठेवलीही होती. गज कापायचे काम पार पडले. आता त्या झरोक्याच्या फटीतून प्रत्येकाने कसे बाहेर पडायचे याबाबत आम्ही आपसात बोलणीही केली. लाकडाच्या चौकटीतून उपसून काढलेले लोखंडी गज जसेच्या तसे परत बसविले. जाळीही जशीच्या तशी सहज कोणाच्या डोळ्यात भरणार नाही अशी बसविली. कायम ठेवलेल्या दोन लोखंडी गजांना, खादीच्या धोतराला पीळ देऊन ते दोरीसारखे बांधले. त्या आधाराने प्रत्येकाला झरोक्यातून खाली उडी घ्यायची आहे; भिंतीला लागून काटेरी झुडूपे आहेत; तेथून हरसूल गावाच्या नदीकाठावर उभ्या असलेल्या मोटारीपर्यंत लपत छपत जायचे आहे; असे सर्व संबंधितांना व्यवस्थित पढविण्यात आले.

२४ डिसेंबरच्या रात्री औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहातून आम्ही बाहेर पडणार होतो. जेल फोडून पळणार होतो. त्या दिवशी सायंकाळी पाच वाजता कारागृहाच्या दाराजवळ श्री. बिंदाप्रशाद व लक्ष्मीनारायण लाला यांची भेट झाली. 'रात्री अडीचच्या सुमारास हरसूलच्या मंदिराजवळील नदीच्या टेकडीवर मोटार येईल. दोन वेळा मोटारीचा कर्णा वाजविला जाईल;' असे श्री. लक्ष्मीनारायण लाला यांनी श्री. बिंदाप्रशाद यांना सांगितले.

अनुक्रमणिका

रात्री अकराच्या सुमारास श्री. बिंदाप्रशाद यांनी एकामागून एक नऊ जणांच्या गाठी भेटी घेतल्या. प्रवासासाठी मिळविलेले पैसे सुरक्षिततेसाठी  मिळविलेली काचेची पूड व मिरच्यांची भुकटी श्री. नागोराव पाठक यांनी स्वतः घेतली. ठरल्याप्रमाणे श्री. जीवनराव बोधनकर यांनी त्या संडासासमोर पहारेकऱ्यांचे काम पार पाडण्याची जबाबदारी स्वीकारली.

औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह  फोडण्याच्या व तेथून ९ जणांना पळवून लावण्याच्या कार्यात, जालन्याचे श्री. राधाकिशन लाला, श्री. ब्रद्रीनारायण बारवाले व माणिकचंद कटारिया या सत्याग्रहींचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले.

पौर्णिमेची रात्र होती. टिपूर चांदणे पडलेले होते. मध्यरात्रीनंतर हवेतला गारवा जाणवत होता. रातकिड्यांच्या आवाजाशिवाय सर्वत्र शांतता होती; सामसूम होती. श्री. बिंदाप्रशाद यांच्या समक्ष ठरल्याप्रमाणे झरोक्याच्या दोन लोखंडी गजाला बांधलेल्या खादीच्या धोतराच्या पीळदार दोराच्या साहाय्याने श्री. खोत हे झरोक्यातून बाहेर पडले. त्यांच्या पाठोपाठ नाशिककर व पवार हेही बाहेर पडले. तेवढ्यात जालन्याचे मांगीलाल दायमा म्हणाले, 'मलाही घेऊन चला. नाही तर मी आरडाओरड करून पोलिसाना सांगतो'. श्री. राधाकिशन लाला व ब्रद्रीनारायण बारवाले यांना मांगीलाल दायमाचा चांगलाच वाईट अनुभव होता; तसेच ते महाभाग पोलिसांचे हस्तक म्हणूनही काम करीत असत. प्राप्त परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्या दोघांनी मांगीलाल यांच्याच धोतराचा सोगा त्यांच्या तोंडावर घट्ट दाबला. मांगीलालला घट्ट आवळून धरले. तोच स्थानबद्धांच्या वार्डातले एक वकील परसाकडे लागली असे सांगून चंबू हाती धरून संडासात शिरणार होते पण श्री. जीवनराव बोधनकर यांनी त्यांचा हात आपल्या दोन्ही हाताने घट्ट धरला व ओढीतच श्री. मुकुंदराव पेडगांवकर याच्यासमोर त्यांना उभे केले. श्री. मुकुंदराव पेडगांवकरांनी त्या महाभागाला शेलक्या शब्दात चांगलेच खडसावले. 'काही लोक स्वतःचे प्राण पणाला लावून बाहेर पडावयासाठी प्रयत्न करीत आहेत, अन् तुम्ही उलट्या काळजाचे त्यांच्या आड येता? चला जा आपल्या जागी,' श्री. मुकुंदराव पेडगांवकर त्वेषाने बोलत होते. मध्यंतरी नागोराव पाठक दोराला धरून उतरू लागले. पण ते खाली पडले. त्यांना मार लागला. तसेच ते गाडीपर्यंत पोहोचले. या अनपेक्षित घटनेने आम्हाला पाच सात मिनिटे उशीर झाला. मोटारीचा भोंगा वाजला होता. राम पाठक, बद्रीप्रसाद, बाबूराव काळे, ॲड. गौतम आणि त्यांच्या पाठोपाठ मी झरोक्याबाहेर उड्या घेतल्या. काटे प्रत्येकाच्या पायात खुडले असतानाही एकामागून एक, लपत छपत हरसूलच्या देवीच्या मंदिराजवळच्या नदीच्या टेकडीवर पोहोचलो. तेव्हा तेथे मोटार नव्हती. आम्हाला अकल्पित उशीर झाला. प्रत्येक क्षण मोलाचा अन् महत्त्वाचा होता. शिवाय अधिक वेळ तेथे थांबणे धोकादायक होते. आता आणखी कोणीच येत नाही, येणार नाही असे समजून पहिली तुकडी मोटारीसह निघून गेली होती.

मोटार आम्हाला आमच्या नशीबाच्या हवाल्यावर सोडून गेली होती. पायात काटे मोडल्याने भयंकर वेदना होत होत्या. पाच मिनिटांपूर्वी सर्वांगात संचारलेली अपूर्व शक्ती क्षणार्धात नाहीशी झाल्यासारखे वाटत होते. शरीराची गात्रे एकामागून एक थंडगार पडत आहेत असे वाटू लागले होते. निराशेने सर्वांना हतबल करण्यापूर्वी तेथून चालू लागणे आवश्यक होते. ॲड. गौतम बरेच हताश बनले होते. न कळत ते बोलून गेले, 'भैय्या, अब क्या होगा?' 'घबराईये नही.' 'चला माझ्या मागोमाग भरभर. चला. क्षणभरही येथे थांबू नका.' मी धीर दिला. मी पुढे झालो. माझ्या मागे ते सर्वजण चालू लागले. प्रथम आम्ही हरसूलच्या देवीच्या मंदिरात

अनुक्रमणिका

गेलो, मनोभावाने देवीची  प्रार्थना केली. देवीला साकडे घातले अन् चटकन् मंदिराबाहेर पडलो. नदीच्या काठाकाठाने जात जात जवळच्या शेतात शिरलो. ज्वारीची ताटे डोक्याइतकी वाढलेली होती. ज्वारीच्या रखवालदाराने हटकले तोच आम्ही म्हणालो, 'रास्तेवाले' ज्वारीच्या उभ्या पिकातून पाऊलवाटेने जात जात आम्ही आडमार्गाला लागणार अशी भीती वाटत होती. कडाक्याची झोंबरी थंडी पडलेली होती तरी आम्हा सर्वांच्या अंगाला दरदरून घाम सुटला होता. क्षणभराच्या विश्रांतीनंतर आम्ही झपाझप पावले टाकू लागलो. एकामागून एक पाऊलवाट ओलांडीत आम्ही बोरबनातून आमखास मैदानाच्या-आजचे शिवाजी मैदान-टेकडीच्या मागच्या पायथ्याशी पोहोचलो. पाच मिनिटाच्या विश्रांतीनंतर टेकडीच्या ओबडधोबड पायऱ्या चढून टेकडीवर आलो. आमखास मैदानाचा साराचा सारा भाग निर्वासितांच्या तांड्यांनी खचाखच भरला होता. पाऊलवाट देखील दिसत नव्हती. तेथून जाणे धोकादायक होते. लागलीच आम्ही आमचा मार्ग बदलला. पुन्हा बोरबनात शिरलो. खाम नदीच्या काठाकाठाने चालत चालत मुकबऱ्याजवळ आलो. तोच बेगमपुरा विभागातील थत्ते यांच्या हौदासमोरची पोलिस चौकी आठवली. लागलीच आम्ही आमचा मार्ग बदलला. खाम नदीच्या काठाकाठाने काटेरी झाडेझुडपे ओलांडीत पानचक्कीजवळ आलो. तेथेही निर्वासितांच्या राहुट्या उभ्या होत्या, तेथून चटकन काढता पाय घेतला अन् पानचक्कीच्या बऱ्याच लांबून लष्कर विभागात गेलो. श्री. पन्नालाल दरख यांच्या दारांची जोरजोराने कडी वाजविली. त्यावेळी घरात श्री. पन्नालालजी नव्हते, शिवाय कोणीही पुरुष नव्हता. श्री. पन्नालालजींच्या म्हाताऱ्या आईने दाराची कडी काढली. दार उघडताच माझी वाढलेली दाढी, त्यात माझा विचित्र पेहराव पाहून म्हातारी ओरडली, 'हाय भगवान, निर्वासित' आणि तिने चटकन आतून दार बंद केले. श्री. पन्नालालजी दरख यांची भेट झाली तर ते सहज मोटारीची व्यवस्था करू शकतील, असे मला मनोमन वाटत होते; म्हणूनच मी त्यांच्या घरी गेलो होतो. पन्नास पावलांवर पोलिस चौकी होती, म्हणून तेथून लवकरात लवकर सटकणे अगत्याचे होते. दर्जी बाजार, तोफखाना बाजार ओलांडून आम्ही आडमार्गाने लोखंडी पूल गाठला. मुख्य रस्ता सोडून पाऊलवाट धरली. कर्णपुरा विभागातील उभ्या ज्वारीच्या शेतातून, कर्णपुरा देवीच्या मंदिराजवळ पोहोचलो. देवीच्या दाराशी दहा मिनिटे विश्रांती घेतली, देवीचे दार बंद होते. बाहेरूनच मनोभावाने देवीची प्रार्थना केली. मंदिराजवळील शेताशेतातून चालत चालत आजच्या शासकीय प्रेसजवळून औरंगाबाद रेल्वे स्टेशनच्या त्या काळी असलेल्या पत्र्याच्या संडासाच्याजवळ थांबलो. आमच्या सर्वांच्या पायाचे तळवे चांगलेच दुखत होते. पायात आता अधिक चालण्याइतका त्राण उरला नव्हता. आम्ही सारे एकाच दमात जमिनीवर बसलो. रेल्वेस्टेशनबाहेर सर्वत्र शुकशुकाट होता. प्रवाशांची ये जा सुरू झालेली नव्हती. दोन म्हातारे तांगेवाले त्यांच्या तांग्यांचा आडोसा घेऊन वाळलेले गवत, कचरा, रद्दीकागद, वाळलेल्या झुडुपांच्या काड्या पेटवून अंगात ऊब भरण्याची धडपड करीत होते.

पाच वाजल्याचे ठोके कानावर आदळले. ॲड. गौतम व राम पाठक तांगेवाल्याजवळ गेले. जेमतेम पेटलेल्या शेकोटीने त्यांच्या अंगात थोडीफार ऊब भरली. मी एकटाच विचारात गुरफटलेला होतो. आमच्या जवळ एक पैसाही नव्हता. पैशाशिवाय प्रवास कसा होईल? हाच विचार माझ्या डोक्यात सारखा घिरट्या घालीत होता. दहा मिनिटानंतर हैदराबाद राज्याचे बडे मंत्री सकाळच्या गाडीने येणार असल्याची खबर समजली. ती खबर एकताच माझे सर्वांग थरथरून गेले. आता औरंगाबाद ते मनमाड प्रवास सकाळच्या गाडीने करणे अत्यंत धोकादायक वाटू लागले. पुन्हा निरनिराळ्या विचारानी मी घेरला गेलो. तेवढ्यात एकामागून एक पोलिस शिपाई भरलेल्या चार लॉऱ्या धडकल्या, त्यांच्या मागे पोलिस बँडची लॉरीही आली. रेल्वे स्टेशनबाहेरचे मैदान पोलिसांनी व्यापले जात होते. संडास जवळून मी ते पहात होतो. आता काय करावे अन् काय करू नये हे

अनुक्रमणिका

माझे मलाच समजेनासे झाले होते. इतक्यात मनमाडहून पूर्णाकडे जाणारी गाडी येणार असल्याची घंटा वाजली. क्षणाचाही विलंब न लावता मी माझ्या सहकाऱ्यांसमवेत संडासाच्या बाजूने स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर गेलो. त्यावेळी आमच्या जवळपास कोणीही नाही असे पाहून मी माझ्या सहकारी दोस्तांना सांगितले, 'गाडी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उभी राहाताच सर्वांनी वेगवेगळ्या डब्यात शिरायचे. पुढच्या स्टेशनवर गाडी थांबेल तेव्हा आपण परत भेटू, बोलू.' गाडी प्रवाशांनी खचाखच भरलेली होती. माझे दोस्त डब्यात शिरल्याचे पाहून मी शिरावयाचा प्रयत्न करू लागलो. गाडीचे दार कोणीही उघडत नाही असे दिसताच मी खिडकीतून डब्यात शिरलो. दाराशी एक व्यक्ती बेडींग पसरून झोपलेली होती. माझ्या न कळत गडबडीत माझा पाय तिच्या पायाला लागला. प्रथम त्या व्यक्तीने चवताळून शेलक्या शिव्या हासडल्या, तोपर्यंत गाडीने पहिले सिग्नल ओलांडले होते. बेडिंगवर झोपलेल्या व्यक्तीचे तोंड जाड ब्लँकेटने झाकलेले होते. कुशी बदलताना तोंडावरचे ब्लँकेट खाली ओढले गेले. मी त्या व्यक्तीच्या पायाशी कसाबसा अंग चोरून उभा होतो. अंधुक प्रकाशात मला चेहरा दिसला. तो चेहरा ओळखीचा असल्यासारखे वाटले. त्या व्यक्तीसही माझा चेहरा ओळखीचा वाटला असावा. त्या व्यक्तीने डोळे चोळीत चोळीत माझ्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले. एकमेकांशी ओळख पटल्यासारखे वाटले म्हणून त्या व्यक्तीने हाताच्या बोटाने 'मी इकडे कसा?' असे विचारले असावे असा मी कयास केला. मी माझ्या ओठावर बोट ठेवले अन् आणखी काही विचारू नये असे सुचविले. त्या व्यक्तीने आपले पसरलेले पाय आखडून घेतले. माझ्या अनुमानाप्रमाणे ती व्यक्ती पाहाण्यातली निघाली. ते नांदेडचे बाहेती होते. ते त्यांच्या भावाच्या भेटीसाठी चारपाच वेळा जेलमध्ये आले होते. त्यांनी मला त्यांच्या बेडिंगवर बसावयासाठी जागा करून दिली. मी हळूच त्यांना विचारले, 'भैय्या, तुमच्या खिशात पन्नास रुपये आहेत का?' जराही संकोच न करता त्यांनी दहादहाच्या तीन नोटा माझ्या हातात दिल्या. माझ्या पाठीवर थाप मारून त्यांनी मला जणू शाबासकीच दिली. मी जेलमधून सटकलो असे त्यानी विचित्र पेहरावावरून कदाचित ताडले असावे. तेवढ्या अवधीत चिकलठाणा रेल्वे स्टेशन आले. मी लगेच गाडीतून खाली उतरलो. ठरल्याप्रमाणे आम्ही चहाच्या दुकानाजवळ एकमेकांना भेटलो. त्या तीस रुपयापैकी वीस रुपये ॲड. गौतमला दिले. त्यांनी गाडीची शिटी होत असताना धावतपळत गार्डजवळ जायचे. गडबडीत आम्हाला तिकीट काढता आले नाही; आम्हाला जालन्याला जायचे आहे असे म्हणून तिकिटासाठी वीस रुपये गार्डला द्यायचे असे सांगून टाकले. त्याप्रमाणे ॲड. गौतम यानी गार्डला सांगितले व त्यांच्या जवळ तिकिटासाठी वीस रुपये दिले. 'जा.गाडीत चढा. जालना स्टेशनवर भेटा' असे गार्डने गौतमला सांगितले. गाडी सुरू झाली. गाडीने वेगही धरला. मला बराच धीर आला.

जालना रेल्वे स्टेशनचे पहिले सिग्नल गाडीने ओलांडताच मी श्री. बाहेतीचे आभार मानले. जालना स्टेशनवर उतरलो. गार्डला भेटून तिकिट घेण्याचे व उरलेले पैसे परत घेण्याचे मी टाळले. सहकारी मित्रांसमवेत गुडस् विभागाकडे झपझप चालत गेलो आणि तेथून रेल्वे स्टेशनच्या आवाराबाहेर पडलो. श्री. माणिकचंद पहाडे समवेत मी तीन चार वेळा श्री. मदनलालजी चौबिशियांकडे गेलो होतो. तो आधार धरून मी श्री. मदनलालजींच्या घरी जाण्याचे मनाशी ठरविले. श्री. मदनलालजींचे घर नेमके कोठे आहे हे मला माहीत नव्हते. मी श्री. मदनलालजी यांच्या घराचा पत्ता व्यवस्थित सांगू शकत नसल्याने तांगेवाले मला त्यांच्या तांग्यात बसवत नव्हते. एकामागून एक तांगा स्टेशनच्या आवारा बाहेर पडत होता. आता तीन चार तांगेच उभे होते. अचानक औरंगाबादचे श्री. लालाचंद मालानी मला तांग्यात दिसले. लगबगीने मी त्यांच्याजवळ गेलो आणि मदनलालजींचा नेमका पत्ता व त्यांच्या घराच्या खुणा विचारल्या. मला जवळ उभा पाहून त्यांची

घाबरगुंडी उडाली असावी असे मला वाटू लागले. त्यांनी त्यांच्या धांदरट स्वभावाप्रमाणे श्री. मदनलाल यांचा पत्ता व्यवस्थित न सांगता, 'मारवाडी गल्लीत लवकरात लवकर जा. येथे थांबू नका' असेच काहीतरी भरभर सांगून टाकले व ते एकटे एका तांग्यात बसून गेले. बाकीचे तांगे तोपर्यंत प्रवाशांना घेऊन निघून गेले होते. आम्ही पायपीट करीत करोडगिरी नाक्यापासून बरेच दूर चालत गेलो. समोरून एक रिकामा तांगा आला. तो तांगा आम्ही थांबविला. मारवाडी गल्लीत, त्या तांगेवाल्याने त्याचा तांगा नेमका श्री. मदनलालजी यांच्याच घरासमोर उभा केला. 'मारवाडी गल्ली यही है क्या? गौतमने तांगेवाल्याला विचारले. 'जी हाँ, यही मारवाडी गल्ली है।' तांगेवाल्याने लगेच उत्तर दिले. मी तांगेवाल्याच्या हातात दहाची नोट दिली. त्याने दोन रुपये परत केले.

घरासमोरच्या दर्शनी भागात एक व्यक्ती तोंडासमोर वृत्तपत्र धरून ते वाचत गादीवर बसलेली होती. 'भाऊसाहेब मदनलालजी इथंच राहातात का?' असे मी काकुळतीने विचारले, उत्तर मिळाले नाही. पुन्हा अत्यंत हळूवारपणे विचारले. प्रतिसाद मिळाला नाही. तोंडासमोरचे वृत्तपत्र जेथल्या तेथे होते. मी श्री. मदनलालजींना तीन चार वेळा बघितलेले होते. त्यांचा चेहरा माझ्या डोळ्यात भरलेला होता. वृत्तपत्र तोंडासमोर धरून गादीवर बसलेल्या व्यक्तीच्या पाठीमागच्या भिंतीवर श्री. मदनलालजींचे एक छायाचित्र लावलेले होते. ते छायाचित्र लक्षात येताच आम्ही श्री. मदनलालजींच्या घरात आलो आहोत असे मला वाटले. मनाला दिलासा मिळाला. समाधान वाटले.

'भाऊसाहेब मदनलालजी घरात आहेत का?' मी पुन्हा नम्रपणे विचारले.

'घरात नाहीत.' इतक्या तोकड्या दोन शब्दांत उत्तर मिळाले.

'केव्हा येणार आहेत?' अत्यंत हळुवारपणे मी विचारले.

'माहीत नाही.' पुन्हा केवळ दोन शब्दांत उत्तर कानावर पडले.

तेवढ्यात वारे जोराने वाहू लागले. त्या व्यक्तीने तोंडासमोर धरलेली वृत्तपत्राची पाने उलटली, तेव्हा वृत्त वाचणारी व्यक्ती श्री. मदनलालजीच असल्याची ओळख पटली. छायाचित्रातली व्यक्ती व गादीवर वाचणारी व्यक्ती श्री. मदनलालजीच आहेत असे मी ताडले. मी लगेच मनाचा हिय्या करून बैठकीत गेलो अन् श्री. मदनलालजींचा हात धरला आणि म्हणालो.

'भाऊसाहेब मी शंकरलाल पटेल आहे. मी निर्वासित नाही.'

आ वासून ते क्षणभर माझा चेहरा बारकाईने पाहातच राहिले. लगेच त्यांनी मला जवळ ओढून कवटाळले. आम्हा दोघांच्या डोळ्यातून आनंदाश्रूंच्या धारा वाहू लागल्या. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी मला त्यांच्या माजघरात जवळ जवळ ओढीतच नेले आणि म्हटले, 'देखोजी यह अपने माणिकचंद जी के दोस्त हैं। औरंगाबाद की जेल तोडकर आपने घर पधारे है।' श्री. मदनलालजींच्या पत्नी, 'परमात्मा आपका रक्षण करे'

असे कसेतरी बोलू शकल्या. त्यांच्याही डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या; तरी त्यांनी स्वतःला सावरून घेतले आणि मला तोंड हातपाय धुण्यासाठी गरम पाणी दिले.

'भाऊसाहेब, माझ्यासोबत आणखी सहकारी आहेत. ते तिघे घराबाहेरच उभे आहेत.' असे मी सांगताच श्री. मदनलालजींनी त्यांना स्वतः माजघरात आणले. आम्ही सर्वांनी हात, पाय, तोंड धुतले; तेव्हा रात्रीच्या प्रवासाचा अन् दगदगीने आलेला शीण थोडा कमी झाल्यासारखे वाटले. चहा, फराळ झाला. आमच्या विश्रांतीसाठी घरची गडीमाणसे व्यवस्था करू लागली. इतक्यात श्री. मदनलालजींच्या अगदी विश्वासातला एक माणूस आला व औरंगाबादचे जेल तोडून काही लोक पळाल्याची खळबळजनक बातमी जालन्याच्या पोलिसांना कळाली असल्याचे त्याने सांगितले. आता आमच्या केवळ विश्रांतीसाठीही त्यांचे घर सुरक्षित राहिले नाही असे त्यांनी सांगितले. जमेल तेवढ्या लवकर आम्ही घरातून बाहेर पडावे व जालना देऊळगाव राजा मार्गावर असलेल्या त्यांच्या मळ्यात जावे असे श्री. मदनलालजींनी सांगितले आणि तेथून देऊळगाव राजाला जाण्यासाठी मोटार, पायात घालण्यासाठी रबरी कापडाचे बूट, आवश्यक तेवढे पैसे व फराळाचे सामान, बारा वाजेपर्यंत त्यांच्या मुनीमजीसमवेत पाठविण्याचे आश्वासन दिले. लगेच आम्ही त्यांच्या घराबाहेर पडलो अन् त्यांनी दिलेल्या वाटाड्याच्या मागोमाग एका मागून एक चालू लागलो. तळपायांत काटे मोडलेले होते, फोड आलेले होते. आमचे पाय जमिनीवर टेकवत नव्हते, तरी नाईलाजास्तव पायी चालत श्री. मदनलालजींच्या मळ्यात गेलो. मळ्यातल्या घरात गेल्यावर समोर जे दिसेल ते घेतले अन् आम्ही लंवडलो. पाच मिनिटांत आम्ही गाढ झोपी गेलो असू. आम्हाला जाग आली तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. मुनीम येणार होते ते अजून आले नव्हते. आम्हा सर्वांना सपाटून भूक लागली होती. विहिरीवर गेलो अन् पोटभर पाणी प्यालो. लक्ष्मण पवार व राम पाठक यांनी विहिरीलगत असलेल्या खारकी बोरांच्या झाडावरची कच्ची बोरे आणि पेरूच्या झाडांवरील कच्चे पेरू काढून माकडासारखे भराभर खाल्ले. पुन्हा पाणी प्याले. मी व ॲड. गौतम मुनीमजींची मार्गप्रतीक्षा करीत गोणपाटावर आडवे पडलो होतो. इतर सहकारीही घरात आले आणि तेही आडवे झाले. आम्ही सर्वजण झोपलो. चार वाजण्याच्या सुमारास जाग आली. मुनीमजी आलेले नव्हते. आम्हा सर्वांना थंडी वाजल्यासारखे वाटू लागले. राम पाठक आणि ॲड. गौतम यांना सडकून ताप आला होता. माझ्याही अंगात ताप भरत असल्याचे वाटत होते. तळपायाची आग होत होती. असंख्य वेदना सर्वांनाच होत होत्या. आम्ही मुनीमजीची वाट पाहून पाहून थकलो. आता मुनीमजी येणारच नाहीत असे आम्हाला वाटू लागले. पाच वाजण्याच्या सुमारास हातात एक लहान पिशवी घेऊन मुनीमजी आले. 'मोटारीची व्यवस्था होऊ शकली नाही. जालना शहरात तुमची शोधशोध करीत पोलिस फिरत आहेत. तुमच्यासाठी फराळाचे सामान मी सोबत आणले आहे. हे सामान्य घ्या आणि लवकरात लवकर या मळ्याबाहेर पडा' मुनीमजीने एका दमात सर्व सांगून टाकले.

'पायांत घालण्यासाठी कापडी बुटांचे काय झाले?' मी मुनीमजींना विचारले. 'मिळू शकले नाहीत.' 'आणि पैसे?' 'माझ्याजवळ दिले नाहीत' मुनीमजीने ते वाक्य उच्चारताच फराळाची थैली त्या घरातच सोडून आम्ही मनाचा हिय्या व दृढनिश्चय करून चटकन घराबाहेर पडलो अन् चालू लागलो. रस्त्यावर सामसूम होती. आम्ही थोडा वेळ थांबलो. रस्त्यावर चालताना आम्ही एकमेकांत पंधरावीस पावलांचे अंतर ठेवून चालायचे निश्चित केले. सर्वांच्या पुढे मी चालायचे व प्रसंग पडल्यास आमचा एकमेकांबरोबर काहीही संबंध नाही अशीच बतावणी करावयाची असे ठरवून आम्ही हळूहळू जालना शहराच्या दिशेने चालू लागलो. सुमारे साडेसहा वाजता आम्ही सराफ बाजारात आलो. डॉ. डिक्कर यांच्या दवाखान्याजवळ आलो. त्यावेळी माझ्या शरीरात

सडकून ताप भरला होता. अन्य सोबत्यांच्या अंगातही ताप भरलेलाच होता. माझ्या उजव्या हाताचे मधले बोट चांगलेच सुजलेले होते. भयंकर वेदना होत होत्या. औषधौपचाराच्या निमित्ताने प्रथम मी जिन्याच्या पायऱ्या चढून दवाखान्यात गेलो. त्यावेळी रोग्यांची गर्दी होती. त्यांतले बहुतेक निर्वासित असल्यासारखे दिसत होते. डॉ. डिक्करानी बहुतेक रोग्यांची तपासणी संपवली होती. रोगी म्हणून माझी पाळी आली तेव्हा डॉ. डिक्कर चवताळून म्हणाले, 'सरकारी अस्पतालमें क्यूं नही गये? आपको क्या होता है?' 'मेरे इस उंगली मे बहोत दर्द हो रहा है' मेहरबानी फर्माकर पट्टी बांधिए। बदनमे बुखार भी भरा है। हो सके तो इंजेक्शन दीजिये।' मी मोठ्या मिन्नतवारीने डॉ. डिक्कर यांना सांगितले. माझ्या बोटाला पट्टी बांधण्यासाठी, कम्पाऊंडरद्वारे मला मधल्या खोलीत बोलावले. माझ्या बोटाची तपासणी करताना डॉ. डिक्कर यांनी माझा उजवा हात आपल्या डाव्या हाताने उचलून धरला. 'आपके बदनमे काफी बुखार भी है। आप सरकारी अस्पताल में जाईए।' ते म्हणाले. इतके सर्व सांगेपर्यंत डॉ. डिक्कर मला निर्वासितच समजले होते. डॉ. डिक्कर, त्यांचा कम्पांऊंडर आणि मी इतकेच त्या खोलीत होतो. मी त्यांना झटकन म्हणालो, 'डॉक्टर, मी शंकरलाल पटेल आहे; निर्वासित नाही' तुम्ही मला अद्याप ओळखू शकला नाही. मला आता कोणाची, कशाची भिती वाटत नाही.' 'माफ करा शंकरलाल, मी तुम्हाला निर्वासितच समजलो.' डॉ. डिक्कर बोलले, तेव्हा त्यांना ओशाळल्यासारखे वाटत होते ते त्यांच्या चेहऱ्यावरून मला दिसून आले.

'डॉक्टर, वेळ थोडा आहे, अद्याप बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. कृपा करून शेजारच्या सेन्ट्रल बँकेतून गोपाळदास मेहतांना निरोप करा व तातडीने बोलवा.'

डॉ. डिक्करानी खालचे दार बंद करण्यासाठी कम्पाऊंडरला सांगितले. खालचे दार बंद केल्यावर डॉक्टरांनी श्री. गोपाळदास मेहतांना दवाखान्यातच बोलविले. लगेच श्री. गोपाळदास मेहता आले. मला पहाताच त्याना रडू कोसळले; ते त्यांच्या रडक्या सुरातच म्हणाले, 'अरे तू तुझ्या वडिलांचा एकुलता एक आहेस', असे सांगता सांगताच लहान मुलासारखे ओक्साबोक्शी रडू लागले. मलाही गहिवरून आले होते. प्रसंगावधान राखून चटकन मी स्वतःला सावरून घेतले. 'गोपाळदास, माझी हिम्मत खचेल असे काही अधिक बोलू नकोस. मला वाटेल ते करून ही गाडी गाठावयाची आहे. तू मला तुझ्या अंगातील कोट, पँट काढून दे. जुने पुराणे ब्लँकेट, घोंगड्या आणि प्रवासासाठी पन्नास रुपये हवे आहेत.'

माझ्या विनंतीप्रमाणे श्री. गोपाळदास मेहताने त्याच्या अंगातला कोट व पँट काढून दिली. कम्पाऊंडरला पिटाळून चार जुने ब्लँकेट मागविले आणि डॉक्टरकडून पन्नास रुपये घेऊन मला दिले. तोपर्यंत डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे कम्पाऊंडरने आम्हाला ताप व थंडीसाठी इन्जेक्शन व औषध देऊन झाले होते. ब्लँकेट व पैशाची विभागणी मी दवाखान्यातंच केली. दोघांचा निरोप व आशीर्वाद घेऊन मी माझ्या सहकारी मित्रांसमवेत दवाखाना सोडला; तेव्हा पाणावलेल्या डोळ्याने गोपाळदास मेहता म्हणाले होते 'श्री नाथजी तुमचे रक्षण करो.' दोन वेगवेगळ्या टांग्यातून आम्ही जालना रेल्वे स्टेशनवर आलो. चटकन ॲड. गौतम तिकिटे घेऊन आला. बरोबर ब्रेड चिवडाही आणला होता. देखाव्यासाठी आम्ही एकमेकांपासून दूर झालो. आधी ठरविल्याप्रमाणे माझ्याशिवाय इतरांनी डब्यातील बाकड्याखालची जागा मिळविली व ब्लँकेटने सर्वांग झाकून ते आडवे झाले. गाडी सुटणार अशा बेतात मी धावत-पळत गाडीचा शेवटचा डबा पकडला. गाडी सुरू झाली. मी डब्याचे दार धरून होतो. 'रेल्वेमन्स का डिब्बा है' असे आतील प्रवासी सांगत होते. मी विनंती करीतच होतो.

अनुक्रमणिका

रेल्वेने पहिले सिग्नल ओलांडले तरी आतले लोक दार उघडायला तयार नव्हते. 'अरे भाई, मैं बदनसिब महाजिर हूँ। मैं बीमार हूँ। मुझपर मेहेरबानी करो। खुदा आपको नेकी दे।' माझी शेवटची वाक्ये डब्यातल्या लोकांच्या कानावर पडली तेव्हा त्यापैकी एकाने दार उघडले अन् एका हाताने मला आत ओढून घेतले. माझ्या अंगात सडकून ताप असल्याचे त्याला जाणवले. त्याने डब्यातल्या रेल्वेच्या कामगारांना सांगितले, 'गरीबके बदनमें बहोत बुखार चढा हुआ है।'

दोघानी मला आधार देत वरच्या बाकड्यावर चढविले आणि सांगितले, 'अब मनमाड आनेतक आरामसे यहाँ सो जाव।' त्याबरोबरच त्या दोघांनी माझ्याजवळचे ब्लँकेट माझ्या डोक्यापासून ते थेट पायापर्यंत नीट पसरले. मी माझे तोंड झाकून बाकड्यावर झोपी जाण्याचा प्रयत्न करू लागलो. आता मी बराच सहीसलामत असल्यासारखे मला वाटू लागले. मला थोडा विसावा व दिलासाही मिळाला. काही केल्या झोप येत नव्हती. बिड्याच्या धुरानी सगळा डब्बा भरला होता. इतर सहकाऱ्यांचे काय झाले असेल? त्यांना माझ्यासारखा कोणी वाली मिळाला असेल का? काही झाले तरी ते तिघे पकडले जाऊ नयेत याबाबत मी मनातल्या मनात देवीला साकडे घातले. अधूनमधून मला डुलक्या येऊ लागल्या. ब्लँकेट पांघरल्याने जीव कासावीस होत होता. औरंगाबाद स्टेशनवर गाडी थांबली. 'औरंगाबाद, औरंगाबाद' असे हमालांचे आवाज कानावर येत होते. मी जरा खडबडून जागा झालो. जीव सारखा गुदमरत होता; तरी मी माझ्या तोंडावरचे ब्लँकेट काढले नव्हते. पोलिसांच्या शिव्यावर शिव्या कानावर आदळत होत्या. 'गद्दार, निमकहराम! किसी डिब्बेमें नजर नही आते। इस डिब्बेमें, उस डिब्बेमें देखो।' अशी आरडाओरड सुरू होती. पोलिसांना आमचा ठावठिकाणा मिळू शकला नाही. शेवटी रेल्वेमेन्सचा लहान डबा तपासण्यासाठी पोलिसांचा जथ्था डब्यासमोर जमा झाला. पोलिस डब्यात डोकावून पाहू लागले.

'इस डिब्बे में रेलके लोगोंके अलावा और कोई नही। हमने अबतक इस डिब्बे में किसी और को न आने दिया, न घुसने दिया है।' असे रेल्वेमेनपैकी एकाने सांगितले, तरी पोलिस शिपायांनी डबा धुंडाळून काढला. बाकड्यावर बसलेल्यांचे चेहरे निरखून पाहिले. बाकड्याखालची जागा त्यांच्या हातातील काठ्या फिरवून पाहिली. इतक्यात गाडीचे इंजिन सुरू झाले. प्लॅटफॉर्म संपण्यापूर्वी शिपायांनी शिताफीने प्लॅटफॉर्मवर उड्या मारल्या. इंजिन वेगाने धावू लागले. नगर नाका पार पडला असावा. माझ्या तोंडातून उसासा बाहेर पडला.

लासूरच्या रेल्वे स्टेशनवरही आमचा कसून शोध केला गेला. जवळपास सर्वचे सर्व डबे तपासून झाले. पोलिसांची आरडाओरड, शिट्या ऐकू येत होत्या. शिवाय 'गद्दार, कमीने, नमकहरामोने नाक में दम ला रखा है।' असे शब्दही कानी पडत होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही पोलिसांना आमचा शोध करण्यात यश आले नाही. इंजिन सुरू झाले. लासूर मागे पडले. रोटेगावच्या स्टेशनवर गाडी बराच वेळ थोपवून ठेवली गेली. पोलिसांनी त्यांची सर्व शक्ती लावून तपास केला. पुनरपि प्रत्येक डबा निरनिराळ्या शिपायांनी दोन दोनदा डोळ्यांखालून घातला. रेल्वेमेनचा डबा धुंडाळला गेला. काही उपयोग झाला नाही रोटेगाव मागे पडले. रेल्वेमेनच्या डब्यातही कुजबुज सुरू झाली. कुजबुजीचे काही शब्द माझ्या कानावर पडत होते. 'पोलिस किसी गद्दार जालीम की तलाशमें है। कुछ गद्दार कमीने लोग बिला वजह अमन में खलल पैदा करते है। यही अच्छा होता, की इस गाडीमें वह गद्दार पकडा जाता। उस गद्दारपर हम भी अपना हात चला लेते।' नगरसोल स्टेशनवर गाडी थांबली. लगेच मी वरच्या बाकड्यावरून धपकन उडी मारली. तोंडावरचा घाम पुसून काढला. डब्याचे

दार उघडून घोटभर पाणी पिण्याच्या उद्देशाने मी नळाकडे गेलो. माझे सर्वांग घामाने डबडबले होते. थंड वाऱ्याच्या झुळुकीने मला दिलासा मिळाला. गाडी सुरू झाली तेव्हा मी माझ्याच तंद्रीत होतो. समोर येईल तो डबा पकडण्यासाठी धडपड केली. प्रत्येक डब्याचे दार बंद होते. गडबडीत पहिल्या वर्गाचे दार मी पकडले. दारातून आत चांगलाच उजेड दिसत होता. डब्यातील लोकांना दार उघडावयाची मी कळकळीने विनंती केली. आतून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. मी दार घट्ट धरून उभा होतो. मी दीनवाणीने विनंती केली. माझा जीव धोक्यात असल्याचे सांगितले. पुन्हा दार उघडा म्हणून विनंती केली. 'कोणी तरी भामटा, चोर, दरोडेखोर असेल, त्याच्या विनंतीला भाळू नका. दार उघडू नका.' डब्यात बोलले जात असलेले शब्द मी ऐकत होतो. 'मी चोर भामटा नाही. निर्वासितही नाही. मी मोठ्या संकटात आहे. माझा जीव धोक्यात आहे. मला वाचवा. मी औरंगाबादचाच आहे.' असे मी पुन्हः पुन्हा सांगत होतो. तोपर्यंत इंजिनने दुसरे सिग्नल ओलांडले. माझे हातपाय थरथर कापत होते. माझा तोल मी सांभाळू शकत नव्हतो. अचानक दार उघडले गेले. मला दुरून पहाताच डब्यातील एक महिला 'हा तर निर्वासित दिसतो. ढकला त्याला दाराबाहेर; नाहीतर साखळी ओढा.' असे जवळजवळ किंचाळलीच. गाडी आता हैदराबाद संस्थानच्या हद्दीबाहेर आलेली होती. 'कृपा करून असे काही करू नका.' मी माझे नाव सांगितले. 'मी जेल फोडून पळून आलो आहे' असे एका दमात सांगितले. माझ्या बालवयात माझ्या उजव्या हातावर पटेल जी. पी. अशी अक्षरे गोंदलेली मी त्यांना दाखविली. त्या सर्वांना खात्री पटली. त्या सर्वांचा माझ्यावर विश्वास बसल्यासारखे मला वाटले. त्यांच्यापैकी एका वयस्कर बाईनी तर मला त्यांच्याच जवळ बर्थवर बसावयाला सांगितले. त्या बाई माझ्यासाठी बाजूला सरकल्या. त्यावेळी अचानक अनवधानाने माझा उजवा हात त्या वृद्ध महिलेच्या हाताला लागला. 'माफ करा.' मी म्हणालो. 'अरे बापरे, याच्या अंगात तर सडकून ताप भरलेला आहे. हे पहा, तुम्ही इथं थोडी विश्रांती घ्या. तुम्हाला विश्रांतीची फार गरज आहे.' त्या वयोवृद्ध महिलेने मला माझे पाय लांब करून लवंडता यावे यासाठी जागा करून दिली. 'मला खूप तहान लागली आहे. पाण्याविना माझा जीव कासावीस होतो आहे.' मी म्हणालो व पाणी मिळेल या आशेने उठायचा प्रयत्न करू लागलो. 'नका, नका. तुम्ही उठू नका.' त्या महिलेने मातेच्या ममतेने मला पाणी पाजले. मला गहिवरून आले, माझ्या डोळ्यात अश्रू चमकले. ते पाहून सर्वांचे डोळे पाणावले. त्यानंतर एका तरुणीने थर्मासमधून कपात चहा ओतला व मला चहा दिला. डब्यातले लोक औरंगाबादेतील श्री. गोविंदजी बिरमजी कुटुंबापैकी होते.

गाडी मनमाड रेल्वे स्टेशनच्या आवारात येताच मी डब्याचे दार उघडले व दारात उभा राहिलो. गाडी प्लॅटफॉर्मवर आली. प्लेटफॉर्मवर प्रवाशांची खूप गर्दी होती. अंधुकशा प्रकाशात मला ओळखीचे लोक स्पष्टपणे दिसू शकले नाहीत. मात्र माझे सहकारी श्री. बाबुराव जाधव यांनी मला ओळखले. ते व त्यांच्याबरोबर अनेक लोक 'हैदराबाद स्टेट कॉंग्रेस झिंदाबाद,' 'स्वामी रामानंद तीर्थ झिंदाबाद', 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा देत देत माझ्या डब्याजवळ आले. साराचा सारा प्लॅटफॉर्म घोषणांनी निनादून गेला. आम्ही क्षणभर भांबावून गेलो. तेवढ्यात गर्दीतून मार्ग काढीत माझे सहकारी माझ्या डब्याजवळ आले. डब्यातील त्या वृद्ध महिलेला मी नम्रपणे खाली वाकून अभिवादन केले. सर्वांचा निरोप घेतला आणि मी डब्यातून खाली आलो घोषणावर घोषणांनी मनमाड रेल्वे परिसर निनादून गेला होता. त्या जनसमुदायासह आम्ही प्लॅटफॉर्मबाहेर पडलो. मनमाड रेल्वे स्टेशनला लागूनच श्री. माणिकचंद पहाडे यांची स्वतःची एक चाळ होती. त्या चाळीतच हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे मनमाड कॅम्प कार्यालय होते. आम्ही सर्वजण तेथे पोहोचलो. कार्यालयाच्या दाराशी श्री. आनंदराव वाघमारे उभे होते. मी त्यांना नमस्कार करण्यासाठी पुढे सरसावलो. त्यांनी मला त्यांच्या पाया

पडू दिले नाही. लागलीच त्यांनी मला कवटाळले. ‘शाब्बास जीते रहो।’ ते उद्‌गारले. आजूबाजूच्या लोकांच्या तोंडावर आनंद ओसंडून आलेला दिसत होता. माझ्या सहकारी दोस्तांचा मी, श्री. आनंदरावांबरोबर परिचय करून दिला. आम्ही एकूण नऊजण जेल फोडून बाहेर पडलो, त्यापैकी दोन गटांची कशी व का ताटातूट झाली तेही सांगितले.

‘तुम्ही सगळे सुखरूप बाहेर आलात हे समाधान काही कमी मोलाचे नाही. तुम्ही जेल तोडून बाहेर पडणार असल्याची माहिती स्वामीजींना देण्यात आली तेव्हापासून स्वामीजी फार बेचैन झाले आहेत. त्यांना तुमच्या जीविताबाबत सारखी चिंता वाटत आहे. मोटारीतून गेलेले कदाचित मुंबईला पोहोचले असतील. सकाळी सहा ते सातच्या सुमारास मुंबईला जाणाऱ्या एकामागून एक दोन गाड्या आहेत. गौतम आणि तू मुंबईला जा. तुम्हाला प्रत्यक्ष पाहून स्वामीजींचा जीव खाली पडेल’ असे श्री. वाघमारे यांनी सांगितले. हे ऐकून मीही अस्वस्थ झालो होतो. श्री. वाघमारे यांनी मुंबईतील हैदराबाद स्टेट काँग्रेस कार्यालयाचा पत्ता व्यवस्थित समजावून सांगितला. मुंबईच्या प्रवासासाठी आवश्यक तेवढे पैसेही दिले. दुपारी एक वाजण्याच्या सुमारास मी व ॲड. गौतम मुंबईला पोहोचलो. घोड्याच्या व्हिक्टोरियातून मोरारबाग येथे दाखल झालो. त्यावेळी स्वामीजी “ नारायण नारायण” असे नामस्मरण करीत मागेपुढे येरझाऱ्या घालीत होते. जवळच श्री. गोविंदभाई व भाऊसाहेब वैशंपायन उभे होते. त्यांच्याच बाजूला डॉ. मेलकोटही होते. त्यापैकी कोणीही मला ओळखले नाही. ॲड. गौतमला तर त्यांनी पाहिलेलेच नव्हते.

‘गोविंदभाई, गोविंदभाई’ मी दोन वेळा हाक मारली. तिकडे त्यांनी लक्ष दिले नाही. अजूनही त्यांनी मला ओळखले नसावे. मी माझ्या मनाचा हिय्या करून म्हणालो, ‘गोविंदभाई, मी शंकरभाई आलो आहे’. मी हळव्या सुरात बोललो माझ्याकडे क्षणभर गोविंदभाई पाहातच राहिले. मी शंकरभाईच असल्याची त्यांची खात्री झाली. सर्वांनी माझ्याकडे अत्यंत विस्मयाने पाहिले. नंतर दोन पावले पुढे सरून गोविंदभाई म्हणाले, ‘स्वामीजी शंकरभाई आला आहे’ . स्वामीजींना अभिवादन करण्यासाठी मी चटकन स्वामीजींसमोर वाकत असताना, स्वामीजींनी माझे दोन्ही हात धरून कवटाळले, कडकडून मिठी मारली. सर्वांचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबलेले होते.

आमच्या आधी मोटारीने निघून गेलेले पाचजण अजूनही मुंबईत आलेले नव्हते.

आम्ही आदल्या रात्री जेलमधून कसे बाहेर पडलो याचा सविस्तर वृत्तान्त, सर्वांसमोर सांगताना ॲड. गौतम हे श्री. के. व्ही. नरसिंगराव यांचे नातलग असल्याचेही सांगितले. आमच्या धाडसी प्रयत्नाचे व आम्ही सर्वजण सुखरूप बाहेर आल्याचे सर्वांनी कौतुक केले.

श्री. गोविंदभाई, भाऊसाहेब वैशंपायन व श्री. ललित मोहन वकील यांच्याबरोबर मी जवळच्या ‘ठक्कर कल्ब’मध्ये दुपारचे जेवण घेतले. मोरारबागेत परत आल्यावर मी लंवडलो अन् लागलीच झोपी गेलो. सायंकाळचे सहा वाजेपर्यंत मला गाढ झोप आली. अंगावरच्या कपड्याशिवाय माझ्याजवळ काहीही नव्हते. सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास आवश्यक तेवढे कपडे विकत घेण्यासाठी श्री. गोविंदभाई यांनी मला शंभर रुपये दिले. त्याच सुमारास श्री. नागोराव पाठक व श्री. बाबूराव काळे मोरारबागेत दाखल झाले.

घडलेला सारा वृत्तांत सांगताना श्री. श्रीनिवास खोत पाथर्डीमार्गे बीडला, श्री. बद्रीप्रशाद उपाध्याय नाशिकला असे परस्पर त्यांच्या गावी गेल्याचे त्यांनी सांगितले. रोजच्या वापरासाठी धोतरजोडी, दोन नेहरू शर्ट, दोन बनियन, टॉवेल, रुमाल वगैरेसाठी त्यांनी दोनशे रुपये मागून घेतले. दोन दिवसांच्या विश्रातीनंतर विचारविनिमय करून पुढील कार्यक्रम ठरविला गेला. श्री. नागोराव पाठक यांना सिल्लोड, भोकरदन-सोयगांव-उंडनगाव परिसर चांगला परिचित होता. लहानमोठ्या कार्यकर्त्यांची चांगली ओळखही होती. श्री. बाबूराव काळे मूळचे सोयगावचेच असल्याने धडक कार्यक्रम पार पाडू शकतील म्हणून त्या दोघांना शेंदुर्णी कँपवर पाठविले गेले.

अनुक्रमणिका

# रझाकार व सरंजामी राजवट

निझामी राजवटीच्या मराठवाडा विभागाचे ज्येष्ठ विभागीय अधिकारी म्हणजे सुभेदार यांचे निवासस्थान औरंगाबाद शहरात होते. हैदराबाद संस्थानच्या प्रचलित कारभाराप्रमाणेच काटेकोरपणे मराठवाडा विभागातील पाच जिल्ह्यांचा सारा कारभार राबविला जात असे. सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी अत्यंत निगडित असलेला व आवश्यक असलेला विभागही जिल्ह्याचे अव्वल तालुकदार म्हणजे जिल्हाधिकारी यांच्याच नियंत्रणाखाली चालत असे. नगरपरिषद, नगरपालिका हे दोन्ही शब्द शहरवासीयांत रूढ होण्यापूर्वी त्या विभागाला 'बलदिया' या नावाने संबोधिले जायचे. 'बलदिया'चे सभासद निझामी शासनाद्वारे नियुक्त केले जात असत. बलदियाचे सभासद निझाम सरकारच्या जी हुजूरांच्या तांड्यापैकीच अव्वल तालुकदार आपल्या मर्जीप्रमाणे आणि वरून आलेल्या शिफारसीप्रमाणे निवडीत असे. इतर सरकारी अधिकारी कायमचे पदसिद्ध सभासद असायचे. बलदियाची मासिक बैठक अव्वल तालुकदार यांच्याच कार्यालयात घेण्याची प्रथा अंमलात यायची. अव्वल तालुकदार यांच्या कामाच्या व्यापामुळे, अधूनमधून स्वास्थ्य बरोबर नसल्यामुळे कित्येक वेळा ऐनवेळी बैठक रद्द केली जायची. बलदियाच्या कामकाजाबाबतची बैठक व बैठकीचा कार्यक्रम अव्वल तालुकदार स्वतःच आपल्या मर्जीप्रमाणे ठरवीत असत व बैठकीचा आराखडा व कार्यक्रम हुकूमी आवाजाने सभासदासमोर मांडून हुकूमी आवाजाने मंजूर करून घेत असत. नागरिक सदस्य 'मुनासिब है' इतकेच काय ते बोलत. शहराची साफसफाई, दिवाबत्ती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न इत्यादी नागरिकांच्या तक्रारी अर्जाद्वारे बैठकीत मांडल्या गेल्या तर 'जी हुजूर', 'मुनासिब है' व 'होयबावाले' चुकून एका शब्दानेही बोलत नसत. घरबसल्या विनासायासप्रयास, वशिला आणि थातुरमातुर करून मिळालेली, मिळविलेली मानाची जागा त्या महाभागांना हातची जाऊ नये असेच वाटत असे. त्यामुळे हो ला हो लावला जाई. काही कारणास्तव एखादा प्रश्न पुढे आलाच तर 'पुढच्या बैठकीत बोलू, पाहू' असे सांगून नागरिकांचे महत्त्वाचे प्रश्न अधांतरी लोंबकळत ठेवले जात असत. बलदियाचे अस्तित्व असलेल्या काळात अव्वल तालुकदाराशी या ना त्या कारणाने जवळीक ठेवणाऱ्या सभासदांनी व धनवान, प्रतिष्ठित म्हणून सरकारदरबारी मान्यताप्राप्त अशा अनेकांनी रहदारीच्या मुख्य सडकांवर, गटारींवर, आक्रमण करणाऱ्या इमारती बांधून काढल्या. गल्लीबोळांत राहणाऱ्यांनी आपापल्या छोटेखानी घरासमोर, मातीच्या विटांचे थरावर थर रचून भिंती बांधून काढल्या. सरकारी जमिनीवर अनाधिकृत बांधकाम करण्यातच चढाओढ लागलेली होती. पर्यायाने सडका लहान झाल्या, गल्लीबोळ वेड्यावाकड्या वळणाचे बनले. असे सर्व घडले ते बलदियाचे अध्यक्ष, खुद्द जिल्हाधिकारी असताना.

मराठवाडा विभागात मराठी भाषेची गळचेपी करीत करीत मराठी भाषा विसरायला लावण्याचे भरपूर प्रयत्न केले गेले, अशा परिस्थितीतही काही जागरूक मराठीप्रेमी धुरीणांच्या हाती औरंगाबादेतील एकमेव मराठी माध्यमाचे श्री सरस्वती भुवन विद्यालय होते. या शिक्षणसंस्थेला सर्वचे सर्व प्रामाणिक शिक्षक लाभले होते. त्यामुळे सदर शिक्षण संस्थेची सर्व थरात प्रशंसा केली जाई. शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसायला धड जागा नव्हती अगर फर्नीचर नव्हते. पावसाळ्यात तर भलतीच फटफजिती होत असे. शिक्षकांच्या शिकविण्याच्या पद्धतीने आणि कुशाग्र बुद्धीने विद्यार्थी भारावून जात. त्यामुळे सोय आणि गैरसोयीबाबत पालक तसेच विद्यार्थी कधीच बोलत नसत. ती शिक्षणसंस्था नावारूपाला आली ती शिक्षकांच्या निष्ठेमुळे. शिक्षणसंस्थेचे बहुतेक सर्व पदाधिकारी, अधिकाऱ्यांच्या भेटीच्या वेळीच काय ते शिक्षणसंस्थेत येत असत. शिक्षणसंस्थेच्या दैनंदिन कामात त्यांना रस नव्हता; शहरात, समाजात आपण कोणी तरी विशेष आहोत; याच आविर्भावात ते

अनुक्रमणिका

मिरवत असत. होळी आणि रंगपंचमीचे सण आपल्या खंडप्राय देशात पुरातन काळापासून रूढ आहेत. या सणांचे स्वरूप  धार्मिक आणि सामाजिक दोन्हीही होते. कृष्णावताराच्या काळात रंगपंचमी आणि रंग खेळला जात असल्याबद्दलच्या अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. आजच्या आधुनिक युगात द्वारका आणि मथुरेच्या मंदिरात रंग खेळला जातो, गुलाल उधळला जातो. मंदिराच्या पुजाऱ्यांकरवी रंगाचा प्रसाद मिळविण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी होत असते. पंडित जवाहरलाल नेहरू आपल्या देशाचे पंतप्रधान बनवण्यापूर्वीपासून रंग खेळत असत. पंतप्रधान झाल्यावर पंडित जवाहरलाल नेहरू यांचे रंगांनी माखलेले कपडे व चेहरा यांची छायाचित्रे वृत्तपत्रांत छापली गेलेली आहेत. आपल्या देशात प्राचीन काळापासून रंगपंचमी व होळीचा सण साजरा केला जात असे. बदलत्या ऋतूचे हवामान नागरिकांना सह्य व्हावे यासाठी निसर्गानेच देशभर केसूच्या झाडाच्या बियांचा पेरा केला. केसूच्या झाडांना पौष महिन्यात पालवी फुटते आणि फुलोरा येतो तो फाल्गुन महिन्यात. फुलाचा रंग केशरी असतो. आधुनिक जगात रासायनिक पद्धतीच्या वापरात निरनिराळे रंग वापरता येण्यापूर्वी निसर्गाने केसूची झाडे व त्या झाडांची केशरी रंगाची फुले देणगी म्हणून दिली होती. होळीचा सण आपापल्या घरांच्या दारासमोर एरंडाचे रोपटे किंवा फांदी जाळून आजही साजरा केला जातो. होळीच्या सणाची सांगता नाचगाण्यांच्या मैफलीने केली जाई. नाचगाण्यांच्या मैफिलीत सर्व जातीचे, धर्माचे लोकही सहभागी होत असत. धुंवाधार रंग खेळला जायचा. रंग खेळायला तसा कोणीच विरोधी असल्याचे दिसत नव्हते.

महाराष्ट्राचे युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आजोबांचा शुभ विवाह रंगपंचमीच्या निमित्ताने रंग खेळतानाच निश्चित करण्यात आला. हा एक ऐतिहासिक दाखला जमेच्या बाजूला आहे. असे असताना शहरातील काही प्रतिष्ठितांना मात्र रंग खेळू नये असे वाटत होते. त्या महाभागांनी श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था आपल्या ताब्यात ठेवली होती. शहरात जल्लोशाने रंग खेळला जात असताना, खेळला जाऊ नये या विचाराचे हे लोक विद्यार्थ्यांचे संमेलन प्रशालेच्या आवारात आयोजित करीत व त्यात शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभागी झालेच पाहिजे असा दंडक असे. रंग खेळण्याच्या प्रकारापासून विद्यार्थ्यांना परावृत्त करण्याची महान कामगिरी आपण पार पाडीत आहोत असेच त्यांना वाटत होते. रंग खेळणारे शहाणे नव्हते असेच जणू काय त्यांना या खटाटोपाद्वारे सांगावयाचे होते. रंग खेळण्याच्या निमित्ताने शहरातील कितीतरी नागरिकांना, तरुणांना, विद्यार्थ्यांना एकत्र आणणे शक्य होते; पण त्यांना हे नको होते.

सरड्याच्या बदलत्या रंगाप्रमाणे हैदराबाद संस्थानचे सुलतान मीर उस्मान अलीखान यांनी त्यांच्या राजवटीच्या कारभाराचे रंग बदलायला प्रारंभ केला. सरकार दरबारात जमा झालेल्या भाटांद्वारे हैदराबाद संस्थानचे सुलतान, मुसलमान आणि हिंदु नागरिकांना समसमान नजरेनेच बघतात; हिंदू मुसलमान असा भेदभाव ते करीत नाहीत; त्यांच्या एका डोळ्यात मुसलमान तर दुसऱ्या डोळ्यात हिंदू ठसलेले आहेत असे सर्वत्र सांगावयाला व पटवून द्यायला प्रारंभ केला. संस्थानात पदोपदी मुसलमानांना झुकते माप दिले जात होते; तरी सांगणारे ते समसमान आहेत असेच सांगत असत. हत्तीचे खावयाचे दात आपल्याला सहजासहजी दिसत नाहीत; दिसतात ते देखाव्याचे दात. त्याप्रमाणे निझामी राजवटीचा कारभार चालू लागला. सांगायचे एक व करावयाचे नेमके दुसरे असे सर्रास अनुभव जनतेला येऊ लागले. सरकारने अवलंबिलेल्या राज्यकारभाराच्या विचित्र पद्धतीमुळे मुसलमान मंडळी बरीच शेफारली. संस्थानचा राजा मुसलमान आहे असे बहुतेक लोक वेळोवेळी सांगू लागले. इस्लाम आणि मुस्लिम हे दोन शब्द पदोपदी वापरात येऊ लागले.

जात्यंधता ठळकपणे आचरणात येऊ लागली. इतरांपेक्षा मुसलमान मंडळी वेगळी आहेत असेही स्पष्ट शब्दात मांडले जाऊ लागले. आशुरखाना, दर्गा, मशिदीपासून २०० पावले अलिकडे आणि पलिकडे वाद्य बंद केले जाऊ लागले. दोन वर्षांपूर्वी रंग खेळणारेच आता अंगावर रंगाचा शिंतोडा पडू नये असे बोलू लागले. खेळीमेळीचे वातावरण संपले. हिंदु मोहल्यात रंग खेळला जात असताना, भांडण उकरून काढावयाच्या विचाराने काही मस्तवाल बनलेले, बनत चाललेले मुस्लिम मुद्दाम तिकडे फेरफटका मारू लागले.

सतत तापत चाललेले वातावरण थंड करण्यासाठी व अचकट विचकट शब्दांचा वापर बंद पाडण्यासाठी काही विद्यार्थ्यांनी व शहरातील समंजस नागरिकांनी श्री. गोविंदभाईंना गळ घालून रंगाच्या गाड्या नेहमीप्रमाणे मिरवणुकीने निघाल्या असताना बरोबर घेतले. सर्वांनी डोळ्यांत तेल घालून भरपूर खबरदारी घेतली. अचकट विचकट शब्दाला लगाम लागल्यासारखे वाटू लागले. सुपारी मारुतीपासून सुरू झालेली रंगाच्या गाड्यांची मिरवणूक मुलम्ची बाजारापर्यंत सुखासमाधानाने गेली. दर्गा मशीद, आशुरखाना यांवर रंगाचा एकही थेंब पडणार नाही, टाकला जाणार नाही याची काळजी घेतली गेली. मुलम्ची बाजारातील छोट्याशा मशिदीजवळ रंग खेळणाऱ्यांनी रंगाचा एकही थेंब टाकला नसताना मशिदीच्या भिंतीवर रंग टाकल्याची हाकाटी सुरू झाली. तोपर्यंत मिरवणुकीत सहभागी झालेले बरेच पुढे गेले होते. श्री. गोविंदभाई हे त्यांच्या विद्यार्थीमित्रांसमवेत हळूहळू चालले होते. इतक्यात मशिदीत आणि जवळच्या बोळात दबा धरून बसलेले गुंड जोराने ओरडले, 'देखते क्या? चलाव लाठी ।' आणि त्या पाठोपाठ चाकू, सुऱ्या, तरवारींचा सर्रास उपयोग केला गेला. वीस-पंचवीस विद्यार्थी, नागरिक जखमी झाले. एकच हलकल्लोळ माजला, काही लोक जीव वाचविण्यासाठी सैरावैरा पळू लागले. जखमी झालेल्यांचे बरेचसे रक्त सडकेवर पडले. सर्वत्र एकच हकलल्लोळ माजला. थोड्या वेळाने शहर कोतवालीचे पोलिस अधिकारी पोलिसांच्या ताफ्यासह आले. तोपर्यंत शस्त्राने घाव घालणारे पळून गेले होते. सर्वप्रथम घायाळ झालेल्यांना सरकारी दवाखान्यात दाखल करून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले.

औरंगाबाद शहरात सर्वत्र घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. रस्त्यावर चिटपाखरूही दिसत नव्हते. लोक भयभीत झाले होते. शहरातील सर्व वरिष्ठ अधिकारी, त्यांच्या पाठोपाठ शहरातील काही नागरिक, व्यापारी दवाखान्यात आले; तोपर्यंत डॉ. गेब्रिल व त्यांच्या सहकाऱ्यांनी तडकाफडकी सर्व प्रकारची खटपट करून परिश्रमपूर्वक सर्व जखमी मंडळीवर आवश्यक तेवढे उपचार केले होते. दवाखान्यात दाखल करण्यात आलेल्या जखमी रुग्णांसाठी आवश्यक ती औषधी, इंजेक्शने, दूध व मोसंबीचा पुरवठा श्री. शेषमल जीवराज व श्री. बजरंगलाल टिबडीवाला यांनी तातडीने केला.

१९३३ पर्यंत औरंगाबाद शहरात हिंदू आणि मुसलमान गुण्यागोविंदाने राहात होते. ओळखीचे लोक एकमेकांना अभिवादन केल्याशिवाय पाऊल टाकत नसत. एकमेकांत सलोखा होता. हा हिंदू, हा मुसलमान असा भेदभाव बोलण्यातही दिसत नव्हता. निझामी राजवटीचा कारभार बदलल्यापासून मुसलमान समाजातील मंडळी हिंदू समाजातील बहुतेक सर्व लोकांबरोबर फटकून वागू लागली. आपसातला आपलेपणा कमी कमी होत गेला. हिंदू आणि मुसलमान असे दोन तट आकार घेऊ लागले. काही मुसलमानांत सैतानी वृत्ती जोपासली जाऊ लागली. शाब्दिक बोलाचाली सुरू झाली. हिंदू लोक सहिष्णुतावादी असल्याने मुसलमान गावगुंडांना बरेच फावत गेले. प्रत्येक बाबतीत वादावादी, आणि त्यानंतर हमरातुमरी होऊ लागली.

अनुक्रमणिका

शांतताप्रिय, धर्मनिरपेक्ष, समतावादी लोक वेळप्रसंगी नमते घेत जीवनाची वाटचाल करीत असत, त्यामुळे मुसलमान लोक हिंदू लोकांना नेभळट समजू लागले; मन मानेल ते करू लागले; तरी त्यांची प्रत्येक बाब शासन खपवून घेऊ लागले. शासनाचा हवा तेवढा पाठिंबा असल्याने मुसलमान एकेरीवर येऊ लागले. भांडण उकरून काढावयाचेच बेत रचू लागले. मशिदीवर रंग टाकला नसताही रंग टाकला असे ठासून सांगत सडकेवर रक्त सांडेपर्यंतचा प्रकार होऊन शांतताप्रिय औरंगाबादेतील हिंदू लोकांवर जातीय दंगा लादला गेला; काळिमा फासला गेला; हा घडलेला नव्हे, घडवून आणलेला प्रकार अत्यंत दुःखदायक होता. तरी याउप्पर असे घडू नये, आपसात तेढ राहू नये यासाठी विभागाचे सुभेदार मौ. गुलाम अहमद खान व अव्वल तालुकदार यांनी तातडीने शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची बैठक बोलावून शांतता कमिटी कायम केली. सदर कमिटीद्वारे त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता शहरात शांतता नांदावी यासाठी दोन्ही जमातीच्या मान्यवर व सर्वसाधारण लोकांद्वारे गोरक्षण येथे एक जाहीर सभा; शहराचे वयोवृद्ध व प्रतिष्ठित नागरिक साहू राय छोटेलालजी टंडन यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वरिष्ठ अधिकारीही जातीने उपस्थित होते. शहरात पूर्ववत शांतता प्रस्थापित करण्याचे सर्वांनी मान्य केले; इतकेच नव्हे, तर शांतता नांदावी यासाठी शहरात जातीने निरनिराळ्या लोकांच्या गाठीभेटी घेण्याचेही एकमुखाने मान्य करण्यात आले.

सायंकाळच्या सात वाजण्याच्या सुमारास औरंगाबाद शहराच्या सर्व रस्त्यांवर सामसूम होती. घराच्या दारात उभे राहूनच काही लोक दुपारी घडलेल्या अनिष्ट प्रकाराबाबत एकमेकांबरोबर कुजबूज केल्यासारखेच धिम्या आवाजात बोलत होते.

दवाखान्यात दाखल केलेल्या जखमी रुग्णांपैकी पाच लोकांच्या जखमा बऱ्याच मोठ्या आणि खोलवर झालेल्या होत्या. त्यांच्या स्वास्थ्याबाबत त्यांच्या घरच्या लोकांना आणि इतर नागरिकांना चिंता वाटत होती. दवाखान्यात जावे आणि रुग्णांना प्रत्यक्ष पहावे, भेटावे, दिलासा द्यावा असेही कित्येकांना वाटत होते. रुग्णांचे नातेवाईक बरेच हवालदिल बनलेले होते. सर्वत्र स्मशानशांतता होती. रस्त्यावर चिटपाखरूही फिरकत नव्हते. घडलेल्या प्रकारामुळे श्री. गोविंदभाई बरेच अस्वस्थ होते. अधूनमधून दवाखान्यातील रुग्णांच्या प्रकृतीबाबत श्री. गोविंदभाई त्यांच्या मित्रांकडून खबर मिळवीत होते. रात्री आठच्या सुमारास जखमी रुग्णांपैकी एक रुग्ण दगावल्याची खबर कानोकान सर्वत्र पसरली. नातेवाईक हवालदिल बनले. काही नागरिकांचे तोंडचे पाणी पळाले. रुग्णांच्या नातेवाईकांना दिलासा देण्यासाठी, तसेच त्यांचे सांत्वन करण्यासाठी दवाखान्यात जावे तर जाण्यायेण्यासाठी मोटार किंवा मोटारीसारखे सुखरुप वाहन दृष्टिक्षेपात नव्हते. दवाखान्यात मुसलमान वस्तीतूनच जावे लागणार होते; म्हणून दवाखान्यात तांग्यातून जाणे धोक्याचे वाटत होते. अशी अवस्था असताना आणखी तीन रुग्णांची प्रकृती अतिशय चिंताजनक असल्याची बातमी शहरात पसरली. नागरिकांच्या मनात कालवाकालव सुरू झाली. काय करावे आणि काय नाही; कोणालाही सुचेना. पक्ष्यासारखी वर आकाशात भरारी मारून दवाखान्यात जावे असे एकाने बोलून दाखविले. दवाखान्यात जायची आतुरता सारखी वाढतच होती. इतक्यात माझ्या श्वशुरांची जुनी मोटार माझ्या दाराशी उभी असल्याचे माझ्या लक्षात आले. मात्र मोटार ड्रायव्हर जवळपास राहात नव्हता. मला मोटार चालविता येत नव्हती. मोटार ड्रायव्हर मोटार कशी सुरू करतो, चालवताना काय काय करतो हे मी पुष्कळ वेळा बारकाईने पाहिलेले होते. त्या संकेतानुसार मोटार सुरू करावी व चालवावी असे मला वाटले. हँडल मारणे माझ्या शक्तिबाहेरचे होते. गुलमंडी जवळच्या

अनुक्रमणिका

कांजीभाईंच्या उपहारगृहाजवळ (आजच्या बाटा दुकानालगत) मी काहीजणांसह चिंताक्रान्त अवस्थेत विचार करीत उभा होतो. मोटारीचे हँडल मारावयासाठी व दवाखान्यात कोणीतरी माझ्याबरोबर चलावे म्हणून मी विनंती केली.

'चला मी येतो,' भुरेवार म्हणाला. श्री. भुरेवार चांगला धडधाकट होता.

'मोटार चालविताना अचानक काही बिघाड झाला, मुसलमान मोहल्ल्यातच ती बंद पडली तर काय करायचे?' असा प्रश्न जवळच्या एका विद्यार्थ्याने केला.

'मी तुमची साथ सोडणार नाही' भुरेवारने मला आश्वासन दिले. मला अंगात शक्ती संचारल्यासारखे वाटले. भुरेवारने सर्व शक्ती एकटवटून हँडल मारले. मोटार सुरू झाली. भुरेवार माझ्याच शेजारी बसला. एक विद्यार्थी मागे बसला. मोटारीची दारे बंद केली. मोटारीने वेग धरला. मछली खडक, चौक बाजार, चौक पोलिस चौकीपासून मुसलमान मोहल्ला मागे टाकीत मोटार काला दरवाजातून बाहेर पडली आणि दवाखान्याच्या गेटला खरचटत, दवाखान्याच्या पायऱ्यांना धक्का देत उभी झाली. दवाखान्याच्या वऱ्हांड्यातच डॉ. गेब्रिल व त्यांचे सहकारी डॉक्टर उभे होते.

'घायाळ रुग्ण कसे आहेत?' मी अतिशय आतुरतेने, कातर आवाजात विचारले. 'बागूलशिवाय सर्व बरे आहेत. बागूलही लवकरच शुद्धीवर येईल असे मला वाटते.' डॉ.गेब्रिल म्हणाले. आम्हाला हुरूप आला. डॉ. गेब्रिलसमवेत आम्ही सर्व रोग्यांच्या खाटांजवळ गेलो; विचारपूस केली. श्री. बागूलच्या खाटेजवळ उभे असताना तो शुद्धीवर आला. त्याने मला चटकन ओळखले, त्याच्या व त्याच्या विधवा भगिनीच्या डोळ्यांत अश्रू तरंगू लागले. मी त्यांना धीर दिला. जवळपास चाळीस मिनिटे आम्ही दवाखान्यातील रुग्णांजवळ होतो.

'बहुतेक जखमी बरे आहेत. आता आम्हाला कोणाचीच काळजी वाटत नाही.' असे डॉ. गेब्रिल यांनी पुन्हा सांगितले. आम्ही त्यांचा निरोप घेऊन, आलो होतो त्याच मार्गाने गुलमंडी चौकात आलो. तोपर्यंत गुलमंडी चौकात शंभर-दीडशे लोक दवाखान्यातील रुग्णांची खबर मिळावी म्हणून आतुरतेने गटागटाने उभे होते.

'दवाखान्यातील जखमी सुखरूप आहेत. आता काळजी करण्याची आवश्यकता नाही.' जमलेल्या मंडळींना एका दमात सांगून झाल्यावर मी व भुरेवार गोविंदभाईंच्या घरी पायी चालत गेलो व त्यांना जखमी लोकांची खबर दिली. एक दीर्घ उसासा टाकून त्यांनी समाधान व्यक्त केले.

शहरभर इतके सारे रामायण घडल्यावरही कुंपणावरून शेळ्या हाकणाऱ्यापैकी कोणा एकाने दाराबाहेर पाऊल टाकले नाही; उलट रंग खेळणाऱ्यांना व त्यांची साथ देणाऱ्यांनाच दोष दिला. पारंपरिक प्रतिष्ठित नेतृत्व आणि गोविंदभाईंच्या भूमिकेतील फरक या घटनेने सर्वसामान्यांना प्रकर्षाने जाणवला.

अनुक्रमणिका

मराठवाडा विभागाचे सुभेदार मौ. गुलाम अहमद खान यांनी एका प्रसंगी कोर्टात, प्रचलित प्रथेनुसार परमेश्वराची शपथ घेण्यास नकार दिल्याचे मागे सांगितले आहे. त्यांनी आपण धर्मातीत असल्याची छाप जनमानसावर बसवली होती. मौ. गुलाम अहमद खान हे मुसलमान असूनही इतर मुसलमानांपेक्षा निराळे असल्याचे स्पष्ट होते; मात्र निझामी राजवटीने आखून दिलेली लक्ष्मणरेषा त्यांनाही ओलांडता आली नाही, प्राप्त परिस्थितीत त्यांना नोकरी टिकवावयाची होती; शिवाय त्यांना मोठे पद मिळविण्याचा हव्यासही होता.

जनसंपर्क साधण्यासाठी श्री. गोविंदभाईंनी औरंगाबाद जिल्हा व शहरातील पुरुष व स्त्रियांच्या हस्तकलानिर्मितीचे एक प्रदर्शन भरविण्याचे काम हाती घेतले याचा उल्लेख मागे आला आहे. त्यानिमित्त शहरातील आणि जिल्ह्यातील कलाकुसरीची निर्मिती करणाऱ्या कलाकार आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या गाठीभेटी घेऊन नियोजित हस्तकला प्रदर्शनाबाबत बोलणी करण्यात आली. या निमित्ताने महात्मा गांधीचा चरखा आणि सूतकताईला प्रदर्शनात प्राधान्य देण्याचा त्यांनी सल्ला दिला. शहरातील काही विभागात चरख्यावर सूतकताई करणाऱ्याबरोबर संपर्क साधला गेला. सर्वमताने प्रदर्शन सराफ बाजारालगत असलेल्या श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या प्राथमिक विभागाच्या शाळेच्या आवारात घ्यायचे निश्चित करण्यात आले. सदर प्रदर्शनासाठी श्रीमती हरणाबाई – आताच्या श्रीमती आशाताई वाघमारे – निरनिराळ्या वस्तू गोळा करीत. मी त्या वस्तूबाबत माहिती व शीर्षकाचे फलक तयार करू लागलो. शाळेचे आवार गच्च भरले, इतक्या वस्तू मिळविल्या होत्या. श्री. साहू राय छोटेलालजी टंडन यांनी प्रदर्शनाचे उद्‌घाटन सुभेदार मौ. गुलाम अहमद खान यांच्याच हस्ते करावे असा सल्ला दिला व त्याबाबत आग्रहही धरला. तसा त्या दोघांच्या वडिलांचा स्नेहसंबंध होता, तोही उजळला गेला. श्री. गोविंदभाईंचे विशेष गुण व विशेष काही करण्याची जिज्ञासा श्री. टंडन यांनी हेरली; म्हणूनच त्यांनी हरप्रकारे सहकार्य देऊ केले व दिले. त्याबरोबर सरकारी यंत्रणेला न दुखवता कार्य करण्याचा पोक्त सल्लाही दिला. मौ. गुलाम अहमद खान यांच्याच हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्याचे निश्चित केले. उद्‌घाटक म्हणून उद्‌घाटनाचे निमंत्रण देण्यासाठी श्री. राय छोटेलाल समवेत श्री. गोविंदभाई मौ. गुलाम अहमद खान यांच्या निवासस्थानी गेले तेव्हा भर कोर्टात आपण 'ला मजहब' असल्याचे सांगणारे सुभेदार मौ. खान यांनी 'प्रदर्शनात मांडल्या जाणाऱ्या वस्तूबाबतची माहिती पत्रके व त्यांची शीर्षके यांची प्रत्यक्ष पाहणी केल्यावरच मान्यता देऊ शकेन.' असे सांगून, ते निझाम राजवटीचे एकनिष्ठ सेवक असल्याचे पटवून दिले. प्रदर्शनाची प्रत्यक्ष पाहणी करताना महात्मा गांधीच्या चित्रासमवेत चरख्याचे चित्र होते व त्या चित्राखाली चरखा, टकळी, कापूस, कापसाचे पेळू ठेवलेले होते. त्या विभागाला गांधीजींचे बोधवाक्य 'चरखा चला चलाके। लेंगे स्वराज्य लेंगे।' हा फलक लावलेला होता. तो फलक काढून टाका असे सुभेदार यांनी सांगितले व त्याबाबत आग्रहही धरला. नाइलाजास्तव तो फलक काढावा लागला.

आठ दिवस प्रदर्शन बघणाऱ्यांची सारखी रीघ लागलेली होती. सुमारे आठ दहा हजारावर आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनी ते प्रदर्शन पाहिले, मात्र समाजात धुरीण म्हणून वावरणाऱ्यांनी प्रदर्शनाच्या आवारातही नुसता फेरफटका मारला नाही. प्रदर्शनाच्या निमित्ताने शहरातील विद्यार्थ्यांच्या मनावर श्री. गोविंदभाईंच्या विचारांचा ठसा उमटला. गटागटाने विद्यार्थी गोविंदभाईंना भेटू लागले. बातचीत करू लागले. काही विद्यार्थी तर भारावून गेले. मराठीभाषिक विद्यार्थ्यांबाबत निझामी राजवटीने आरंभिलेली हेळसांड, अवहेलना थोपवून ठेवण्यात श्री. गोविंदभाईच मार्गदर्शक ठरतील असे विद्यार्थ्यांना वाटू लागले. पुष्कळशा विद्यार्थ्यांना श्री. गोविंदभाईंच्या मनाचा, मनातील विचारांचा ठाव सहजासहजी घेता आला नाही. तसे श्री. गोविंदभाई कधीही

भडभड बोलत नसत, त्यामुळे त्यांच्या विचारांचे आकलन होऊ शकले नाही. बहुतेक वेळा हे अनेक विचारांचे काहूर आहे तरी काय हे समजून घेण्यासाठी काही विद्यार्थी अनेक प्रश्नांची छेडछाड करायचे. विचारांची देवाणघेवाण होऊ लागली. विद्यार्थ्यांचे मनोगत त्यांना समजू शकले.

त्या काळातले बहुतेक विद्यार्थी आजच्या माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांइतकेही चिकित्सक नव्हते, तरी शाळेच्या आवारात दैनंदिन जे काय घडत होते त्याचा विचार करणारे काही विद्यार्थी होते. सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचा शिक्षकवर्ग अत्यंत आत्मीयतेने शिकवीत असे. शाळेचे इतर कर्मचारी त्यांचे काम वेळच्या वेळी पार पाडीत असत. सरकारकडून अनुदान मिळवावयाचे व शहरातील नागरिकांकडून मासिक वर्गणी गोळा करावयाचे कामही, शिक्षण संस्थेची सभासद मंडळी कर्मचाऱ्यांद्वारेच करीत. तेवढे काम करणारे महाभाग शिक्षण संस्थेवर, शिक्षकांवर आणि कर्मचाऱ्यांवर फार मोठे उपकार करतात असे अधूनमधून बोलत. संस्थेच्या प्राथमिक विभागाच्या काही शिक्षकांना व काही कर्मचाऱ्यांना वेठबिगारी सारखे मनसोक्त राबवून घेण्यात जराही कसर ठेवली जात नसे. याबाबतचे अनुभव आणि माहिती काही चाणाक्ष विद्यार्थ्यांना समजत होती. संचालक मंडळी घरात बसून शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी काही चाकोऱ्या आखीत व त्या चाकोऱ्या काटेकोरपणे पाळल्या जाव्यात असा दंडक होता. इतके असताना शिक्षकवर्ग, आपले काम प्रामाणिकपणे, नियमित पार पाडीत होते.

शाळेच्या आवारात बदलत चाललेल्या परिस्थितीचा विचार केला जात नव्हता. सेवाभावी दृष्टी समोर नव्हती. आपल्यापुरतेच बघावयाची सवय सर्वांना लागलेली होती. हैदराबाद संस्थानचे राज्यकर्ते मराठी भाषिकांच्या नाड्या आवळीत होते. मराठी भाषेची सर्रास गळचेपी केली जात होती. मराठी भाषेच्या आणि मराठी भाषिकांच्या कल्याणासाठी काढण्यात आलेल्या या एकमेव मराठी माध्यमाच्या शाळेच्या संचालकांना मात्र त्याची खंत व खेद वाटत नव्हता. मायबाप निझाम सरकारला नाराज करावयाचे नाही असाच त्यांचा निश्चय असल्याचे दिसत होते.

ब्रिटिश आणि निझामी राजवटीच्या दुहेरी जोखडात हैदराबादची प्रजा अडकलेली होती. तोंड दाबून बुक्क्यांचा मारा होत होता. घरचेच महाभाग मूग गिळून गप्प बसले होते. ‘ठेविले अनंते तैसेचि रहावे’ असे, हळूच तेही कानात सांगायचे असा महामंत्र जपणारेही काही कमी नव्हते. मराठी मायबोलीला काट मारून, उर्दू भाषाच तुमची आमची, सर्वांचीच मातृभाषा समजून तिचेच अध्ययन इष्ट मानणारे व मुसलमानांसारखाच हुबेहूब पेहराव करणारे लोकही संस्थानात होते. लोकसंख्येच्या मानाने मराठवाडा विभागात, औरंगाबाद शहर व जिल्ह्यात हिन्दू मराठी भाषिकांची संख्या बरीच अधिक होती. संस्थानचे निझाम, हे संस्थानातील हिन्दू व मुसलमानाकडे समसमान नजरेने बघतात असे अधूनमधून सांगत असत, मात्र तसे घडत नव्हते. हिन्दू लोकांच्या देवस्थानाकडे, धार्मिक कार्याकडे आणि शिक्षणाकडे विचारपूर्वक दुर्लक्षच केले जात होते.हिन्दू मराठी भाषिक अक्षरशत्रू राहावा या दृष्टीनेच संस्थानचे राज्यकर्ते वाटचाल करीत होते. हिन्दू जनतेच्या शिक्षणाचे मातेरे केले गेले व बहुसंख्य जनता अक्षरशत्रू राहिली. त्यामुळे राज्यकर्त्यांना त्यांच्या अज्ञानाचा मनमुराद फायदा लुटता आला. औरंगाबाद जिल्ह्याचे बहुसंख्य लोक खेड्यातच राहात असत. खेडेगावात प्रत्येक गोष्टीची वानवा असे. जवळपासच्या गावाला जाण्यासाठी मातीचेही रस्ते नव्हते. मानवी जीवनाला आवश्यक असलेल्या पिण्याच्या पाण्यापासून दिवाबत्ती, आरोग्य केंद्र, कच्याबच्यासाठी छोटी शाळा नव्हती.

अनुक्रमणिका

पावसाळ्यात तर गावकऱ्यांना घराबाहेरही पडता येत नसे. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागे. गोरगरीब जनता मुक्या जनावराप्रमाणे सर्व आघात सहन करीत होती. निसर्गाच्या कृपेवर अनेकांना जगावे लागे. निझामी राजवटीला गरीब शेतकऱ्यांचा, अन्नदात्याचा विचार करण्याची फुरसत नव्हती; शिवाय गरजही वाटत नव्हती.

संस्थानचे जहागीरदार, मनसबदार, रिसालदार, वतनदार, रूसुमदार, मोठमोठे जमीनदार आणि सावकार यांनी शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा वारेमाप फायदा घेऊन, शेतकऱ्यांना शेजमजूर केले. 'अन्नदाता', 'बळीराजा' ही विशेषणे अदृश्य झाली. धान्याच्या राशी उभ्या करणारा शेतकरी कर्जबाजारी बनला. पोटाची खळगी भरण्यासाठी धान्य भिक्षेसारखे मागावे लागले. धान्याच्या राशी उभ्या करण्यासाठी शेतकऱ्याला त्याच्या निढळाचा घाम काळ्या मातीत शिंपडावा लागला. अविश्रांत परिश्रमाने तो सारखा खंगत गेला, त्याच्या हाडाची काडे झाली. मराठवाडा विभागातील सर्वची सर्व शेती केवळ निसर्गाच्या कृपेवर सर्वस्वी अवलंबून होती. औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर, पैठण आणि अंबड हा भाग धान्यांच्या राशी उभ्या करणारा होता, निझामी राजवट त्या भागाला 'सोनेकी चिडियाँ' या गोंडस नावाने संबोधून निढळाच्या घामाने पैदा केलेल्या धान्यांच्या राशी बिनदिक्कतपणे हैदराबाद या राजधानीच्या शहराकडे वळवीत होती.


गोदावरी ही दक्षिणेची गंगामाई समजली जाते. पावसाळ्यात नदीला पूर यायचा. पैठण हे गाव गोदावरीच्या पात्रापासून बरेच उंचावर असूनही पुराचे पाणी गावात शिरण्यापर्यंत वाढत जावयाचे. पाणी यायचे, डोळ्यादेखत वाहून जायचे. त्या प्रचंड पात्रावर बंधारा बांधावयाचा विचार निझामी राजवटीने कधीही केला नाही. बंधारा बांधला जाऊ शकत नाही असे सांगण्यात आले. आजचे जायकवाडी धरण त्या महाभागांनी पाहिले तर त्यांची त्यांनाच त्यांच्या अज्ञानाची जाणीव होईल; तसेच जात्यंधतेच्या कैफाने बेभान बनलेल्या निझामी राजवटीचा, मराठवाडा विभाग आणि त्यात जेमतेम जगू शकलेल्या हिन्दू मराठी भाषिकांबाबतचा आकस किती खोलवर गेलेला होता हे समजू शकेल.

निझामी राजवटीने आपल्या चालढकल पद्धतीचा वापर करीत करीत बरेचसे होयबा पदरी बांधून जखडून ठेवले. हिन्दू मुसलमानात दरी निर्माण केली आणि निर्माण केलेल्या दरीचा फायदा घेत घेत या ना त्या कारणाने दहशतीचे गढूळ वातावरण निर्माण करून संस्थानातील नागरिकांचे, नागरिकत्वाचे हक्क हिरावून हुकूमशाही पद्धतीचा अमल सुरू केला. लोकशाही भाषण, मुद्रणाच्या हक्कावर गदा आणली. सामान्य नागरिकांना, ते जणू खुल्या कारागृहात राहात आहेत असे वातावरण निर्माण केले आणि हिन्दू मराठी भाषिक नागरिकांना बंदिवानासारखेच जीवन कंठावयास भाग पाडले. हैदराबाद संस्थानातील मराठवाडा विभागाच्या मुस्लिमेतर नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची राखरांगोळी केली जात होती. स्त्रियांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जात होती. त्यावेळी मराठवाड्यातील लोकांच्या बचावासाठी, संरक्षणासाठी शेजारी म्हणूनही, कोणी मदतीसाठी फिरकला नाही. "नित्य नवनव्या संकटांचा मारा सहन करीत करीत मराठवाड्याचा शेतकरी शेतमजूर बनला, कर्जबाजारी बनला; त्याचे सर्वस्व हिरावून घेतले गेल्याने तो भयंकर हताश आणि अस्थिर बनत गेला. पोटावर आणि पाठीवर शासनाचे वार सहन करीत

अनुक्रमणिका




कै. स्वामी रामानंद तीर्थ



कै. गोविंदराव नानल




कै. आ. कृ. वाघमारे



कै. माणिकचंद पहाडे

अनुक्रमणिका



कै. कर्वे गुरुजी



श्री. गोविंद्भाई श्रॉफ



कै. स. कृ. वैशंपायन



श्री. विनायकराव चारठाणकर

अनुक्रमणिका

करीत त्याचे पोट पाठीला टेकले. त्याचे दणकट आणि पीळदार शरीर चिपाडासारखे झाले. आता तोच हाडकुळा शेतकरी निर्धाराने पाय रोवून उभा ठाकला आहे. आता तो हातचे गमावलेले आपले सर्वस्व परत हस्तगत केल्याशिवाय झोपायचा नाही."  अशाच आशयाचे एक झणझणीत पत्रक औरंगाबादेतील बोटावर मोजता येतील अशा राष्ट्रीय विचारांच्या नागरिकांनी १९३७ च्या महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनात परतूड येथे उपस्थितांना सादर केले होते. त्या काळात चार भिंतीच्या आवारात बोलायला, शोकसभा घ्यायला परवानगी घ्यावी लागत होती. शासनकर्त्यावर टीकाटिप्पणी करणाऱ्यांना सरळ कारागृहात डांबले जायचे. आजच्या लोकशाहीच्या काळात कोणालाही काहीही बोलता येते. स्वैराचारी, स्वातंत्र्यवादी, मनमुराद वायफळ गप्पागोष्टी भर रहदारीच्या रस्त्यावर कर्णे लावून सांगतात. जे बोलतात तेच शेतकऱ्यांचे खरे कैवारी असल्याचा आभासही निर्माण करतात. शासनकर्त्यांवर कोरडे ओढल्याचे नाटक रंगवितात. मनाला वाटेल तेवढी टीकाटिप्पणी करतात. शेतकरी रस्त्यावर आला असल्याचेही बेगुमानपणे सांगतात. 'जेल भरो' आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याचे जाहीर करून सभा, मेळावे, सम्मेलने, अधिवेशने गाजवितात. आजच्या वृत्तपत्रांना असाच मालमसाला हवा असतो. वृत्तपत्रे भडक मथळे छापून आपला खप वाढविण्यासाठी खटपट करतात. योगायोगाने महाराष्ट्र राज्याचे बहुतेक मंत्री शेतकरी मंडळीपैकीच आहेत. त्याशिवाय त्यांना निवडून देणारेही बहुजन समाजाचे शेतकरीच अधिक प्रमाणात आहेत; याचाच सर्वांना विसर पडलेला दिसतो.

निझामावर ब्रिटिशांची विशेष मेहेरनजर होती. देशातील इतर सर्व संस्थानांत हैदराबाद संस्थानाला व संस्थानिक निझामाला महत्त्वाचे व आगळे स्थान देण्यात आले होते. त्यात हैदराबाद संस्थान इतर संस्थानांपेक्षा बरेच मोठे होते; तसेच गर्भश्रीमंतही होते. हेन्री फोर्डच्या पाठोपाठ हैदराबादचे निझाम जगात तिसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत गणले जात होते. अशी पार्श्वभूमी असताना हैदराबादचे निझाम साध्या फकिरासारखा वेष परिधान करून जनतेवर आपल्या साधेपणाची निराळी छाप बसवू पाहात होते. निझाम मीर उस्मान अली स्वभावाने अतिशय कद्रू आणि पैशाचे भयंकर लोभी होते. 'किंग कोठी' या नावाच्या त्यांच्या महालातील निरनिराळ्या फळांच्या फोडी, राजधानीतील नबाब, जहागीरदार, मनसबदार व श्रीमंत नागरिकांकडे ते भेट म्हणून पाठवीत असत आणि त्यानी अपेक्षित केल्याप्रमाणे सोन्याच्या गिन्या परतभेट म्हणून त्यांच्याकडे पाठविल्या जात. निझामाने त्यांच्या कद्रू स्वभावाला अनुसरून फळांच्या फोडी पाठवावयाच्या आणि फोडी स्वीकारणारे महाभाग त्याबद्दल स्वतःला धन्य आणि भाग्यवान समजायचे कारण निझामाची कृपादृष्टी त्या सर्वांना हवी होती. राजाश्रय मिळावा यासाठी अनेक महाभाग धडपडत असत. निझामाचे कायमचे आश्रित बनून मानमरातबाचे किताब मिळविण्यासाठी अनेक धडपडत होते. निझामाने त्याची सत्ता सदासर्वकाळ अबाधित राहावी यासाठी अनेक 'जी हजूर', 'मुनासिब है', 'रियाया बहोत खूष है' असे सांगणारेच दावणीत जखडून ठेवले होते. निझामाच्या राजवटीने काहीही केले तरी ते खपवून घेतले जाईल याची जाणीवपूर्वक खबरदारी घेतली जाई. निझामाला अल्लाचाच अवतार म्हणेपर्यंत अनेकांनी मजल मारली होती. निझामाने आपल्या राजवटीद्वारे संस्थानच्या सर्वच्या सर्व जिल्ह्यांचा महसूल हैदराबाद या राजधानीच्या शहराला वैभवसंपन्न आणि अफलातून बनविण्यासाठी खर्च केला. त्याच हैदराबाद शहरात आपापल्या भव्य आणि अलिशान प्रासादात धुरीण मंडळी सुखासमाधानाने झोपा काढीत होती. त्यांना हव्या असलेल्या सर्व सुखसोयी निर्माण केलेल्या होत्या.

हैदराबाद या राजधानीच्या शहराखालोखाल मराठवाडा विभागाचा औरंगाबाद जिल्हा इतर जिल्ह्यांपेक्षा महत्त्वाचा आणि मोठा गणला जात असे. औरंगाबाद शहरापासून सुमारे १८ मैलाच्या अंतरावर

खुलदाबाद नावाचे गाव उंच पठारावर आहे. त्या पठारावर औरंगजेब, मलिकंबर, निझामाचे पूर्वज आणि सूफी पंथाच्या मुसलमान संतांच्या कबरी आहेत. स्वर्गासारख्या वाटणाऱ्या रमणीय पठारावर निझामाने स्वतःसाठी, आपल्या वंशजासाठी अधूनमधून हवापालटाप्रीत्यर्थ एक मोठे विश्रामालय बांधले होते. त्या विश्रामालयांत ब्रिटिशांची शानदार सरबराई करण्यात पाण्यासारखा पैसा खर्च केला जात होता. मात्र औरंगाबाद जिल्हा व शहराचा मागासलेपणा जसाचा तसा, जेथल्या तेथे होता. 'औरंगाबाद शहर एक नगीना; नीचे मट्टी ऊपर चूना।' असे म्हटले जात असे ते यामुळेच! औरंगाबाद शहराचे व जिल्ह्याचे नाव मोठे होते; ऐतिहासिक परंपरा होती; तरी शहर, जिल्हा व तेथे वस्ती करून राहणारी प्रजा सर्वस्वी दुर्लक्षिलेली होती. ग्रामीण भागातील सर्वसाधारण जनता पूर्वापार काळापासून चंद्रमौळी झोपड्यातच, खुराड्यासारख्या निवाऱ्यातच राहात होती. सर्वसाधारण खेडूत लोकांची हरप्रकारे भरपूर उपेक्षा केली जात असे. राज्यकर्त्यांना त्याचा विचार करण्याइतका वेळ नव्हता आणि तशी तातडीची गरजही भासत नव्हती. राज्यकर्ते कधीकाळी खेडेगावात गेले नाहीत. एकतर तेथे जाण्यायेण्यासाठी धड रस्ते नव्हते आणि सर्व ठीकठाक असल्याचे सांगितले जात असल्याने तेथवर ते राज्यकर्ते कधीही गेले नाहीत, त्यांना जाऊ दिले नाही. संस्थानाच्या कानाकोपऱ्यात जे काय घडत होते त्यातले बरेचसे राजधानीत राहाणाऱ्या जागरूक म्हणविणाऱ्यांच्या कानावर जात होते; या ना त्या प्रकारे ते कळत होते. ऐकलेल्या आणि समजलेल्या गोष्टींची प्रथम चीरफाड करून त्यात किती तथ्य आहे हे पडताळून पाहिले जायचे आणि त्यात फारसे तथ्य नसल्याचा निर्वाळा त्यांच्या त्या प्रासादात बसल्याबसल्याच दिला जायचा.

नागरिक स्वातंत्र्य व जबाबदार राज्य पद्धतीच्या मागणीला बड्या बड्या नेमस्त, पुढारी म्हणून मिरवणाऱ्यांची व सरकारधार्जिण्यांची साधी सहानुभूतीही मिळत नव्हती. उलट कडवा विरोध आणि संघर्षाचा पवित्रा अंगिकारण्याबाबत बोलणाऱ्या मोजक्या लोकांची टिंगल उडविली जात असे; भरपूर निंदानालस्ती केली जात असे. शेजाऱ्यांना शेजारच्या घरात काय काय घडत होते याची कल्पनाही नव्हती. विरोध व संघर्ष मोजक्या लोकांना स्वतःच्या बळावर उभा करावा लागणार होता. परिस्थिती सारखी बिघडत आणि चिघळत चालली होती. मृतांच्या टाळूवरचे लोणी चाटणारे आपापल्या पदरात जे काय पडेल ते पाडून घेण्याच्या विचारात गुरफटलेले होते. देशभक्त म्हणवून घेण्यापेक्षा देशद्रोही म्हणून का होईना आपापली तुंबडी भरणारे महाभाग चुगलखोरीचा धंदा करीत होते. बड्या बड्या धुरीणांना, कायदेपंडितांना संघर्षाचा पवित्रा मान्य नव्हता; मानवत नव्हता. त्यांचीच री ओढणारे मराठवाडा विभागातही ठाण मांडून बसलेले होते. निझामी राजवटीचे कारभारी त्यांच्या पाशवी शक्तीच्या कैफाने बेभान बनले होते. शिवाय संघर्षाचा पवित्रा घेणाऱ्यांना मुंगीसारखे चिरडून टाकता येईल असे अनुमान राज्यकर्त्यांनी बांधले होते. हिंदू आणि मुसलमानांत सलोख्याची हवा विरून गेली. मुसलमान मंडळी हिंदू लोकांना उघड उघड 'काफिर' म्हणू लागली. वैमनस्य वाढीला लागले. हैदराबाद संस्थानचा राजा-मुसलमान आहे म्हणून तो हिंदू लोकांना नको, अशा कंड्या पिकविल्या जाऊ लागल्या. 'इस्लाम खतरेमे है' अशीही आरडाओरड सुरू करण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थांचे नाव कोणीही उच्चारू नये असे काही तरी करावयाचे धोरण निश्चित करण्यात आले व हैदराबाद शहराच्या अबिद्‌रोडवरील ज्येष्ठ आणि तरबेज विधिज्ञ रामाचारी यांच्यावर ही कामगिरी सोपविण्यात आली.

अशा प्रकारे स्वामी रामानंद तीर्थ, हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे असामान्य शिल्पकार आणि त्यांच्या निकटवर्ती सहकाऱ्यांची जीवघेणी निंदानालस्ती, बदनामी, नामुष्की करण्याच्या कारभाराला विधिज्ञांच्या सल्लामसलतीने प्रारंभ करण्यात आला. त्यापाठोपाठ स्वामीजी महात्मा गांधीचे सच्चे आणि कट्टर अनुयायी

असतानाही स्वामीजी व त्यांचे अत्यंत निकटवर्ती गोविंदभाई छुपे कम्युनिस्ट आहेत असा बोलबाला जाहीर सभेतून सुरू झाला. वृत्तपत्रांतून त्या वृत्ताला वारेमाप प्रतिसाद देण्यात आला.

अनुक्रमणिका

# सशस्त्र लढा

मोरार बागेत हैदराबाद स्टेट काँग्रेसचे मध्यवर्ती कार्यालय होते. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कृति-समितीचे सदस्य व अन्य कार्यकर्ते श्री. गोविंदभाई, भाऊसाहेब वैशंपायन, आनंदराव वाघमारे, बाबासाहेब परांजपे, दिगंबरराव बिंदू, डॉ. मेलकोटे कार्यालयाच्या आवारातच राहात असत अथवा जाऊन येऊन तेथे असत. अधूनमधून श्री. राघवेंद्रराव दिवाण, विश्वंभरराव हराळकर, काशीनाथ जाधव, नारायणराव जोशी इत्यादीही येत जात असत. श्री. भाऊसाहेब वैशंपायन मुंबई शहरातील काही विश्वासू लोकांच्या सक्रिय सहकार्याने एका अज्ञात ठिकाणी ट्रान्समीटरद्वारे हैदराबाद लढ्याच्या बातम्या प्रसारण करण्याचे काम पार पाडीत असत. श्री. पद्माकर लाटकर त्यांचे मदतनीस म्हणून काम करायचे.

निझामी शासनाने हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना, विद्यार्थ्यांना, गावकऱ्यांना घाबरवून टाकण्यासाठी पाशवी प्रकारचा नंगानाच सुरू केला होता. निझामी शासनाचे पोलिस, मुसलमान, गावगुंड, मुसलमान निर्वासित आणि रझाकारांचा गणवेश परिधान केलेले जात्यंध मुसलमान हिंदू लोकांवर शस्त्रे उपसून हल्ल्यावर हल्ले करीत होते. जनमानसात घबराट निर्माण केली जात होती. खेडेगावात, तालुक्याच्या गावात, जिल्ह्याच्या शहरात हिंदू लोकांजवळ त्यांची संरक्षक हत्यारे नव्हती; त्यामुळे बहुतेक वेळा हिंदू लोकांना स्वतःचा बचाव करणेही अवघड होई. मुसलमान समाजाचे गावगुंड, पोलिस, रझाकार, निर्वासित हिंदू लोकांच्या रक्ताच्या पिपासेने झपाटलेले असल्याचे दिसत होते.

'काफिर है। देखते क्या? चलाव कत्ता।' असे व अशाच आशयाचे शब्द सर्रास कानावर आदळत होते. काही तडफदार लोकांना प्रतिहल्ला करावा, दोन हात करावेसे वाटत असे; मात्र हत्याराशिवाय व वरिष्ठांच्या पाठिंब्याशिवाय मनातले विचार प्रत्यक्षात आणता येत नव्हते. अत्याचार तरी किती सहन करायचे असे कितीतरी लोकांना वाटू लागले होते. सरहद्दीवरील गावकरी, महिला आणि इतर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिहल्ले करणे आवश्यक बनले होते. आवश्यक हत्यारे सहजासहजी बाजारात तर मिळत नव्हती. स्वयंचलित शस्त्रे मिळविण्याचे काम मोठ्या जिकिरीचे होते. श्री. बाबासाहेब परांजपे, श्री. दिगंबरराव बिन्दू निरनिराळ्या लोकांबरोबर अहोरात्र संपर्क साधण्याचे कामात गुरफटलेले होते. स्वयंचलित शस्त्रांचा वापर कसा करायचा याबाबतचे शिक्षण मिळणे जरूरीचे होते. महत् प्रयासाने स्वयंचलित हत्यारे, गनस्लॅब, हॅन्डग्रेनेड, डिटोनेटर इत्यादींचा वापर कसा करावयाचा याचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. मी व माझ्यासमवेत इतर काही तरुणांनी तज्ज्ञांच्या देखरेखीखाली रीतसर शिक्षण घेतले; माहिती मिळविली. हत्यारातला खरेखोटेपणा तडकाफडकी समजू शकेल इतकी माहिती मात्र बहुतेकांना नव्हती. बनावट हत्यारांचा सुळसुळाट होता. असली हत्यार म्हणून ठासून सांगून सपशेल फसवाफसवीही केली जात असे. त्यात हत्यारे देण्याच्या व घेण्याच्या वेळा रात्रीच्याच असायच्या. रात्रीच्या गडद अंधारात हत्यारांची देवाणघेवाण करावी लागे. हत्यार मिळविताना एकट्यालाच जावे लागे. हत्यारांची खरेदी करताना जीव धोक्यात घालूनच जावे लागायचे. हत्यारे मिळविण्याचे जिकिरीचे काम मला झेपेल का? याबाबत एकटाच माझ्या मनाशी मी विचार करू लागलो. 'जमले नाही तरी जमवून घेऊ' असे मी मनात ठरविले आणि हत्यारांच्या खरेदीच्या कारभारात स्वतःला झोकून देण्याचा निश्चय केला. हत्यारे खरेदीबाबत व त्याचा वापर करण्याबाबत बोलता बोलता, मुंबई शहरात, गेटवे

अनुक्रमणिका

ऑफ इंडिया पासून तो वसईच्या खाडीपर्यंतचा पुष्कळसा भाग, बोरीबंदर पासून ठाणे कल्याण पर्यंतचा भाग, खंडाळा, लोणावळा, खडकी व पुणे शहराचा पनवेलपर्यंतचा भाग, पुणे-दौंड-अहमदनगरचा भाग, तसेच नागपूर—जबलपूर, बंगलोर इत्यादी ठिकाणाबाबत जाण्यायेण्याबाबतची माहिती; बोलण्याच्या भरात माझ्या तोंडातून श्री. भाऊसाहेब वैशंपायन यांनी वदवून घेतली. माझ्यावर जबाबदारी टाकलीच तर मी कशी पार पाडू शकेन याबाबात पोलिसांच्या उलटसुलट तपासणीच्या पद्धतीने विचारपूस केली. हत्यारांबाबत जवळपास रोज तास, अर्धातास श्री. वैशंपायन बोलत असत. मी माझा हट्ट, निश्चय कितीदा जरी बोलून दाखविला तरी प्रत्यक्ष हत्यार खरेदी करण्याचे काम दिले गेले नव्हते. त्यावरून काही लोकांना माझ्या प्रामाणिकपणाचा संशय तर नाही ना येत? असे माझे मलाच वाटू लागले. जेलमधून बाहेर पडल्यावर, काही तरी विशेष असे आपण करू असे मला वाटत असे. दहा दिवस मी रिकामटेकडा नुसता बसून होतो. माझी मलाच माझ्या रिकामटेकडेपणाबद्दल शिसारी येऊ लागली. अकराव्या दिवशी दुपारच्या जेवणानंतर श्री. वैशंपायन यांना गाठून विचारले, 'भाऊसाहेब, आता मला काम सांगा. बसून व पडून राहाण्याचा मला मनस्वी कंटाळा आला आहे.'

'शंकरभाई, हत्याराचे काम तुम्ही समजता तेवढे सोपे नाही.' श्री. वैशंपायन म्हणाले.

'सोपे नाही, अवघड आहे यात संशय नाही. माझ्याबाबत तुम्हाला संशय वाटतो का?' असे मी विचारताच भाऊसाहेब म्हणाले, 'तुमच्याबद्दल, तुमच्या कामाच्या जिद्दीबद्दल आमच्यापैकी कोणालाच संशय नाही. जरा सबूर करा. मी एकदोन दिवसात पाठवतो तुम्हाला हत्यारांच्या मोहिमेवर.'

इतक्यात श्री. नागोराव पाठक, शेंदुर्णी व देऊळगाव राजा कॅंपला किमान संरक्षणासाठी स्वयंचलित हत्यारांची गरज असल्याचा निरोप घेऊन मोरार बागेत दाखल झाले. हत्यारांची गरज लक्षात घेता अवघ्या दोन तासांनी, नाशिक शहरात औरंगाबादकरांचा पत्ता, पत्र व आवश्यक तेवढी रक्कम श्री. नागोराव पाठक यांच्या हवाली केली गेली आणि त्यांना नाशिकला जाण्यासाठी रवाना करण्यात आले. मला का पाठवले नाही; असे मी मनाशी बोलू लागलो. दोन दिवस वाट पहावयाचे मी ठरविले. औरंगाबादकरांच्या निरोपाप्रमाणे हत्यारे घेऊन श्री. नागोराव पाठक दुसऱ्या दिवशी किमान सायंकाळपर्यंत यायला हवे होते; मात्र ते आले नाहीत. पाच दिवसांनी श्री. नागोराव पाठक परत आले असल्याचे मला समजले. त्यांना शस्त्रे मिळू शकली नाहीत. मनमाड कॅम्पवर मला एका विशेष कामानिमित्त पाठविण्यात आले होते. त्यावेळी माझी तेथील छायाचित्रकार श्री. ठाकूर यांची अचानक गाठभेट झाली. त्यावेळी हैदराबाद लढ्याबाबत मी बरीच माहिती सांगितली. हत्यारे आवश्यक आहेत व ती मिळविण्यासाठी आमचे नेते सारखी धडपड करीत आहेत असेही श्री. ठाकूर यांना सांगितले. येवला येथे श्री. गंगाराम छबिलदास या नामवंत धनवान पेढीचे श्री. त्रिभुवनदास पटेल, गुजराथी यांच्याजवळ मध्यम आकाराच्या बुलेटची एक स्वयंचलित रायफल आहे व ती त्यांना विकावयाची आहे असे समजल्याचे मी सांगितल्यावर त्यांनी मला विचारले, 'विकत घ्यायची आहे का ती रायफल तुम्हाला?'

'हो. ती रायफल चांगल्या स्थितीत असेल तर तडकाफडकी घ्यायची आहे.' असे मी श्री. ठाकूर यांना सांगितले.

अनुक्रमणिका

'ठीक आहे. मी ती रायफल योग्य किंमतीत मिळवून देतो. तुम्ही रकमेची व्यवस्था करा.' असे श्री. ठाकूर यांनी मला आश्वासन दिले. दोन तासानंतर मी व ठाकूर येवल्याला गेलो. मी माझे स्नेही श्री. प्रभाकर गुप्तेकडे थांबलो. एक तासाने श्री. ठाकूर यांनी ती रायफल अत्यंत सावधगिरीने आमचे स्नेही श्री. ठाकोरभाई पटेल यांच्या घराच्या खोलीत दाखविली. मी रायफल तपासून घेतली. रायफलचा सौदा आठशे रुपयात पटला व रायफल मिळाली. मी माझे बेडिंग घेण्यासाठी श्री. प्रभाकर गुप्ते यांच्या घरी गेलो. श्री. प्रभाकर गुप्ते येवला काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. श्री. गुप्ते यांच्या घराचे दार बंद करून त्यांच्या स्वयंपाकगृहात बुलेट्ससह रायफल मिळाल्याचे त्यांना सांगीतले.

'ठीक केलं. रायफल विश्वासातल्या घरातली आहे. मात्र ती व बुलेट्स सावधगिरीने न्या.' असे श्री. प्रभाकर गुप्ते म्हणाले.

मी माझे बेडिंग घेऊन श्री. ठाकोरभाईंच्या घरात गेलो. आतल्या खोलीत श्री. ठाकोरभाई, श्री. ठाकूर व मी इतकेच होतो तरी सावधगिरी म्हणून खोलीचे दार आतून बंद केले. मी माझे बेडिंग मोकळे केले. माझ्या कपड्यात ती रायफल गुंडाळली व बेडिंगमध्ये ठेवली. बेडिंग व्यवस्थित बांधले आणि सायंकाळच्या गाडीने मनमाड रेल्वे स्टेशन गाठले. दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता श्री. माणिकचंद पहाडे हे नांदगाव येथून मनमाडला आले. तेव्हा काल रात्री आणलेली रायफल बुलेट्ससह त्यांच्या स्वाधीन केली. दुसऱ्या दिवशी सकाळच्या पहिल्या गाडीने नाशिकला गेलो. औरंगाबादकरांचा पत्ता ऐकलेला होता. त्या आधारे त्यांना त्यांच्याच घरी गाठले. स्वयंचलित हत्यारांबाबत बोललो. त्यांच्या घरीच त्यांच्यासमवेत जेवलो व मग आम्ही दोघे देवळालीला गेलो. देवळालीच्या एका अधिकाऱ्याची व त्यांची चांगली गट्टी होती. त्या अधिकाऱ्याची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. त्या अधिकाऱ्याला त्याचे स्वयंचलित पिस्तूल व चांगल्या स्थितीतले बरेचसे कपडे विकावयाचे होते. योगायोग चांगला जुळून आला होता. पिस्तूल सहा बोअरचे होते. उलनचे कपडे अगदी नव्याने शिवलेल्या कपड्यांसारखेच दिसत होते. २ कोट, ६ पँट्स, पिस्तूल ४८ बुलेटसह दोन हजार रुपयाला विकायला ते अधिकारी तयार होते. औरंगाबादकरांनी ओढाताण करून पंधराशेत सौदा पटविला. त्या अधिकाऱ्याला शंभराच्या पंधरा नोटा दिल्या. सामानाचे बोचके घेऊन मी औरंगाबादकर यांच्यासमवेत त्यांच्या घरी आलो. पिस्तूल रुमालात गुंडाळले व आतल्या बनियनच्या खिशात ठेवले. बुलेट्स कागदाच्या पाकिटात बंद करून कोटाच्या खिशात ठेवल्या. बाकीच्या कपड्यांचे गाठोडे बांधून झाल्यावर इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी करताना, 'श्री. नागोराव पाठक, श्री. वैशंपायन यांचे पत्र घेऊन तुमच्याकडे आले होते का?' असे मी श्री. औरंगाबादकरांना विचारले. तेव्हा श्री. ओरंगाबादकर म्हणाले, 'हो. नागोराव पाठक आले होते. श्री. पोतनीस यांना भेटून येतो असे सांगून गेले; मात्र परत आलेच नाहीत. तुमची त्यांची भेट झाली होती का?' असेही त्यांनी मला विचारले. 'हो. ओझरती भेट झाली; मात्र सविस्तर बोलणे झाले नाही.' असे मी चटकन सांगितले. रात्रीच्या जेवणाची वेळ झाली होती. त्यांच्या आग्रहाखातर मी त्यांच्याच घरी जेवलो आणि रात्रीच्या गाडीने मनमाड गाठले. बरोबर आणलेले कपड्यांचे गाठोडे मी माझ्या उशाशी घेऊन झोपलो. सकाळी लवकर जाग आल्याने मी तोंड धुतले. कपड्याचे गाठोडे कु. कुसुम जोशीजवळ दिले. परत येईपर्यंत सांभाळण्याबाबत विनंती केली अन् मुंबईला जाण्यासाठी गाडी गाठली.

मुंबईला पोहोचल्यावर मोरार बागेत गेलो तेव्हा बहुतेक लोक जेवावयाला जाण्याच्या गडबडीत होते. त्या मंडळींबरोबर मीही जेवण घेतले. मोरार बागेत परत आलो. मी, भाऊसाहेब वैशंपायन यांना संडास, स्नानगृहाच्या बाजूला नेले व आतल्या बनियनच्या खिशात रुमालात गुंडाळलेले पिस्तूल त्यांना दिले. स्नानगृहाचे दार आतून बंद करून त्यांनी ते पिस्तूल निरखून पाहून घेतले. बाहेर आल्यावर 'सौदा किती रकमेत मिटला?' असे श्री. वैशंपायन यांनी विचारले. 'पंधराशे. सोबत चाळीस बुलेट्स आणि वापरता येतील असे गरम कपडेही आहेत.' मी सांगितले.

'मग हा व्यवहार चांगला झाला आहे.' असे श्री. वैशंपायननी सांगितले आणि बुलेट्सचे पाकिट माझ्याकडून मागून घेतले. त्यानंतर मनमाड कॅम्पच्या पैशांनी येवल्याहून ४८ बुलेट्ससह मध्यम रायफल मिळविल्याचे व ती रायफल बुलेट्ससह श्री. माणिकचंद पहाडे यांच्या स्वाधीन केल्याचेही मी श्री. वैशंपायन यांना बजावून सांगितले. त्या दोन कामगिऱ्यांमुळे मी हत्यारे गोळा करण्याच्या कामात चांगली कामगिरी पार पाडू शकेन असा विश्वास मी श्री. भाऊसाहेब वैशंपायन यांच्या मनात रुजवू शकलो; असे मला दोन दिवसानंतर प्रत्यक्ष दिसून आले.

सायंकाळच्या पाच वाजता श्री. वैशंपायन मला बरोबर घेऊन घोड्याच्या बग्गीतून मलबार हिल हँगिंग गार्डनला घेऊन गेले. अर्धा तास त्यांनी मला बागेत फिरविले. मात्र तोंडावाटे एक शब्दही बोलले नाहीत. त्यांना मला काहीतरी सांगावयाचे होते. परंतु का कोण जाणे त्यांच्या तोंडातून शब्द बाहेर पडेनात. शेवटी मी बोललो, 'भाऊसाहेब, आपण दोघांनी या बागेत असे किती वेळ फिरत राहायचे?' कसलातरी धक्का बसल्यासारखे ते दचकले. त्यानंतर त्यांच्याच इशाऱ्याने एका कोपऱ्यातील बाकड्यावर आम्ही बसलो.

'शंकरभाई, आपल्याला हवी तशी उपयुक्त हत्यारे सहजासहजी मिळत नाहीत. मिळालीच तर सुखरूप आणता येत नाहीत. कधीकधी तर मिळालेल्या हत्यारांसमवेत, हत्यार मिळविणाऱ्यासही पोलिसाच्या तावडीत जावे लागते; तर कधी निव्वळ बनावट हत्यारे गळ्यात बांधली जातात. आपल्या विभागातील परिस्थिती सारखी बदलत आहे. निर्वासित, रझाकार सारखी घबराट निर्माण करीत आहेत. नागरिकांचे मनोधैर्य खचू नये यासाठी प्रतिहल्ले चढविल्याशिवाय गत्यंतर नाही. त्यासाठी सर्व प्रकारचे धोके लक्षात ठेवून हरप्रकारे हत्यारे मिळविणे अत्यंत निकडीचे बनले आहे.' इतके सारे त्यांनी मला एका दमात सांगितले. पाच मिनिटांच्या विश्रांतीनंतर श्री. वैशंपायन अत्यंत आत्मीयतेने आणि पोटतिडिकीने सांगू लागले. 'शंकरभाई, हत्यारे मिळवायला अगर मिळविलेले आणावयाला जेव्हा केव्हा तुम्ही जाल तेव्हा ज्या ठिकाणी जायचे सांगितले जाईल त्या ठिकाणच्या आजूबाजूस प्रकर्षाने डोळ्यात भरेलसे काय आहे? कोणत्या रंगाचे घर अगर दुकान आहे? झाड असेल तर ते कशाचे आहे? बाग असेल तर बागेत कशाकशाची झाडे आहेत? वगैरेसारख्या खाणाखुणा लक्षात ठेवत जा; म्हणजे त्याआधारे तुम्ही वाट चुकणार नाहीत आणि सुखरूप परत येऊ शकाल. पेचप्रसंग निरनिराळे रूप धारण करून, एकामागून एक वेगाने सामोरे येत आहेत. अनेक प्रकारच्या संकटांच्या फैरी आपल्यावर आणि आपल्यासभोवती झडत आहेत; मात्र आमचे शेजारी आमच्या मदतीसाठी त्यांच्या दाराबाहेर पडत नाहीत.' भाऊसाहेब वैशंपायन यांनी प्राप्त परिस्थितीचे खरेखुरे, वास्तव चित्र रेखाटले. त्यांनी केलेल्या सूचनांच्या आधारे मला किती तरी महत्त्वाचे काम करता आले. हत्यारे मिळविण्याच्या कामात मला जी वाटचाल करता आली, यश मिळविता आले त्याचे सर्व श्रेय श्री. भाऊसाहेबांना देणे मी माझे परम कर्तव्य समजतो.

अनुक्रमणिका

लोणावळ्याच्या रेल्वे स्टेशनलगतच्या ओसाड पडलेल्या माळरानात एका अज्ञात इसमाकडून स्टेशनलगतच्या भागात सुमारे दोन हजार बुलेट्स सहज आणि सुलभतेने मिळू शकतात असा तातडीचा निरोप, पुण्यातील एका विश्वसनीय व्यक्तीकडून श्री. वैशंपायन यांना मिळाला होता. स्टेनगनच्या बुलेट्स लोणावळ्याहून आणावयासाठी मलाच पाठवावयाचे असे श्री. वैशंपायन यांनी ठरविले. श्री. वैशंपायन यांनी प्रथम मला लोणावळ्याची ठळक माहिती सांगितली. 'गुरुकुल' च्या उजव्या बंगल्याच्या फाटकाजवळ मी रात्री दोन वाजता निव्वळ दगडासारखे उभे रहायचे. बंगल्याच्या आवारात दिवा लागल्यासारखे तुम्हाला दिसेल. त्यानंतर 'तुम्ही कोण? तुमचे नाव काय?' विचारले जाईल. तेव्हा, तुम्ही 'मी चंद्रशेखर शर्मा इतकेच सांगायचे.' त्यानंतर एक माणूस बंगल्याचे दार उघडून बाहेर येईल व तो तुम्हाला एक वजनदार थैली देईल. ती थैली डाव्या हाताने घ्यायची व उजव्या हाताने त्या माणसाच्या डाव्या हातात एक पाकीट द्यायचे. त्यानंतर तुम्ही तडक रेल्वे स्टेशन गाठायचे व मुंबईला यायचे. 'ठीक? जमेल?'

'जमेल' इतकेच मी बोललो.

'उद्या रात्री तुम्हाला लोणावळ्याला पोहोचावयाचे आहे.' चटकन् श्री. वैशंपायन मला उद्देशून म्हणाले.

'भाऊसाहेब, या कामात मदतनीस म्हणून 'हिंदुस्थान' ला घेतलं तर चालेल का?' मला मदतनीस हवा म्हणून मी विचारले.

'चालेल, परंतु त्यासाठी एक व्यक्ती ऐवजी दोन व्यक्ती येत असल्याचे कळवावे लागेल.' श्री. वैशंपायन यांनी थोडीशी अडचण पुढे ठेवली.

"कळवाल तर बरे होईल, सोयीचे होईल. म्हणतात ना 'एक से दो भले'." मला जे सांगता येणे शक्य होते ते सर्व खुल्या मनाने सांगून झाल्यावर "मी आता मनमाडला जातो, तेथून 'हिंदुस्थान'ला बरोबर घेऊन ठरल्याप्रमाणे लोणावळ्याला त्या व्यक्तीकडे जातो" . असे मी म्हणालो व निघालो.

श्री. भाऊसाहेब वैशंपायन यांनी दिलेले पाकीट मी माझ्या कोटाच्या आतल्या खिशात व्यवस्थित ठेवले आणि बोरीबंदर स्टेशन गाठले. मनमाडचे तिकिट काढून गाडीच्या डब्यात पाय ठेवला तोच गाडी सुरू होणार असल्याबद्दल शिटी कानावर आदळली. रात्री तीनच्या सुमारास मी मनमाडला पोहोचलो. स्टेट काँग्रेसच्या कार्यालयात गेलो; तेव्हा नेहमीप्रमाणे 'हिन्दुस्थान' पडल्या पडल्याच जोरजोराने हसत खिदळत बोलत होता. मला पहाताच त्याने त्याचे बोलणे आवरते घेतले आणि मला झोपण्यासाठी जागा मोकळी करून दिली. सतरंजीवर अंग टाकताच झोप केव्हा लागली ते माझं मलाच कळाले नाही. नेहमीप्रमाणे मी सकाळी लवकर उठलो. तोंड-हात पाय धुतल्यावर चहा घेताना मी 'हिन्दुस्थान'ला उठविले आणि त्याला सांगितले, " हे पहा, 'हिन्दुस्थान', तास दीड तासात तुला घेऊन मला एका महत्त्वाच्या कामासाठी बरेच लांब जायचंय." हिन्दुस्थानने त्याच्या शरीराला आळेपिळे दिले अन् तो ताडकन् माझ्यासमोर उभा राहिला. जवळच्या माठातील पाण्याने त्याने गुळणी भरली, चुना-तंबाखूची भुकटी तोंडात कोंबली अन् लघवी करण्यासाठी तो बाहेर पडला. अर्ध्या तासात बाहेर जाण्यासाठी तो तयार झाला. मनमाड-दौंड-पुणे मार्गे लोणावळा की मनमाड-कल्याण मार्गे

लोणावळा या विचारात मी थोडा गुरफटलो होतो. दौंड मार्ग थोडा रखडपट्टीचा अन् कंटाळवाणा होता. कल्याण मार्ग झटापटीचा होता. शिवाय दिवसा जाऊन करायचे तरी काय? तेथे किती, कोठे कोठे भ्रमंती करायची? या प्रकारचे विचार डोक्यात घोळत होते.

माझ्या जिवाच्या बऱ्या वाईटाबद्दल मला जराही भीती वाटत नव्हती. मला भीती वाटत होती ती सोबत असलेल्या त्या अनामत रकमेची. ती रक्कम कारणी न लागता, मला अंधारात रात्रीच्या वेळी पाहून-गाठून माझ्या जवळून ती कोणी हिसकावून घेतली तर? म्हणून सावधगिरीसाठी वेडेवाकडे काही झाले अगर होऊ लागले तर जिवंत साक्षीदार म्हणूनच मी माझा स्नेही सहकारी हिन्दुस्थानला बरोबर घेतले होते. शिवाय तो दिसायला हडकुळा जरी होता तरी दिलदार व बिलंदर साथीदार होता. जीवाला जीव देणारा होता. त्याशिवाय तो जात सोडील परंतु साथ न सोडणाऱ्यांपैकीही होता. याबाबत मला बालंबाल खात्री होती. सकाळचे जेवण आम्ही दोघांनी थोडे उशिराच घेतले. दुपारच्या अडीच वाजताच्या भुसावळ-मुंबई या गाडीने आम्ही लोणावळ्याला जाण्यासाठी मनमाड सोडले. रात्री अकरा वाजता आम्ही कल्याणमार्गे लोणावळ्याला पोहोचलो. लोणावळा स्टेशनवर हॉटेलच्या कामगाराकडून गुरुकुलची आवश्यक ती माहिती हिन्दुस्थानने मिळविली होती; त्यामुळे रात्रीचा एक वाजेपर्यंत रेल्वे स्टेशनचा प्लॅटफॉर्म व चहाच्या दुकानाच्या आसपास फेरफटका मारीत मारीत वेळ कसातरी घालविला. श्री. भाऊसाहेब वैशंपायन यांनी सांगितलेल्या गुरुकुलच्या खाणाखुणा व हॉटेलच्या पोऱ्याने सांगितलेल्या खुणांची गोळाबेरीज करून आम्ही दोघे नेमक्या ठरल्यापैकी, ठरल्या ठिकाणी बंगल्याच्या फाटकाच्या दाराजवळ उभे राहिलो. बंगल्याच्या समोरच्या खोलीत दिवा लावला गेल्याने प्रकाश पडला.

'कोण आहे? कोण आहात तुम्ही? तुमचे नाव काय?' बंगल्याच्या आतूनच कोणीतरी बोलत होते, विचारीत होते.

'चंद्रशेखर शर्मा'.

'ठीक आहे, थांबा'.

पुन्हा तो दिवा मालवला गेला. बंगल्याच्या दारातून कोणीतरी बाहेर येत असल्याचे दिसू लागले. एकजण फाटकाच्या डाव्या बाजूकडे गेला व लगेच फाटकाजवळ आला. त्या व्यक्तीच्या अंगात पाश्चात्त्य पद्धतीचा गाऊन होता, त्या व्यक्तीने आपल्या उजव्या हातातली चांगली जड वजनाची एक पिशवी 'ही घ्या' म्हणून मला दिली. मी ती माझ्या डाव्या हातात घेतली. पिशवी बरीच जड असल्याने मला ती तोलता येणे बरेच अवघड बनल्याचे पाहून हिन्दुस्थानने त्याच्या दोन्ही हाताने ती उचलून धरली. मी माझ्या खिशातले पाकिट त्या व्यक्तीच्या हातात दिले. 'अच्छा' असे सांगून ती व्यक्ती बंगल्याकडे जाताना दिसली. ती जाडजूड, वजनदार पिशवी हिन्दुस्थानने आपल्या डाव्या खांद्यावर ठेवली अन् आम्ही दोघे हळूहळू लोणावळा स्टेशनच्या आवारात आलो. हवेत कमालीचा गारठा होता. हाताची बोटे गारठल्यासारखी वाटत होती. पण पिशवी खांद्यावर वाहून आणल्याच्या परिश्रमाने हिंदुस्थानला चांगलाच घाम आला होता. त्याने ती पिशवी बाकड्यावर हळूच ठेवली आणि तो चहा मिळविण्यासाठी चहाच्या दुकानाजवळ गेला तेव्हा दुकानदार चहाचे पाणी उकळीत होता. दुकानाची दोन पोरे कपबश्या स्वच्छ करीत होती. दुकानदाराने पाच मिनिटांत कपात गरम चहा ओतला. एका

अनुक्रमणिका

दमात हिन्दुस्थानने चहा घेतला. त्याला बरेच हायसे वाटले असावे. तोपर्यंत मी पिशवीवर हात ठेवून बाकड्यावर बसलो होतो. इतक्यात गाडी येत असल्याची घंटा वाजली. हिन्दुस्थानला मी मुंबईची तिकिटे काढण्यासाठी पैसे दिले. त्याने दोन तिकिटे आणली. तेवढ्यात धाडधाड आवाज करीत गाडी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर आली. आम्ही दोघे गाडीत चढलो. गाडी बोरीबंदर स्टेशनवर सकाळी अकरा वाजता आली. ती पिशवी घेऊन आम्ही दोघे टॅक्सी मोटारीतून मोरार बागेत गेलो. तेव्हा ती पिशवी हिन्दुस्थानच्या खांद्यावर होती. ती पिशवी कमालीची वजनदार असल्याने श्री. वैशंपायननी तात्काळ ताडले अन् ती खाली ठेवण्यासाठी त्यांनी हातभार लावला. पाच-सात मिनिटानंतर ती पिशवी घेऊन श्री. वैशंपायन बाजूच्या खोलीत गेले. त्यांच्या पाठोपाठ मी व हिन्दुस्थानही गेलो. श्री. वैशंपायन यांनी पिशवीचे तोंड उघडले व पिशवीत हात घातला तेव्हा खळखळ असा आवाज झाला. मुठीत भरतील इतक्या तांब्याच्या रंगाच्या कोऱ्या करकरीत, थोड्याशा लांबड्या आकाराच्या स्टेनगनच्याच गोळ्या असल्याचे दिसले. श्री. वैशंपायनांच्या तोंडावर आनंद झाल्याचे दिसले. त्यानंतर श्री. बाबासाहेब परांजपे व श्री. नागनाथ परांजपे यांनी त्या गोळ्या पडताळून पाहिल्या. सर्वांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेची छटा झळकली. माझ्यासमवेत आलेला हिन्दुस्थान त्यांनी जवळून पहिल्यानेच पाहिला.

आठ दिवसानंतर मला पुण्याहून डिटोनेटर, जिलेटिन, फ्यूज वायर व गनस्लॅब आणण्यासाठी पाठविण्यात आले. ते सर्व सामान देणारी व्यक्ती होती नारायणदत्त शर्मा. त्या व्यक्तीचे नाव व ठावठिकाणा श्री. बाबासाहेब परांजपे यांना भुलेश्वर विभागातील एका मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याकडून समजला होता. त्या व्यक्तीवर आतापर्यंत पुष्कळ वेळा दुर्धर प्रसंग आले होते. ती व्यक्ती निरनिराळ्या नावांनी आणि निरनिराळे वेष परिधान करून स्वयंचलित हत्यारे, निरनिराळी भयंकर स्फोटक द्रव्ये समाज कंटकांना देत असल्याचा सुगावा एका फितुराद्वारे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना लागला होता. पोलिस अधिकाऱ्यांनी अनेक प्रकारे खटपटी केल्या; वायरलेसचाही वापर केला; मिळालेल्या माहितीच्या आधारे त्या त्या मार्गावर मोटारी उभ्या केल्या; अनेक अडथळे उभे केले, मात्र ती व्यक्ती त्यांना पकडता आली नाही. महात्मा गांधी खून कटात तो सहभागी असल्याचे समजले होते आणि म्हणून त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी जंगजंग पछाडले; परंतु ती व्यक्ती पोलिसांच्या हाती लागली नाही. त्या व्यक्तीने आपल्यावर गुदरलेली एक चित्तथरारक कथा मला बोलण्याच्या ओघात सांगितली. श्री. शर्मा म्हणाले "एका नव्या करकरीत मोटारीतून भयंकर स्फोट उडवणारे साहित्य पुण्याहून मुंबईकडे नेले जात होते. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी मोटार अतिशय वेगाने चालवीत होतो. खंडाळा-लोणावळा विभागात आमच्या पाठोपाठ एकामागून एक जवळपास चार मोटारी भर वेगाने येत असल्याचे मला जवळच्या काचेत दिसले. मी मोटारीचा वेग आणखी वाढविला. वाढलेल्या आणि सतत वाढवीत ठेवलेल्या वेगामुळे मोटारीचा तोल धड सांभाळता येणे आवघड बनत चालले होते. वाटेल ते झाले तरी पोलिसांच्या तावडीत सापडावयाचे नव्हते. एका अवघड वळणावर येताच मी प्रसंगावधान साधून मोटारीचे दार उघडले आणि स्वतःला बाहेर झोकून दिले. माझा तोल गेला. खाचखळग्यातून सरपटत मी एका झाडाच्या बुंध्यावर जोराने आदळलो. माझ्या उजव्या हाताचे हाड मोडले. भयंकर वेदना झाल्या. शरीराच्या बऱ्याच भागावर बरेच खरचटले होते. अत्यंत व्याकुळलेल्या अवस्थेत मी अंधारात झाडाच्या बुंध्याजवळच पडलो होतो. माझी ती नवी करकरीत मोटार रस्त्याच्या उजव्या बाजूला कलंडली, आणि तेथून खंडाळ्याच्या घाटातल्या भागात अदमासे दोनशे फूट खाली कोसळली. मोटारीचा चक्काचूर झाला. पाठलाग करणाऱ्या मोटारी भर वेगाने धावत होत्या; म्हणून त्या सर्वांच्या मोटारी दहा-पंधरा मैल पुढे निघून गेल्या. थोड्या अंतरावर दिसणारी मोटार त्यांना दिसली नाही. मोटार दृष्टीक्षेपात येईना तेव्हा मोटारीतल्या व्यक्तीने आपल्याला गुंगारा दिला हे पोलिसांना जाणवले.

अनुक्रमणिका

हातची शिकार पाहाता पाहाता गेल्याचे पोलिस अधिकाऱ्यांना खूपच वाईट वाटले. सर्व बडे-छोटे अधिकारी व शिपाई हताश झाले. वेळ रात्रीची होती. पोलिसांनी जवळपासची निरनिराळी वळणे धुंडाळली. जवळपासची झाडेझुडपे निरखून पाहिली. "हवा तेवढा खटाटोप करूनही पोलिसांना मी किंवा माझी ती नवी मोटार सापडली नाही. जवळपास सात-आठ तास बेशुद्ध अवस्थेत मी झाडाझुडपांत अडकून पडलो होतो." 'पोलिसांना हवा असलेला नारायणदत्त शर्मा मीच आहे.' असे मोठ्या अभिमानाने त्यांनी त्यांच्या आलीशान बंगल्यात मला सांगितले.

आधी ठरल्याप्रमाणे श्री. शर्मा यांनी त्यांच्या त्या भव्य बंगल्याच्या मागच्या दाराजवळच्या खोलीत ठेवलेले, तेलकट गोणपाटात गुंडाळलेले स्फोटक साहित्य प्रत्यक्ष दाखविले. त्यांनी दाखविलेले स्फोटक द्रव्यांचे साहित्य मी काळजीपूर्वक पाहिले. त्यानंतर श्री. शर्मानी स्वतःच्या हातांनी ते साहित्य पद्धतशीर गोणपाटात गुंडाळले आणि सराईत हमालाप्रमाणे गोणपाटाच्या चोहीबाजूने जाड दोऱ्यानी आवळून बांधले. त्या साहित्याचा उग्र वास गोणपाटातूनही येत होता.

ते गोणपाटात गुंडाळलेले गाठोडे घेऊन मी पुण्याच्या रेल्वे स्टेशनवर टॅक्सी मोटारीने आलो. टॅक्सी मोटारीच्या डिकीतून ते गाठोडे काढताना हमालाने मला विचारले, 'मालक, दक्कन क्वीन ना?' मी होकार दिला. तेवढ्यात श्री. शर्मा टॅक्सीतून उतरले आणि त्यांनी माझ्यासाठी रिझर्व केलेले तिकिट मला दिले. श्री. शर्मा त्यावेळी भारीपैकी सूट चढवून आले होते. प्रथमदर्शनी मी त्यांना ओळखू शकलो नाही. श्री. शर्मानी माझ्या रिझर्व सीटचा क्रमांक हमालाला सांगितला. हमालाने लगबगीने ते गाठोडे डोक्यावर घेतले आणि रिझर्व क्रमांकाच्या सीटजवळ ठेवले. त्या मागोमाग मी व श्री. शर्मा डब्यात चढलो. त्यावेळी त्या डब्यात मी एकटा प्रवासी होतो. श्री. शर्मा यांनी हमालाला सांगून ते गाठोडे जवळच्या दुसऱ्या डब्यात थोडेसे बाजूला ठेवून घेतले. हमालाने केलेल्या त्या कामाबाबत आवश्यक तेवढी चिरीमिरी हमालाच्या हातात श्री. शर्मा यांनी दिली. डेक्कन क्वीन सुटायला वीस मिनिटांचा अवकाश होता. डबा बराच वेळपर्यंत रिकामाच होता.

'तुम्ही तुमच्या रिझर्व सीटवर बसून रहा' श्री. शर्मा मला उद्देशून म्हणाले, अधूनमधून इतर सहप्रवाशांच्या लक्षात येणार नाही अशा प्रकारे त्या गाठोड्यावर पाळत ठेवा. यदाकदाचित विचारपूस झालीच तर ते गाठोडे तुमचे नाही असे दणकून सांगायला जराही कचरू नका. मुंबईला गेल्यावर इतर प्रवाशांच्या पाठोपाठ तुम्हीही डब्याबाहेर पडा. डब्यात आता कोणीही प्रवासी बाकी नाही असे दिसताच हमालाला सांगून ते गाठोडे प्लॅटफॉर्मबाहेर न्या. शक्य तो शीख अगर हिंदू टॅक्सीवाल्याची टॅक्सी ठरवून त्यातूनच हे गाठोडे तुमच्या मुक्कामाच्या ठिकाणी नेण्याचा प्रयत्न करा.' इतके सर्व सांगेपर्यंत डब्यात मी व श्री. शर्मा दोघेच होतो. थोडासा विसावा म्हणून मी व श्री. शर्मा डब्याबाहेर पडलो अन् डब्यालगत उभे राहिलो. गाडी सुटायला पाच मिनिटे बाकी होती. तेवढ्यात मुंबई प्रांताचे वरिष्ठ पोलिस प्रमुख श्री. कामत, त्यांची पत्नी व दोन मुली व मुलांसह डब्यात आले. त्यांच्या व्यवस्थेसाठी एक पोलिस अधिकारी व पाच-सहा पोलिसही प्लॅटफॉर्मवर उभे होते. त्यांच्या व माझ्या सीटमध्ये आठ क्रमांकांचे अंतर होते. गाडी सुरू झाली तेव्हा मी माझ्या रिझर्व्ह सीटवर बसलो. डब्यात उंची विदेशी अत्तराचा घमघमाट भरलेला होता. पिंपरी ते लोणावळा गाडी जात असताना डब्यात कशाचा तरी उग्र वास येत असल्याचे सर्वांनाच जाणवले. जवळपास सर्वांनी आपापले सुगंधाने भरलेले रुमाल

अनुक्रमणिका

नाकाला लावले. त्यामुळे डब्यात उंची सेन्टस्‌चा सुवास दरवळू लागला क्षणभर माझा जीव भांड्यात पडल्यासारखे मला वाटले.

भर वेगाने धावणारी डेक्कन क्वीन बोरीबंदर स्टेशनवर धडकली. श्री. कामत यांच्या कुटुंबियांना घेण्यासाठी मुंबईचे पोलिस अधिकारी व पोलिस शिपाई त्यांच्या त्या रिझर्व्ह डब्यासमोरच उभे होते. त्यामुळे त्या डब्याजवळ हमालांची ये जा व गर्दी नव्हती. श्री. कामत कुटुंबीय मंडळी, पोलिस अधिकारी आणि शिपायांच्या ताफ्यासमवेतच बाहेर पडली. तो व शेजारचा डबा पार रिकामा झाला आहे असे दिसताच मी एका हमालाद्वारे ते गाठोडे बाहेर घेतले. गाठोडे बाहेर काढताना हमाल म्हणाला, 'साहेबा, गाठोडे भारी वजनदार हाय.' 'तू ते डोक्यावर घेऊन चल. मी तुला चांगली मजूरी देईन.' माझे शब्द ऐकताच हमाल चटकन्‌ म्हणाला, 'बराय.' हमालाने ते गाठोडे चटकन्‌ डोक्यावर घेतले व तो मागे माझ्याकडे पाहात पाहात बाहेर पडला. जवळच उभ्या असलेल्या सरदारजीच्या टॅक्सीत हमालाने ते गाठोडे व्यवस्थित ठेवले. मी त्याला पाच रुपयांची नोट घडी करून दिली. तो हमाल चटकन्‌ बाजूला गेला. मी टॅक्सीच्या मागच्या सीटवर बसलो. टॅक्सी चालू करताना टॅक्सी ड्रायव्हर सरदारजीने विचारले, 'कहाँ जायेंगे?' 'मोरार बाग' मी माझ्या जाण्याचे ठिकाण सांगितले.

'वो कहाँ होता है?' सरदारजीना मोरार बाग निश्चित कोठे आहे हे समजले नसावे हे जाणून मी त्याना सोयीचा पत्ता सांगितला.

'हिराबाग धरम शाला के पीछे।'

'अच्छा! अब समझ गया।' सरदारजी म्हणाले. सरदारजीनी टॅक्सी बरोबर मोरार बागेच्या फाटकाजवळ उभी केली.

'ये लो! ये आ गया आपका मोरार बाग।' सरदारजी म्हणाले. फाटकाजवळ बसलेल्या पाटीवाल्याकडून मी ते गाठोडे टॅक्सीबाहेर काढले. सरदारजीच्या हातावर दहाची नोट ठेवली. सरदारजी 'नमस्ते साब' म्हणून त्यांच्या टॅक्सीसह निघून गेले.

पाटीवाल्याने ते गाठोडे मोरार बागेत वरच्या माळ्यावर नेऊन ठेवले. त्याच्या हातात मी दोन रुपयाची नोट ठेवताच तो चटकन पायऱ्या उतरून खाली गेला. मोरार बागेतील कार्यालयात त्या गाठोड्याचा उग्र वास पसरला. तसा तो उग्र वास काहींच्या नाकाला झोंबला असल्यासारखे दिसू लागले.

'चार दिवसांच्या विश्रांतीनंतर, रायफली आणि काही स्फोटक साहित्य आणण्यासाठी मला नागपूरला जावे लागेल.' असे श्री. वैशंपायन यांनी सांगितले. 'नागपूरला मी श्रीमती ताई यांच्या आश्रमात श्री. सीताराम पप्पू यांना भेटावे व ते जे काय देतील ते सामानसाहित्य मनमाडला श्री. माणिकचंद पहाडे यांना द्यावे.' असा कार्यक्रम मला देण्यात आला असताना डॉ. मेलकोटे म्हणाले, 'साहित्य बरोबर आणताना शक्य तो पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत जा. तसे शक्य झाले नाही तर एअर कंडिशन डब्यातून प्रवास करावा लागला तरी विचार करीत बसू नका. जसा प्रसंग समोर येईल तसा तडकाफडकी निर्णय घेत जा. बरेच घरभेदी

अनुक्रमणिका

आपल्या लोकांना पकडून देण्याचा खटाटोप करीत आहेत. वेळप्रसंगी तुम्ही पोलिसांच्या तावडीत सापडले जाणार असे दिसताच, तुमच्या जवळचे साहित्य तुमचे नाही असे पक्क्या निर्धाराने दणकून सांगायला जराही कचरू नका. वेळप्रसंगी सामान-साहित्य गेले तर जाऊ द्या मात्र तुम्ही पकडले जाऊ नका.' श्री. वैशंपायन, डॉ. मेलकोटे व इतरांनी वेळोवेळी सांगितलेल्या खाणाखुणा, सूचना व कल्पना मी माझ्या मनाच्या कप्प्यात दडवून ठेवीत होतो.

ठरल्याप्रमाणे मी नागपूरला श्रीमती ताईंच्या आश्रमात गेलो. आश्रमात पाय ठेवण्यापूर्वी माझा ठावठिकाणा कसून तपासला गेला. मी मुंबईतील हैदराबाद स्टेट काँग्रेसचा विश्वासू माणूस असल्याची खात्री पटल्यावरच मला त्या आश्रमात पाय ठेवता आला. सकाळचा नेहमीचा कार्यक्रम आटोपल्यावर माझी व श्री. सीताराम पप्पूंची भेट झाली. बराच वेळ आम्ही दोघे बोलत बसलो. त्यावेळी माझी धाकटी बहीण तारा पटेल नागपुरातच माध्यमिक कन्याशाळेत मॅट्रिकच्या वर्गात शिक्षण घेत असून मुलींच्या वसतिगृहात राहात असल्याचे मी श्री. पप्पू यांना सांगितले. दुपारच्या मधल्या सुट्टीत मी, पप्पू व ताईसमवेत माझ्या बहिणीला भेटलो व शाळा सुटल्यावर श्रीमती ताईच्या आश्रमात येण्यास तिला सांगितले.


माझ्याजवळ दिले जाणारे साहित्य नागपूरहून मनमाडला नेताना जमल्यास मी माझ्या बहिणीस बरोबर घ्यावे म्हणजे महत्प्रयासाने मिळविलेले साहित्य अपेक्षित जागेपर्यंत सुखरुप नेता येऊ शकेल असे श्रीमती ताईने सुचविले. मी माझ्या बहिणीला कल्पना दिली. माझ्याबरोबर सामानासमवेत मनमाडपर्यंत यायचे माझ्या बहिणीने मान्य केले. श्री. सीताराम पप्पूंनी गोळा केलेले सर्वच सर्व सामान मी माझ्या बेडिंगमध्ये व्यवस्थित ठेवले. सायंकाळी विदर्भ विभागाचे गृहमंत्री मा. ना. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या खाजगी मोटारीतून श्री. पप्पू यांनी मला माझ्या बहिणीसह नागपूर एक्सप्रेस गाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात बसविले. आम्ही दोघे बहीणभाऊ मनमाड स्टेशनवर उतरलो. त्यावेळी मनमाड प्लॅटफॉर्मवर मनमाड कॅम्पचे बरेच जण उभे असल्याचे दिसले.




कै. लक्ष्मणराव वाळूजकर



श्री. गोविंदराव गोसावी गुरुजी



कै. द्वारकादास पटेल



श्री. रमणलाल पारिख

अनुक्रमणिका



श्री. नागोरावजी पाठक



श्री. पंढरीनाथ गोविंद तत्सत



श्री. हनुमंत बेंडे



कै. श्रीमती गीताबाई चारठाणकर

अनुक्रमणिका

मी वातानुकूलित व पहिल्या वर्गाच्या डब्यातूनच प्रवास करतो; ब्रॅन्डनमध्ये जेवण घेतो; उंची कपडे वापरतो; भारी सिगारेट ओढतो; याबाबतच्या तक्रारी माझ्या कानावर पडतील अशा प्रकारे बोलले जाऊ लागले. श्री. माणिकचंद पहाडे यांच्या जवळही माझ्याबाबत बऱ्याच कागाळ्या केल्या गेल्या. माझ्याबाबत एकही तक्रार न करणारा माझा स्नेही सहकारी होता गिरिजाशंकर ऊर्फ हिन्दुस्थान. वेळोवेळी तक्रारी केल्या गेल्या तरी श्री. पहाडे यांनी माझेच समर्थन केले. तेच बऱ्याच मंडळीना कमालीचे झोंबले. काही लोकांनी त्यांच्या आयुष्याचा महत्त्वाचा आणि ऐन उमदीचा काळ स्वतःच्या फुशारक्या आणि बिनबुडाच्या शिळोप्याच्या गप्पा मारण्यातच घालविला व ज्या विशेष महत्त्वाच्या घटना घडल्या त्या ऐकून माहीत झाल्यावर त्या घटनांचे कल्पक, जनक आपणच आहोत असा आभास निर्माण केला. आयत्या पिठावर रेघोट्या ओढणाऱ्यांची तसेच ईर्ष्या, हेवेदावे ज्यांच्या अणुरेणूत खचाखच भरलेले आहेत, अशा लोकांची मनोवृत्ती जगाचा निर्माता ब्रह्मदेवही बदलू शकणार नाही, असे मी मनाशी ठरवून माझी नित्याची वाटचाल करीत राहिलो; म्हणूनच माझा मनोभंग झाला नाही. मला व मी करीत असलेले काम ज्यांनी ज्यांनी जवळून आणि बारकाईने पाहिले त्यांनी निरनिराळ्या आमिषाचे पेटारे माझ्या सभोवती उभे करून मी माशासारखा गळाला लागतो का हेही डोळ्यात तेल घालून पाहिले. 'माझी सत्वपरीक्षा घेण्यासाठी अनेक प्रकारची प्रलोभने माझ्या चौफेर उभी केली तरी मी बळी पडलो नाही.' असे जेव्हा कळून आले तेव्हा मला माझे मित्र हरफन मौला म्हणू लागले. मी केलेल्या व करीत असलेल्या कामाच्या मोबदल्यात मला माझ्या वडिलधाऱ्या मंडळींचा विश्वास संपादन करता आला; हीच मी केलेल्या कामाची पावती मी समजू लागलो. इतर प्रकारच्या मानापेक्षा विश्वास हा मी माझा बहुमान समजत होतो. माणसाला नाही नाही त्या गोष्टी संपादन करता येतात. त्या संपादन करण्यासाठी फार मोठे मोल द्यावे लागत नाही; मात्र विश्वास संपादन करण्यासाठी प्रामाणिकपणाचे मोल द्यावे लागते. मी ऐकलेल्या माझ्याच बाबतच्या तक्रारींनी मी जरासा गोंधळून गेलो होतो. विचारांच्या हिंदोळ्यात माझे मन हेलकावे खात होते. माझ्या डोक्यात विचारांचे काहूरही थैमान घालू लागले. मी माझ्या वरिष्ठांकडे नजर फिरविली. त्यांचा माझ्यावर पूर्णतया विश्वास असल्याचेच दिसल्याने मी तत्काळ माझ्या विचारांची वाट बदलली अन् नव्या हुरूपाने, नव्या दमाने, जिद्दीने अन् जोमाने काम करावयाचा दृढनिश्चय केला.

'वसईच्या खाडीत माचवा क्रमांक ७ मधून अमेरिकन बनावटीचे रिव्हाल्वर', हँड ग्रेनेड अधूनमधून विकत मिळतात अशी माहिती मुंबई फोर्ट विभागात असलेल्या महाराष्ट्र बँकेतील श्री. दातारांनी श्री. बाबासाहेब परांजपे यांना दिली मात्र त्यासाठी कधीकधी माचव्यात बसून वसईच्या खाडीत समुद्रात बरेच लांबही जावे लागते असे सांगितले तसेच अपेक्षित साहित्य मिळेल या आशेवर माचव्यातच मुक्कामही करावा लागतो असेही सांगितले. त्या सर्वांची श्री. परांजपे यांनी मला कल्पना दिली. दुसऱ्या दिवशी दुपारी श्री. दातारांबरोबर मला पाठविण्यात आले. श्री. दातार यांचा व माझा एका खास कारणपरत्वे दोन वर्षापूर्वीपासून परिचय होता. श्री. दातार हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कट्टर सभासद आणि पुरस्कर्ते होते असे त्यांच्या बोलण्यावरून मला समजले. ठरल्याप्रमाणे मी व श्री. दातार वसईच्या खाडीत माचवा क्रमांक ७ मध्ये गेलो. प्रथम श्री. दातारांनी माचवाप्रमुखाबरोबर ऐसपैस गप्पा मारताना मुख्य विषय छेडला. समुद्रपाण्याच्या व मासळीच्या वासाने मी थोडासा त्रस्त झालो होतो. मासळीचा तो उग्र वास मला सहन करवत नव्हता. मला सारखी मळमळ होत होती. वांती होईलसे वाटत होते. माझी चलबिचल माचव्याच्या प्रमुखाने ओळखली. अनेक विदेशी सेंट माखलेला एक रुमाल त्याने मला दिला. त्या सुवासाने मला जरासा धीर आल्यासारखे वाटले. तो रुमाल मी माझ्या नाकाला लावून बिस्तऱ्यावर लवंडलो. मला कधी झोप लागली ते समजलेही नाही. उठलो तेव्हा तो माचवा जेथल्या तेथे

हेलकावे खात उभा होता. श्री. दातार आणि माचव्याचे प्रमुख बऱ्याच उशिरा उठले. माचव्यात चहा फराळ व सर्व प्रकारच्या जेवणाची चांगली सोय होती. उत्तम प्रतीचा चहा घेतल्यावर सकाळचा फराळ झाला. फराळाच्या वस्तू चांगल्या होत्या. त्यात माझ्या आवडीच्या वस्तू असल्याने जेवणाइतका मी फराळ घेतला. त्यानंतर लगेच आमची माचव्यातून समुद्राची सफर सुरू झाली. आमच्या त्या माचव्याने सुमारे ५० मैल लांबीचे अंतर कापले असावे. समुद्रात इतका लांबवर जाण्याचा तसा तो माझा पहिलाच प्रसंग होता. समुद्राचे वारे लाटा उसळवीत होते. नवनवे अनुभव येत होते. कधी मौज वाटायला लागायची, तर कधी कधी जोरदार धडकी भरायची, जीव वरखाली होत असे. मी उसाश्यावर उसासे टाकीत होतो. श्री. दातार मात्र हसत-खिदळत माचव्याच्या लोकांबरोबर बोलत होते. तेवढ्यात मला वांत्यावर वांत्या होऊ लागल्या. माझे सर्वांग गारठल्यासारखे मला वाटू लागले. औषध म्हणून मला थोडी ब्रँडी देण्यात आली. क्षणभरात माझ्या सर्वांगात ऊब भरल्यासारखे मला जाणवले. उंची सेंटचा भरपूर शिंपडा केलेला दुसरा रुमाल माचव्याच्या प्रमुखाद्वारे मला मिळाला. माझ्या नाकात मासळीची घाण बसली होती. त्या दुर्गंधीची मला शिसारी आली होती. सेंटच्या सुवासाने ती थोडी कमी झाली. माचव्याच्या आजूबाजूला लहानमोठ्या शिडाच्या होड्या येत व जात होत्या. छोटेसे अर्ध्या लुंगीसारखे कापड गुंडाळलेले उघडेनागडे कोळी ललकाऱ्या देत होते. तेवढ्यात आमच्या माचव्याला लागून एक इंजिनवर चालणारी होडी-बोट मला दिसली. माचव्याच्या वर, त्या बोटीतील काही लोकांची काहीतरी देवाणघेवाण होत असल्यासारखे मला दिसू लागले. आतापर्यंत निरनिराळ्या होड्यातून घेतलेल्या मोठमोठ्या माशांचा बराच मोठा ढीग साचला होता. मासोळ्यांच्या विचित्र दुर्गंधीमुळे माझे डोके भणाणून जात होते. त्यात आणखी भर पडणार या विचाराने मी बराच त्रस्त झालो होतो. या विचारांच्या तंद्रीत असताना 'शंकरभाई द्या टाळी!' असे मोठ्याने हसत सांगून श्री. दातारांनी मला माझ्या तंद्रीतून ओढून बाहेर खेचले.

'काय झाले ?' मी श्री. दातारांना विचारले.

'पाहाता काय ? आपले काम फत्ते झाले.' दातारांनी सांगितले. थोड्या वेळात आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. बरेच समाधान झाल्यासारखे मला वाटले. माचव्यात मासळीचे ढीग सर्वत्र अस्ताव्यस्त पडलेले होते. मासळीचे ढीग पायाखाली तुडवीतच माचव्याचे लोक इकडेतिकडे जात होते. मासळीच्या त्या भयंकर दुर्गंधीतून माझी सुटका होणार असल्याने त्या वासाकडे मी आता लक्ष देत नव्हतो. मी व श्री. दातार माचव्याच्या प्रमुखाच्या केबिनमध्ये गेलो तेव्हा माचव्याच्या प्रमुखाने आम्हा दोघांचे स्वागतच करीत असल्याचा देखावा केला. प्रथम उत्तम प्रतीचा चहा दिला; उंची सिगारेट दिली. तेवढ्यात त्या छोट्या बोटीतून माचव्यात घेतलेले एक मोठे बोचके माचव्याच्या खास कामगारांनी केबिनमध्ये आणून एका बाजूला ठेवले. केबिन बंद करून, माचव्याच्या प्रमुखाच्या इषाऱ्यावर कामगारांनी नेमके तेच बोचके आमच्यासमोर ठेवले.

'यातले साहित्य, आतूनबाहेरून पॅराशूटच्या मऊ व गुळगुळीत कापडात काळजीपूर्वक गुंडाळून ठेवले जाते व मग पॅराशूटच्या दोरखंडांनी घट्ट आवळून विशिष्ट पद्धतीने बांधले जाते; म्हणून आतल्या वस्तूंना पाण्याचा थेंबही लागत नाही.' असे कथन माचव्याचे प्रमुख करीत असताना कामगारांनी तेज सुरीचा वापर करून दोऱ्या कापून काढल्या. पॅराशूटच्या कापडाचे वेष्टनावर वेष्टन काढीत काढीत, त्या कामगारांनी शेवटचे वेष्टन हळूवार पद्धतीने हाताळले. ते शेवटचे वेष्टन होते तलम रेशमी कापडाचे व आत उंची कापडात साहित्य व्यवस्थित रचून ठेवलेले होते. उंची कापडात गुंडाळलेल्या वस्तू माचव्याच्या प्रमुखाने हळुवारपणे मोकळ्या

करायला प्रारंभ केला. चार स्वयंचलित अमेरिकन बनावटीचे रिव्हॉल्वर व त्यांच्या बुलेट्स समोरच्या टेबलावर ठेवल्या गेल्या. सारेचे सारे साहित्य कोरे करकरीत होते. ते साहित्य माझ्या आटोक्यात आल्याचे दिसल्याने मी अत्यंत भारावून गेलो. माझ्या चेहऱ्यावर प्रसन्नता प्रगटली. तेवढ्यात माचव्याच्या प्रमुखाने आमच्या देखतच त्या नव्या करकरीत बुलेट्स रिव्हॉल्वरमध्ये भरून माझ्या स्वाधीन केल्या. क्षणाचा विलंब न करता लांबवर पसरलेल्या समुद्राच्या पाण्यात एकामागून एक सहा गोळ्या मी झाडल्या. सप् सप् आवाज कानानी ऐकला. गोळ्या झाडताना हाताला हिसका बसत असल्याचे जाणवले.

'या चार रिव्हॉल्वर पैकी तूर्तास दोनच रिव्हॉल्वर आज तुम्हाला देऊ शकेन.' असे माचव्याच्या प्रमुखाने श्री. दातारांना सांगितले. एक हजार रुपये त्याच्या हातावर ठेवायचे हे दातारांनी, मला त्यांच्या उजव्या हाताच्या एका बोटाची खूण करून सांगितले. मी शंभराच्या दहा कोऱ्या करकरीत नोटा त्याच्या हातात दिल्या. माचव्याच्या प्रमुखाने त्या नोटा त्याच्या पँटच्या खिशात कोंबल्या आणि मग उंची कापडासह दोन रिव्हॉल्वर आणि दोनशे गोळ्यांची पाकिटे माझ्या स्वाधीन केली.

'आता बरोबर पाच दिवसांनी या. त्या खेपेस तुम्हाला बरेच साहित्य देईन.' असे माचव्याच्या चालकाने श्री. दातारांना सांगितले.

आवश्यक तेवढी बोलणी झाली. आम्हा दोघांना इंजिनवर चालणाऱ्या छोट्या बोटीत बसविले गेले आणि वसई खाडीच्या किनाऱ्यावर आणून सोडले गेले.

दुपारच्या तीन वाजताच्या सुमारास मी व दातार मोरार बागेत आलो तेव्हा आम्हा दोघांच्या कपड्याला मासळीचाच वास येत असल्याने श्री. वैशंपायन यांनी त्यांच्या नाकाला रूमाल लावल्याने मी ताडले. समुद्रात रात्र जागून काढल्याने मी पेंगू लागलो. लवकरात लवकर झोपावयाचा मी विचार केला. मी बाजूच्या सतरंजीवर लवंडलो अन् लागलीच झोपी गेलो.

सायंकाळच्या सहाच्या सुमारास मला श्री. बाबासाहेब आल्याचे सांगून जागे केले गेले. मी आंबून गेलेल्या शरीराला आळेपिळे देत उठून बसलो; तेव्हा मी माझ्या स्वप्नातून जागा झाल्यासारखे मला वाटले. स्वप्नात मी पाहिलेला माचवा, मासोळ्या अन् समुद्राच्या पाण्याच्या लाटाऐवजी मी मोरार बागेत असल्याचे मला जाणवले. मी लागलीच नळावर गेलो. तोंड, हातपाय चांगल्या सुवासिक साबणाने खसाखस घासून धुऊन काढले आणि दुसरे कपडे अंगावर चढविले; तेव्हा कोठे मला जरा बरे वाटू लागले. तरी मासळीच्या वासाची दुर्गंधी मला जाणवत होतीच.

बरोबर पाच दिवसांनी मी श्री. दातार यांच्या समवेत पुन्हा वसईच्या खाडीत गेलो. थोडी शोधाशोध करून श्री. दातारांनी माचवा क्रमांक ७ चा ठावठिकाणा मिळविला. अर्ध्या तासाच्या शोधाशोधीनंतर त्या माचव्याच्या प्रमुखाची गाठ भेट झाली, मात्र बोलाचाली झाली नाही. तो त्याच्या कामात गुरफटला होता. तब्बल एक तासानंतर माचव्याच्या प्रमुखाशी पुढील कार्यक्रमाबाबत बरेच बोलता आले. रात्रीच्या जेवणाचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. जेवणानंतर चहा झाला. एका मागून एक दोन सिगारेटी मी फस्त केल्या.

समुद्राच्या प्रवासाची तयारी करण्याचे काम सुरू झाले. एक तासाने माचवा समुद्रात पुढे पुढे सरकू लागला; माचव्याची गती बेताचीच होती. काही वेळाने माचव्याने वेग धरला. समुद्राच्या लाटांवर लाटा उसळू लागल्या. समुद्राच्या खारट पाण्याचा व मासळीचा वास नाकात भरू लागला. त्या वासाची मला शिसारी येऊ लागली. डोके भणाणू लागले. अंगाला सुसाट वारा झोंबू लागला. सर्वत्र काळोख पसरलेला होता. अधूनमधून शिडाच्या मोठ्या व लहान होड्या, इंजिनवर चालणाऱ्या लहान लहान बोटी जवळून जात होत्या; तेव्हाच काय तो आवाज कानावर यायचा. या खेपेला मला विशेष त्रास झाला नाही. जेवणापूर्वी एक तासभर झोप काढली. रात्रीच्या जेवणानंतर मला पुनरपि लवकर झोप लागली. ठरलेल्या संकेताप्रमाणे ठरलेल्या अंतरावर मिळावयाचे घबाड माचव्याच्या प्रमुखाच्या हाती लागले नाही. पुढच्या ठेप्यावर मिळेल असे गृहीत धरून माचवा रेटून पन्नास मैल अधिक दूर अंतरावर नेण्यात आला. तेथे बऱ्याच वाटाघाटी, तावातावाची बोलणी झाली. घेवाणदेवाणीबाबत बाचाबाचीही झाली. तेव्हा मला जाग आलेली होती. जे काय घडले व घडत होते ते सारे मला दातार यांच्या द्वारे ऐकावयाला मिळाले. तसेच या खेपेस माचवा वसई खाडी पासून किमान शंभर मैल लांबवर आलेला असल्याचेही कळले. वाटाघाटी मोडण्याच्या बाजूनेच झुकत असल्याचे ऐकून माझे अंग शहारुन गेले. नितान्त आवश्यकता आहे त्यावेळी अविश्रांत परिश्रम करूनही साहित्य मिळत नाही; जात्यंध मुस्लिम गुंड, निर्वासित, रझाकार हल्ल्यावर हल्ले चढवीत आहेत अन् आम्ही प्रत्युत्तर देऊ शकत नाही याचेच मला राहून राहून वाईट वाटत होते. मनाला अनंत यातना होत होत्या. सौदा होणे आवश्यक असले तरी सौदा झालाच नाही तर रिकाम्या हाताने परत जाण्याची पाळी येऊ नये म्हणून मनातल्या मनात प्रार्थना करीत होतो. माझी प्रार्थना ऐकली गेली. सौदा पटला. साहित्याची देवाणघेवाण झाली. मला हायसे वाटले. पुन्हा हुरूप आला. माचवा परतीच्या मार्गाकडे वळविला गेला. थोड्या वेळानी मला व दातारांना त्या कॅबिनमध्ये बोलावले गेले. औपचारिक बोलणी संपल्यावर दोन मोठाली बोचकी आमच्यासमोर ठेवली गेली. माचव्याच्या प्रमुखाने त्याच्या नेहमीच्या कामगारांना इषाऱ्याने खुणावताच त्यांनी त्या दोन्ही बोचक्यांच्या जाड दोऱ्या धारदार सुऱ्यांनी एका मागून एक सपासप कापून काढल्या. बोचक्यावर गुंडाळलेली पॅराशूटच्या कापडाची वेष्टणे एकामागून एक काढली. शेवटचे वेष्टण तलम रेशमी कापडाचे; दिसायला पारदर्शक होते; तरी त्यातून पाण्याचा थेंब आत जाऊ शकणार नव्हता. त्यानंतर उंची कापडाचे वेष्टण काढताच दोन कोऱ्या करकरीत रायफलींचे भाग व भयंकर स्फोट करणारे १०० हॅन्डग्रेनेडस फ्यूज वातीसह आमच्या समोर व्यवस्थित ठेवले गेले.

मी क्षणभर आश्चर्यचकित झालो. माझ्या शरीरात वीज संचारल्यासारखे मला जाणवले. 'या रायफलींच्या बुलेटस्‌चे काय?' मी श्री. दातार आणि माचव्याच्या प्रमुखाकडे एकदमच पाहताना विचारले.

'बरी आठवण झाली.' माचव्याच्या प्रमुखाने म्हटले अन् त्याच्या भारीपैकी सूटकेसमधून पाचशे बुलेट्‌सची पाच पाकिटे बाहेर काढून समोर ठेवली.

'या रायफलीचे सुटे भाग असेच नेले अन् ते धड बसले नाहीत तर सारेच मुसळ केरात जाईल.' असे मी सांगताच माचव्याच्या प्रमुख म्हणाला, 'हे पहा, एक तर ह्या रायफलींचे सर्वचे सर्व भाग याच बोचक्यात बांधलेले होते. शिवाय प्रत्येक भाग कोरा करकरीत आहे. तुमच्या समाधानासाठी आपण या सुट्या भागांची जुळवाजुळव येथेच करू, मग तर झाले.' इतके सांगून त्याने रायफलीच्या सुट्या भागांची व्यवस्थित जुळवाजुळव केली अन् एका मागून एक सहा गोळ्या झाडल्या. माझे मनस्वी समाधान झाले.

अनुक्रमणिका

आता या रायफली वसई खाडीबाहेर मोरारबागेपर्यंत न्यायच्या कशा? माझ्या प्रश्नाची उकल करण्यासाठी माचव्याच्या प्रमुखाने त्यांच्या कामगाराद्वारे बांगड्यांचे रिकामे पुठ्ठ्याचे डबे मागविले व त्या डब्यांना व्यवस्थित व आवश्यक तेवढ्या आकारांची छिद्रे पाडून दोन रायफलींची दोन बंडले तयार केली. चोहोकडून पॅराशूटच्या बारीक पण मजबूत दोऱ्यांनी ती गच्च आवळून बांधली. 'आता तुम्हाला बागड्यांचं बंडल नेता आहात असे सांगता येईल.' असे माचव्याच्या प्रमुखाने सांगून त्याच्या कल्पकतेचा आम्हाला दाखला दिला. इथवर सर्व गोष्टी झाल्यावर मुद्याच्या प्रश्नाकडे आम्ही वळलो. सौद्याबाबत आमची बोलणी सुरू होणार, तेवढ्यात हँडग्रेनेड व त्यांच्या फ्यूज, वाती जेथल्या तेथेच राहिल्याचे माझ्या लक्षात आले. माचव्याच्या प्रमुखाकडे पाहात मी म्हणालो, 'अहो या हॅन्डग्रेनेड व त्याच्या फ्यूज वातींचे एक बोचके बांधावयाचे राहून गेले आहे ना!' 'खरंच! गडबडीत ते विसरलोच होतो.' इतके सांगून त्याने त्याच्या कामगाराद्वारे हॅन्डग्रेनेड व फ्यूज वातींचे एक बोचके बांधून तयार केले. व्यवहाराबाबत बोलणी सुरू झाली. थोडक्यात ती बोलणी आटोपली. माचव्याच्या प्रमुखाच्या हातात तीन हजार रुपये द्यावे असे मला दातारांनी तीन बोटे दाखवून सुचविले. मी तडकाफडकी शंभराच्या तीस नोटा माचव्याच्या प्रमुखाच्या उजव्या हातात ठेवल्या. त्याने जशाच्या तशा खिशात कोंबल्या अन् आम्हा दोघांना बोचक्यासह वसईच्या किनारपट्टीवर आणून सोडले. तेथून आम्ही आमच्या बोचक्यांसमवेत वसई ते दादर व दादर ते चर्नीरोडपर्यंत लोकलने प्रवास केला. आम्ही वाटेत सगळीकडे बांगड्यांचे व्यापारी आहोत असाच आभास निर्माण करीत होतो. चर्नीरोड स्टेशन येथून आम्ही आमच्या तीन बोचक्यांसह घोड्याच्या बग्गीतून मोरारबागेजवळ आलो. जवळचे दोन पाटीवाले बोलावले व त्यांच्याद्वारे ती तीन बोचकी आम्ही मोरारबागेत वरच्या माळ्यावर नेली. श्री. भाऊसाहेब वैशंपायन समोरच उभे होते. तिन्ही बोचकी योगायोगाने पाटीवाल्याने त्यांच्याच पुढे ठेवली. चौकोनी आकाराच्या पुठ्ठयाच्या दोन बोचक्यांकडे जरा विस्मयकारक नजरेने पाहात श्री. वैशंपायन यांनी श्री. दातारांना उद्देशून विचारले, 'दातार, हे काय आणले?' 'बांगड्या! या बोचक्यातल्या बांगड्या आपल्या मी मी म्हणणाऱ्या नकली कागदी घोडे दौडविणाऱ्याना अहेर म्हणून पाठवा!' श्री. दातार सहज हसत बोलले. बांगड्याचे पार्सल तेही चिकाटीने लढा लढविण्याची ईर्ष्या बाळगणाऱ्यांनी आपल्या कार्यालयात आणावे याबाबतचे दुःख झाल्यापासून राहिले नाही. खेद आणि खजीलपणा आणखी अधिक वाढू नये म्हणून मी जवळच्या टेबलावरून ब्लेड घेतली, खोक्यावर बांधलेली दोरी कापून काढली. उतरंडीसारखे एकावरएक व्यवस्थित रचून ठेवलेले बांगड्यांचे रिकामे डबे एकामागून एक वरून खाली ठेवायला प्रारंभ केला. सुमारे तीन रिकामे डबे मला सहज उचलून खाली ठेवता आले. चौथा डबा वर उचलताच त्यात चकचकीत लोखंडी नळीसारखे काही दिसू लागले. आजूबाजूला उभे असलेल्यांची जिज्ञासा वाढली. नंतरचे तीन डबे जरा बेताने उघडताच ती नळी नसून रायफल आहे; असे जाणवले व सर्वांच्या तोंडून एकच 'शाब्बास!' 'भले बहाद्दूर!' असे उद्गार निघाले. एकामागून एकाने माझी व श्री. दातारांची पाठ थोपटली आणि क्षणभरातच कार्यालयातल्या सर्वच्या सर्व लोकांच्या तोंडावर आनंदाने हास्याची लकेर उमटली. आमच्या अंगावरील कपड्यात भिनलेला मासळीचा दुर्गंध सहन होत नव्हता म्हणून बहुतेकांनी नाकाला रुमाल लावला होता. ती आनंददायी घटना व तो आनंदाचा क्षण या घटकेपर्यंत मी विसरलेलो नाही. आजही तो आनंदाचा क्षण जशाचा तसा आठवतो. त्या घटनेचे काही जिवंत साक्षीदार आजही हयात आहेत, जे हयात नाहीत त्यांची स्मृती अणुरेणूत भरलेली आहे.

हैदराबाद संस्थानच्या निरनिराळ्या भागांत रझाकार म्हणविणारे कडवे मुसलमान आणि निझामी राजवटीचे पोलिस सतत बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव करीत असल्याच्या बातम्या एकामागून एक हैदराबाद स्टेट

काँग्रेसच्या कार्यालयात धडकत होत्या. सर्वसामान्य जनता भयभीत झाल्याचेही सांगितले जात होते. भयावह वातावरणाने जनता हवालदिल बनत चालली होती. मरगळ झटकून, आत्मविश्वासाने, निर्धाराने अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सरसावलेल्या तरुण विद्यार्थ्यांनीच कच खाल्ली तर निरपराध गोरगरिबांना निझामाच्या निर्दयी जोखडातून कोण सोडवील? असे विचाराचे थैमान सुरू होते. प्रतिकाराशिवाय दुसरा पर्याय दृष्टीक्षेपात नव्हता. लाठीकाठी, धाक इत्यादींद्वारे संकट टळणार नव्हते. उभारून आलेल्या सैतानी पद्धतीच्या संकटाचा बीमोड सशस्त्र प्रतिकारानेच होऊ शकत होता. हत्यारांची वानवा होती. भरपूर प्रयत्न करूनही आवश्यक ती हत्यारे सहजी मिळत नव्हती; मिळू शकत नव्हती. हत्यारे मिळविण्यासाठी जिवापाड धडपड आणि खटपट केली जात होती. हत्यारे मिळविणे भयंकर जिकीरीचे काम बनले होते. रणकंदन माजले होते, निरपराध्यांचे मुडदे पडत होते.

‘शंकरभाई, रात्रीच्या शेवटच्या गाडीने तू पुण्याला जा. सकाळपर्यंत प्रेसच्या मशिन विभागाचे प्रमुख अधिकारी श्री. बापट यांना त्यांच्याच घरी हे पत्र दे. ते तुला हँन्डग्रेनेडचे दोनशे रिकामे शेल देतील. ते शेल पुण्याहून मनमाडला न्यायचे. मनमाड कॅम्पच्या कार्यालयात श्री. माणिकचंद पहाडे यांनाच द्यायचे.’ इतके सारे श्री. बाबासाहेब परांजपे यांनी मला एका दमात सांगितले. ‘बाबासाहेब, पुण्याला जायला माझी ना नाही. २०० हँडग्रेनेडचे रिकामे शेल मला एकट्याला पेलवणार नाहीत व अशा कामासाठी एकापेक्षा दोन अगर तीन सहकारी असावेत असे मला वाटते. तुमची संमती असेल तर प्रथम पहिल्या गाडीने मनमाडला जातो. मनमाड कँम्पवरून दोन तीन सहकारी बरोबर घेऊन रात्रीच पुण्याला जातो. पुणे आणि अहमदनगर विभागाचे पोलिस आपल्या कार्यकर्त्यांच्या पाळतीवर असल्याचे गेल्या आठवड्यात श्री. बाळासाहेब भारदे हे श्री. पहाडे यांना सांगत असताना मी ऐकले आहे. पोलिसांना कोणा एकाच्या हालचालींचा जराही संशय आला तर सर्व सामान तपासतात....’ मला जे वाटले ते विचार मी श्री. बाबासाहेबांना शांतपणे सांगितले. बाबासाहेब विचारात पडले. थोड्या वेळाने त्यांनी मला मनमाडला जायला सांगितले. मी मनमाड व पुण्याला जाण्याच्या तयारीला लागलो. प्राप्त परिस्थितीचा विचार करून श्री. वैशंपायन मला उद्देशून म्हणाले, “एकसे दो भले, मलाही मान्य आहे. प्राप्त परिस्थितीत आता आपणा सर्वांनाच बिनबोभाट काम करावयास हवे. आनंद आणि उत्साहाच्या भरात काही गुप्त गोष्टींची उघड्यावर विचारपूस करू नये. आपसात बोलताना आपल्या जवळपास कोण आहे; कोण येतो कोण जातो याचाही विचार केला पाहिजे. आपण हैदराबाद संस्थानाबाहेर असलो तरी आपण अगदीच सुरक्षित आहोत असे समजून चालणार नाही.”

महात्मा गांधी यांनी त्यांच्या पोटतिडिकीने दिलेली हाक मुंबई प्रांतातील लोकांनी उचलून धरली. ‘चले जाव’ या घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी जनतेने जे जे करता येईल ते केले. ब्रिटिश साम्राज्यशाहीचे हल्ले प्रतिहल्ले प्राण पणास लावून परतविले. जोरदार प्रतिकार केला. शस्त्राचे प्रत्युत्तर शस्त्राने दिले. महात्मा गांधींच्या आशीर्वादानेच हैदराबाद स्टेट काँग्रेसने मुक्तिसंग्राम सुरू केला होता. हैदराबाद राज्यात राहून लढा लढविणे अशक्यच बनले होते. म्हणूनच सरहद्दीबाहेर यावे लागले व तेथून संस्थानी जनतेला जात्यंध मुसलमानांच्या कचाट्यातून मुक्त करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करावे लागले. महात्मा गांधींचा वारसा हक्क सांगणाऱ्यांपैकी काही मंडळी मुंबई प्रांताची राज्यकर्त्री होती. त्यांच्या शेजारी भयंकर क्रूर प्रकारचे अत्याचार होत होते. निझामी राजवटीने मुंबई प्रांताच्या शेजारच्या भागात जात्यंधतेचा वरवंटा फिरवीत फिरवीत नागरिकांच्या शरीराची चिपाटे करून टाकली होती. हंबरडा फोडून जनता सुटकेसाठी धडपडत होती. हा शेजाऱ्यांचा आक्रोश जणू आपल्या कानावर आलाच नाही; असाच आविर्भाव करीत येथील राजकर्त्यांनी

निझामी राज्यकर्त्यांबरोबर बेगुमानपणे वाटाघाटी केल्या आणि नकळत त्यांनी निझामी राजवटीच्या राज्यकर्त्यांना दिलासा देत देत स्वत्वासाठी, नागरिकस्वातंत्र्यप्राप्तीसाठी स्वतःच्या घरावर तुळशीपत्रे ठेवणाऱ्यांनाच या ना त्या संशयावरून बंदिस्त करण्यास प्रारंभ केला.

## निझामी अपप्रचार

निझामी राजवटीने जनतेच्या कल्याणाबाबत बोलणारे, ओरडून सांगणारे बाजूला सारले, बंदिस्त करून जखडून ठेवले. जनतेचे कल्याण व जनतेच्या कल्याणाचे राजकारण त्यांना कळाले नाही, कळतही नाही असा अपप्रचार केला. अशिक्षित जनता निझामी राजवटीचा तो कुटिल डाव ओळखू शकली नाही.

## निझामाची कोलांट उडी

साम्राज्यवादी ब्रिटिशांची राजवट संपुष्टात आली. हिंदुस्थान म्हणून जगाला परिचित झालेला आपला देश स्वतंत्र झाला. आपला देश भारत म्हणून संबोधला गेला. आपल्या देशाला सार्वभौमत्व प्राप्त होऊ नये म्हणून हैदराबाद संस्थानची निझामी राजवट अनेक कोलांट उड्या मारीत होती, अनेक युक्त्या क्लृप्त्या अंमलात आणीत होती; पाकिस्तान देशाची मदत मिळत रहावी म्हणून धडपड करीत होती. कोट्यवधी रुपयांच्या मोबदल्यात आधुनिक स्वयंचलित शस्त्रांचा व भयंकर स्फोटक द्रव्यांचा साठा करीत होती. स्वतंत्र भारत देशावर हल्ला करण्याचे मनसुबे रचीत होती. त्याच निझामी राजवटीने साम्राज्यवादी ब्रिटिश राजवटीचे राज्य आपल्या देशावर प्रस्थापित करण्याच्या आणि आपल्या देशबांधवांचा संहार करण्याच्या कामात भरपूर मदत केली म्हणून ब्रिटिश राजवटीने निझामाला आपला 'निष्ठावंत मित्र' म्हणून किताब बहाल केला. आपल्या देशाचा कर्दनकाळ ठरू पहाणाऱ्या हैदराबाद संस्थानच्या निझामाकडून स्वतंत्र देशाच्या मुंबई प्रांताला निझामाची मदत करून कोणता किताब मिळवावयाचा होता? निझामी राजवटीने हल्ल्यावर हल्ले चढवून सर्वसाधारण नागरिकांना त्रस्त केले असता, मराठवाडा विभागांचे लोक प्रतिकार करून जनतेचे मनोधैर्य वाढविण्याच्या योजना आखत असताना शस्त्रांची जुळवाजुळव करतात म्हणून संशयावरून कार्यकर्त्यांना अटक केल्याबद्दल मुंबई प्रांताचे काही समजदार आणि जागरूक अधिकारी दुःख आणि खेद प्रकट करीत होते. निझामी राजवटीच्या क्रूर अत्याचारांचा नाममात्र प्रसाद मुंबई प्रांताच्या नेत्यांना, राज्यकर्त्यांना मिळाला असता तर त्या राजवटीची क्रूरता किती अमानुष होती याची प्रत्यक्ष प्रचीती त्यांना आली असती. हैदराबादच्या नागरिकांना 'स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढा द्या' असा संदेश देणाऱ्या महात्मा गांधींची शिकवण आत्मसात करून त्या शिकवणीप्रमाणेच वागणाऱ्या व त्यांचा वारसा हक्क सांगणाऱ्या या नेत्यांचे व सत्ताधाऱ्यांचे महात्मा गांधी वेगळे होते काय?

मी मनमाडला पोहोचलो. अगदी थोड्या वेळात श्री. वसंत निंभोरकर, श्री. गिरजाशंकर ऊर्फ हिंदुस्थान, अनंत भोंगले, रामचंद्र जेऊरकर यांना घेऊन रातोरात पुण्याला पोहोचलो. श्री. बापट यांना त्यांच्याच घरी गाठले. श्री. बाबासाहेबांचे पत्र त्यांना दिले. पत्रातला मजकूर वाचून झाल्याबरोबर श्री. बापट यांनी त्यांच्या घराचे प्रवेशद्वार बंद केले. आतून कडी लावली. घरात अडगळीच्या सामानात दडवून ठेवलेले हॅन्डग्रेनेडचे १६० शेल जाड गोणपटाच्या पिशव्यात रद्दी कागदासमवेत व्यवस्थित भरले अन् त्या पिशव्या माझ्या स्वाधीन केल्या. बाकीचे ५० शेल सायंकाळपर्यंत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्या चार पिशव्या आम्ही

त्यांच्या झोपण्याच्या खाटेखाली दडवून ठेवल्या. दुपारचे जेवण जवळच्या हॉटेलात घेतले. रिकामपणाचा कार्यभाग म्हणून आम्ही पर्वतीपर्यंत गेलो. सायंकाळी ४० हॅन्डग्रेनेडचे शेल श्री. बापट यांनी एका जाड पिशवीत भरून दिले.

दौंडमार्गे मनमाड गाडी गाठावयासाठी आम्ही तांग्यातून पुणे स्टेशनवर आलो. मी सर्वांसाठी तिकिटे काढली. गाडी प्लॅटफॉर्मवर लागताच पिशव्यासह आम्ही वेगवेगळ्या डब्यात चढलो. चारपाच पोलिस शिपाई त्या गाडीच्या डब्याजवळ येरझारा घालत होते. अधून मधून ते डब्यात डोकावत होते. योगायोगाने श्री. जेऊरकर आणि हिंदुस्थान एकाच डब्यात एकमेकापासून जरा लांबवर बसले होते. त्याच डब्यात पोलिस सारखे डोकावू लागल्याने श्री. जेऊरकरांची सुरू झालेली चलबिचल पाहून हिंदुस्थानने श्री. जेऊरकर यांना डब्याच्या दाराच्या विरुद्ध बाजूच्या खिडकीजवळ बसावयास खुणेनेच सांगितले व स्वतः दाराच्या खिडकीजवळ पानतंबाखू चघळीत बसला. गाडी सुरू झाली. तेव्हा प्रत्येकाने पिशवी बाकड्याच्याखाली पायाजवळ ठेवली. पहाटे मनमाड स्टेशनवर उतरलो. एक नंबर प्लॅटफॉर्मकडे जात असताना श्री. जेऊरकर यांना पोलिसाने हटकले. श्री. हिंदुस्थानने थातुरमातुर केले. आम्ही आमच्या पिशव्यांसह बाहेर पडलो.

सकाळी ११ वाजता त्या पिशव्यांतले शेल श्री. माणिकचंद पहाडे यांच्या स्वाधीन केले. दुपारच्या भुसावळ-मुंबई पॅसेंजर गाडीने मी मुंबईला गेलो. सायंकाळी मुंबईच्या कार्यालयात श्री. बापटांकडून हस्तगत केलेले २०० शेल श्री. पहाडे यांच्या स्वाधीन केल्याचे श्री. परांजपे यांना सांगीतले.

रात्री जेवण आटोपल्यावर श्री. वैशंपायन व श्री. परांजपे यांनी ४२ च्या लढ्याच्या कामात सहभागी झालेल्या, सम विचारांच्या, समाजवादी साथी मारुती कुमार कोळी यांच्या तडफदार वृत्तीबाबत काही ठळक प्रसंग सांगितले. त्याचा ठावठिकाणा सांगितला आणि श्री. मारुती कुमार कोळी यांजकडून आपल्या लढ्याला आज आवश्यक असलेले वेगवेगळे पदार्थ व जाड तारा कापण्यासाठी विशिष्ट पद्धतीच्या कैच्या मिळू शकतील याची कल्पना दिली. सध्या ते त्यांच्या कुटुंबियासमवेत मासळ्यांचा व्यवसाय करतात; मात्र त्यांची निवांत भेटसुद्धा मध्यरात्रीनंतरच होऊ शकते. ठाणे कारागृहाच्या बऱ्याच मागच्या बाजूला खाडीजवळ ते शोधाशोध करून सापडू शकतील असे सांगून त्यांना देण्यासाठी श्री. वैशंपायन आणि श्री. परांजपे यांनी आपल्या स्वाक्षरीचे पत्र मला दिले.

जवळपास चार तास इकडून तिकडे, तिकडून इकडे फिरल्यावर श्री. मारुती कोळी यांना भेटू शकलो. प्रथम मी माझ्या कोटाच्या खिशात कोंबून ठेवलेले ओळख पत्र त्यांना दिले. जवळपास दोन तास हैदराबाद लढ्याबाबत आणि औपचारिक गप्पागोष्टी केल्या. तोपर्यंत त्यांच्या खास मर्जीतल्या सहकाऱ्याने पुढील सफरीची व्यवस्था केली होती. श्री. मारुती कोळी हे त्या विभागाचे प्रमुख होते. त्यांच्या साध्या इशाऱ्यावर सर्व कामकाज व्यवस्थित पार पडत असे. सकाळच्या तीन वाजण्याच्या सुमारास त्यांच्या समवेत मी, त्यांच्या नेहमीच्या दोन साथीदारांबरोबर ठराविक माचव्यात बसून खाडीत गेलो. एका ओसाड, मात्र गर्द झाडीने दर्शनी भाग झाकून टाकलेल्या जागेजवळ एका जाडजूड झाडाच्या बुंध्याला दोरखंड आवळून माचवा थोपटून ठेवला. माचव्याजवळ एक जुनाट निकामी नाव खाडीच्या पाण्याबरोबर हेलकावत नुसती उभी होती. दोऱ्यांच्या साहाय्याने श्री. मारुती कोळी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत वानरासारख्या उड्या मारून त्या नावेत गेले. मधून

मधून समुद्राच्या पाण्याच्या लाटा उसळून येत होत्या. मी एकटा एका माचव्यात होतो. समुद्राच्या लाटांबरोबर माचवा हेलकावे खात होता. जवळपास दोन तासानंतर श्री. मारुती कोळी व त्यांचे सहकारी यांनी अतोनात परिश्रमाने एक जाडजूड बोचके माचव्यात फेकले व त्याच्या पाठोपाठ ते सर्वजण माचव्यात आले. ते बोचके डांबर फासलेल्या गोणपाटामध्ये जाड काथ्याच्या दोऱ्यांनी घट्ट आवळून बांधलेले होते. बोचके दिसायला मोठे नव्हते मात्र बरेच वजनदार असल्यासारखे दिसत होते.

ठाण्याहून मी कोठे जाणार याबाबत त्यांनी आधीच विचारले होते. मी मनमाडला जाणार असल्याचे त्यांच्या लक्षात होते. "मनमाडकडे जाणाऱ्या गाडीत माझे सहकारी हे बोचके तुम्ही बसाल तेथे व्यवस्थित ठेवतील. मनमाडला हमाल गाठून हे बोचके आधी गाडीतून उतरुन घ्या, 'दोन पैसे अधिक देईन' असे हमालाला सांगा, म्हणजे तो हमाल वजनदार असले तरी वजनदार नसल्यासारखे सहज डोक्यावर घेऊन चालू लागेल. त्याच्या पाठोपाठ तुम्ही जा. हमाली आधीच ठरवली म्हणजे वादावादी शिवाय आपले सामान सहीसलामत नेता येते," असे सर्व त्यांनी मला एका दमात सांगितले होते. मी मनमाडला श्री. मारुती कोळी यांचा सल्ला तंतोतंत अमलात आणला. माझा कार्यभाग बिनबोभाट पार पडला. सकाळी अकराच्या सुमारास श्री. माणिकचंद पहाडे नांदगावहून मनमाडच्या कॅम्प कार्यालयात आले. औपचारिक बोलाचाली झाल्यावर श्री. पहाडे यांनी श्री. गिरजाशंकर व श्री. पंढरीनाथ तत्सत् यांच्या शिवाय बाकीच्यांना निरनिराळ्या कामानिमित्त बाहेर पाठविले. कार्यालयाचे दार आतून बंद केले गेले. आतल्या खोलीत ठेवलेले बोचके श्री. गिरजाशंकर व श्री. तत्सत् यांनी उचलून बाहेरच्या खोलीत आणले तेव्हा ते बोचके बरेच जड असल्याचे त्या दोघांच्या हालचालींवरून सहज लक्षात आले. त्यानंतर श्री. गिरजाशंकर व श्री. तत्सत् या दोघांनी बोचक्याभोवती बांधलेल्या काथ्याच्या दोऱ्या कात्रीने, ब्लेडने कापून काढल्या. बोचके मोकळे केले. तेव्हा आतल्या भागात पॅराशूटच्या कापडात गुंडाळलेले डिटोनेटर, जिलेटीन स्फोटक, फ्यूज वायर व कैच्या हाती लागल्या. ते सर्व श्री. पहाडे यांच्या स्वाधीन केले. रात्रभर झोपता आले नव्हते. झोप डोळ्यात मावत नव्हती. जेवण झाले आणि थोड्याच वेळात मला गाढ झोप लागली. रात्र मी मनमाड कॅम्पवर झोपून काढली.

दुसऱ्या दिवशी दुपारच्या गाडीने मुंबईला जायचा विचार करीत होतो. मला रिकामे बसवत नव्हते, सतत काहीतरी करावे, करीत राहावे असेच वाटत होते. माझ्या शरीराच्या मानाने मी माझ्या नकळत बरेच अधिक परिश्रम करीत होतो. त्यामुळे मी बराच थकल्यासारखा दिसत होतो. हात-पाय दुखत होते तरी रेटून वाटचाल करीत होतो. माझ्या कामाबाबतच्या धडपडीचे काही लोक कौतुक करीत होते; त्यामुळे आलेला शीण विसरून जात असल्यासारखेही वाटत होते.

## घोटीचे गोळ्या प्रकरण

सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास श्री. पहाडे आले. कार्यालयाचे नित्याचे कामकाज आटोपल्यावर श्री. पहाडे व मी बोलत बसलो. श्री. पंढरीनाथ तत्सत् दाराशी बसले होते. दाराबाहेर श्री. गिरजाशंकर उभा होता. श्री. पहाडे मला उद्देशून सांगू लागले, हे पहा शंकरलाल, ४२ च्या 'चले जाव' चळवळीच्या काळात नाशिक, इगतपुरीच्या परिसरात काही जहाल समाजवादी कार्यकर्त्यांनी, रेल्वेच्या कर्मचाऱ्यांना, हमालांना विश्वासात घेऊन, मिलिटरीच्या शस्त्रांनी भरलेल्या दोन वाघिणी मालगाडीला जोडल्या असल्याची इत्थंभूत

माहिती मिळविली. इगतपुरी आणि घोटीच्या आसपास ती मालगाडी अडवून मिलिटरीच्या शस्त्रास्त्रांच्या दोन वाघिणी लुटण्याबाबतचा आराखडा तयार केला. लाईनमनच्या करामतीने घोटीजवळ मालगाडी थांबविली. मालगाडीचे इंजिन ड्रायव्हर, इतर सहकारी आणि गार्ड यांस रिव्हाल्हरचा धाक दाखवून ताब्यात घेतले. तोपर्यंत इतर सहकाऱ्यांनी घोटी स्टेशनच्या टेलिफोन/ टेलिग्रामच्या तारा कापून टाकल्या होत्या. दोन वाघिणी फोडल्या गेल्या व त्यातून ३०३ च्या रायफली व काडतुसे हातोहात पसार केली गेली. लुटलेला माल काही धाडसी अन् तडफदार कार्यकर्त्यांनी या ना त्या प्रकारे लांबवर पसार करण्याची महत्त्वाची कामगिरी पार पाडली. त्यातला बुलेट्सचा मोठा साठा  लवकर पसार करता येईना म्हणून काही गावकऱ्यांच्या मदतीने मातीचे खड्डे खणून त्यात पुरून ठेवल्याची माहिती नांदगावच्या एका परिचित व्यापाऱ्याने श्री. पहाडे यांना सांगितली होती. त्यांचे व घोटीतल्या एका व्यापाऱ्याचे व्यापारानिनित्त स्नेहसंबंध जुळले होते. घोटीतल्या त्याछोट्या व्यापाऱ्याला त्याच्या नेहमीच्या परिचित गिऱ्हाईकांच्या व शेतकऱ्यांच्या कडून ही गोष्ट समजली होती. शेतकऱ्यांच्या मुलांना त्या बुलेट्स नेमक्या कोठे गाडून ठेवल्या आहेत त्या जागेच्या खाणाखुणाही माहीत असल्याचे समजले होते. जोरदार प्रतिकार आणि प्रतिहल्ले करण्यासाठी ३०३ च्या बुलेट्स हव्याच होत्या; त्या सहजासहजी मोठ्या प्रमाणात हाती लागणार होत्या. त्या कामाकडे श्री. पहाडे यांनी जातीने लक्ष घातले.

प्रथम नांदगावच्या व्यापाऱ्याद्वारे, तांदुळ खरेदीच्या निमित्ताने घोटीच्या छोट्या व्यापाऱ्याला नांदगावच्या विश्वासातल्या माणसाबरोबर नांदगावला आणले. त्या तिघांच्या गाठीभेटी श्री. पहाडे यांच्याच घरी झाल्या. त्या लुटलेल्या बुलेटस् बाबत आवश्यक तेवढी माहिती मिळावी म्हणून विचारपूस केली गेली. ‘रायफली निरनिराळ्या लोकांनी केव्हाच पसार केल्या होत्या. उरलेल्या बुलेट्स काही शेतकऱ्यांनी आपापल्या घरात पुरून ठेवल्या आहेत.’ त्या छोट्या व्यापाऱ्याने सांगितले. ‘त्या शेतकऱ्यांचे घर तुम्हाला माहीत आहे का?’ श्री. पहाडे यांनी विचारले. ‘हो. तीन शेतकरी व त्यांची घरे मला माहीत आहेत.’ त्या व्यापाऱ्याने सांगितले. ‘ते शेतकरी त्या गोळ्या आपल्याला देतील का?’ असा प्रश्न श्री. माणिकचंद पहाडे यांनी पुढे मांडला. ‘थोड्या पैशाच्या आमिषाने अगर धाकाने शेतकरी गोळ्या देतील.’ छोट्या व्यापाऱ्याने त्याचे मत समोर ठेवले. ‘या कामात तुम्ही आमची मदत करावी.’ श्री. पहाडे यांनी त्या व्यापाऱ्याला विनंतीवजा गळ घातली. ‘पहाडे, मला आपल्या कार्यात सहभागी होता आले तर मी स्वतःला भाग्यवान समजेन.’ त्या व्यापाऱ्याने मदतीचा हात पुढे करताना सांगितले. ‘मग उद्याच मी माझ्या कार्यकर्त्यांना पाठवतो,’ असे श्री. पहाडे म्हणाले. ‘जरूर पाठवा! मी त्यांना आवश्यक तेवढी मदत करीन.’ व्यापारी बोलले. ‘शंकरलाल, या कामासाठी कोणाकोणाला बरोबर घ्यायचे हे तुझे तूच ठरव आणि चटकन कामाला लाग.’ श्री. पहाडे मला म्हणाले. मी त्या कामगिरीच्या निमित्ताने माझ्या कामाचा आराखडा तयार केला.

दुसऱ्या दिवशी दुपारच्या भुसावळ पॅसेंजर गाडीने, सौ. गीताबाई चारठाणकर, सौ. प्रतिभा वैशंपायन, कु. कुसुम जोशी, श्री. गिरजा शंकर ऊर्फ हिन्दुस्थान, वसंत निंभोरकर, रामचंद्र जेऊरकर व मी घोटीला गेलो. आधी ठरल्याप्रमाणे आम्ही त्या छोट्या किराणा दुकानदाराकडे गेलो. आम्हाला पाहून त्यांना आनंद झाला. प्रथम त्यांनी आम्हाला त्यांच्या घरी नेले. घरातल्या सर्व वडिलधाऱ्या स्त्रीपुरुषांना आमची ओळख करून दिली. चहापान झाल्यावर ते दुकानदार मूळ मुद्याकडे वळले. ‘चला, आता आपल्याला आपल्या कामाला लागले पाहिजे.’ असे म्हणत ते ताड्कन उभे राहिले. मी एकट्यानेच त्यांच्यासोबत चलावे व बाकीच्या लोकांनी त्यांच्या घरातच राहावे असे त्यांनी सुचविले. त्यानंतर मी व ते त्यांच्या घराबाहेर पडलो. ते पुढे व मी त्यांच्यामागे चालत

चालत तीन वेगवेगळ्या घरांत गेलो. त्या तिन्ही घरात त्यांनी मला मधल्या खोलीपर्यंत नेले. तेथे चूल होती. तेथेच स्वयंपाक केला जात असावा. सुरक्षितता म्हणून लुटून आणलेल्या गोळ्या त्या खोलीत पुरून ठेवल्या असाव्यात असा मी कयास केला. आम्ही तिसऱ्या घराबाहेर पडणार होतो, तेवढ्यात शेतात काम करणारा पीळदार शरीराचा एक तरणाबांड माणूस हातातली कुदळ अन् फावडे खांद्यावर ठेवून दाराशी आला. घरमालक त्या माणसाला घेऊन चुलीच्या घरात गेला. घरमालकाने बोटाने आखून दिलेला भाग त्याने कुदळीने खोदला, नंतर हाताने माती उकरून काढली. उकरलेली माती बाजूला सारली गेली. घरमालकाने त्या माणसाला परसात बसायला सांगितले. घरमालकानी बोचक्यासभोवतालची माती बोटाने काढली. आवळलेल्या दोऱ्या सैल केल्या. दोऱ्या उपसून काढल्यावर डांबर फासलेले गोणपाट मोकळे केले. आत मऊ-तलम गुंडाळलेले पॅराशूटचे कापड काढले. त्यात तेलकट गोणपाटात गुंडाळलेल्या गोळ्या निघाल्या. सर्वच्या सर्व गोळ्या एकजात कोऱ्या करकरीत, चमकदार, तेलात माखल्यासारख्या दिसत होत्या. गोळ्यांची नितांत गरज, ज्या मिळविण्यासाठी सारखी धावपळ करावी लागत होती, ज्या सहजासहजी मिळत नव्हत्या, त्याच गोळ्या भरपूर प्रमाणात डोळ्यांनी पहाताच मला अतिशय आनंद झाला. अशा प्रकारे तिन्ही घरातून एकूण २,००० गोळ्या आमच्या पदरात पडल्या. घोटीतल्या त्या छोट्या किराणा दुकानदाराने प्राप्त परिस्थितीचे गांभीर्य ओळखून, स्वतःच्या दुकानातून थोडा कापूस, तीन प्रकारचे कडधान्य व लसूण मागविला व तो त्या गोळ्यांसमवेत गोणपाटाच्या जाड पिशव्यांत भरला. सकृद्दर्शनी, प्रवासी आपल्या घरी जीवनोपयोगी सामान नेत आहेत असेच दिसावे अशी योजना! घोटी येथे केवळ पॅसेंजर गाडीच थांबते म्हणून पॅसेंजर गाडी किती वाजता येणार आहे याची माहिती घेण्यासाठी दुकानदाराचा धाकटा भाऊ रेल्वे स्टेशनवर गेला. ‘आता सकाळी पाच वाजता गाडी आहे’, असा त्याने निरोप आणला. अदमासे रात्री चार तास दुकानदाराच्या घरी लवंडलो. जेमतेम दोन तास कशीबशी झोप झाली.

मनमाड स्टेशनवर आम्ही सकाळी बाराच्या सुमारास आलो. गाडी तशी प्रवाशांनी खचाखच भरलेली होती. गाडीतून उतरणाऱ्यांची व चढणाऱ्यांची भाऊगर्दी होती. रेटारेटी करून डब्यातून बाहेर पडताना सौ. गीताबाई चारठाणकर व श्री. वसंत निंभोरकर यांच्या पिशव्या दारावर घसडल्या गेल्या. खळ्खळ् आवाज झाला. डब्यासमोर उभे असलेल्या रेल्वे पोलिसांचे लक्ष त्या आवाजाकडे गेले. सौ. गीताबाई व श्री. वसंत निंभोरकर यांना त्या पोलिसांनी थोपवून ठेवले. तेवढ्या अवधीत बाकीचे सर्वजण आपला बचाव करण्यासाठी तत्परतेने तेथून निसटले. मी मात्र प्लॅटफॉर्मच्या बाजूला राहून पोलिस पुढे काय करतात हे पाहात उभा राहिलो. आठ दहा मिनिटानंतर गिरजाशंकर ऊर्फ हिंदुस्थान सरळ माझ्याजवळ आला व पान खाण्याच्या निमित्ताने तो मला पानपट्टीवाल्याकडे नेत असताना म्हणाला, ‘पहाडेसाहेब अद्याप आलेले नाहीत. बहुधा ते आज येणारही नाहीत; असे काल सायंकाळी नांदगावला जाण्यापूर्वी त्यांनी ऑफिसमध्ये सांगितले होते.’ ते ऐकून मी सर्दच झालो. आता काय करावे ते माझे मलाच धड समजेना. प्रतिकारासाठी ज्या गोळ्यांची सर्वत्र आवश्यकता होती त्या गोळ्या पदरात पडल्याचे समाधान मनमाडला येईपर्यंत वाटत होते; त्या समाधानावर विरजण पडू पाहात होते, गोळ्या हातच्या गेल्या तर प्रतिकार, प्रतिहल्ला करता येणार नव्हता या विचाराने डोक्यात काहूर माजविले होते. गोळ्या गेल्या तरी चालेल, गोळ्या पुन्हा प्रयत्न करून मिळवता येतील; परंतु गोळ्यासमवेत सौ. गीताबाई व श्री. वसंत निंभोरकर पकडले गेले तर त्यांना कोण कसे सोडविणार? या विचारात गढून गेलो होतो; तेवढ्यात मनमाडचे रेल्वे पोलिस सौ. गीताबाई चारठाणकर व श्री. वसंत निंभोरकर यांना त्यांच्या त्या पिशव्यासह, मनमाड रेल्वे स्टेशनच्या पोलिस चौकीत नेत असताना मी पाहिले.

अनुक्रमणिका

श्री. पहाडे यांना तातडीने नांदगावहून बोलविण्यासाठी आवश्यक ती धडपड केली; मात्र उपयोग झाला नाही. तेवढ्यात भुसावळकडे जाणारी गाडी सुरू झाली.

तब्बल बारा तास सौ. गीताबाई चारठाणकर यांना पोलिस चौकीत काढावे लागले. दुसऱ्या दिवशी श्री. पहाडे आले. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या जामीनावर सौ. गीताबाई चारठाणकर याना त्यांच्या पिशवीसह पोलिस चौकीतून सोडविले. परंतु भरपूर प्रयत्न करूनही श्री. निंभोरकरला सोडविता आले नाही. श्री. वसंत निंभोरकरला अदमासे ४३ दिवस मनमाडच्या पोलिस कोठडीतच राहावे लागले.

भारत देश स्वतंत्र झाला होता. स्वातंत्र्यप्राप्तीचा अत्यानंद सर्वत्र उफाळला होता, त्या वेळी निझामी राजवटीची जनता पारतंत्र्याच्या जोखडात अडकलेली होती. आपणही स्वतंत्र व्हावे. स्वतंत्र भारत देशाचे नागरिक म्हणून त्या आनंदोत्सवात सहभागी व्हावे यासाठी निझामी राजवटीतील जनता आपल्या जीवाची बाजी लावीत होती. प्राणपणाने लढा देत होती.

इंदूर-देवासच्या आजूबाजूस लष्कराच्या वापरात येणारी स्वयंचलित हत्यारे मिळू शकतील अशी खात्रीलायक माहिती श्री. दिगंबरराव बिंदू याना त्यांचे जुने मित्र टाकळकर यांनी सांगितली. त्या सुमारास निझामी राजवटीचा सैतानी कारभार हैदराबाद संस्थानच्या कानाकोपऱ्यात सुरू होता. जे काय हैदराबाद संस्थानात घडत होते त्याची हैदराबाद संस्थानात स्वतंत्र वृत्तपत्रे नसल्याने वाच्यता होत नव्हती. त्याशिवाय वृत्तपत्रांचे बातमीदार संस्थानच्या राज्यकर्त्यांनी दावणीत बांधून ठेवलेले असल्याने, राज्य सरकारचे अधिकारी सांगतील तशाच आशयाच्या बातम्या संस्थानबाहेर पाठविल्या जात! संस्थानात सर्व ठीकठाक चालले आहे असा शासनातर्फे प्रचार केला जात होता; तोच खरा समजला जात होता. हैदराबाद संस्थानचा मराठवाडा विभाग किती तरी वर्षांपासून सर्वस्वी दुर्लक्षित राहिला; तरी सबूरीने घ्या. हाच सल्ला अनेकांकडून दिला जात असे. हल्ल्यांवर हल्ले होत असत. प्राणार्पण करणारे, प्राणाचे मोल देणारे मातीच्या पुतळ्यासारखे घडविता येत नव्हते; म्हणून देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाचे मोल देण्याची तयारी असणाऱ्यांचे संरक्षण करणे अगत्याचे बनले होते व त्यासाठी स्वयंचलित हत्यारांचीच गरज होती.

काही कामानिमित्त मी मनमाड कॅम्पला होतो. मला तातडीने मुंबईला बोलावले असल्याची तार आली. ३० जानेवारीच्या दिवशी नागपूर एक्सप्रेसने मी मनमाडहून मुंबईला जायला निघालो. मुंबईला जाताना माझ्या डोक्यात अनेक योजना गर्दी करीत असत. शरिरात उत्साह असायचा. 'असे करू, तसे करू' असे सारखे वाटत असायचे. या प्रवासात मात्र का कोण जाणे मी बराच बेचैन होतो. मला काही तरी होत होते. काय होत होते माझे मलाच समजले नाही. मी बराच अस्वस्थ बनलो होतो. पदोपदी अस्वस्थता वाढत होती. जीव गुदमरल्यासारखे वाटत होते. माझ्या मनाची सारखी कासावीस होत होती. कल्याण स्टेशन आले. मी गाडीतून खाली उतरलो. मुंबईला जाण्याचा विचार रद्द करून परत मनमाडला जावे असेच मला वाटू लागले. मी गाडीत चढलो. पुन्हा अस्वस्थता मला भंडावून सोडू लागली. कसाबसा मी बोरीबंदरवर आलो. बोरीबंदरवर बराच शुकशुकाट दिसला. मोरारबागला जायला वाहन मिळाले नाही. मात्र स्टेशनचे आवार ओलांडताच "घोडा गाडीत काय बसला आहात? खाली उतरा. पायी चला. डोक्यावरची टोपी काढा. माहीत नाही राष्ट्रपिता महात्मा गांधी गेले. बापू गेले. बापूंचा खून झाला." स्वंयसेवक – स्वयंसेविका सारख्या ओरडून सांगत होत्या.

अनुक्रमणिका

काही ओक्साबोक्शी रडत रडत सांगत होत्या. मी माझ्या डोक्यावरची टोपी काढली. खिशात कोंबली. घोड्याची गाडी हळूहळू चालली होती. बाजारची दुकाने बंद होती. सर्वत्र "बापू गेले. बापू गेले!' 'किसी हत्यारेने उन्हे मारा।' 'रघुपती राघव राजाराम, पतीत पावन सीताराम" लोक एक आवाजाने म्हणत होते. सर्वत्र स्मशान शांतता दिसू लागली. मोठ्या मुष्किलीने मी मोरारबाग गाठला. कार्यालयात सर्वांच्या चेहऱ्यावर झालेला आघात प्रकर्षाने दिसत होता. रामधूनचे स्वर तेवढेच काय ते कानावर पडत होते. कार्यालयात मधोमध टेबलावर महात्मा गांधींची प्रतिमा ठेवली होती. प्रतिमेला पुष्पहार घातला होता. जवळ उदबत्त्या जळत होत्या. ते दृश्य पाहून माझा कंठ दाटून आला. मी हेलावून गेलो. ओक्साबोक्शी रडू लागलो. सारेचे सारे शोकसागरात बुडाले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नथुराम गोडसेने महात्मा गांधींचा खून केल्याचे समजले.

काँग्रेसचे कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि चिडलेले नागरिक कांदेवाडी आणि लगतच्या बोळात राहात असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व हिंदुमहासभेच्या लोकांच्या घरात घुसून त्याना मारहाण करू लागले. खेचत खेचत सडकेवर ओढून आणू लागले असे समजताच मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर हे जातीने कांदेवाडी विभागात आले. लोकांच्या हातापाया पडले. हिंदूमहासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक वगळता स्वतंत्र भारत देशाचे सर्वचे सर्व आबालवृद्ध स्त्री-पुरुष शोकसागरात बुडाले होते. बापूजींच्या खुनाने सारा देश हादरून गेला होता. असा जबरदस्त हादरा, धक्का यापूर्वी आपल्या देशाने अन् आपल्या देशाच्या समस्त नागरिकांनी पारतंत्र्याच्या काळातही अनुभवला नव्हता.

सत्यवानाची प्राणज्योत अकाली हिसकावून घेण्यासाठी सरसावून आलेल्या यमाला सावित्रीने रिकाम्या हाती परत जावयास भाग पाडले. निझामी राजवटीच्या निरपराधी लोकांची प्राणज्योत मालविण्यासाठी हपापलेल्या जात्यंध निझामी राजवटीला व त्या राजवटीच्या जात्यंध मुस्लिमांना, निर्वासितांना, रझाकारांना रिकाम्या हाताने परत फिरविण्यासाठी विनंती, प्रार्थना करून चालणार नव्हते. मानवतेचा संहार बंद पाडण्यासाठी हत्याराचे उत्तर हत्यारानेच देणे क्रमप्राप्त बनले होते. मानवतेची हत्या थोपवून धरण्यासाठी हत्यारांशिवाय पर्यायच बाकी नव्हता. महात्मा गांधींना भारताच्या कानाकोपऱ्यात काही लोक वगळता, इतर सारे राष्ट्रपिता मानीत होते. काही विचारवंत मुसलमानही महात्मा गांधींना त्यांचा खराखुरा पुढारी, 'रहनुमा' समजत असत. महात्मा गांधींना 'बापू' म्हणूनच संबोधिले जात असे. पर्यायाने आम्ही त्यांच्या दहा दिवसाचे अधिकारी बनतो; म्हणूनच देशभर दहा दिवसाचे सुतक पाळले गेले.

नेमक्या त्याच सुमारास हैदराबाद संस्थानात हैदोस चालू होता. निरपराध लोक मारले जात होते. सर्वत्र धुमाकूळ माजलेला होता. जात्यंधतेचा कैफ सारखा वाढत होता.

महात्मा गांधींच्या वारसदारांनी, सुतक्यांनी सुतक पाळावयाचे की त्या काळात सशस्त्र प्रतिकार करीत करीत लोकांचे जीव वाचवायाचे अशा विचारांच्या द्वंद्वात आमचे ज्येष्ठ पुढारी सापडले होते. सर्वंकष विचाराअंती सर्व शक्तिनिशी जोरदार प्रतिकार करावयाचाच निर्धार व्यक्त करण्यात आला. सुतकी मने ढवळून निघाली. पुनरपि जोरदार तयारी सुरू झाली. आतापर्यंत गोळा केलेली हत्यारे अपुरी पडत आहेत, गोळ्या व स्फोटक द्रव्ये संपत आहेत; त्यामुळे जगण्यासाठी व निरपराध्यांना जगविण्यासाठी स्वयंचलित हत्यारे, हत्यारांच्या गोळ्या, हातबॉम्ब व इतर भयंकर स्फोटक साधने मिळविणे अत्यंत आवश्यक बनले होते.

अनुक्रमणिका

श्री. दिगंबरराव बिंदू यांनी त्यांच्या मनाचा हिय्या करून, त्यांचे जुने व चांगले परिचित मित्र श्री. टाकळकर यांच्याबरोबर, मी इंदूरला जावे, असे मला सांगितले. ६ फेब्रुवारीला श्री. टाकळकर समवेत इंदूरला जाण्यासाठी आवश्यक तेवढे पैसे आणि श्रीमंत अक्कासाहेब, अच्युतराव खोडवे व सखाराम मंडलिक यांच्या नावाची ओळख पत्रे व त्यांचा पत्ता, घेऊन मी श्री. टाकळकर यांच्या समवेत इंदूरला जाण्यासाठी मुंबईहून निघालो. इंदूरला पोहोचल्यावर प्रथम आम्ही आमचा तात्पुरता मुक्काम शांतिनिकेतन हॉटेलमध्ये ठोकला. शांतिनिकेतनमध्ये अर्ध्या अधिक खोल्यांत निरनिराळ्या महाविद्यालयाचे विद्यार्थी राहात असल्याचे समजले. सकाळचे जेवण घेतल्यावर आम्ही श्री. खोडवे व श्री. मंडलिक यांच्या भेटीसाठी बाहेर पडलो. सायंकाळपर्यंत श्री. खोडवे व श्री. मंडलिक यांची गाठभेट झाली नाही; होऊ शकली नाही. आम्हाला दिलेल्या ठावठिकाणांचा पत्ता आम्ही शोधून काढला. मात्र तेथे श्री. अच्युतराव खोडवे व श्री. सखाराम मंडलिक नावाचे कोणीच राहात नसल्याचे आजुबाजूच्या कुटुंबियांकडून समजले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता श्री. खोडवे व श्री. मंडलिक यांच्या शोधार्थ आम्ही शांतिनिकेतन हॉटेल बाहेर पडलो. बरीच पायपीट केल्यावर ते दोघे समोरच्या बाजूने जात असताना अचानक दिसले. ते दोघे ज्या टोपण नावाने इंदूर शहरात वावरतात ती नावे त्यानी आम्हाला सांगितली. आम्ही शांतिनिकेतनच्या खोली नंबर ३ मध्ये थांबलो असल्याचे त्यांना सांगितले. रात्री ८ च्या सुमारास आमच्या भेटीसाठी येण्याचे त्यांनी मान्य केले; परंतु त्यांच्या काही कामानिमित्त ते दोघे येऊ शकले नाहीत.

रात्रीच्या प्रवासात बरीच दगदग सहन करावी लागल्याने मला रात्रभर झोप आली नव्हती. रात्रीचे जेवण झाल्यावर मी लगेच झोपी गेलो. सकाळी आमचा चहाफराळ झाल्यावर श्री. खोडवे व श्री. मंडलिक आतातरी येतील असे मला वाटू लागल्याने मी त्यांच्या येण्याची वाट पहात होतो. श्री. टाकळकर यांची सारखी चुळबूळ चालली असल्याचे मला दिसून आले. श्री. खोडवे व श्री. मंडलिक यांची लवकरात लवकर भेट व्हावी असे मला वाटत होते. त्या दोघांची भेट झाल्यावर त्यांच्या सल्ल्याप्रमाणे पुढील कार्यक्रम ठरवावा असे मी मनातल्या मनात ठरविले होते.

'श्री. खोडवे व मंडलिक रात्री आले नाहीत. 'आतापर्यंत आले नाहीत ते आता येतील असे दिसत नाही. इथे उगाच बसून राहण्यापेक्षा देवासलाच का जाऊ नये?' टाकळकर म्हणाले. त्यांना देवासला जाण्याची ओढ लागली आहे, घाई झाली आहे असे मला वाटू लागले. 'ते दोघे यायला हवे होते. त्या दोघांकडे हा भाग सोपविलेला आहे. आपण त्या दोघांना भेटूनच आपला पुढील कार्यक्रम ठरवू.' असे मी सांगताच श्री. टाकळकर म्हणाले. 'आपल्या कार्यभागासाठी मला तरी त्यांची गरज वाटत नाही. येथे उगाच बसून राहण्यापेक्षा देवासलाच जाऊ या.' श्री. खोडवे व श्री. मंडलिक आले नाहीत; येतीलच असे मलाही वाटेना. त्यात श्री. टाकळकरांनी देवासला लवकरात लवकर जाण्याबाबत माझा पिच्छा पुरविला होता. शिवाय त्यांनाही श्री. दिगंबरराव बिन्दू यांनी एक विश्वासू व्यक्ती म्हणून माझ्यासमवेत पाठवले होते. दोघेही श्री. बिन्दूंच्या विश्वासातले. त्यातल्या कोणाला प्राधान्य द्यावयाचे याबाबत मला निश्चित काही ठरवता येईना. श्री. खोडवे, श्री. मंडलिक यांची भेट झाली तर बरे होईल असेच मला वाटत होते. दोघांना भेटता आले नाही तर दोघांपैकी किमान एकाची तरी भेट घ्यावी, सविस्तर बोलावे आणि मगच देवासला जावे असेच मी माझ्या मनातल्या मनात ठरविले होते. परंतु श्री. टाकळकर देवासला जाण्याबाबत हट्ट धरून बसले. नाइलाजास्तव आम्ही

शांतिनिकेतन हॉटेल बाहेर पडलो. चालत चालत आम्ही थोडे पुढे आलो असू. आमच्या समोरून रामधून म्हणत एक शोकमग्न लोकांची माना खाली घालून शिस्तबद्ध मूक मिरवणूक येत होती. आम्ही रस्त्याच्या बाजूने उभे राहिलो.

राष्ट्रपिता महात्मा गांधी आम्हा सर्वांना सोडून गेले. त्याला आज बरोबर दहा दिवस झाले होते. त्याचा शोक ती मिरवणूक प्रदर्शित करीत होती. मिरवणुकीतले लोक एकमेकांशी चकार शब्द बोलत नव्हते. त्यांतले अर्धे लोक आमच्या समोरून जात असताना आम्ही पाहात होतो. त्यानंतर काही लोक बोटांनी खुणा करून तोंडातून शब्द न काढताच एकमेकांना काही सांगत असल्यासारखे वाटले. तेवढ्यात त्या शिस्तबद्ध एक कतारीने, उघड्या डोक्याने जाणाऱ्या मिरवणुकीतून तीनचार तरुण बाजूला झाले. त्यापैकी एक जण आम्हा दोघांच्या समोर उभा टाकला. मिरवणूकीच्या जरासे बाजूने चालत असलेल्या पोलिस इन्स्पेक्टरला दुसरा काही तरी सांगू लागला. तेवढ्यात ती मिरवणूक आमच्या पुढे पाच-सहा पावले जाताच, तो पोलिस इन्स्पेक्टर, जमादार व चारपाच पोलिस शिपाई आमच्या मागे पुढे उभे ठाकले. श्री. टाकळकर सटपटले अन् झटकन् दोन पावले मागे गेले. पोलीस इन्स्पेक्टर माझ्या चेहऱ्याकडे बारकाईने पाहात असल्यासारखे चटकन् माझ्या लक्षात आले. काँग्रेसच्या स्वयंसेवकाने पोलिस इन्स्पेक्टरला सांगितल्याप्रमाणे माझ्यात व श्री. गोळवलकर गुरुजींच्या चेहऱ्यात बरेच साम्य असल्याचा निष्कर्ष त्याने मनाशी पक्का केला असावा अन् वेषांतर केलेले श्री. गोळवलकर गुरुजी मीच आहे असे त्या इन्स्पेक्टरला मनोमन पटले असावे असे त्याच्या चेहऱ्यावर सतत बदलत चाललेल्या हावभावावरून मी ताडले. मुंबई सोडण्यापूर्वी श्री. आनंदराव वाघमारे सहज म्हणाले होते, "शंकरलाल, तू आता हुबेहूब गोळवलकर गुरुजी सारखाच दिसतोस." त्याची आठवण मला झाली. श्री. गोळवलकर गुरुजी वेषान्तर करून भ्रमंती करीत असताना त्यांना पकडल्याचे श्रेय आता आपल्याला मिळणार असल्याची आनंदाची छटा त्या पोलिस इन्स्पेक्टरच्या चेहऱ्यावर चमकली. तेवढ्यात शिपायाने आणलेली सुवासिक जर्द्याची पानपट्टी त्याने तोंडात कोंबली आणि पोलिस शिपायासमवेत मला जवळच्या पोलिस चौकीत नेले. मला श्री. गोळवलकर गुरुजी समजून लागलीच पोलिस कोठडीत बंदही केले.

मी गोळवलकर गुरुजी नाही तर हैदराबाद स्टेट काँग्रेसचा, श्री. दिगंबरराव बिंदू सारख्या ज्येष्ठ पुढाऱ्याचा विश्वासू कार्यकर्ता आहे याबाबत सर्व माहिती श्री. टाकळकरांना होती, तरी त्यांची घाबरगुंडी उडाली. ते त्यांचा जीव वाचविण्यासाठी धावतपळत, धापा टाकीत शांतिनिकेतन हॉटेलात दाखल झाले. खोली उघडून पलंगावर आडवे होण्यापूर्वी त्यांनी आपल्या खोलीला आतून कडी लावली. श्री. खोडवे व मंडलिक यांची शोधाशोध करून मला पोलिसांनी पोलिस चौकीत नेल्याचे सांगावयाचे पार विसरून गेले. दुपारच्या जेवणाच्या वेळी आमच्या खोलीच्या शेजारच्या दोघा विद्यार्थ्यांनी 'तुमचे मित्र दिसत नाहीत? कोठे गेले आहेत?' असे श्री. टाकळकर यांना विचारले. शेजारच्या विद्यार्थी मित्रांनी कळकळीने विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर श्री. टाकळकरांना धड सांगता आले नाही. इतक्यात देवासहून आलेले विद्यार्थ्यांचे वर्गमित्र आम्ही ज्या खोलीत थांबलो होतो त्या खोलीच्या समोरच्या खोलीत दाखल झाले आणि लागलीच आवेशाने त्यांच्या वर्गमित्रांना सांगू लागले. "वेषान्तर केलेल्या गोळवलकर गुरुजींना अलीखान पोलिस इन्स्पेक्टरने शिताफीने पकडून बाजार चौकाच्या पोलिस कोठडीत बंद केले आहे."

"गोळवलकर गुरुजी याच समोरच्या खोलीत उतरले होते. भल्याभल्याना ते माहीत नाही." दुसऱ्या मित्राने पुष्टी जोडली. अन् गोळवलकर गुरुजींच्या येथील वेषांतर अवस्थेबाबत वादविवाद सुरू झाला.

अनुक्रमणिका

"पोलिस इन्स्पेक्टर अलीखान यांनी ज्यांना पकडून पोलिस चौकीत बंद केले आहे ते गोळवलकर गुरुजीच आहेत का? " एका विद्यारर्थ्यांने शांतपणे प्रश्न विचारला." हो." इतकेच नाही तर इंदुरच्याच एका काँग्रेसच्या स्वयंसेवकाने गुरुजींना त्या जमावात चाणाक्षपणे ओळखले. "श्री. गोळवलकर गुरुजींना पकडल्याने आनंदित झालेल्या विद्यार्थ्याने सांगितले. "तुझी अन् त्या काँग्रेसच्या स्वयंसेवकाची गल्लत झालेली आहे." "नाही, आमची मुळीच गल्लत झालेली नाही." असा वादविवाद सुरू होता तरी श्री. टाकळकर काही एक बोलले नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांत अनेक शंका कुशंका बळावत गेल्या. तर्कवितर्क लढविले जाऊ लागले. इतक्यात बाजार चौकात राहात असलेला एक विद्यार्थी तेथे आला.

"अरे मित्रांनो, गोळवलकर गुरुजींना तडकाफडकी करण्यात आलेल्या अटकेमुळे आपण सारेच भारावून गेलो आहोत. आपले राष्ट्रपिता बापू यांच्या शोक मिरवणुकीचे त्यांना काय सोयरसुतक असणार? त्याबाबत आपण विचारच केला नाही. त्या अलीखान पोलीस इन्स्पेक्टरचाही आपण विचार केला नाही. अलीखानला मी चांगला ओळखतो. तसा तो बिनडोकच आहे. तो केव्हा काय करील याचा नेम नाही. सर्वस्वी त्यांच्यावर विसंबून राहण्यात अर्थ नाही." चर्चेतील एका मित्राची प्रतिक्रिया.

"या सर्व घडामोडीतून पराचा कावळाच होण्याची शक्यता दिसते. अन् असे झालेच तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक आपले हसे उडवतील. म्हणून निदान आपण तरी उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग सारखे करू नये!" सावधगिरीची आणखी एक प्रतिक्रिया.

"मग पकडलेली व्यक्ती आहे तरी कोण? " दुसरी शंका. "कोणी का असेना, प्रत्येक घडामोडीच्या निराकरणाचे आपणच मक्तेदार आहोत काय? "

काही कारण नसताना कोणा एकाची छेडछाड केली असेल, त्रास दिला जात असेल तर आपण बोलले पाहिजे. जरूर वाटल्यास झगडले पाहिजे. मित्रांनो, आपण सारे स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत हे इतक्यातच विसरू नका." एका शांतवृत्ती विद्यार्थ्याने त्याचे मनोगत सांगितले.

"मग आपण काय करावे असे तुला वाटते? "

इतके बोलून झाल्यावर हॉटेलमध्ये राहात असलेले व बाहेर राहात असलेले चौघे विद्यार्थी तडक शांतिनिकेतन हॉटेलच्या मॅनेजरकडे गेले.

आठ तारखेला मी व श्री. टाकळकर, दोघेच शांतिनिकेतनमध्ये आलो असल्याचे मॅनेजरनी सांगितले. आम्हा दोघांची नावे, आम्ही कोठून आलो, कोणत्या कामासाठी आलो व आमच्या व्यवसायाबाबत शांतिनिकेतन हॉटेलच्या रजिस्टरमध्ये नोंदलेली माहिती त्यांनी वेगळ्या कागदावर टिपून घेतली. त्याचे वाचन सर्व विद्यार्थ्यांसमोर करण्यात आले. ही सर्व घटना टाकळकरांकडून मला नंतर समजली.

पोलिस इन्स्पेक्टर तसा बिनडोकच होता. श्री. गोळवलकर गुरुजींना पकडले म्हणून त्याला पारितोषिक मिळेल, बढती मिळेल, यासाठी काँग्रेसच्या स्वयंसेवकांनी सांगितले ते खरे समजून गोळवलकर

गुरुजींसारख्या दिसणाऱ्याला अटक केली आहे, असा निष्कर्ष काढून आता काय केले म्हणजे माझी सुटका होऊ शकेल याचाच विचार विद्यार्थीवृंदामध्ये सुरू झाला.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची आवश्यक तेवढी मदत घ्यावी असे सर्व विद्यार्थ्यांनी ठरविले. दरम्यान श्री. खोडवे व श्री. मंडलिक यांची शोधाशोध केली. परंतु त्यांची भेट प्रत्यक्ष झालीच नाही.

सायंकाळी पाचच्या सुमारास श्रीमती अक्कासाहेब पाळण्याच्या गाद्या घेण्यासाठी बाजार चौकाच्या पोलिस चौकीजवळच्या दुकानात त्यांच्या मोटारीतून आल्या होत्या. तोपर्यंत मी पोलिस कोठडीतच होतो. सकाळपासून मला पिण्याचे पाणी देखील दिले नव्हते. माझ्या जिभेला सारखी कोरड पडत होती. तहानेमुळे मी कासावीस झालो होतो. पाण्यासाठी मी बरीच आरडाओरड केली परंतु कोणीही तिकडे लक्ष दिले नाही. माझ्या पोटात सारखी कालवाकालव होत होती. मी माझी सारी शक्ती एकवटून जोरजोराने ओरडत होतो. अचानक माझ्या आरडाओरडीचा आवाज श्रीमंत अक्कासाहेबांच्या कानी पडला. त्या पोलिसांच्या मोटारीजवळ आल्या. चौकशी करता, इन्स्पेक्टर अलीखान यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसचा कार्यकर्ता शंकरभाई पटेल यांना गोळवलकर गुरुजी समजून सकाळपासून ठाण्याच्या खोलीत बंद केले आहे; मात्र ठाण्यात बंद केलेली व्यक्ती गोळवलकर गुरुजीच असल्याचे पहारेकरी सांगतात अशी माहिती तेथे आलेल्या शांतिनिकेतनमधील विद्यार्थ्यांनी त्यांना दिली. त्यांचे खाजगी कारभारी त्यांच्या शेजारी होते.

"हे विद्यार्थी म्हणतात, ती व्यक्ती गोळवलकर नाही, ती व्यक्ती तर हैदराबाद स्टेट काँग्रेसची आहे." अक्कासाहेबांनी त्यांच्या खाजगी कारभाऱ्यांना लागलीच म्हटले.

"राजे महाराज, मी शांतिनिकेतन हॉटेल मध्येच राहतो. ठाण्यात बंदिस्त केलेली व्यक्ती हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या काही विशिष्ट कामानिमित्त कालच येथे आली. ती व्यक्ती व त्याचे जोडीदार आमच्या खोलीजवळच थांबलेले आहेत. त्यांचे नाव आहे शंकरलाल पटेल" . एका विद्यार्थ्याने नम्रपणे सांगितले. "जमादार, त्यांना माझ्या जबाबदारीवर ताबडतोब बाहेर आणा." असे अक्कासाहेबांनी सांगताच मला बाहेर काढण्यात आले व माझी सुटका झाली. मी ठाण्याबाहेर येताच विद्यार्थ्यांनी आवाज एकवटून घोषणा दिली 'राष्ट्रपिता महात्मा गांधी झिंदाबाद!'

श्रीमती अक्कासाहेबांना विनम्रभावाने अभिवादन करून मी त्या विद्यार्थ्यांसमवेत शांतिनिकेतन हॉटेलमध्ये आलो. तीन दिवस प्रयत्न करूनही श्री. खोडवे व श्री. मंडलिक यांना आम्ही किंवा ते आम्हाला भेटू शकले नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी श्री. टाकळकर समवेत देवासला गेलो. त्यांच्या मध्यस्थीने एक अमेरिकन बनावटीचे नवे कोरे करकरीत रिव्हॉल्वर व शंभर गोळ्या मिळाल्या.

औरंगाबाद जेलमध्ये असताना वाढलेले केस व दाढी यांची औरंगाबाद जेलमधून सटकण्यास मला बरीच मदत झाली. मी जेलमधून पसार झालो तेव्हा मी निर्वासितासारखाच दिसत होतो. माझे चांगले परिचित

स्नेही डॉ. डिक्कर व श्री. गोपाळदास मेहताही मला ओळखू शकले नव्हते; परंतु माझी वाढलेली दाढी व डोक्यावरचे केस यामुळे मी जवळपास गोळवलकर गुरुजींसारखा दिसत होतो. त्याचा परिणाम इंदूरला विचित्र रीतीने भोगावा लागला.

इंदुरला घडलेला प्रकार मी श्री. दिगंबरराव बिंदु व श्री. गोविंदभाईंना सांगितला.

'शंकरभाई, एक-दोन दिवसात तुम्ही तुमचा फोटो काढून घ्या अन् लागलीच केस कमी करा. दाढी काढून टाका. आता पुन्हा जेलमध्ये जायची व जेलमधून पळून बाहेर पडावयाची पाळी न यावी.' असे श्री. गोविंदभाईंनी मला सांगितले. २ मार्चला महात्मा गांधीच्या पहिल्या मासिक श्राद्धाच्या दिवशी मी श्री. गोविंदभाईंच्या सूचनेनुसार फोटो काढला, केस कमी केले आणि दाढी काढून टाकली.

हैदराबाद संस्थानचे मीर उस्मान अलीखान संस्थानिक होते, तरी राजवटीचा सारा उलटसुलट कारभार कासिम रझवीच्याच इषाऱ्यावर चालत होता. संस्थानाच्या कानाकोपऱ्यात रझाकारांच्या पाशवी अत्याचारांनी थैमान माजविले होते. हिंदू जनतेच्या रक्ताचे घोट घ्यावयासाठी पिसाळलेले रझाकार, निर्वासित आणि निझामी राजवटीचे पोलिस अतिशय अमानुष अत्याचार करीत होते. पदोपदी कासिम रझवीचे फूत्कार हैदराबाद संस्थानच्या नागरिकांच्या कानावर आदळत होते. जे घडत होते ते राष्ट्रीय विचाराचे श्री. सिराजुल हसन तिरमिजी सारख्या मुसलमानांना आणि बहुतेक शिया पंथाच्या मुसलमानांना पसंत नव्हते. तेच तेवढे रझाकार बनले नव्हते. हैदराबाद संस्थानचे संस्थानिक जिवंत असताना त्यांच्या डोळ्यांदेखत कासिमचाच शब्द न् शब्द निझामाच्या शब्दापेक्षा महत्त्वाचा गणला जात असे. पाश्चात्त्य देशांतून अनेक प्रकारची हत्यारे सरळ विमानाने हैदराबाद संस्थानात धडकत होती. पाकिस्तान देशाची कुमक केव्हाही येण्याच्या मार्गावर होती. अशा बिकट विचित्र अवस्थेत हैदराबाद संस्थानात सर्वत्र शांतता असल्याचे नारे, रेडिओद्वारे शांतता कमिटीच्या हिंदू आणि मुस्लिमाद्वारे लावले जात होते. शांतता कमिटीचे सदस्य सरकारचे बगलबच्चे. फंदफितुरीचे जनक, मवाळ नेमस्तांचे वारस आणि अहोरात्र निझामाची री ओढणारे होते; इतकेच नव्हे तर, उद्याचा विचार न करता, बेशरमीचा बुरखा पांघरून निलाजऱ्यालाही शोभणार नाही असे, हैदराबाद राज्याच्या रेडिओवरून, हैदराबाद संस्थानात सर्वत्र शांतता नांदत असल्याची सपशेल खोटी भाषणे देत हैदराबाद संस्थानच्या नागरिकांची आणि हैदराबाद संस्थानच्या बाहेरच्या नागरिकांची दिशाभूल करीत होते. स्वतःला धुरीण समजणारे काही राजकारणी तडजोडीची बोलणी निझामी राजवटीच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांबरोबर करीत होते; तेही हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचे सदस्य लढा लढविणाऱ्या कृतिसमितीच्या सदस्यांना अंधारात ठेवून. हिंदूना व मुसलमानांना प्रत्येकी ५० टक्के प्रतिनिधित्व देण्याच्या अटीवर तडजोड झाल्याच्या कंड्या फैलावल्या जात होत्या. हैदराबाद स्टेट कॉँग्रेसच्या कृतिसमितीच्या पुढाऱ्यांच्याच आदेशाचे तंतोतंत पालन करणारे कार्यकर्ते मात्र 'मोडून जाऊ पण वाकणार नाही .' या बाणेदार वृत्तीने मानवतेचा खून करणाऱ्यांना जमीनदोस्त करण्यासाठी नव्या जोमाने सरसावले होते. राजधानीतले काही धनवान, व्यापारी, ज्येष्ठ पुढारी निझामी राजवटीला हस्ते परहस्ते, निरनिराळ्या खोट्या नावांनी सहाय्य करीत होते. योगायोगाने आतल्या आत लपून छपून चाललेल्या देशद्रोही कारभाराचे बिंग अखेर फुटले.

अनुक्रमणिका

हैदराबाद संस्थानाची नाकेबंदी करण्याचे धोरण भारताचे उपपंतप्रधान गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी ठरविले व लगेच त्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणीही सुरू झाली. हैदराबाद संस्थानात बाहेरून रेल्वे मार्गाने, जड वाहनातून आणि बैलगाड्यातून सडकेवरून आणि चोरमार्गाने येणारा कोणताही माल, कापड, तेलाचे व जीवनोपयोगी वस्तूंचे साठे जेथल्या तेथेच जप्त करण्याच्या सूचनांची कडक अंमलबजावणी सुरू झाली. श्री. माणिकचंद पहाडे यांनी वार्ताहार श्री. पांडुरंग रांजणीकर यांची नियुक्ती मनमाड रेल्वे स्टेशनवर केली. त्यांनी स्थानिक पोलिस अधिकारी व शिपायांच्या मदतीने मनमाड-पूर्णा-हैदराबाद मार्गाने जाणाऱ्या प्रत्येक गाडीतल्या मुसलमानाची आणि माल पुरवठ्याचा व्यवसाय करणाऱ्या मुसलमान आणि हिंदू दलालांची कसून तपासणी सुरू केली. औरंगाबाद शहरात नावाजलेल्या काही दुकानदारांनी अनेक उपाय करून माल अडवून ठेवण्याची कामगिरी बजावली.

हैदराबाद संस्थानात अशांततेचा भडका पेट घेऊ लागला होता. भारताला सार्वभौमत्व मिळू लागले तर त्यावेळी हैदराबाद संस्थानाला स्वतंत्र राज्य मानले जावे यासाठी अनेक प्रकारचे खटाटोप सर्रास केले जात होते. त्या दुर्दैवी घटनांची माहिती भारत सरकारला मिळाली होती. सार्वभौमत्वाआड येणाऱ्या अनिष्ट आणि दुर्दैवी घटनांना जेथल्या तेथे खीळ ठोकली जावी असे प्रयत्न सुरू झाले. अशा घटना नेस्तनाबूत करू शकेल, असा दरारा हैदराबाद संस्थानच्या राज्यकर्त्यांना वाटावा तसेच शेजारच्या पाकिस्तान देशालाही वाटावा म्हणून हैदराबाद संस्थानिकाला व पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना उद्देशून भारताचे उपपंतप्रधान गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारत सरकारच्या रेडिओवरील त्यांच्या भाषणाद्वारे नुसतेच खडसावले नव्हते तर त्याप्रमाणे कृतीलाही प्रारंभ केला होता.

**

अनुक्रमणिका

# निझामी हद्दीतील लढ्याची काही केन्द्रे

पाकिस्तानचे राष्ट्रपती कायदे आझम बॅ. महमदअली जिना यांना उद्देशून –

गृहमंत्री सरदार वल्लभभाई म्हणाले,

"जिना साब, भारत देश शांतताप्रिय देश है। भारत शांतता रखना चाहता है। हमारे देशमे अशांती पैदा करनेका प्रयास करने नही दिया जायेगा। शांतताप्रधान भारत तलवारका जबाब तलवारसे भी दे सकता है। भारत देशका, देशवासियोंका राष्ट्रपिता महात्मा गांधी के अहिंसा पर पूरा विश्वास है। हमारे देश मे अशांती पैदा करनेका प्रयास कभीभी नही करना। हम किसीको भी किसीके नामपर हमारे देशमे हिंसाचार नही करने देंगे!"

सरदार पटेल यांच्या आकाशवाणीवरील भाषणाने हैदराबाद संस्थानच्या बहुतेक हिन्दूंना कमालीचा दिलासा दिला. त्यांचे मनोधैर्य बरेच वाढले.

"जिना साब, भारत तलवारका जबाब तलवारसेही देगा" हे वाक्य बहुतेकांना तोंडपाठ झाले होते. तेच वाक्य वेळोवेळी, वेळप्रसंगी बोलून दाखविले जात होते. जेव्हा केव्हा, जोरजुलूम, दंडेलीचे, अत्याचाराचे प्रकार दिसत तेव्हा तेव्हा कार्यकर्ते "तलवारका जबाब तलवारसेही दिया जाएगा।" असे त्वेषाच्या भरात बोलू लागले.

'तलवारीचे उत्तर तलवारीनेच दिले जाईल' या घोषवाक्याने थोडाफार वचक, गुंडागर्दी करणाऱ्या जात्यंध मुस्लिमांवर, रझाकारांवर, निर्वासितांवर बसत असल्यासारखे दिसू लागले. मानवतेचा खून करण्याच्याच अविचाराने पिसाटलेल्या हिणकस मनोवृत्तीची अधेमधेच दमछाक होऊ नये म्हणूनच 'इस्लाम खतरेमे है' या घोषणेचे फूत्कार रझाकारांचा सरदार कासीम रझवी टाकू लागला. 'इस्लाम खतरेमे है' या जात्यंधतेच्या विषारी फूत्काराने वातावरण पुनरपि विषारी बनू लागले. त्या वातावरणात सर्वसामान्य नागरिकांचा सत्यानाश होऊ नये, विषारी वातावरण पैदा करणारेच शिल्लक राहू नयेत अशी योजना आखली जात होती. प्राप्त परिस्थितीचा चौकस विचार करून हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या कृतिसमितीने प्रतिकारात्मक लढा अधिक प्रखर करण्याचेच निश्चित धोरण स्वीकारले.

श्री. द्वारकादास पटेल यांना देऊळगावराजा कॅम्पवर पाठवावयाचे ठरल्यामुळे त्यांच्याकडून औरंगाबाद कृतिसमितीची सूत्रे श्री. काशीनाथ नावंदर यांनी स्वीकारली. त्यांची औरंगाबादेतील शाळा कॉलेजच्या विद्यार्थी विद्यार्थीनींबरोबर आणि तरुणांबरोबर चांगलीच जवळीक होती. शाळा कॉलेजला रामराम ठोकणारे बहुतेक विद्यार्थी काहीतरी आगळे आणि दिव्य करावयाच्या विचाराने झपाटलेले असल्याने, प्रत्यक्ष कार्यक्रम तडकाफडकी सांगा असेच सतत म्हणत होते. शहराच्या बहुतेक विद्यार्थ्यांनी कायमचे जमत नसेल तर निदान तात्पुरते शाळा कॉलेजचे शिक्षण सोडावे यासाठी आवश्यक तेवढे प्रयत्न करूनही काही विद्यार्थी पालकांच्या, शिक्षकांच्या व प्राध्यापकांच्या धमक्यांना घाबरून शाळा कॉलेजला जातच होते. विनंती-विनवण्यानी जे साधले नाही ते दहशतीने साधले जाईल असा कयास करून इंटरमिजिएट कॉलेजच्या इमारतीचा काही भाग जमीनदोस्त करण्यासाठी डायनामाइट लावण्याची योजना आखली गेली. खाराकुवा भागातले श्री. रमणलाल

अनुक्रमणिका

पारेख व नवनीतलाल बादशहा यांनी पहारेकऱ्यांची नजर चुकवून मुख्य इमारतीपासून वेगळ्या असलेल्या सायन्स विभागाच्या इमारतीला रात्री डायनामाइट लावला. डायनामाइटच्या धडाक्याने इमारतीला जबरदस्त हादरा बसला. स्फोटाचा आवाज लांबवर ऐकू गेला. आता कॉलेजच्या आवारात वावरणे धोक्याचेच आहे असे गृहीत धरून, जे विद्यार्थी विनंत्याना न जुमानता कॉलेजला जातच असत त्यांनीही कॉलेजला जाणे बंद केले.

हैदराबाद स्टेट काँग्रेस कृतिसमितीने अंगिकारलेल्या चळवळीचे स्वरूप पदोपदी उग्र बनावे, जवळून दुरून पहाणाऱ्याला व घरात बसून ऐकणाऱ्याला त्याची धडकी भरावी, जोरदार प्रतिकार केला जावा. प्रतिहल्ले चढविले जावेत; जोरदार प्रतिकाराने निझामी राजवटीच्या पोलिसांना, गावगुंडांना, निर्वासितांना आणि रझाकारांना धडकी बसावी व त्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेची खच्ची करण्यासाठी विद्यार्थी कार्यकर्ते, गावकरी त्वेषाने चवताळून, सर्व शक्ती एकवटून, ठोशास ठोसा देण्यासाठी जोमाने पुढे आले. या हेतूने पाटीलपटवाऱ्यांचे दप्तर जाळणे, पोलिस चौक्या व करोडगिरीचे नाके उद्ध्वस्त करणे, रेल्वेचे रूळ उखडणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, छोटे पूल उडविणे इत्यादी प्रकारचा कार्यक्रम कार्यान्वित करण्याचा आराखडा तयार केला गेला.

**रूळ उखडण्याचे धाडस**

मनमाड कॅम्प बैठकीत ठरल्याप्रमाणे दौलताबाद व पोटूळ रेल्वे स्टेशनच्या मध्य भागातील रूळ उखडण्याचा व तारा तोडण्याचा कार्यक्रम स्वतः श्री. काशीनाथ नावंदर यांच्याकडे सोपविला गेला होता. त्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्यांत श्री. काशीनाथ नावंदर समवेत, श्री. वसंत निंभोरकर, गिरिजाशंकर ऊर्फ हिन्दुस्थान, सांडू कऱ्हाळे साहू कुलकर्णी व रामचंद्र जेऊरकर होते. ठरविलेला कार्यक्रम ठराविक वेळातच पार पाडणे आवश्यक होते. जलद वाहने उपलब्ध नसल्याने नाइलाजास्तव सायकलींचा वापर करावा लागला. कार्यक्रम ठरविताना निश्चित केलेल्या जागेजवळ जाताच सांडू कऱ्हाळे माकडासारखा झपझप खांबावर चढला. कंबरेत बांधलेल्या विशिष्ट प्रकारच्या कैचीने त्याने एका मागून एक पाच तारा कापून काढल्या. रात्रीचा सर्वत्र अंधार, खोलगट जमीन, दगडधोंडे आणि काटेरी झाडाझुडुपांचा सतत होत असलेला त्रास सहन करीत करीत साधारणतः दोन मैल लांबीच्या पट्ट्यातल्या तारा कापल्या. परतीचा लांबचा प्रवास सायकलींनीच करावा असे ठरले. सकाळ उजाडण्यापूर्वी बरेच अगोदर सारेचे सारे औरंगाबाद शहरात निरनिराळ्या मार्गाने आपापल्या घरी गेले.

अशांतता सर्वत्र घोंघावत होती; तरी औरंगाबाद रेडिओद्वारे सर्वत्र शांतता असल्याचे दररोज सांगितले जात होते. जे काय राजरोस घडत होते त्याची मनस्वी चीड, अनेकांना येत होती. मनात खुपत असलेल्या बोचणीमुळे सपशेल खोटे प्रसारण करणाऱ्या रेडिओ स्टेशनचाच गळा घोटावा, त्याचा आवाज कायमचा बंद पाडावा म्हणून रेडिओ स्टेशनच उद्ध्वस्त करायचा विचार महिनाभर अनेकांना सारखा भंडावून टाकीत होता. पण रेडिओ स्टेशन उद्ध्वस्त करावयाचे काम तसे सोपे नव्हते. तसेच आवश्यक तेवढी साधनेही उपलब्ध नव्हती.

अनुक्रमणिका

## औरंगाबाद तहसील कार्यालयावर धाड

औरंगाबाद तहसील कार्यालयाची इमारत उद्ध्वस्त करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. गनकॉटन स्लॅब मिळाली नाही म्हणून जिलेटीनचा उपयोग करावयाचे ठरविले. श्री. दिगंबर कुलकर्णी यांनी तहसील कार्यालयाच्या इमारतीची बारकाईने पहाणी केली. धुमधडाका उडविण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. कामाची वाटणी श्री. काशीनाथ नावंदर, दिगंबर कुलकर्णी, सांडू कऱ्हाळे व दत्ता पाडळकर यांनी आपापसात केली. हे चौघे कुंभारवाडा विभागात, अमृतेश्वर मंदिरासमोरील कु. प्रमिला पारनेरकरच्या घरातून रात्री तीनच्या सुमारास बाहेर पडले. मुरगी नाक्याजवळच्या लहानशा टेकडीवजा उंचवट्यावरून, जहागिरदारांच्या वाड्याच्या बाजूने तहसील कार्यालयाच्या पूर्वेकडील भिंतीला भोक पाडण्याची त्यांनी खटपट सुरू केली. त्याजवळच कार्यालयाचे प्रवेशद्वार होते. तेथे अरब पहारेकरी व सशस्त्र पोलिसांचा पहारा होता. धडपड करून, खाटखूट न वाजू देता भिंतीला भोक पाडले गेले. त्या भोकातून डायनामाइट आत घातले. डिटोनेटर व फ्यूज वायर व्यवस्थित जोडल्यावर फ्यूज वायर पेटविली. श्री. नावंदरसह तिघांनी तेथून पळ काढला. परतीचा मार्ग निश्चित केलेला असताना, घाईगर्दीने, लवकरात लवकर लांबवर सटकता यावे या विचारात गोंधळल्यामुळे, परतीच्या मार्गाचा थोडासा विसर पडला. प्रसंगावधान राखून काशीनाथ नावंदर यांनी आपल्या पाठोपाठ पळत चलायचे सांगितले, अन् ते पळू लागले. गडद अंधारातून ते चौघे कोठून कोठे जात होते ते त्यांचे त्यांनाच धड समजले नाही. अंगाला, विशेषेकरून पायाच्या पिंढऱ्या व मांडीला काट्याकुट्याचे ओरखडे चांगलेच झोंबत होते. कसेबसे त्या चौघांनी आजच्या भाजी मंडई व ज्योती लॉजच्या जवळून वाहाणाऱ्या नाल्यात पाय ठेवताच कानठळ्या बसतील इतका मोठा प्रचंड आवाज झाला. जुना बाजार, कुंभारवाडा, औरंगपुरा विभागात तो प्रचंड आवाज जाणवला. त्या धुमधडाक्याच्या आवाजाबाबत अनेकप्रकारे शोधाशोध करण्यात आली. संशय म्हणून अनेक घरांच्या झडत्याही घेण्यात आल्या. झडत्या घेण्याचे सत्र बरेच दिवस अहोरात्र चालू होते. रात्री ९-१० च्या सुमारास सडकेवर रेडिओ ऐकण्याच्या निमित्ताने जमा होत असलेल्या गर्दीचा फायदा घेऊन काशीनाथ नावंदर त्याच्या वास्तव्याची जागा बदलत असे. अधूनमधून काशीनाथ नावंदर श्री. गंगाधरराव भोगले यांच्या घरात राहावयाचा. श्री. काशीनाथ नावंदरच्या सोबतीला सांडू कऱ्हाळे हा बराच धीरोदात्त, विश्वासू कार्यकर्ता होता.

औरंगाबाद शहरातील आजच्या सिद्धार्थ बागेजवळचा पूल उडवावयाचे ठरले. दिगंबर कुलकर्णी, दत्ता पाडळकर आणि सांडू कऱ्हाळे यांनी स्वतः होऊन ती कामगिरी स्वीकारली. जाण्यायेण्याचा मार्ग आपसात निश्चित करून ते तिघे सायकलीवर पुलाकडे गेले. त्यावेळी रात्रीचे आठ वाजले असावेत. रस्त्याची रहदारी बरीच थंडावलेली होती. स्वच्छ चांदणे पडले होते. ते तिघे, त्यांच्या सायकली सडकेच्या बाजूला ठेवून पुलाच्या पायथ्याशी गेले. पुलावरून, पुलाजवळून जाणाऱ्या येणाऱ्याला ते दिसू शकत नव्हते. त्या तिघांनी एकमेकांच्या संगनमताने डायनामाइटला फ्यूज वायर जोडल्यावर लगेच त्याला स्फोटक वात लावली अन् ती वात पेटविली. वातीने पेट घ्यायला प्रारंभ करताच ते तिघे आपापल्या सायकली घेऊन सटकले. डायनामाइटचा स्फोट व्हायला किमान २० मिनिटावर वेळ लागेल असे त्यांचे अनुमान होते. आजच्या 'प्रिन्ट्रॅव्हल' हॉटेलच्या चौरस्त्यावर, अदालत रोडवरून भरवेगाने सायकलीवरून जात असताना न्यायमंदिर व कोटला मंदिराजवळ एका पिसाट कुत्र्याने भुंकत भुंकत त्यांचा पाठलाग सुरू केला. त्या पिसाट कुत्र्याच्या पाठलागामुळे त्या तिघांना भरवेगाने सायकली पुढे रेटता येईनात. तेवढ्यात स्फोट झाल्याचा आवाज कानावर

आदळला. कोर्टाच्या पहारेकऱ्यांनी एका मागून एक ललकाऱ्या दिल्या. सुरक्षिततेसाठी प्रथम दत्ता पाडळकर कोटला बालाजी मंदिराकडे वळला. सांडू कऱ्हाळे काला चबुतराचौकमार्गे मोंढ्याकडे गेला. दिगंबर कुलकर्णीने पैठण गेटकडचा रस्ता पकडला. सबजी मंडी, शहाअली नेहरी दर्गा, सिल्लेखाना विभागात स्फोटाचा हादरा जाणवला होता. बहुतेक मुसलमान मंडळी घराबाहेर उभी होती. त्यापैकी एका आडदांड माणसाने दिगंबर कुलकर्णी याला त्याच्या सायकलीसह पकडले. आजूबाजूचे लोक जोराने पळत आले व त्या सर्वांनी दिगंबर कुलकर्णी सभोवती गराडा घातला. आरडाओरड शिगेला पोहोचली होती. तेवढ्यात रात्रीच्या राउंडवर बसलेले चार शिपायी जमादारसमवेत तेथे धडकले. जमादाराने दिगंबर कुलकर्णीला आपल्या ताब्यात घेतले. त्याची झडती घेताना त्याच्या पँटच्या खिशात स्फोटक वातीचा तुकडा पोलिसांच्या हाती लागला. जमादाराने दिगंबर कुलकर्णीच्या तोंडात जोरदार थप्पड लगावली. पोलिसांनी त्यांचे वळवळत असलेले हात चालविले आणि सायकलसमवेत अधूनमधून धक्काबुक्की करीत दिगंबर कुलकर्णीला चौक पोलिस-चौकीत दाखल केले.

दत्ता पाडळकरही दुसऱ्या दिवशी पकडला गेला. सायकल दुकानदाराने त्याला ओळखले. सांडू कऱ्हाळे मात्र पोलिसांच्या हाती लागला नाही. संधी साधून तो मनोहरराव बाब्रेकरांच्या घरात लपून राहिला. सांडू कऱ्हाळेचा शोध करण्यासाठी अनेक घरांवर छापे टाकले, झडत्या घेतल्या; मात्र तो सापडला नाही. दिगंबर कुलकर्णीचे वडील सरकारी शिक्षक होते. निझामी शासनाने त्यांना सक्तीने निवृत्त केले. भावाला नोकरी गमवावी लागली. एक महिनाभर दिगंबर कुलकर्णी व दत्ता पाडळकर या दोघांना पोलिस-चौकीत पडून रहावे लागले. नंतर त्या दोघांना औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले.

याच सुमारास हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कृतिसमितीतर्फे राज्यभर रेल्वेचे रूळ उखडण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचा आदेश देण्यात आला. परसोडा व रोटेगावचा पट्टा काशीनाथ नावंदरकडे देण्यात आला. त्याच्या त्या कार्यात वैजापूरचे विश्वनाथ मास्तर जरुळकर, औरंगाबादचे रामचंद्र आणि गिरिजाशंकर ऊर्फ हिंदुस्थान साथीला होते. त्या सर्वांनी मनमाडहून निघताना आवश्यक तेवढे साहित्य आणि संरक्षणासाठी पिस्तूलही घेतले. सायंकाळी तारूर रेल्वे स्टेशन जवळून अंगुलगावच्या बाजूने हैदराबाद संस्थानच्या हद्दीत पायी प्रवास सुरू केला. विश्वनाथ मास्तर जरुळकर यांना त्या भागाची संपूर्ण माहिती असल्याने त्यांच्या मागोमाग सर्वजण चालले होते. तोंडावाटे अवाक्षरही न काढता सर्वांनी सुमारे पाचसहा मैलाचे अंतर पार केले. रोटेगाव आणि परसोडा मधील जागा ठरविली. रूळाला डायनामाइट लावले. स्फोटक फ्यूज वायरने पेट घेतला, आणि अगदीच थोड्या अवकाशात प्रचंड आवाज झाला. लोखंडाचा एक तुकडा काशीनाथ नावंदरच्या अगदी कानाजवळून भरवेगाने दूर अंतरावर पडला. थोड्या वेळात काशीनाथ नावंदर, विश्वनाथ मास्तर यांच्या समवेत त्यांचे बाकीचे सहकारी लपतछपत मनमाडला गेले.

त्याच सुमारास गंगापूरचे बाजीराव पाटील यांनी औरंगाबाद किराणा चावडी पोलिस चौकीवर देशी बनावटीचा हातबॉम्ब फेकला. त्याचा जोरदार हादरा पोलिस ठाण्यातील शिपायांना जाणवला.

अनुक्रमणिका

## लाडसावंगीचे प्रकरण

१९४७-४८ चा लढा सुरू होण्याच्या बेतात असताना, भजनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने लाडसावंगीचे पंढरीनाथ पाटील यांनी त्यांच्या स्वतःच्या घरी एक गुप्त बैठक घेतली. पाच लोकांची एक कमिटी नेमण्यात आली. त्या कमिटीच्या सदस्यांनी एकविचाराने, संघटितपणे निझामी राजवटीविरुद्ध सर्वशक्तीनिशी खंबीरपणे उभे राहावयाचा, प्रतिकार करावयाचा एकमुखी निर्णय घेतला. गावकऱ्यांच्या संघटित चळवळीचा प्रारंभ होण्यापूर्वीच, गावकऱ्यांनी अत्यंत गुप्तता राखून ठरविलेला कार्यक्रम तहसिलदार व पोलिस अधिकाऱ्यांना कोणा एका घरभेद्याकडून समजला. तडकाफडकी औरंगाबादहून आवश्यक तेवढी कुमक मागविली गेली. चार पोलिस अधिकाऱ्यांसमवेत साठ पोलिस शिपायांचा तांडा व त्यांच्या पाठोपाठ सत्तर ऐंशी रझाकार व निर्वासित लाडसावंगीत दाखल झाले. गावात इथूनतिथून पोलिस दिसू लागले. गावातील रझाकारांना प्रथम एकत्र केले गेले. त्यानंतर लाडसावंगी गावातील प्रमुखांना अट्टल गुन्हेगारांना जसे पोलिस चौकीत आणतात त्याचप्रमाणे चौकीत नेण्यात आले व काहीही विचारपूस न करता सर्वांना बेदम चोपून काढले गेले. श्री. काकाजी पाटलांना तर भयंकर छळले व इतरांना पोलिस चौकीत डांबून ठेवण्यात आले. लाडसावंगीत पोलिस अधिकारी व पोलिस शिपायांनी अत्यंत बेजबाबदारीने केलेली घटना झंझावाती वाऱ्यासारखी गावाच्या कानाकोपऱ्यात व जवळपासच्या छोट्या गावांतही पसरली. आजूबाजूच्या गावकऱ्यांनी एकवटून लाडसावंगीसभोवती वेढा घातला. हैदराबाद स्टेट काँग्रेस, स्वामी रामानंद तीर्थ व महात्मा गांधींच्या जयजयकारांनी लाडसावंगी गाव व गावासभोवतालचा सारा परिसर निनादून टाकला.

## पोलिस अधिकाऱ्यांची धमकी

“आल्या पावलाने मुकाट्याने परत जा, नाही तर तुमच्याच डोळ्यादेखत या सर्वांना गोळ्या घालून मारले जाईल.” पोलिस अधिकाऱ्यांच्या या धमकीने गावकऱ्यांचे अवसान थोडे नरमले. रात्रीचा अंधार सर्वत्र पसरला होता. त्याचा फायदा गावकऱ्यांनी घेतला. धमकीने घाबरुन गेल्याचा देखावा करून गावकरी हळूहळू एकामागून एक गावाबाहेर निघून गेले. पोलिसांना वाटले, गावकरी घाबरून परत आपापल्या गावात गेले. मात्र गावकऱ्यांनी योजनापूर्वक माघार घेतल्याचे सोंग वठविले होते. निरनिराळ्या गावातून आलेले गावकरी गावाबाहेर पडले आणि जवळच्याच शेतांत दबा धरून बसले. रात्र शेतात बसून काढली. दुसरे दिवशी त्यांच्या मदतीला इतर गावकरी आले. नंतर सर्वांनी लाडसावंगी गावात घुसावयाचा प्रयत्न केला. पोलिस अधिकारी व त्यांचे शिपायी घाबरून गेले. त्यांनी गोळ्या झाडावयाला प्रारंभ केला. त्या गोळीबारात काशीनाथ म्हस्के मारले गेले. गोळीबाराच्या धामधुमीत आणि माजलेल्या गडबडीत पोलिसांनी डांबून ठेवलेले गावकऱ्यांचे पुढारी निसटले व गावकऱ्यांच्या घोळक्यात जाऊन मिसळले. आपले लोक सहीसलामत परत आल्याबरोबर गावकऱ्यांनी घातलेला वेढा काढून घेतला.

लाडसावंगीला घडलेली घटना श्री. बाबूराव जाधव यांनी औरंगाबादचे जिल्हाधिकारी श्री. शेख अब्दुला यांच्या कानावर घातली. श्री. शेख अब्दुला ताबडतोब जातीने लाडसावंगीला गेले. तेथील गावकरी आणि पोलिसांना एकत्र बोलावून त्यांनी शांतता प्रस्थापित केली. गोळीबारात मारले गेलेले श्री. काशिनाथ म्हस्के यांचे शव सन्मानपूर्वक गावकऱ्यांच्या स्वाधीन केले.

अनुक्रमणिका

त्यानंतर मात्र पाशवी अत्याचाराला ऊत आला. अत्याचाराची प्रकरणे सारखी वाढतच गेली. निरनिराळ्या गावांत अत्याचारांचे प्रमाण सतत वाढतच असल्याच्या खबरा एकामागून एक येतच होत्या. अत्याचाराची परतफेड करीत करीत, गावगुंड, रझाकार आणि पोलिसांना भंडावून सोडावयाच्या योजना राबविण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यात पोलिस पाटील आणि पटवारी यांची दप्तरे जाळण्याचा कार्यक्रमही समाविष्ट केलेला होता.

शेतकऱ्यांच्या वेषात श्री. बाबूराव जाधव, लक्ष्मीनारायण लाला व बन्सीकाका फुलंब्री गावाच्या वेशीला लागूनच असलेल्या श्री. बाळासाहेब सीमंत यांच्या शेतात दडून बसले. रात्री दोनच्या सुमारास ते तिघे भोकरदन तालुक्याच्या कोलता टाकळी गावात गेले. कोलता टाकळीचा कार्यक्रम आधीच निश्चित केलेला असल्याने, गावातील जोमदार तरुण शेतकरी गावाबाहेर श्री. जाधव, लालाजी व काकांना भेटले. अर्धी रात्र उलटून गेली असल्याने फक्त रातकिड्यांचा आवाजाच काय तो कानावर पडत होता. त्या शेतकऱ्यांच्या तरण्याबांड पोरांनी प्रथम गावातील सर्वच्या सर्व घरांच्या बाहेरच्या कड्या काळजीपूर्वक लावून घेतल्या. पटवारी आणि पोलिस पाटील यांच्या घरासभोवती अन् लहान लहान बोळींत बैलगाड्या अस्ताव्यस्त अवस्थेत एकात एक गुंतवून ठेवल्या. लक्ष्मीनारायण लाला प्रथम पोलीस पाटील यांच्या घरात दोरीच्या साहाय्याने, छतावरच्या धुराड्यातून उतरले. पोलिस पाटील जागे झाले. आरडाओरड करण्यासाठी आवाज उंचावण्यापूर्वीच लक्ष्मीनारायण लाला यांनी आपले पिस्तूल त्यांच्या छातीवर टेकले. "आता आरडाओरड, गडबड कराल तर मारले जाल." असे सांगून त्यांनी दाराची आतली कडी काढली. तेवढ्यात बाहेरची कडी काढली गेली अन् लगेच बाबूराव जाधव, बन्सीकाका आणि गावकऱ्यांची तडफदार मुले दारातून घरात आली. पोलिस पाटलाच्या डोळ्यांदेखत लाकडी कपाटातून लोखंडी संदुकातून भराभर सरकारी दप्तर बाहेर काढले आणि पेटविले. त्यानंतर पटवाऱ्याचे दप्तर त्याच्याच डोळ्यांदेखत जाळले. उजाडण्यापूर्वी बाबूराव जाधव, लक्ष्मीनारायण लाला व बन्सीकाका यांनी कोलता टाकळीची सरहद्द ओलांडली.

भोकरदनच्या पोलीस अधिकाऱ्यांनी व शिपायांनी कोलता टाकळीच्या गावकऱ्यांना अमानुष प्रकारे छळून काढले; अनेक प्रकारच्या खटपटी लटपटी केल्या; मात्र दप्तरे जाळणाऱ्या सूत्रधाराचे नावगाव मिळाले नाही.

## कोलता टाकळीचा चित्तथरारक प्रसंग

कोलता टाकळीच्या गावकऱ्यांना पोलिसांनी भरपूर चोपून काढले, तरीही गावकरी डगमगले नाहीत; उलट गावकऱ्यांचे मनोधैर्य बळावले. उत्साह ओसंडून आला. जराही न गडबडता अगर कच न खाता गावकऱ्यांनी गेवराई गुंगी, अडसगाव व आजूबाजूच्या पोलीस पाटील आणि पटवाऱ्यांची दप्तरे जाळून भस्मसात केली. गावकऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढत गेला. ठोशास ठोसा देण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली. गावकऱ्यांचे सहकार्य हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना सहज सुलभतेने मिळू लागले. त्यातूनच कोलता टाकळी कॅम्प उभा करता आला. कोलवा टाकळी जवळच डोंगराळ भागात लोहगड नावाचे अगदीच मोजक्या लोकवस्तीचे एक छोटेसे गाव आहे. डोंगराच्या माथ्यावर एक प्राचीन शिवालय आहे. मंदिरासमोर भव्य सभामंडप असून जवळच पाण्याचे टाके आहे. आजूबाजूचा भाग डोंगराळ आणि दाट जंगलाचा आहे. वेळप्रसंगी

अनुक्रमणिका

तेथे दडून राहता येण्यासारखी भरपूर जागा आहे. दिवसभर मंदिरात, मंदिराच्या आसपास दडून बसून रात्रीच्यावेळी तेथूनच जवळपासच्या लोकांच्या गाठीभेटी घेणे सोपे व सोयीचे वाटत होते. लोहगड येथूनच लढ्याची सूत्रे हलविली जाऊ लागली. कॅम्पवरील सैनिकांनी आसपासच्या सुमारे पंधरावीस पोलीस पाटील, माली पाटील आणि पटवारी यांचे राजीनामे हस्तगत केले आणि हैदराबाद स्टेट काँग्रेसने अंगिकारलेल्या लढ्याचे सहकारी म्हणून त्यांना कार्य करायला लावले. गावकऱ्यांच्या संपूर्ण संरक्षणाची कडेकोट व्यवस्था केली. एक महिन्याच्या कालावधीत कोलता टाकळी, कोलते पिंपळगाव, गेवराई गुंगी, इसराम पाटलाची गेवराई, धानौरा, निधोना, वजीर खेडा, अंजनडव, गिरसावळी ही गावे स्वतंत्र झाल्याचे जाहीर करण्यात आले. या गावांचा परिसर २० मैल इतका होता. या विभागांत दोन वेगवेगळ्या गढ्यांवर राहाण्याची, अन्नधान्य, शस्त्रांचा साठा सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था केलेली होती. स्वतंत्र परिसरावर डोळ्यांत तेल घालून इमानेइतबारे पाहारा व टेहळणी करण्यासाठी अत्यंत विश्वासू कार्यकर्ते नियुक्त केले गेले. कोणताही निझामी राजवटीचा अधिकारी त्या परिसरात फिरकू शकणार नाही अशी दक्षता घेतली जात होती.

संरक्षण विभाग लक्ष्मीनारायण लालाकडे, कडक बंदोबस्त डॉ. धामणगावकरकडे, इतर कारभार बाबूराव जाधवकडे अशी यंत्रणा होती. सरकारी यंत्रणेप्रमाणे सर्व कामकाज नियमित व व्यवस्थितपणे पार पडत होते. याच सुमारास सौ. दगडाबाई शेळके कॅम्पमध्ये दाखल झाल्या. हसनाबादच्या जात्यंध मुसलमानांना, गावगुंडांना, रझाकारांना तो भाग सलू लागला. हसनाबादच्या पिसाटांनी आजूबाजूच्या रझाकरांसमवेत बोलणी केली व कोलता टाकळीचा कॅम्प नेस्तनाबूत करून म्होरक्यांना गोळ्या घालून ठार मारण्यासाठी, कॅम्पला वेढा घालून सर्व शक्तिनिशी जोरदार हल्ला करण्याचे ठरविले. सुमारे ३०० रझाकार सावखेडा येथे सायंकाळी आले व तेथेच त्यांनी मुक्काम ठोकला. गावकऱ्यांजवळून जोरजबरदस्तीने ७-८ बोकड घेतले व मठातच रात्रीचे जेवण तयार करू लागले. रझाकार खाना तयार करण्यात व तयार केलेला खाना फस्त करण्यात गुंग झालेले होते; याची खबर कोलता टाकळी कँपवर विश्वासू गावकऱ्यांनी पोहोचविली. कँप प्रमुखांची तातडीची बैठक घेण्यात आली. सदर विशेष बैठकीत कॅम्प प्रमुखांशिवाय सौ. दगडाबाई शेळके, संपत नाईक, आगजी पाटील आणि कोलता पिंपळगावचे बाबूराव पाटीलही सहभागी झाले होते.

रझाकारांनी कोलता टाकळी कॅम्पवर हल्ला करण्यापूर्वीच कोलता टाकळी कॅम्पच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर जोरदार, निकराचा हल्ला करावा असे एकमुखी आवाजाने ठरवून रात्री ९ वाजताच्या सुमारास रझाकारांना चोहोकडून वेढा घातला गेला. वेढले गेल्याची चाहूल लागताच, रझाकारानी गोळ्यांचा जोरदार वर्षाव सुरू केला. उलटपक्षीही तेच घडले. रझाकारांची तारांबळ उडाली. भयभीत जीव वाचविण्यासाठी रझाकारांना तेथून पळ काढावा लागला. घडलेल्या प्रकाराने रझाकारांची, निझामी पोलिसांची अवहेलना झाली. त्याचा सूड घेण्यासाठी प्रमुख पोलिस अधिकाऱ्यास बोलविण्यात आले. सुमारे पंधरा दिवसानंतर हसनाबादहून हजारावर रझाकार, सशस्त्र पोलीस व अधिकारी पिंपळगाववर हल्ला करण्यासाठी निघाल्याचे समजताच लक्ष्मीनारायण लाला शस्त्रांसह गेवराईला गेले. तेथून सुमारे ४० सशस्त्र कार्यकर्ते व गावकरी यांना घेऊन पिंपळगावच्या परिसरात लपत छपत आले. तोपर्यंत रझाकारांनी पिंपळगावच्या गावकऱ्यांच्या गाईबैलांच्या गोठ्यांना आगी लावल्या होत्या. त्यामुळे बरीच जनावरे तडफडून मरत होती. रझाकारांचा तो अत्यंत अमानुष पाशवी प्रकार पाहताच कॅम्प प्रमुखांनी सर्वप्रथम गावातील सर्वच्या सर्व महिलांना व बालबालिकांना एका वाड्यात सुखरूप आणून ठेवले. त्यानंतर गढीवरून सर्व शक्तिनिशी रझाकारांवर गोळीबार

सुरू केला. दाजीबा म्हस्के या वयोवृद्ध माणसाने त्यांच्या वर सतत गोळ्यांचा वर्षाव केला. त्यामुळे रझाकारांना आणि पोलिस शिपायी व अधिकारी यांना गावात घुसता आले नाही. धावपळ सुरू असताना एका रझाकाराने दाजीबा म्हस्के यांच्यावर नेम धरून गोळी झाडली. दाजीबा म्हस्के मारले गेले. त्याच सुमारास गावाबाहेर दबा धरून बसलेल्या हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार प्रतिहल्ला चढविला. गोळ्यांच्या फैरी जवळपास एक तास सतत चालू होत्या. अंधाराचा फायदा घेऊन काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा मोर्चा रेटून पुढे नेला. रझाकार पोलिस शिपायी व अधिकारी यांची घाबरगुंडी उडाली. जीव बचावण्यासाठी त्यांनी माघार घ्यायला प्रारंभ केला. सडकेच्या चकमकीत केशवराव कोलते भयंकर जखमी झाले. पांडुरंग बिनोरकर, दगडूगिरी गुलाबगिरी गावाबाहेरच मारले गेले. त्यामुळे स्वातंत्र्याच्या लढ्याच्या काँग्रेसच्या सैनिकामध्ये भयंकर संतापाची लाट उसळून आली; व ते सर्वचे सर्व रझाकारांवर चवताळून तुटून पडले. डॉ. धामणगावकर व लक्ष्मीनारायण लाला यांनी स्टेनगन आणि ३०३ च्या गोळ्यांचा मारा करून रझाकारांना आणि पोलिसांना पिटाळून लावले. माघार घेण्याच्या घिसाडघाईत सुमारे ३० रझाकार मारले गेले; तर काही हत्यारे फेकून पळून गेले.

औरंगाबाद शहरातील मध्यवर्ती कारागृहात, औरंगाबाद जिल्ह्यातून गोलटगाव, लाडसावंगी, किनगाव, करमाड, चिटगोपा, हरसूल, चौका, गणोरी, फुलंब्री, टाकळी, पिंपळगाव, गुंगी, गेवराई, धानोरा, निधोना, लिंबखेडा, वजीरखेडा, बोरगाव, अजनडव, लिंगदरी, भारसावळी, पैठण, पिंपळवाडी, बिडकिन, तेलवाडी, आपेगाव, व्याहमांडवा, गंगापूर, तुर्काबाद खराडी, तांदूळवाडी, कायगाव, सावरखेडा, वैजापूर, जरुळ, बोरसर, शिऊर, अंबड, राणी उंचेगाव, जालना, बदनापूर, सेवली, कन्नड, पिशोर, गल्ले बोरगाव, कसाबखेडा, चिकलठाण, सिल्लोड, भराडी, अब्बा पोलाद, उंडनगाव, भोकरदन वगैरे लहानमोठ्या गावांतूनच सत्याग्रही आले होते. गोलटगावच्या एकट्या किसन पाटील यांच्या कुटुंबातून १५ जण आले होते तर गोपाळ महादेव, किसन गोपाळ, एकनाथ विष्णुपंत, विठ्ठल रघुनाथ, गुलाबचंद नागोरी, शंकर नारायण, रमणिकलाल देवीदास, विठ्ठल, पंढरीनाथ, विष्णू रामचंद्र, नरहर मनोहरराव, गणपत सदाशिव, केशव विष्णुपंत, हरिभाऊराव सोनाजी, भाऊराव, मनोहर यशवंत, भगवान एकनाथ, देवीदास निळकंठ, प्रभाकर रामचंद्र, विठ्ठल पंडितराव, विश्वनाथ गोविंदराव, रामराव ग्यानोजी, बालमुकूंद, गणपत नारायण, किसनराव राजाराम, श्री. मानीराव दादा, लक्ष्मणराव श्रीपतराव, आसाराम गंगाराम, पंडित गोपीनाथ, उत्तम नाना, चुन्नीलाल साहेबराव, विठोबा, देवकिशन, एकनाथ, बाबू विठोबा, गुलाबचंद बालकिशन, रामलाल टिकाराम, चंदन दत्ताराम, भीमसिंग करानिया, लालसिंग प्रेमदास, मेघराज भोलासिंग, जादू काळू, वाल्या माकाजी इत्यादींचा या सत्याग्रहींत समावेश होता.

औरंगाबाद जिल्ह्यात सर्वांत मोठा तालुका जालना होता, शिवाय तेथे औरंगाबाद शहरापेक्षा मोठी बाजारपेठही होती. जालना तालुक्याच्या सरहद्दीला लागून असलेल्या अंबड, भोकरदन, सिल्लोड येथील नागरिकांची जालना शहराबरोबर बरीच जवळीक होती. जालना शहरात हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या खालोखाल आर्य समाजाची जनमानसावर चांगली पकड होती. त्याशिवाय जालना शहरात आणि तालुक्यात मवाळ-नेमस्त, सरकारबरोबर पदोपदी मिळते जुळते घेणाऱ्या सरकारधार्जिण्या लोकांचे छोटे छोटे कंपू होते; तरी तेथे अनेक बाबतीत बराच एकोपा दिसून येत होता. १९४७ मध्ये हैदराबाद शहरात भरलेल्या हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या शेवटच्या अधिवेशनात जालना शहर व जवळपासच्या तालुक्यांतून अन् गावांतून गेलेले लहान

मोठे कार्यकर्ते आणि विद्यार्थी परतीचा प्रवास करताना, सत्याग्रह मोहिमेद्वारे निझामी राजवटीला भंडावून टाकण्याचाच विचार करीत होते. सत्याग्रह मोहिमेद्वारे जेल भरता येईल मात्र तेवढ्याने जात्यंध निझामी राजवट नमेल असे मनोमन वाटत नव्हते. भारतात छेडल्या गेलेल्या १९४२ च्या मोहिमेसारखी मोहीम अंगिकारूनच निझामी राजवटीला सळो की पळो करता येऊ शकेल असे कित्येकांना वाटत होते. स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते आपापल्या घरात विसावण्यापूर्वीच काही ठळक कार्यकर्त्यांची धरपकड करण्याचे काम सुरू झाले होते. धरपकडीच्या नावाखाली पोलिसांनी मारपीट, दंडेली करण्याचा पवित्रा घेतला होता. शहरातले व गावातले वातावरण बिघडत व चिघळत गेले, प्रमुख कार्यकर्त्यांना प्रथम लपून छपून भूमिगत राहूनच काम करावे लागले. निझामी राजवट जोरजुलूम दंडेली करण्यात पटाईत असल्याचे प्रदर्शन पोलिसांनी त्यांच्या सैतानी वर्तनाने जनतेसमोर उभे केले. त्यात रझाकार व निर्वासितांनी रंग भरायला प्रारंभ केला. वातावरण आपोआप तापत गेले. जालना शहरातील व आजूबाजूच्या गावातील तरुण, तडफदार, साहसी, धाडसी, खंबीर विचारांचे लोक संघटित होऊ लागले. शहरातील तरणेबांड नागरिक तसेच खेड्यांतील शेतकऱ्यांची तरुण मुले जवळपास रोज सत्याग्रह करून जेलमध्ये जाऊ लागली. काही कारण नसता पोलीस व रझाकार सत्याग्रहींना मारपीट करू लागल्याने जनतेमध्ये निझामी राजवट व पोलिसांबाबत मनस्वी संताप व चीड निर्माण होत गेली. सत्याग्रह अधिक जोमाने चालू लागले.

निझामी राजवट खिळखिळी करण्यासाठी व राज्यकर्त्यांची पदोपदी त्रेधातिरपिट उडविण्यासाठी, कृती समितीच्या आदेशाप्रमाणे प्रथम तलाठी, पोलिस पाटील यांची दप्तरे जाळणे, करोडेगिरी नाके व छोट्या पोलीस चौक्या नेस्तनाबूत करणे या बाबतचा कार्यक्रम जोमाने अमलात आणला गेला. कित्येक वेळा पोलिसांना त्यांचा जीव वाचविण्यासाठी हत्यारे टाकून पळावे लागले. जनतेत रणचंडिकेनेच जणू संचार केल्याचे स्वरूप दिसू लागले. जरासे खुट्ट वाजले की, त्याचे उत्तर लोक फटाफट देऊ लागले. निझामी राजवटीचे नोकर जनतेच्या निर्भयतेसमोर फिके पडताहेत व जनतेत उफाळून आलेला प्रचंड उत्साह पोलिसांना गर्भगळित करीत आहे असे समजताच निझामी राजवटीने तिचे जात्यंध पाशवी अत्याचार अधिक जोमाने सुरू केले. गावगुंडांनी, निर्वासितांनी आणि रझाकारांनीही तोच कित्ता गिरवावयास प्रारंभ केला. परिस्थितीने अचानक पलटा घेतल्याने जनतेत एकदम घबराट पसरत गेली. जनतेचे धैर्य खचत असल्यासारखे दिसू लागले. वाटेल ते करून जनतेमध्ये उत्साह व त्याचबरोबर निझामी राजवटीबाबत भयंकर तिरस्कार, संताप, चीड सतत टिकवून ठेवण्याचा आदेश बाबूराव जाधव यांना देण्यात आला. त्यांच्या जोडीला लाला लक्ष्मीनारायण व डॉ. वामनगावकर होते. जोरदार प्रतिकार करीत करीत औरंगाबाद व भोकरदन तालुक्यात गावकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला गेला. जोरजुलूम, अत्याचार करणाऱ्याविरुद्ध पाय रोवून प्रतिकार करावयाइतके मनोधैर्य उभे केले गेले आणि हल्लेखोरांचा भरपूर समाचार घेत घेत गावगुंड, पोलीस, निर्वासित आणि रझाकारांना सळो की पळो करून सोडले. गावकऱ्यांवर हल्ले करणारे, लूटमार करणारे, स्त्रियांना अचकट विचकट बोलणारे, गावकऱ्यांच्या मनोधैर्याने त्यांच्याच डोळ्यांदेखत जीव वाचविण्यासाठी सैरावैरा पळ काढताना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहायला मिळू लागले. गावकऱ्यांचे मनोधैर्य वाढले. त्यांचे बाहूंत स्फुरण चढल्याचा त्यांचा त्यांनाच अनुभव येऊ लागला. घरात बसून राहाणे, दडूनपडून राहाणे त्यांना आता आवडेनासे झाले होते. अतोनात छळ करणाऱ्या निझामी पोलिस, गांवगुंड, निर्वासित आणि रझाकारांचा कैफ क्षणार्धात होता की नव्हता करण्यासाठी प्रयत्न करण्याची शक्ती त्यांच्या हातापायात संचारली होती. इतके दिवस मूग गिळून गप्प बसल्याचे त्यांचे त्यानाच खुपू लागले होते. 'याद रखो, तलवार का जबाब तलवारसेही दिया जायेगा' असे ते

सर्व शक्ती एकवटून जोमाने सांगू लागले होते. किनगाव, गोलटगाव, लाडसावंगी येथील बहुतेक लोक 'तरू अथवा मरू' या आवेशानेच शिर हातात घेऊन रणांगणात उतरले होते. त्यांनी त्यांच्या शरीरातली मरगळ झटकून टाकली होती. मराठवाडा विभागतला झोपेतून जागा झालेला गावकरी अन् शेतकरी चांगल्या चांगल्यांची झोप कायमची उडवितो हेही तितकेच खरे असल्याचे दाखविले जात होते. मराठवाड्याच्या गावकरी आणि शेतकऱ्यांनी जात्यंधतेच्या अन् पाशवी अत्याचारांच्या कैफाने मस्तवाल बनलेल्या निझामी राजवटीशी आपल्या स्वतःच्या शक्तीवर भूमिगत लढा देऊन प्रखर प्रतिकार केला. शेकडो वर्षांपासून निझामी राजवटीच्या जात्यंधतेच्या वरवंट्याखाली सतत भरडला गेलेला, सर्वस्वी दुर्लक्षिलेला मराठवाडा आपली अस्मिता विसरला नाही.

टेलिफोन, टेलिग्रामच्या तारा कापणे, रेल्वेचे रूळ उखडणे, पोलिस चौक्या, कोरडगिरीच्या चौक्या जमीनदोस्त करणे इत्यादी कार्यक्रम राबवून खळबळ माजविणे अगत्याचे बनले होते. त्यानुसार धाडसी कार्यक्रम हाती घेतले गेले. धडक कार्यक्रमाचा जोरदार प्रारंभ झाला तो बदनापूर पोलिस चौकीवर हातबॉंब फेकण्याने. तसा बॉंब देशी बनावटीचाच होता, तरी पोलिस चौकी हादरून गेली. आवाजाच्या धडाक्याने बदनापूरचे गावकरी सैरावैरा पळू लागले. पोलिसांनी त्यांच्या परिश्रमांची पराकाष्ठा केली परंतु पोलिस चौकीवर बॉम्ब फेकणाऱ्यांचा थांगपत्ता लागला नाही. त्या बॉम्ब फेकण्याच्या टोळीत रामचंद्र हुंडेकरी, रामराव गोलटगावकर व किशनलाल अग्रवाल हे होते. त्या घटनेच्या पाठोपाठ बदनापूर ते दरेगाव व जालना ते रांजणीमधील रूळ डायनामाइट लावून उद्‌वध्स्त करण्याची कामगिरी औरंगाबादचे भीमराव कुलकर्णी, काशिनाथ त्रिवेदी व जालन्याच्या दोन धाडसी तरुणांनी पार पाडली. माळी कुंपणाची वाढ जितक्या वेगाने सपासप कापून काढतो, त्याच वेगाने; मात्र त्वेषाने टेलिफोन व टेलिग्राफच्या तारा कापून काढल्या. जालना शहर व जालना रेल्वे स्टेशन दरम्यान उभा असलेला भला मोठा जाडजूड लोखंडी पूल उद्‌ध्वस्त करण्याचा धाडसी प्रयत्न केला. पुलाला जबरदस्त हादरा बसला. जवळपासची घरे हादरली, पुलाला छोटीशी जखम झाली. इतकेच होऊ शकले. त्या धाडसी कामगिरीचे सूत्रधार होते औरंगाबादचे रमणलाल पारेख आणि काशिनाथ त्रिवेदी.

जालना शहराला पोलिसांच्या व रझाकारांच्या वर्दळीने लष्कराच्या छावणीसारखे स्वरूप आले होते. रोज नित्य नवनवे अत्याचार, मारझोडीचे प्रकार, दंडेली, व हिंदूंना नेस्तनाबूत करण्याबाबतच्या, कानाचे पडदे फाटतील अशा कर्कश घोषणांनी जालना शहराचे वातावरण प्रक्षुब्ध केले जात होते. जालना शहराला चोहोकडून पोलिस, रझाकार आणि निर्वासितांनी वेढा घालून नागरिकांना वेठीस धरण्याच्या योजना आखल्या होत्या. जालना शहराचे नागरिक असुरक्षिततेचे पदोपदी अनुभव घेत होते. शहरात व गावात राहून पाशवी अत्याचारांच्या व जात्यंधतेच्या कैफाने पिसाटलेल्या पोलिसांचा व रझाकारांचा उघड उघड प्रतिकार तुटपुंज्या साधनांनी करणे शक्य नव्हते; म्हणून कार्यकर्त्यांच्या विचाराने, सल्लामसलतीने निझामी सरहद्दीजवळील देऊळगाव राजा येथे हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचा कॅम्प सुरू केला गेला. श्री मनोहर सोनदे त्या कॅम्पचे सूत्रधार होते. श्री. सोनदे जालना तालुका संघटक होते. श्री. रामराव गुंजकर हे त्यांचे अत्यंत विश्वासू सहाय्यक होते. श्री. रामराव गुंजकर स्वतः शेतकरी असल्याने त्या भागातील शेतकरी व गावकरी यांच्या बरोबर त्यांचे अत्यंत आपलेपणाचे संबंध होते. त्यामुळे श्री. सोनदे, रामराव गुंजकरांना जोरजुलूम दंडेलीचा सर्वांनी एक विचाराने, निर्भयतेने प्रतिकार करावा इत्यादी बाबत प्रचार सभा, गट सभा घेण्यासाठी अधूनमधून पाठवीत

असत. पोलिसांची त्यांच्यावर पाळत होती तरी ते वेषांतर करून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन त्यांचे काम पार पाडीत असत. एकदा वडगाव येथे प्रचार सभेच्या जागेस पोलिसांनी वेढा घातला. पोलिसांच्या मदतीला गावातील रोहिले आले. प्रसंगावधान राखून, चंपतराव जोशी यांच्या मदतीने रामराव गुंजकर तेथून सहीसलामत सटकले.

जालना रेल्वे स्टेशनवर गाडीत बसून प्रचार कार्याप्रीत्यर्थ रामराव गुंजकर शेतकऱ्यासारखे बेमालूम वेषांतर करून डोंगरगावला चालले होते. रेल्वेच्या डब्याच्या बाकड्याखाली आडवे झाले होते. त्याच बाकड्यावर त्यांच्याच शोधात असलेले दोन पोलिस शिपायी बसले. रामराव गुंजकर यांच्याचबाबत त्या दोघा पोलिस शिपायांत बोलणी चाललेली होती. ती बोलणी रामराव ऐकत होते. 'आठ दिनसे निमकहराम गद्दारने परेशान कर रखा है। आज नही तो कल उस हरामी को जिंदा नही तो मुर्दा पकडनाही होगा।' हे सारे ऐकता ऐकता गुंजकरांच्या छातीचे ठोके जलद गतीने पडत होते. तेवढ्यात बदनापूर रेल्वे स्टेशन आले. रामरावला पकडण्यासाठी भटकंती करणारे ते दोन पोलिस डब्यातून बाहेर पडले. डोंगरगावला जाण्यासाठी रामराव यांनाही तेथेच उतरावयाचे होते. गाडी सुरू झाली. इंजिनने थोडा वेग धरताच रामराव छलांग मारून कसेबसे उतरले आणि अंधाराचा फायदा घेऊन बदनापूर रेल्वे स्टेशनच्या अगदीच बाहेरच्या बाजूने झपझप पावले टाकीत डोंगरगावाच्या शिवारात दाखल झाले. डोंगरगावचे गावकरी, शेतकरी तसे संघटितच होते. त्यात त्यांचे मनोधैर्यही चांगले होते; त्यामुळे त्यांना पोलिसांची भीती वाटत नव्हती. उलट त्यांचीच भीती पोलिसांना वाटत होती.

देऊळगाव राजा कॅम्पवर सत्तरावर कार्यकर्त्यांना स्वयंचलित हत्यारांचा वापर व्यवस्थित करता येत होता. पिस्तुल, स्टेनगन, थ्री नॉट थ्री, हँडग्रेनेड व इतर हत्यारे वापरात होती. आवश्यक तेवढी हत्यारे, गोळ्या बरोबर घेऊन स्टेट काँग्रेसच्या सशस्त्र कार्यकर्त्यांनी, सैनिकांनी वडगाव, नागठाण, मानेगाव येथील करोडगिरी नाक्यावर हल्ल्यावर हल्ले करून, नाक्यांतील सर्वची सर्व कागदपत्रे जाळली. हँड ग्रेनेडच्या स्फोटकाच्या आवाजाने घाबरून नाक्याचे पहारेकरी-नाकेदार जीव वाचविण्यासाठी पळून जात असत. वरूड न्हावा, बदनापूर आणि मौजपुरीच्या पोलिस चौक्या बेचिराख करण्याच्या कामात बबनराव व्याहाळकर व बद्रीनारायण बारवाले यांच्या बरोबर सुमारे वीस सैनिक होते.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर आणि सैनिकांवर व त्यांच्या कॅम्पवर प्रतिहल्ला करण्यासाठी निझामी राजवटीने त्यांच्याच सरहद्दीत पोलिस व रझाकारांच्या छावण्या तयार केल्या. गोळ्यांचा चौफेर वर्षाव करून भयंकर घबराट निर्माण केली. मात्र नेमका त्याचा उलट परिणाम झाला. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कॅम्पमध्ये अगर जवळपासच्या गावांतील गावकऱ्यांमध्ये जराही घबराट निर्माण झाली नाही. त्या गोळीबाराचा कोणी धसकाही घेतला नाही. मात्र कार्यकर्त्यांमध्ये व गावकऱ्यांमध्ये भयंकर चीड उफाळून आली. कार्यकर्त्यांनी आणि गावकऱ्यांनी जोरदार प्रतिकार करण्यास प्रारंभ केला. त्यानंतर समोरासमोर चकमकी उडू लागल्या. समोरासमोर गोळीबार सुरू झाला. त्या गोळीबारात श्री. जनार्दन मामा नागपूरकर या पोर वयाच्या, शूर सैनिकाच्या पोटात ३०३ ची गोळी घुसली; तरी काही सैनिकांनी श्री. जनार्दन मामाला आपल्या आडोशाला घेऊन जोरदार गोळीबार करीत करीत भारतीय सरहद्दीत आणले. तेथून मोटारीतून बुलढाणा सरकारी दवाखान्यात नेले. दवाखान्याचे सिव्हिल सर्जन यांनी जातीने श्री. जनार्दन मामाच्या पोटाचे ऑपरेशन केले.

अनुक्रमणिका

पोटात घुसलेली गोळी काढली. दवाखान्याच्या सर्व डॉक्टरांनी त्यांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परंतु त्यांना श्री. जनार्दन मामाला मृत्यूच्या दाढेतून ओढून आणता आले नाही. दुर्दैवाने त्यांची प्राणज्योत दुसऱ्या दिवशी मालवली. बुलढाण्याच्या नागरिकांच्या अपूर्व सहकार्याने श्री. जनार्दन मामांची फार मोठी प्रेतयात्रा काढली गेली. हजारो स्त्री-पुरुषांनी त्यांच्या स्मृतीला अश्रूंच्या माला वाहिल्या.

डोंगरगावच्या परिसरात, भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्याच दिवशी, १५ ऑगस्टला बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह करावयासाठी १४ ऑगस्टला जय्यत तयारी करण्यात आली होती. सत्याग्रहाचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडावा यासाठी परिश्रमपूर्वक व्यवस्था केलेली होती. कार्यक्रमाला गालबोट लावले जाऊ नये यासाठी डोळ्यात तेल घालून सर्वत्र पाळत ठेवली होती. तरी सत्याग्रहाची वेळ व जागा यांची खबर कोणा एका घरभेद्याकरवी पोलिसांना मिळाली. दोन पोलिस अधिकाऱ्यांसमवेत पोलिसांचा भला मोठा तांडा डोंगरगावात येऊन धडकला आणि लगेच त्यांनी समोर दिसेल त्याला अमानुष प्रकारे झोडपून काढायला प्रारंभ केला. त्यात अगदीच पोरवयाच्या छोट्या छोट्या मुलांचा व स्त्रियांचाही समावेश होता. गावात थोडा वेळ घबराट निर्माण झाली. श्री. हणमंत बेंडे उर्फ बंडेरावचा पोलिसांनी कसून शोध केला. परंतु त्यांचा पत्ता लागला नाही म्हणून पोलिसांनी सूडबुद्धीने जोरदार मारपीट केली. तेवढ्यात मुसळधार पावसाच्या सरीवर सरी कोसळू लागल्याने पोलिसांची त्रेधा तिरपिट उडाली. शेतात इथून तिथून चिखल झाला होता. पोलिस शिपायांचे पाय चिखलात रुतू लागले. अधूनमधून पाय घसरल्याने, पोलिस शिपाई चिखलात पडल्याने त्यांचे कपडे, हातपाय चिखलाने माखले गेले, तरी काही आडदांड पोलिस शिपाई दिसेल त्याला फटके लगावतच होते. पांदीजवळ उभ्या असलेल्या एका गुराख्याच्या पोराच्या पाठीवर पोलिसाने जोरदार फटका हासडताच ते पोर जमिनीवर चिखलात कोसळले. "मेलो! मेलो!" म्हणत कळवळून रडू लागले. तेवढ्यात आणखी तीनचार पोलिस शिपाई त्याच्या जवळ आले. ते पोर भयंकर घाबरले. पोलिसांच्या गयावया करीत त्यांच्या हातापाया पडू लागले. एका शिपायाने त्या पोराला मारण्यासाठी हातातील काठी उगारताच त्या पोराने श्री. बंडेराव उर्फ बेंडे, दडून बसलेल्या खोपीचा ठावठिकाणा रडत रडत सांगितला. त्या सुमारास मुसळधार पावसाच्या जोरदार सरीवर सरी कोसळत होत्या. पावसाच्या कोसळणाऱ्या आवाजात पोलिसांच्या बुटाच्या पायाचा आवाज बुडून गेला. जराशीही चाहूल लागली नाही, त्यामुळे श्री. हणमंत बेंडे अगदीच बेसावध अवस्थेत पोलिसांच्या हाती लागले. पोलिस जमादाराने एका शिपायाच्या मदतीने श्री. बेंडेच्या दोन्ही हाताला दोरी घट्ट आवळून बांधली. आकाशात ढगांचा गडगडाट आणि विजेचा लखलखाट होत होता. पावसाचा जोर आणि वेग कमी होण्यासारखे दिसत नव्हते. दोन्ही हात दोऱ्यांनी बांधलेले असूनही मुसळधार पाऊस आणि सर्वत्र चिखलच चिखल झालेला असल्याने श्री. बेंडे यांना पायी चालत पोलिस चौकीपर्यंत नेणे पोलिसांनाच धोक्याचे वाटू लागले. चालता चालता मध्येच जोराचा हिसका देऊन श्री. बेंडे सटकून जाण्याची भीती त्यांना वाटत होती, म्हणून जमादाराने सकाळपर्यंत त्या खोपीत बसून राहावयाचे ठरविले. सर्व शिपायांना डोळ्यात तेल घालून हुशार राहावयास सांगितले. पावसाबरोबर थंड वाऱ्याचे झोत पोलिसांच्या अंगाला चांगलेच झोंबू लागले. त्यात दिवसभर वणवण फिरल्याने बरीच पायपीट झालेली होती, त्यामुळे थकवाही आलेला होता. थोड्या अवधीत शिपायांसमवेत जमादाराला झोपेने घेरले. डुलक्या मागून डुलक्या येऊ लागल्या. जमादार घोरू लागले. घोरण्याची जणू आपसात चढाओढच सुरू झाली. खोपीच्या कुडाला डोके टेकून जमादारा समवेत पोलिस शिपायी गाढ झोपी गेले. प्राप्त परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी प्रसंगावधान राखून श्री. बेंडेनी सर्वप्रथम हाताला बांधलेल्या दोरीच्या गाठी सैल करीत करीत मोकळ्या केल्या. हळूहळू पाय लांब करीत कुडाला भगदाड पाडले व ते

सरपटत बाहेर पडले. इतक्यात बाहेर कशाचा तरी आवाज झाल्याने पोलिसांची झोपमोड झाली. बेंडे सटकल्याचे दिसताच त्यांची झोप उडाली. त्यांनी आपल्या बंदुकी सावरून बेंडेना पकडण्यासाठी चिखलातून पळत जाण्याचा प्रयत्न सुरू केला. गावात जाणे धोक्याचे समजून बेंडे दुधना नदीच्या किनाऱ्याकडे पळत सुटले. टॉर्चच्या प्रकाशात बेंडे पळत असल्याचे पोलिसांना दिसत होते. दुधना नदीला महापूर आलेला होता. पोलिस त्यांच्या पाठोपाठ येत असल्याचे श्री. बेंडेना दिसताच क्षणाचाही विचार न करता त्यांनी भर वेगाने वाहात असलेल्या दुधना नदीच्या पाण्यात उडी मारली. पोलिसांनी नदीच्या पात्रात फटाफट गोळ्या झाडल्या, परंतु तोपर्यंत पाण्याच्या प्रवाहाबरोबर श्री. बेंडे पोलिसांपासून बरेच लांबवर गेले होते. प्रसंगावधान राखून पुराच्या पाण्याच्या प्रवाहाला कापीत कापीत श्री. बेंडेनी लांबवर पैलतीर गाठले.

फार पुरातन काळापासून हैदराबाद संस्थानात धान्याच्या राशी उभ्या करणारे प्रमुख केंद्र म्हणून, मराठवाड्याच्या औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर, पैठण व अंबड हे तीन तालुके गणले जात असत. या तिन्ही तालुक्यांना ‘सोनेकी चिडियाँ’ हा किताब निझाम राजवटीने बहाल केला होता. औरंगाबाद जिल्ह्याच्या तालुक्यांपैकी अंबड तालुक्यांची सरहद्द अधिक प्रमाणात बीड व परभणी जिल्ह्याच्या सरहद्दीला लागून होती. अंबड गाव व तालुक्यात मुसलमानांची दाट वस्ती पूर्वापार चालत आलेली आहे. अरब व रोहिल्यांचा थोडा सुळसुळाट होता. त्यात भर पडली ती रझाकारांची, निर्वासितांची. त्यांच्या जोरजबरदस्तीची अन् मन मानेल तशा पाशवी अत्याचारांची. साहजिकच हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या चळवळीचे केंद्र अंबड ऐवजी साडेगावला नाइलाजास्तव बनवावे लागले. श्री. विठ्ठलराव जोशी १९३८ आणि १९४२ च्या लढ्यात कारागृहात डांबले गेले होते. महाराष्ट्र परिषदेचे संघटक म्हणून जालना येथे ते दोन वर्षे होते. अंबड जन्मगाव आणि जालना कार्यक्षेत्र असल्याने जालना व अंबड तालुक्याच्या चळवळीत सक्रिय सहभागी बनायची त्यांना संधी प्राप्त झालेली होती. हैदराबादेतील स्टेट कॉंग्रेसच्या ऐतिहासिक अधिवेशनानंतर सहजासहजी पकडले जाऊ नये म्हणून प्रारंभापासून ते भूमिगत पद्धतीनेच काम करू लागले. त्यांच्यासमवेत होते राघवेन्द्र देशपांडे, पंढरीनाथ तत्सत्, लक्ष्मणराव देशमुख, रामचंद्र अष्टपुत्रे, बापूसाहेब देशमुख साडेगावकर, भाऊराव वैद्य व रामसिंग चौहान. या सर्वांनी जिवाचे रान करून साडेगावची संघटना बलवान आणि एकजिनसी बनविली. गावातले छोटे शेतकरी, व्यापारी, पाटील, पटवारी हर प्रकारची मदत करीत असत. मुसलमानांपैकी एकटे एक बिबनभाई तांबोळी लोककल्याणाच्या चळवळीत नेहमी सहभागी असत. त्यांचे घर कार्यकर्त्यांचा अड्डा बनलेला होता. त्यांच्या सोबत निवृत्ती तेलीही साथ देत असे. अंबड तालुक्याची हैदराबाद स्टेट कॉंग्रेसची संघटना खऱ्या अर्थाने तेल्या तांबोळ्यांचीच संघटना बनलेली होती. संघटनेत व चळवळीत जातपात मानलीच जात नव्हती. निझामी राजवटीचा बेलगाम कारभार, जात्यंध मुसलमानांचे पाशवी अत्याचार, अकारण मारपीट, पोलिसांची दंडेली आणि रझाकारांची गुंडागर्दी यामुळे तालुक्यात व छोट्यामोठ्या गावात कमालीची असुरक्षितता आणि अशांतता सारखी फैलावत चालली होती. गावागावातले वातावरण गढूळ आणि तापदायक बनत गेले. अशा विचित्र परिस्थितीत जोरजबरदस्तीने लेव्ही आणि खूषखरेदीची वसूली केली जात होती. धान्याचे सरकारी कोठार काठोकाठ भरलेले असताना सामान्यांना सरळ व सुलभ मार्गाने धान्याचे वितरण केले जात नव्हते. मात्र ह्याच शासनाच्या कोठारातून, तीर्थपुरीच्या सरकारी गोदामातून धान्य इतरत्र पाठविले जायचे. सरळ सरळ विनंती करून सरकारी गोदामातून त्याच गावच्या लोकांना धान्य देण्यात टाळाटाळ होत होती. शेवटी गावकऱ्यांनीच त्या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी, आपली शक्ती पणाला लावली. सरकारी गोदामातून इतरत्र जात असलेले धान्य गावापासून लांबवर जाऊन थोपवून ठेवले. थोडीफार बाचाबाची, चकमक उडाली. गावकरी पुढे

सरसावले. धान्य रक्षकांना चोपून काढले. रक्षक पसार झाले. गावकऱ्यांनी ते सारे धान्य गाड्यासमवेत तीर्थपुरीला नेले आणि सर्वसामान्यांना समसमान वाटले. त्या घडामोडीत विठ्ठलराव जोशी समवेत, रामसिंग चौहान, भाऊराव वैद्य, लक्ष्मण सोनार, बाबू कासार, दगडू धनगर, बापूसाहेब देशमुख, मुंजाबा पाटील, पंढरीनाथ तत्सत्, राघवेन्द्र देशपांडे हे होते. या प्रकारामुळे सरकारी यंत्रणेने पोलिसांच्या व रझाकारांच्या मदतीने गावातल्या बहुतेक लोकांच्या घरांच्या झडत्या घेतल्या. सर्वांना भयंकर छळून काढले.

मनमाडच्या बैठकीसाठी बैलाच्या टांग्यातून वेषांतर करून जात असताना विठ्ठलराव जोशी, लक्ष्मणराव देशमुख, राघवेन्द्र देशपांडे, रामराव गुंजकर, बापूसाहेब साडेगावकर चकलांबा पोलिस ठाण्याला जोडलेल्या सुकळीटाकळी जवळ जाताच गावाजवळील पांदीत पोलिसांनी सर्वांना पकडून चकलांबा पोलिस ठाण्यात पायी चालत नेले. चौकशीचे निमित्त करून पोलिसांनी त्या सर्वांना भयंकर छळले. त्या सर्वांची अधिक तपासणी करण्यासाठी हैदराबादहून गुप्तचर खात्याचे प्रमुख श्री. नरसिंगराव, श्री. घोरी आणि औरंगाबादहून भुजंगराव जगताप आले होते. प्रथम त्या सर्वांना अंबड तालुक्यात सर्वत्र पायीच फिरविले. तेथून साडेगावला नेले. तेथेही तसेच घडले. साडेगावला माधवराव देशमुख, बिबनभाई व निवृत्ती तेली यांना पकडून बेसुमार मारहाण केली. त्यांच्या तोंडून चकार शब्द बाहेर आला नाही. इस्लामच्या नावावर बिबनभाईला अनुकूल करण्यासाठी श्री. घोरी यांनी भरपूर प्रयत्न केले परंतु बिबनभाई डगमगले नाहीत. नंतर बिबनभाईला ढोरासारखे बेदम मारले. लपविलेली शस्त्रे व कार्यकर्त्यांची नावे, ठाव ठिकाणा सांगावा यासाठी जंगजंग पछाडले, तरी बिबनभाई गप्प राहिले. बिबनभाईचा माणुसकीला शोभणार नाही इतका क्रूर छळ केला जात होता. आजूबाजूच्या लोकांना तो पाशवी क्रूर अत्याचार बघवत नव्हता. एका कार्यकर्त्याने बिबनभाईच्या घरात दडवून ठेवलेल्या हत्यारांची माहिती दिली. तेवढीच शस्त्रे पोलिसांना मिळाली. त्याशिवाय पोलिसांना काहीही हाती लागले नाही.

निझामी राजवटीतर्फे तुफानी वेगाने निरनिराळ्या अत्याचारांचे सत्र भरवेगाने चालले होते. निझामी सरहद्दीत सर्वत्र असुरक्षितता होती. निझामी सरहद्दीबाहेर कॅम्प कायम करून, निझामी राजवटीच्या सरहद्दीत राहणाऱ्या नागरिकांना दिलासा देणे अत्यंत आवश्यक बनले होते. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कृती समितीच्या आदेशाप्रमाणे, ठिकठिकाणच्या परिस्थितीप्रमाणे तेथील कार्यकर्त्यांच्या विचाराने निझामी सरहद्दीबाहेर कॅम्पस् तयार करण्यात आले. देऊळगाव राजा, शेंदुर्णी, टोका, मनमाड, येवला, अंगुलगाव, साडे पिंपळगाव, कोलता, टाकळी, लोहगड, बोधेगाव टाकळी असे महत्त्वाचे कॅम्पस् होते. देऊळगाव राजास नागोराव पाठक, द्वारकादास पटेल, बबनराव व्याहाळकर, रामराव गुंजकर, मनोहर सोनदे, जनार्दन मामा; शेंदुर्णीस बाबुराव जाधव, लक्ष्मण पवार, धोंडूसिंग हजारी, डॉ. धामणगावकर, लक्ष्मीनारायण, बाबुराव काळे; मनमाडास माणिकचंद पहाडे; टोक्याला रामगोपाळ नावंदर, कुमावत; बोधेगाव टाकळीला काशीनाथ कुलकर्णी, दिगंबरराव कावसनकर, तात्यासाहेब महाजन; अंगुलगावास मुरलीधरराव कानडे, राम जेऊरकर, अनंत भोगले, काशीनाथ नावंदर असे कार्यकर्ते कार्यरत होते. शेवगांव ते बोधेगांव टाकळीपर्यंतच्या भागात श्री. बाळासाहेब भारदे व त्यांचे बंधू अनंतराव भारदे, यांचे भरपूर सहकार्य मिळाले.

अनुक्रमणिका

# शस्त्रासाठी कारागृह

मुंबई शहरातील हैदराबाद स्टेट कॉँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयाद्वारे आणि मनमाड कॅम्पद्वारे मला पुष्कळवेळा स्वयंचलित हत्यारे, हत्यारांच्या गोळ्या, मिलिटरीच्या जुन्या पुराण्या वरद्या, पाणी पिण्याचे चंबू व हेलमेटच्या शोधार्थ व खरेदीसाठी नाशिक, देवळाली विभागात जावे लागे. औरंगाबादेतील कॅन्टोन्मेंटच्या तोफखाना बाजार रस्त्यावर रॉय बंधू राहात असत. रॉय बंधू पैकी तीन भाऊ सर्व प्रकारच्या मोटार दुरुस्तीचे जाणकार कारागीर होते. त्यांचा माझे मामेभाऊ श्री. त्रिंबकदास पटेल यांच्या बरोबर १९४० पासून दाट परिचय होता. व्यवसायानिमित्त रॉय बंधूंपैकी तिघे भाऊ नाशिकला गेले व तेथेच स्थाईक झाले. मी स्वतः हैदराबाद स्टेट कॉँग्रेसच्या लढ्यात सहभागी झाल्याने १९४७ च्या डिसेंबर महिन्यात नाशिक देवळालीला हत्यारे खरेदीसाठी गेलो असता अगदीच अचानक आणि अनपेक्षितपणे रॉय बंधूंची नाशिकच्या सर्कल सिनेमागृहासमोर त्यांच्या स्वतःच्या मोटार रिपेरिंग वर्कशॉपमध्ये भेट झाली. हैदराबाद लढ्याबाबत बरीच बोलणी झाली. त्यांनी लागलीच माझ्या कार्यात मला साहाय्य देण्याच्या उदात्त विचाराने माझा परिचय डॉ. गुप्ते व त्यांचे मामा, जे गुप्ते मामा या नावाने सर्वत्र परिचित होते, त्या दोघांना करून दिला. त्या दोघांनी मला नाशिक-देवळाली विभागात भरपूर मदत करण्याचे आश्वासन दिले व मदत करावयास प्रारंभही केला. त्याशिवाय मुंबई गोदी कामगारांचे पुढारी श्री. मनोहर कोतवाल यांची पत्राद्वारे ओळख करून दिली. श्री. मनोहर कोतवाल हे मुंबईत सर्व परिचित होते. गोदी कामगारांशिवाय त्यांनी त्यांचा समाजवादी विचारांचा एक हुकमी कार्यकर्त्यांचा संच गोळा केलेला होता. तसे ते साने गुरुजींच्या विचाराने प्रभावित होते. माझ्या विनंतीवरून श्री. अनंतराव भालेराव यांनी श्री. मनोहर कोतवाल व त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर हैदराबाद स्टेट कॉँग्रेसने अंगिकारलेल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्याबाबत बरीच बोलणी केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी श्री. मनोहर कोतवाल यांच्या विनंतीवरून श्री. अनंतराव भालेराव यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण शैलीदार भाषणाद्वारे हैदराबाद स्टेट कॉँग्रेसने अंगिकारलेल्या लढ्याबाबतची माहिती त्यांच्या कार्यकर्त्यांसमोर सांगितली. श्री. अनंतराव भालेराव यांनी सांगितलेली लढ्याबाबतची माहिती ऐकून श्री. मनोहर कोतवाल व त्यांचे सहकारी भारावून गेले. त्या बैठकीतच श्री. कोतवाल व त्यांच्या सर्वच्या सर्व कार्यकर्त्यांनी हैदराबाद स्टेट कॉँग्रेसच्या लढ्याला हस्ते परहस्ते, सक्रिय सहाय्य देण्याचे मान्य केले व प्रत्यक्ष कार्यास प्रारंभही केला. श्री. मनोहर कोतवाल, गोदी कामगारांचे तत्पर नेते म्हणून मुंबईतील निरनिराळ्या क्षेत्रांत परिचित होते. गुरुजी, आचार्य धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण आणि समाजवादी विचारसरणीबरोबर त्यांची बांधिलकी होती.

या सुमारास हैदराबाद संस्थानातील अत्याचारांचे प्रमाण वाढत होते. निझामी राजवट, पोलिस व रझाकार यांना धडकी भरेल अशा स्फोटक हातबॉँबचा मारा केला तरच आपल्या कार्यकर्त्यांचा, गावकऱ्यांचा बचाव होऊ शकेल आणि पोलिस व रझाकारांच्या तांड्यामध्ये दहशत निर्माण झाली तर त्यांची हिम्मत खचेल, असा विचार मांडण्यात आला. सुचविलेली योजना अंमलात आणण्यासाठी देशी बनावटीचे बॉँब तयार करण्याच्या कामास प्रारंभ झाला. श्री. बाबासाहेब परांजपे यांचे पुण्याचे एक निकटवर्ती त्या कामाला लागले. स्थानिक पोलिसांच्या व कारखान्यातील कामगारांच्या नजरा चुकवून हे काम करावे लागत असल्याने वेळात वेळ काढूनच ते करावे लागे. त्यामुळे हातबॉँबची निर्मिती हव्या तेवढ्या वेगाने होऊ शकत नव्हती. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईत देशी बॉँबचे शेल तयार करावयाचे काम माझ्याकडे देण्यात आले.

अनुक्रमणिका

या कामासाठी मी श्री. मनोहर कोतवाल यांच्यासमवेत प्रथम काही कारखान्यांत फेरफटका मारला. भायखळा पुलाजवळ खडापारशी पुतळ्याच्या मागे एका अडगळीच्या बोळात श्री. जसूभाई पटेल यांचा लोखंडाची छोटी छोटी अवजारे तयार करणारा छोटेखानी कारखाना आमच्या कामासाठी सुरक्षित व योग्य वाटला. हैदराबाद संस्थानच्या स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी मदत म्हणून कारखानदार श्री. जसूभाई पटेल यांनी शेलनिर्मितीचे काम स्वीकारावे असे जरी वाटत होते तरी केवळ मदत म्हणून ते काम स्वीकारण्यास श्री. जसूभाई तयार झाले नाहीत, मात्र व्यवसाय म्हणून ते काम त्यांनी स्वीकारण्यासाठी, श्री. मनोहर कोतवाल यांनी त्यांना विनंती केली व ती त्यांनी मान्य केली. शेलच्या आकाराचे व लांबी रुंदीचे एक चित्र त्यांना दाखविण्यात आले. लोखंडी पलंगाच्या चार टोकावर शोभा वाढविण्यासाठी सदर टोपण तयार केले जात आहे असेच श्री. जसूभाईनी त्यांच्या कारखान्याच्या कामगारांना व इतरांना सांगावे ही श्री. कोतवाल यांची कल्पना श्री. जसूभाईना आवडली व पटली. किमान आठ-दहा हजारावर टोपणे करावयाची असल्याचे श्री. कोतवाल यांनी श्री. जसूभाईना सांगितले. तसे ते काम त्यांच्यासाठी मोठेच होते. टोपणाच्या आकाराचे चित्र आम्ही देऊ त्याप्रमाणे ढाळून लोखंडाचे टोपण करावयाचे ठरले. त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक तेवढ्या रकमेचा आकडा घासाघाशीने निश्चित केला गेला. ॲडव्हान्स म्हणून श्री. जसूभाई पटेल यांना दोन हजार रुपये देण्यात आले.

त्या हातबाँब टोपण्याच्या तोंडावर ज्या आकाराचे पेच पाडले जाणार होते त्याच आकारांचे नट पेचासमवेत तयार करण्याचे काम श्री. कोतवाल यांनी त्यांचे मित्र व वैचारिक सहप्रवासी मधू लिमये यांना दिले. ॲडव्हान्स म्हणून त्यांनाही पाचशे रुपये दिले.

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात श्री. बाबासाहेब परांजपे यांचे परिचित श्री. दातार यांनी व्हाइसरॉयच्या संरक्षकांपैकी असलेले बिलिमोरिया यांच्याशी गुप्त संधान बांधले. बिलिमोरिया यांचे अंबरनाथ येथील मिलिटरी डेपोच्या वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्याशी घनिष्ठ संबंध असल्याने ह्या अधिकाऱ्यामार्फत दोन टॅक्सी भरून स्वयंचलित शस्त्रे व दारूगोळा मिळवून देण्याचे त्यांनी आश्वासन दिले. श्री. बाबासाहेब परांजपे यांनीच ही माहिती दिली.

### बिलिमोरियाशी गाठीभेटी

श्री. दातार यांनी सांगितलेल्या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी श्री. बाबासाहेब परांजपे यांनी श्री. अनंतराव भालेराव यांना, मला सोबत घेऊन श्री. दातारांसमवेत श्री. बिलिमोरिया यांची प्रथम भेट घ्यावी; औपचारिक बातचीत करताना आपल्या पदरात पडणारे साहित्य खात्रीलायक असल्याचे बघावे तसेच मिळणारे सारे साहित्य कोठून केव्हा व कोणत्या प्रकारे आपल्या ताब्यात दिले जाणार याबाबतचा तपशीलवार कार्यक्रम निश्चित करावा असे सांगितले. त्याप्रमाणे श्री. दातार यांनी श्री. बिलिमोरियांना प्रत्यक्ष भेटून, भेटीची जागा व वेळ निश्चित केली. श्री. दातारांसमवेत श्री. अनंतराव व मी फोर्ट विभागात काळ्या घोड्या नजीकच्या नेव्ही हॉटेलमध्ये गेलो. सूर्यास्तानंतर अंधार झाला होता. त्या हॉटेलच्या झगमगाटाने आणि एकंदर आकर्षक देखाव्याने आम्ही प्रथमदर्शनी भांबावून गेलो. आमच्याबरोबर दातार व दातारांबरोबर गझदर होते. त्या दोघांना तशा भपकेबाज हॉटेलात जायचा-यायचा सराव असल्याने त्यांना विशेष असे वाटले नसावे.मी, अनंतराव भालेराव, दातार व त्यांचे मित्र गझदर एका मोठ्या टेबलापाशी खुर्च्यावर बसलो. हॉटेलात पुरुषांऐवजी सर्वच्या

सर्व महिला काम करताना पाहाण्याचा तो आमचा पहिलाच प्रसंग होता. शिवाय दारूची सवय नसल्याने बिचकत आम्ही कॉफी मागविली. एवढ्यात पंधरा मिनिटे पसार झाली. आम्हा दोघांचे लक्ष दाराकडेच होते. बिलिमोरिया यायचा होता. बिलिमोरियाला आम्ही दोघांनी कधी पाहिलेले नव्हते. बिलिमोरिया कोण व कसा आहे हे आम्हाला श्री. दातार व त्यांचे मित्र गझदर यांच्या चेहऱ्यावरील हास्यानेच समजणार होते. इतक्यात गझदर ताडकन उठला आणि त्याने हास्याच्या फवाऱ्यासह हस्तांदोलन करून बिलिमोरियाचे स्वागत केले. दातारांनी लगेच बिलिमोरियांची ओळख करून दिली. बिलिमोरिया व्हॉइसरॉय लॉर्ड वेव्हलचा संरक्षक होता. आता तो लष्करातून निवृत्त झाला होता. उंचपुरा धिप्पाड शरीराचा, गोरागोमटा, चारचौघांत खुलून दिसणारा, ऐट थेट इंग्रजासारखी! तो आमच्या समोरच्या खुर्चीवर बसला. आम्ही सारे जवळ जवळ सरकलो.

बिलिमोरिया सांगू लागला, पण तो जे काय सांगत होता ते सर्व हलक्या व दबकत्या आवाजात. तो जे काय सांगत होता ते जवळच्या इतरांना ऐकू जाणार नाही याची खबरदारी घेत असल्याचे त्याच्या हावभावांवरून समजू शकत होते. त्याला जे काय सांगावयाचे होते ते सांगून झाले; तेव्हा तो चाणाक्षपणे आम्हा दोघांचे चेहरे पाहत होता. अनंतराव व मी एकाच आवाजात म्हणालो, "पैशाची काळजी करू नका. एका हातात पैसा घ्या व दुसऱ्या हाताने माल द्या, परंतु साहित्य खात्रीचे, चांगले व कामाचे असावे. लष्करातला माल असल्यास अधिक चांगले. त्यानंतर बिलिमोरिया म्हणाला, "माझे अंबरनाथच्या मिलिटरी डेपोशी चांगले व घनिष्ठ संबंध आहेत. तेथील इंग्रज साहेबांबरोबर काल बोललो अन् इकडे येण्यापूर्वी आजही सविस्तर बोलणी केली. ते अधिकारी एका पायावर तयार आहेत माल त्वरित द्यायला. तुम्ही माल कसकसा नेणार याबाबत त्या साहेबांची खात्री करून द्यायची आहे. तेव्हा तुम्ही माल कसा नेणार ते सांगा? " आम्ही ठरलेली योजना त्याला सांगितली. " आधी आम्हाला मिळणार असलेला माल प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहू द्या. या आधी आम्ही दोन तीनदा फसलो आहोत, म्हणून माल पाहिल्यावर पुढचे ठरवू." त्यावर सर्व माल प्रत्यक्ष दाखविण्याचे बिलिमोरियाने मान्य केले. दुसऱ्या दिवशी माल दाखविण्याची व बघण्याची वेळ निश्चित करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी सायंकाळच्या सुमारास चौपाटीच्या अलीकडे मरीन लाईन्सच्या डाव्या बाजूला आमची टॅक्सी थांबली. बिलिमोरियाने त्यांच्या मोटारीचा नंबर दिला होता.गाडीचा रंगही सांगितला होता. गाडी कोणत्या बाजूने येणार होती हेही सांगितले होते. अनंतराव, मी व दातार टॅक्सीत बसूनच त्याची वाट बघत होतो. तो यायला अद्याप पाचसात मिनिटे लागणार होती. आम्ही टॅक्सीवाल्याचे पैसे दिले अन् टॅक्सी सोडली. तेवढ्यात एक काळ्याभोर रंगाची कोरी चकचकीत गाडी थांबली. गाडीच्या सर्व काचा काळसर रंगाच्याच होत्या. शिवाय काचा आतून बंद केलेल्या होत्या. गाडीचा नंबर आणि रंग तोच होता. आम्ही त्या गाडीच्या दिशेने टक लावून पाहात होतो. तोच एका दाराची काच खाली गेली. एका हाताच्या खुणेने आम्हाला गाडीजवळ बोलावले गेले. आम्ही तिघे गाडीजवळ गेलो. मागच्या सीटवर अनंतराव व मी बसलो. समोरच्या सीटवर दातार बिलिमोरियाशेजारी बसले. गाडीची दारे बंद झाली. बिलिमोरियाच गाडी चालवीत होता. मागे वळून तो म्हणाला, "खालचे मॅटिंग वर उचला." त्याखाली ३८ व ४५ बोअरची नवी कोरी करकरीत पिस्तुले दिसली. ती हातात घेऊन बघितली. सर्व ठीकठाक होते. "आता थोडे पुढे सरका. तुमच्या सीटच्या मागे काय आहे ते बघा."

मी मागे हात घातला. माझ्या हाताला ३०३ नवी कोरी रायफल लागली. व्यवस्थित होती. लगेच मी झाकून ठेवली. त्यानंतर बिलिमोरियाने त्याच्या कोटाच्या खिशात हात खुपसला आणि खळखळ आवाज

करणारी नवी कोरी काडतुसे काढली. ती आम्ही दोघांनी तपासली. बिलिमोरियाने आम्हाला मिळवून देणार असलेल्या साहित्यांची झलक आम्हाला दाखविली. आम्हाला जे हवे होते ते आता हाती लागणार या आनंदाने आम्ही भारावून गेलो होतो. माल बघण्याचे काम आटोपताच दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम ठरला. त्याप्रमाणे आम्ही पुढच्या कामाच्या तयारीला लागलो.

मी, अनंतराव, सदाशिव चौधरी, पद्माकर लाटकर, दातार आणि गझदर असे दोन खाजगी टॅक्सीतून निघालो होतो. आमच्यामागे एक लॉरी, त्या लॉरीत आमचे सामान, लुगडी, धोतरजोडी, इतर वापरण्याचे कपडे, हापूस आंब्यांची पेटारी वगैरे. बतावणी अशी की, मनमाडला हैदराबादेतून जे निर्वासित आले आहेत त्यांच्यासाठी आम्ही सामान नेत आहोत. मोरारबागेतून हा लवाजमा बरोबर चारच्या सुमारास निघाला. दादरच्या जरा पुढे कालची तीच काळीभोर गाडी बिलिमोरिया समवेत आमच्या सोबतीला मिळणार होती. आमच्या गाड्या जरा बाजूला उभ्या केल्या. अनंतराव दातारच्या कानाला लागून बोलत होते, ‘अहो! तुमचा तो बिलिमोरिया येईल ना? आपल्याला फसवणार तर नाही ना? ” दातार नेहमीप्रमाणे हसत त्याची खात्री देत होते. गझदरही मागोमाग हमी देत होता. दातारमुळे तो आमचा खास मित्र बनला. शिवाय हैदराबादच्या सशस्त्र लढ्याविषयी त्याने अत्यंत आत्मीयता दाखविली होती. तो निश्चित येणार असेच वाटत होते. एक तास झाला. तो आलाच नाही, तो येईल या आशेवर पुढे जायचे का? की तो येईपर्यंत येथेच थांबावयाचे? अशा विचारचक्रात आम्ही सापडलो होतो. शेवटी मुंबईच्या बाहेर पडायचे ठरले. आम्ही आमच्या गाड्यांसमवेत बरेच दूरवर गेलो. बिलिमोरिया अगर त्याची गाडी येताना दिसली नाही. आता पुढे काय करायचे? बराच वेळ विचार केल्यावर असे ठरले की, गझदर आणि दातारांनी गाडीतून परत जावे. बिलिमोरियाची भेट घ्यावी आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी आधी ठरल्या ठिकाणीच भेटावे.

ओसंडून आलेला आनंद आता विरून गेलेला होता. मनाला एकसारखी हुरहुर लागली होती. केवढ्या उभारीने निघालो होतो. डोळ्यांसमोर इथून तिथून रिव्हाल्वर, रायफली आणि काडतुसेच तेवढी दिसत होती. हैदराबाद संस्थानात आमचेच लोक जीव मुठीत धरून बसले होते. त्यांना त्यांच्या संरक्षणासाठी आणि इतरांचा जीव वाचविण्यासाठी शस्त्रे हवी होती. हवी ती शस्त्रे मिळाली तर पोलिस चौक्याच जमीनदोस्त झाल्या असत्या. लढ्याबाबत मिळणारे यश व त्यासाठी आवश्यक लागणारी हत्यारे याची लालसा आशेचा दिवा दाखवीत होती. आशा अमर असते. आम्ही सर्व निःस्वार्थी बुद्धीने नागरिकांच्या स्वातंत्र्यासाठी लढा लढवीत होतो. निदान आमचा आशाभंग होणार नाही असेच आम्ही समजत होतो. येईल त्या आपत्तीबरोबर निकराने झुंज देण्यासाठी धडपडत होतो. काळही आमची परीक्षाच घेत होता.

आम्ही सोबत घेतलेले बाडबिस्तर, मोटारगाड्यांचे लटांबर यांसह कल्याणला रात्र काढली. अनंतराव भालेरावांची वडील बहीण तेथेच राहात होती, ऐन हैदराबादच्या लढ्याच्या काळात धाकटा भाऊ पाव्हण्यांरावळ्यांसह घरी आल्याने तिला मनस्वी आनंद झाला. मनोमन आम्ही सर्वजण हसत होतो. दुसऱ्या दिवशी आम्हाला कोठे जावे लागणार होते ते त्या बिचाऱ्या मायमाऊलीला काय माहीत?

पद्माकर म्हणाला, ‘रात्री येथे पडून राहण्यापेक्षा मी जरा मुंबईला फेरफटका मारून येतो. ठरल्या वेळी निश्चित परत येईन.’ तो गेला. मी, अनंतराव व सदाशिव चौधरी परत आमचे सर्व लटांबर घेऊन कल्याणच्या

स्टेशनवर गेलो. स्टेशनबाहेर आमच्या सोबतच्या मोटारी उभ्या केल्या. ठरल्याप्रमाणे पद्माकर येणार होता. तो आलाच नाही. शंकेची पाल चुकचुकली. पण त्याला काहीच इलाज नव्हता. चारच्या सुमारास लोकलने दातार व गझदर येणार होते. बरोबर चारच्या ठोक्याला दातार अन् गझदर दादरा उतरताना दिसले. मी अनंतरावांना सांगणार तोच सदाशिव चौधरी म्हणाला, "दादऱ्याकडे बघा, ते दोघे आम्हाला पाहून हसले." आम्ही सर्वजण परत गाड्यांत बसलो. तेवढ्यात दातार व गझदर एका आवाजात म्हणाले, "बहुतेक अर्ध्या तासात बिलिमोरिया येथे येईल." आमचा जीव थोडासा भांड्यात पडल्यासारखे आम्हाला वाटले. आम्हाला अंबरनाथचे शस्त्रागार ठळकपणे दिसू लागले. आज रात्री नऊच्या सुमारास आमच्या ताब्यात शस्त्रे येणार. आज नगदी वीस हजारांच्या नव्या कोऱ्या नोटा व बाकीची रक्कम दोन दिवसांनी, मुंबईत त्याच शानदार हॉटेलात बिलिमोरियाला देण्याचे ठरले होते.

थोड्या वेळानंतर दातारांनी एकदम ढुसणी दिली अन् म्हणाले "ते बघा बिलिमोरिया दादरा उतरतो आहे. ठरल्याप्रमाणे गाड्यात बसा. आता आपण सर्वांनी जय्यत तयारी ठेवायला हवी. ड्रायव्हरना आपला पुढील मार्ग सांगून ठेवायला हवा." बोलता बोलता कल्याण सोडून पुढे जाण्याची तयारी झाली. बिलिमोरिया जसजसा आमच्याजवळ येऊ लागला तसतसा गमावून बसलेला आनंद पुन्हा गवसल्याने आम्हा सर्वांची मने आनंदाने बेहोष झाल्यासारखी वाटू लागली. बिलिमोरिया आमच्याशी हसतमुखाने हस्तांदोलन करीत असतानाच आमच्या दोन्ही मोटारींच्या ड्रायव्हरांना जरासे बाजूला सारून नवीन चेहऱ्याची दोन माणसे ड्रायव्हरच्या जागी बसली. त्यांनी ड्रायव्हरांकडून एकाचवेळी मोटारीच्या किल्ल्या मागून घेतल्या. आम्ही त्या नवीन माणसांना काही विचारणार तेवढ्यात मोटारी चालू लागल्या. गाडी चालविणाऱ्या नव्या दमाच्या नव्या माणसाने त्याच्या डाव्या हातातला एक कागद दाखविला. आम्हा सर्वांना मुंबई पोलिसांनी अटक केलेली असून गाड्यात बसलेले नागरी पोशाखातील लोक पोलिसच आहेत; हे त्या कागदावरून स्पष्ट झाले. आमच्या सर्वांगाला दरदरून घाम आला. तेवढ्या वेळात आमच्या दोन मोटारी आणि एक लॉरी कल्याण पोलिस ठाण्यात दाखल झाली.

जाबजबाब झाले व लगेच आमची रवानगी ठाणे येथील पोलिस चौकीच्या बराकीत करण्यात आली. मी, अनंतराव, सदाशिव, दातार आणि गझदरला आजचा प्रसंग अगदीच अनपेक्षित होता. त्यात गझदरला पोलिस कोठडी आणि तुरुंग माहीत नव्हता. आजच्या सारखा प्रसंग त्याने त्याच्या आयुष्यात पहिल्यानेच पाहिला होता अन् आता तर तो प्रत्यक्ष अनुभवतही होता. मौजमजा, ऐषआरामात त्याचे जीवन गेले होते. तो ढसाढसा रडू लागला. त्याची समजूत घालण्यात रात्र गेली.

## आय्. जी. पी. कामटे यांची सौहार्दशीलता

सकाळी फौजदार आले पण आम्हाला भेटलेच नाहीत. ना तोंड हातपाय धुणे, ना सकाळचा चहा, ना न्याहारी, प्रातर्विधीही बंद. तोंडाला कोरड पडत होती. सांगायचे कोणाला? ऐकणार कोण? दुपारच्या चारच्या सुमारास फौजदार परत आला. हिडिसफिडिस करीत तो आमच्याशी अतिशय उद्धटपणे वागला. शिवीगाळी करीत करीत त्याने आमच्या कसून झडत्या घेतल्या. काहीही सापडले नाही. परंतु बॅग उघडली तेव्हा त्यात बावीस हजाराच्या नोटा व एक काडतूस सापडले. त्यावेळी मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर तर

गृहमंत्री श्री. मुरारजीभाई होते. प्रारंभी बिलिमोरियाही आमच्याच बरोबर होता. पोलिस चौकीच्या बराकीजवळ जाताच बिलिमोरियाने त्याचे ओळखपत्र दाखविले व तो बाजूला जाऊन उभा राहिला आणि अवघ्या पाच मिनिटात तो तेथून निघून गेला. बहुधा तो शासनाचा गुप्तहेर असावा असे आम्ही अनुमान केले.

भारत देश स्वतंत्र झाला होता. देशात स्वराज्य आले होते. ब्रिटिश राजवटीच्या काळातलाच जुना कायदा जसाचा तसा अमलात येत होता. पोलिस अधिकाऱ्याच्या उद्दामपणात आणि अमानुष वर्तनात काहीही फरक पडलेला नव्हता. तब्बल २२ तासांत चूळ भरायला, तोंड, हातपाय धुवायला, तोंडाला पडलेली कोरड कमी करायला घोटभरही पाणी मिळाले नाही. आमची सारखी कासावीस सुरू होती. सायंकाळच्या वेळी सातच्या सुमारास आम्हा पाचजणांना क्रॉफर्ड मार्केटसमोर फलटण रोड येथे मुंबई प्रांताचे ज्येष्ठ पोलिस अधिकारी श्री. कामटे यांच्या कार्यालयात ताबडतोब हजर करण्याबाबत ठाण्याचे पोलिस अधीक्षक श्री. सावंत यांचा टेलिफोन पोलिस चौकीच्या फौजदाराला आला. त्या फौजदाराने, आम्हा पाचजणांना मुद्देमालासमवेत पकडल्याची कर्तबगारी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना दाखविण्याची सुवर्णसंधी मिळाली असल्याचे समजून, कोठडीत बंद करून ठेवलेल्या आम्हा पाचजणांच्या ताबडतोब मुसक्या बांधल्या आणि पोलिस व्हॅनमध्ये चार हत्यारबंद पोलिसांसमवेत फलटण रोड येथे नेले. तेव्हा रात्रीचे ९ वाजले होते. आम्हाला आणल्याबाबतची वर्दी देण्यात आली. पाच मिनिटानंतर फौजदाराने आम्हाला श्री. कामटे यांच्या समोर हजर केले. आमच्यापैकी अनंतरावांबरोबर हस्तांदोलन करण्यासाठी श्री. कामटे यांनी त्यांचा हात पुढे केला तेव्हा अनंतराव व इतरांच्या मुसक्या बांधलेल्या असल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी त्या फौजदाराला उद्देशून विचारले, “हे काय? तुम्ही या सर्वांना मुसक्या बांधून आणले? ताबडतोब त्यांच्या मुसक्या सोडा.” असे सांगताना श्री. कामटे यांना बराच राग आल्यासारखे आम्हाला दिसले. त्या फौजदाराचा थरकाप उडाला हेही आम्हाला दिसले. श्री. कामटे यांनी आम्हाला त्यांच्याच समोरच्या खुर्च्यांवर आदरपूर्वक बसविले. प्रथम पाणी व लगेच चहा दिला....” अनंतराव घडलेल्या प्रकाराबाबत मला वाईट वाटते.” असे श्री. कामटे म्हणाले. तेवढ्यात ठाण्याचे पोलिस अधीक्षक आले. “अनंतराव माझा दुपारचा आणि आताचा डबा तसाच आहे. प्रथम आपण सारे जेवू.” श्री. कामटे म्हणाले. “संकोच वाटत असेल तर जवळच्या खाणावळीत जेवण घ्या.” ठाण्याचे पोलीस अधीक्षक श्री. सावंत यांच्यासमवेत आम्ही जवळच्या खानावळीत कसेबसे चार घास घशात टाकले व त्यानंतर त्यांच्याच समवेत श्री. कामटे यांच्या कार्यालयात आलो तेव्हा तो उर्मट फौजदार साध्या शिपायासारखा जवळ उभा असलेला आम्ही पाहिला.

“इतक्या नोटांची थप्पी घेऊन कोणत्या मोहिमेवर निघाला होता? ” असा खोचक प्रश्न श्री. कामटे यांनी आम्हा सर्वांसमोर उभा केला.

“हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्वातंत्र्यालढ्याच्या कार्यकर्त्यांना मदत करण्यासाठी आम्ही निघालो होतो. हैदराबाद संस्थानातले नागरिक भयंकर संकटात आहेत. आम्ही कोणत्या का कारणाने पकडले गेलो असलो तरी त्याचे आम्हाला वाईट वाटत नाही. आम्ही व आमच्याबरोबर असलेली रक्कम पोलिसांच्या ताब्यात आणि सुरक्षित आहे; इतकी माहिती आमच्या पुढाऱ्यांना अगर आमच्या मध्यवर्ती कार्यालयाला कळवावी.” असे अनंतरावांनी सांगितले.

अनुक्रमणिका

"आता तुम्ही आणि तुमची रक्कम सुरक्षित आहे. त्याबाबत काळजी करू नका." श्री. कामटे यांनी आश्वासन दिले अन् लगेच हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या मध्यवर्ती कार्यालयाला कळविले. मला व अनंतरावांना बरेच हायसे वाटले. डॉ. मेलकोटे कार्यकर्त्यांना अधून मधून सांगायचे, "पैशाच्या मोबदल्यात हातात आलेले साहित्य गमवावे लागले तरी चालेल पण तुम्ही पोलिसांच्या तावडीत अडकू नका." प्रत्यक्ष डोळ्यांनी न्याहाळलेल्या नमुन्याप्रमाणे हाती पडणारे साहित्य हातात येण्यापूर्वीच हातातली रक्कम मात्र पोलिसांच्या ताब्यात गेली. आम्हीही पोलिसांच्या ताब्यात अडकलो, याचेच राहून राहून वाईट वाटत होते.

रात्री आमचा मुक्काम मुंबईच्या ज्येष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या फलटण रोड कार्यालयातच होता. सकाळी ठाण्याच्या पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयात रवानगी केली जात असताना मोरारबागेतील हैदराबाद स्टेट काँग्रेस मध्यवर्ती कार्यालयाची कसून झडती घेण्यात आली. गोविंदभाई, आनंदराव वाघमारे, भाऊसाहेब वैशंपायन,डॉ. मेलकोटे वगैरे कार्यालयातच होते. स्वातंत्र्यलढ्याविषयी पोलिसांपैकी काहींच्या मनात आत्मीयता होती मात्र नोकरीमुळे त्यांचा नाइलाज होता... आम्ही ठाण्याच्या पोलिस अधीक्षक कार्यालयात दाखल झालो. आवश्यक तेवढी विचारपूस, लिखापढी झाल्यावर स्थानबद्ध म्हणून ठाण्याच्या मध्यवर्ती कारागृहात आमची रवानगी करण्यात आली.

ठाण्याच्या कारागृहात आवश्यक तेवढे सोपस्कार झाल्यावर आम्हाला, फाशीची शिक्षा ठोठावलेल्या आणि शिक्षा भोगीत असलेल्या अट्टल गुन्हेगारांच्या वेगळ्या अन् विशिष्ट प्रकारच्या खोल्यांजवळच ठेवण्यात आले. ती जागा पाहताच गझदर ढसढसा रडू लागला. मऊ गुळगुळीत बिछान्यावर पंख्याखाली झोपणाऱ्याला आता दगडी फरशीवर जाड्याभरड्या पट्ट्यावर झोपावे लागणार होते. शॉवर बाथ ऐवजी उघड्या नळावर थंडगार पाण्याने स्नान करावे लागणार होते. दातारही बराच हिरमुसला झाला होता. त्याचे सततचे हास्य जवळजवळ मावळले होते. आम्हा पाच जणांना एकमेकांचेच चेहरे पाहावे लागणार होते. फाशीची शिक्षा भोगणारे शेजारच्या खोलीत काहीतरी वेडेवाकडे बोलत तेच ऐकावे लागणार होते.

दुपारी मनोहर कुलकर्णी आणि पद्माकर लाटकर, आमच्यासाठी आवश्यक तेवढे अंथरूणपांघरूण व जेवणाचे डबे घेऊन आले. दररोज सकाळी व सायंकाळी नियमित जेवणाचे डबे येतील अशी व्यवस्था केली गेली. गझदरला भेटायला कोणीही आले नाही. त्याची बायको श्रीमंत घरातली होती तशी ती मस्तवाल असल्याचे तोच सांगत असे. तो जेलमध्ये गेल्याचे समजताच त्याची बायको त्याला कायमचे सोडून निघून जाईल; असे सांगताना तो लहान मुलासारखा ओक्साबोक्शी रडत राहायचा. त्याची समजूत घालता घालता आम्ही थकून जात असू. विनासायास जीवन सुखासमाधानात व्यतीत व्हावे यासाठी काही लोक लालसेचे कसे गुलाम बनतात याचा अनुभव आम्हाला पदोपदी येत होता. पैशाचा मोह कितीतरी लोकांना मानवजातीला शोभणार नाही असे प्रकार करायला भाग पाडतो. गझदर, त्याबाबत आमच्यासमोर जिवंत उदाहरणाच्या रूपाने उभा होता. कारागृह आणि कारागृहातले जीवन, मला आणि अनंतरावांना नवीन नव्हते. कारागृहात स्वतःला अडकवून आम्हाला आमचा जीव वाचवायचा नव्हता. सैतानी राजवटीबरोबर दोन हात करावयाची खुमखुमी आमच्या अंगात सळसळत होती.

अनुक्रमणिका

सामान्य नागरिकांचा धीर, मनोधैर्य कच खाऊ नये यासाठी प्रतिकार प्रतिहल्ले करता यावे, निर्ढावलेल्या गावगुंडांना, रझाकारांना, निर्वासितांना आणि निझामी राजवटीच्या पोलिसांना पिटाळून मागे रेटावे यासाठी आवश्यक ती साधनसामुग्री गोळा करीत असताना आम्हाला आमच्याच शेजाऱ्यांनी बंदिस्त केले; याचेच आम्हाला वाईट वाटत होते.

## ठाणे तुरुंगातून सुटका

कारागृहाच्या नियमाप्रमाणे कारागृहाच्या तपासणीनिमित्त सेशन्स जज्ज व सर्जन आले असता त्यांनी आम्हाला फाशीची शिक्षा ठोठावलेल्या कैद्यांच्या खोल्यांच्या बाजूला पाहून आश्चर्य व्यक्त केले. पंधरा दिवसानंतर दुसरी फेरी झाली. आम्ही तेथेच होतो. एक महिन्यानंतरच्या तिसऱ्या तपासणी फेरीच्या वेळी आम्हाला जेथल्या तेथे पाहून त्यांना आश्चर्यच वाटले. हैदराबाद संस्थानात स्वातंत्र्य युद्ध चालू असताना आम्हाला बंदिस्त पाहून त्यांनी खेद व्यक्त केला. त्यापेक्षा अधिक त्यांना काय करता येणे शक्य होते? आमची सुटका व्हावी यासाठी दिगंबरराव बिन्दू, डॉ. मेलकोटे यांनी अनेक प्रयत्न केले. दिल्लीच्या वाऱ्या केल्या. आमची सुटका केली जावी असे भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना वाटत होते. मात्र तसे मुंबई प्रांताच्या गृहमंत्र्यांना पटत नव्हते. शेवटी भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल, यांच्या तातडीच्या आदेशाने आमची ठाण्याच्या कारागृहातून सुटका झाली. ठाण्याच्या मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षकाने आम्हाला मुक्त करण्यात दाखविलेली तत्परता पाहून आम्ही भारावून गेलो. जवळपास ७४ दिवस आम्ही ठाण्याच्या कारागृहात स्थानबद्ध होतो.

हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यासाठी अत्यावश्यक स्वयंचलित शस्त्रांचा आणि स्फोटक अस्त्रांचा फार मोठा साठा मिळणार असल्याची खात्री झाल्यावर, औरंगाबादचे धीरोदात्त पुढारी आणि मनमाड कँपचे प्रमुख श्री. माणिकचंद पहाडे, यांच्या सल्ल्याने औरंगाबादमध्ये स्थायिक झालेले सरदार जयसिंग यांचे ज्येष्ठ बंधू सरदार प्रकाशसिंग ओबेरॉय यांनी आम्हाला लागणाऱ्या वाहनांची व्यवस्था केली होती. त्यांचा स्वतःचा पेट्रोल पंप, मालवाहतूक करणारी नामवंत कंपनी आणि टॅक्सी मोटारीचा व्यवसाय होता. सरदार जयसिंग यांचे कनिष्ठ बंधू, सरदार संतसिंग हे त्यांच्या बालवयापासून सरदार प्रकाशसिंग ओबेरॉयकडेच होते. तेच त्यांच्या वडिल बंधूंचा सारा कारभार व्यवस्थितरीत्या चालवीत असत. त्यांच्याबरोबर संपर्क साधून आम्ही दोन टॅक्सी व एक लॉरी मिळविली होती. आमच्यासमवेत तीन ड्रायव्हरही ठाण्याच्या जेलमध्ये डांबण्यात आले होते. तसेच ही वाहनेही जप्त करून ठाण्याच्या पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयात ठेवण्यात आली होती. श्री. प्रकाशसिंग ओबेरॉय यांनी त्यांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून अटक करून ठेवलेल्या तीन ड्रायव्हर्सची मुक्तता केली आणि संबंधित वाहनेही सोडविली.

ठाण्याच्या कारागृहातून सुटका झाल्यावर प्रतिकार व प्रतिहल्ले चढविण्यासाठी देशी बॉम्बची चोहोकडून सतत मागणी केली जात असल्याचे समजले. देशी बॉंबचे ढाळलेले "शेल" तयार करावयाची ऑर्डर दोन महिन्यांपूर्वीच दिलेली होती. दिलेल्या ऑर्डरचे शेल तयार होतात किंवा नाही याची तातडीने माहिती घेण्याचे मला सांगितले गेले. रात्री ९ च्या सुमारास मी श्री. मनोहर कोतवाल यांना त्यांच्याच घरी गाठले. ठाण्याच्या जेलमधील अटकाव आणि सुटका याबाबत औपचारिक थोडी बातचीत केल्यावर श्री. कोतवाल

समवेत मी श्री. जसूभाईंच्या घरी गेलो तेव्हा ते झोपायच्या तयारीत होते. त्यांना दिलेल्या ऑर्डरप्रमाणे सुमारे वीस दिवसांपूर्वीच दहा हजार नग त्यांनी तयार केल्याचे सांगितले. “भायखळा विभागात थोडी चकमक उडाल्याने सुरक्षिततेसाठी खास मर्जीतल्या कामगारांद्वारे कारखान्यातच खोल खड्डे खणून त्यात ते गाडून ठेवले आहेत. पोलिस शिपाई आमच्या कारखान्यासभोवती सारखे चक्कर लगावतात, अधूनमधून कारखान्यातही येतात आणि कशाचीतरी शोधाशोध करीत असल्यासारखे दिसतात. आमच्या चौकीदाराला आणि दोन कारागिरांना घेरण्याचाही त्यांनी आतापर्यंत तीन वेळा प्रयत्न केला आहे. मेहेरबानी करा आणि तुमच्या ऑर्डरीचे सामान उद्याच्या उद्या रात्रीतून न्या अन् आम्ही आणि आमचा कारखाना संकटातून मुक्त करा.” श्री. जसूभाई पटेल अत्यंत काकुळतीने म्हणाले. “जसूभाई, गेल्या दोन महिन्यांपासून ठाण्याच्या जेलमध्ये अडकून पडण्याने ऑर्डरीचा माल त्यांना नेता आला नाही. त्यांना त्या मालाची तशी फार फार गरज आहे.” श्री. मनोहर कोतवाल यांनी श्री. जसूभाईचे थोडेसे समाधान केले. “उद्याच्या उद्या तर जमेलसे वाटत नाही;तरी पण परवा सायंकाळच्या सुमारास ऑर्डरचा माल नेईन.” मी जसूभाईना सांगितले. त्यांना बरेच समाधान झाल्यासारखे वाटले. “कामगारांचा दोन आठवड्याचा पगार द्यायचा आहे. तुमच्या ऑर्डरचा माल साराचा सारा तयार आहे. उद्या दुपारपर्यंतॲडव्हान्स वजा जाता बाकीची रक्कम तरी द्या,” श्री. जसूभाईनी प्राप्त परिस्थिती सांगितली. “ठीक आहे. उद्या दोन वाजेपर्यंत बाकीची रक्कम आणून देईन.” रक्कम देण्याचे मी सांगताच श्री. जसूभाईच्या चेहऱ्यावर थोडेसे स्मित दिसू लागले. रात्रीचे अकरा वाजले होते. श्री. मनोहर कोतवालांना त्यांच्या घरी जायची ओढ लक्षात घेता मी म्हणालो, “कोतवाल, श्री. मधु लिमयेंनाही भेटणे जरूरीचे आहे.”

“हो बरी आठवण झाली. तो याच वेळी त्याच्या घरी सापडू शकेल. चला.” असे सांगून श्री. कोतवाल चालू लागले. पंधरा मिनिटांनी आम्ही दोघे मधू लिमयेंच्या दाराशी गेलो. श्री. मनोहर कोतवालांनी बेल वाजविली. “ कोण आहे? ” आतून आवाज आला. “मधू. मी कोतवाल” कोतवाल म्हणाले. दार उघडून स्वतः मधू लिमयेच समोर आले. “हे केव्हा आले? ” मधू लिमयांनी माझ्याकडे बोट दाखवून विचारले.” तसे ते कालच ठाणा जेलमधून सुटले” श्री. कोतवालांनी सांगितले. “सर्व ठीकठाक आहे ना? दोन मिनिटे तर बसा,” असे सांगून श्री. मधू लियमांनी दोन खुर्च्या ओढल्या. “बाकी सर्व ठीकठाक आहे. लिमये, आपल्या कामाचे काय झाले? ” मी मधू लिमयांना विचारले. “ त्याचे असे झाले. मी ते काम माझ्या एका परिचित कामगाराला दिले. तो पठ्ठा ॲडव्हान्स घेऊन गेला तो परत आलाच नाही.” श्री. मधू लिमयांनी उत्तर दिले. “म्हणजे याचा अर्थ असा की आमचे पैसे गेले अन् ऑर्डरचा मालही तयार झालाच नाही.” मी काकुळतीने बोलून गेलो.” हो झाले तसे काही तरी; मात्र त्याला जबाबदार मी आहे. तुमच्या ऑर्डरचा माल दोन दिवसात तयार करू शकेन. नाही तर मी तुमच्या ॲडव्हान्सची रक्कम द्यायला तयार आहे. परवा सायंकाळपर्यंत व्यवस्था करतो,” मधू लिमयांनी आश्वासन दिले.

ठरल्या दिवशी श्री. मधू लिमये भेटू शकले नाहीत. शेवटी श्री. जसूभाई पटेल यांना गळ घालून, त्यांच्या एका चांगल्या परिचित कारखानदाराकडून आवश्यक तसे व तेवढे नट्स केवळ सहा तासात करून घेतले. तयार झालेले शेल लवकरात लवकर मनमाड कॅम्पला पोहोचते करण्याबाबत मला बाबासाहेब परांजपे यांनी सांगितले. मी ते शेल मनमाडला नेण्याच्या तयारीला लागलो. नेमक्या त्याच सुमारास श्री. जसूभाई पटेल यांच्या कारखान्याची कसून झडती घेतली गेली. “लोखंडी पलंगाच्या चार गजांवर टोपण म्हणून बसवता येतील असे लोखंडी टोपण तयार करण्याची ऑर्डर तुम्हाला कोणी दिली? त्याचे नाव गाव ठावठिकाणा काय?

ऑर्डर केव्हा दिली? कोणत्या आकाराचे व कोणत्या धातूचे ते टोपण तयार केले? टोपणाचे किती नग तयार केले? किती रक्कम घेतली? " असे प्रश्न विचारले गेले. झडती घेणाऱ्यांच्या अंगावर पोलिसांसारखे कपडे नव्हते. मात्र वागणूक व वर्तणूक पोलिसांसारखीच होती. ते टोपण नव्हते. टोपण नावाने हॅण्ड ग्रेनेडचे शेलच होते, असा कयासही सांगितला गेला. श्री. जसूभाई पूर्वीपासून काळजी घेत होते. त्यांनी त्यांच्या खास कामगारांना विश्वासात घेऊन आणि अधिक पैसे देण्याचे आश्वासन देऊन, शेल तयार केले होते. कामगार पैशाच्या मोहाला बळी पडतील म्हणून काही कामगारांना त्यांनी पगारी रजेवर गुजराथेतल्या त्यांच्या घरी पाठविले होते. तयार केलेल्या टोपणवजा शेलबाबत अधिक बोलबाला होऊ नये, चर्चा होऊ नये म्हणून रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांकडूनती तयार केलेली टोपणे गोणपाटात भरून, गोणपाटाचे तोंड लोखंडी तारेने आवळून बांधले.दोन दिवसानंतर दुसऱ्याच रोजंदारीवर काम करणाऱ्याकामगारांकडून अडगळीच्या जागी खोल खड्डे खणून ती शेलची बोचकी खड्ड्यात व्यवस्थित ठेवली व जमिनीवर खड्डा केल्याची खूण राहाणार नाही अशी काळजी घेत इथूनतिथून माती पसरली. मात्र याबाबत सतत चालू असलेल्या चौकशीपायी कारखाना पोलिसांच्या नजरेत भरू नये, डोळ्यांत खुपू नये, कारखान्याला खीळ बसू नये, कारण नसता घरबसल्या त्रास भोगावा लागू नये यासाठी अनेक खटपटी कराव्या लागल्या. दहा हजार शेल तयार आहेत. पोलिसांचा ससेमिरा लागण्यापूर्वीच ते शेल त्या कारखान्यातून हलविण्याबाबत कारखानदार सातत्याने सांगतो आहे; असे सर्व मी श्री. बाबासाहेब परांजपे यांना सांगितले.

लवकरात लवकर विश्वासू मोटार लॉरी वाहकाद्वारे ते शेल मनमाड कॅम्पला घेऊन जाण्याची व्यवस्था करण्याचे काम माझ्यावरच सोपविले गेले. मी रात्रीच्याच गाडीने नाशिकला गेलो. श्री. राय बंधूंच्या मध्यस्थीने श्री. गुप्तेमामा बरोबर लॉरी भाड्याबाबत वाटाघाटी करून व भाडे नक्कीकरून लॉरी ठरविली. माल वाहून नेण्याचा दिवस व वेळ निश्चित केली. ठरल्याप्रमाणे लॉरी मुंबईत मोरारबागेजवळ आली. एक दिवस आधी हैदराबाद स्टेट काँग्रेसची पुढारी मंडळी कृतीसमितीच्या बैठकीसाठी मद्रासला गेली होती. शेल निर्मितीची उरलेली रक्कम व जकात नाक्याच्या करासमवेत वाहतुकीच्या भाड्यासाठी लागणारी रक्कम मला देण्याबाबत सांगण्यात आलेले होते. तरी एक हजार रुपये कमीच दिले गेले. श्री. मनोहर कोतवाल यांच्या मध्यस्थीने श्री. जसूभाई पटेल यांना ठरलेल्या करारापेक्षा एक हजार रुपये कमी दिले व शेलची बोचकी लॉरीत रात्री आठ वाजण्याच्या सुमारास भरली. लॉरी सुरू करण्यापूर्वी ड्रायव्हरने, ठाण्याच्या नाक्यावर अडवणूक होऊ नये, लॉरीतला माल तपासला जाऊ नये म्हणून माझ्याजवळून पन्नास रुपये मागून घेतले होते. ड्रायव्हरने ठाण्याच्या नाक्यावर शंभर पावले अगोदर लॉरी थांबविली व तो चालत नाक्यावर गेला अन् थोड्या वेळाने पानपट्टी चघळीत, हातवारे करीत परत आला. पाच सात मिनिटानंतर त्याने लॉरी सुरू केली. लॉरी ठाण्याच्या नाक्यावर नेली. ठाणेदारासमोर लॉरी चालू अवस्थेतच उभी केली. ठाणेदारांनी थोडीशी आरडाओरड करीत लॉरी सभोवती फेरी मारली. अधूनमधून लॉरीमध्ये हे काय आहे? ते काय आहे? असे विचारीत विचारीत लॉरी तपासल्याचे नाटक रंगविले आणि पुढे नेण्यास दरडावूनच सांगितले. आमचा लॉरीचा प्रवास सुरू झाला. अधूनमधून समोरून येणाऱ्या मोटारी, जीप गाड्या व लॉरीच्या प्रकाशाने डोळे दिपून जायचे. क्षणभर काहीही दिसत नसल्यासारखेही वाटायचे. मध्येच पावसाची रिमझिम होत होती. कसारा ते इगतपुरीपर्यंतच्या घाटात जोरदार पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. ढगांच्या गडगडाटासमवेत विजांच्या लखलखाटाने डोळे दिपून जाऊ लागले. रेटून लॉरी पुढे चालविणे धोक्याचे बनले होते. शेवटी ड्रायव्हरने लॉरी हळूहळू एका झाडाजवळ थांबविली. तब्बल तासानंतर पावसाचा जोर कमी झाला तरी बारीक रिमझिम चालूच होती.

अनुक्रमणिका

ड्रायव्हरने शिताफीने लॉरी कमी वेगाने चालू ठेवली. देवळालीची सरहद्द ओलंडताच लॉरीचे इंजिन अचानक बंद पडले. बारीक पावसाचे थेंब पडत असतानाही ड्रायव्हरने अतोनात खटाटोप करून इंजिन चालू केले. जेमतेम गजगतीने चालत चालत नाशिक येथील सर्कल सिनेमा समोरच्या रॉय बंधूंच्या मोटार दुरुस्तीच्या कारखान्यासमोर सकाळी पाच वाजताच्या सुमारास लॉरी पुन्हा अचानक बंद पडली. तेवढ्यात पावसाच्या सरी कोसळू लागल्या. आकाशात ढगांचा गडगडाट आणि विजांचा लखलखाट सारखा चालू होता. सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते. रस्त्यावर रहदारी अगदीच थंडावली होती. थांबण्यावाचून गत्यंतर नव्हते. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पावसाचा वेग बराच कमी झाला होता. अंगातले बहुतेक सर्व कपडे ओलेचिंब झालेले असतानाही श्री. रॉय बंधू व त्यांच्या मुख्य मेकॅनिकने प्रयत्नांची पराकाष्ठा करून लॉरीचे इंजिन ठाकठीक करून पूर्ववत चालू केले. रात्री नवाच्या सुमारास नाशिक-मनमाडचा प्रवास सुरू झाला. रात्री दहापर्यंत मनमाडच्यागावाबाहेरील गुरुद्वाराजवळ मोटार लॉरी येणार असल्याचे मनमाड कॅम्प कार्यालयाला आधीच कळविले होते. लॉरीमधील साहित्य उतरून घेण्याचे काम गिरिजाशंकर ऊर्फ हिंदुस्थानकडे सोपविले होते. रात्री नऊपासून मनमाडला पाऊस पडतच होता. मधूनच जोरदार सरीही येत होत्या. ढगांचा गडगडाट, विजांचा लखलखाटही चालू होता. पाऊस थांबण्याची सुतराम् शक्यता दिसत नव्हती. थंड वारे अंगाला झोंबत होते. मनमाड गावातली वर्दळ थंडावली होती. गुरुद्वाराजवळील परिसरात चुकूनही माणूस दिसत नव्हता. नदीचे पाणी धो धो वाहात होते. थंडीच्या लहरी अंगाला सारख्या झोंबत होत्या. अशाही बिकट अवस्थेत आणि प्राप्त परिस्थितीत हैदराबाद स्टेट काँग्रेसचा अत्यंत विश्वासू, निष्ठावान स्वयंसेवक कार्यकर्ता, अंगावरच्या ओल्याचिंब कपड्यानिशी थंडीने कुडकुडत गुरुद्वाराजवळच्या नदीच्या काठावर ताटकळत उभा होता. रात्री दोनच्या सुमारास लॉरी गुरुद्वाराजवळ नदीच्या काठावर पोहोचली.

लॉरीच्या दिव्यांच्या प्रकाशात मला गिरिजाशंकर 'हिंदुस्थान'नदीच्या काठावर सर्वांग भिजलेला व थंडीने कुडकुडत असलेला दिसताच माझे सर्वांग शहारून गेले. सर्वप्रथम मी गिरिजाशंकरला माझ्याजवळ लॉरीत बसविले. माझ्या अंगावर असलेला रेनकोट त्याच्या अंगावर गुंडाळला. थोड्या वेळाने गिरिजाशंकरच्या तंत्राने ड्रायव्हरने लॉरी नदीच्या पात्रातून बाहेर काढली अन् हळूहळू लॉरी नदीपासून एक फर्लांग दूर असलेल्या एका ओसाड घराजवळ उभी केली. त्या घराभोवती चिखलच चिखल होता. चिखलात रुतलेला पाय मोठ्या मुश्किलीने बाहेर काढावा लागे. अशा अवस्थेतही गिरिजाशंकर जवळच्या शेतातल्या घरांत गेला अन् चार पाच शेतकऱ्यांच्या पोरांना घेऊन आला. त्या सर्वांनी लॉरीतील बोचकी एकामागून एक त्या ओसाड घरात ठेवली. तोपर्यंत सकाळचे पाच वाजल्याचे ठोके कानावर आदळले.

सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास नांदगावहून श्री. माणिकचंद पहाडे मनमाड कँप कार्यालयात आले. मुंबईहून दहा हजार देशी बाँबचे नवे शेल, त्यात भरण्याचे स्फोटक पदार्थ, फ्यूज वायर लॉरीतून आणल्याचे सविस्तर वृत्त श्री. लाला बिंदाप्रसाद यांनी सांगितले. सायंकाळी नांदगावला जाण्यापूर्वी देशी बाँबच्या नव्या शेलमध्ये स्फोटक द्रव्ये भरण्याची कामगिरी, सांगाल ते काम व सांगाल ती कामगिरी, या अत्यंत तन्मयतेने व तत्परतेने पार पाडण्याचा नेहमी होकार भरणाऱ्या गिरिजाशंकर भावसार ऊर्फ हिंदुस्थानकडेच सोपविली. सायंकाळी सातच्या सुमारास त्याच्याकडे सोपविलेल्या कामाचा त्याने शुभारंभ केला. अवघ्या दहा दिवसात दोन हजार देशी हातबाँबमध्ये स्फोटक द्रव्ये भरली. एकामागून एक कडक तंबाखूची पानपट्टी तोंडात भरावयाची आणि मध्येच लहर लागली तर कढत चहा घ्यायचा; इतकाच काय तो गिरिजाशंकरचा विरंगुळा

[अनुक्रमणिका](#)

होता. श्री. माणिकचंद पहाडे यांना तो आपले दैवत मानीत असे. त्यांनी सोपवलेली कामगिरी पार पाडणे; तो आपले आद्य कर्तव्य समजत असे. त्याच्या चेहऱ्यावर हास्य नेहमीच झळकत असे. त्याच्या त्या अहोरात्रीच्या परिश्रमाने, मुंबईहून आणलेल्या शेलमध्ये स्फोटक द्रव्ये बोलता बोलता भरली गेली. त्याच देशी बॉंबच्या हत्याराने निझामी राजवटीच्या क्रूर मनोवृत्तीच्या पोलिसांना, गावगुंडांना, रझाकारांना पळता भुई थोडी केली. कितीतरी आबालवृद्धांचे, गावकऱ्यांचे, कार्यकर्त्यांचे प्राण वाचविले गेले. श्री. माणिकचंद पहाडे यांनी त्याच्याकडे सोपविलेली कामगिरी, त्याने हसत खेळत पार पाडली. मात्र कर्तव्य म्हणून कामगिरी पार पाडताना त्याच्या नकळत स्फोटक विषारी द्रव्याचे बारीक बारीक कण श्वासोछ्वासासमवेत... त्याच्या पोटात गेले, रक्तात मिसळले, अन् निष्पाप निष्कलंक, उमद्या स्वभावाचा, हरफन मौला, दिसायला काडीमुडी, सोसाट्याच्या वाऱ्याने उडून जाईल असा, एक अत्यंत विश्वासू कार्यकर्ता, आम्हा सगळ्यांना शेवटचा रामराम करून आपली जीवनयात्रा अधेमधेच अर्धवट अवस्थेत संपवून दूर दूर जाण्याच्या पंथाला लागला. आमचे आद्य पुढारी श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या धाकट्या भावांनी, डॉ. गोपाळदास श्रॉफ यांनी आपल्या वैद्यकीय प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र ते त्यांचे प्रयत्न श्री. गिरिजाशंकर भावसार ऊर्फ हिंदुस्थानला त्याच्या परतीच्या मार्गावरून मागे फिरवू शकले नाहीत. भारत देश स्वतंत्र आणि सार्वभौम बनल्यावर तो असता तर!...पण नियतीला ते मान्य नव्हते. त्याचा तो सदान्कदा हसरा चेहरा अन् त्याची 'हरफन मौला'वृत्ती पुन्हा पहायचे आमच्या नशिबी नव्हते. तो हसत हसत गेला. त्याच्या त्या धीरोदात्त कर्तव्यपरायणतेच्या आठवणी तेवढ्या शिल्लक आहेत.

औरंगाबाद शहाराचा अर्धाअधिक मोकळा परिसर आणि सर्व लहानमोठ्या मशिदी व दर्गे निर्वासितांच्या तांड्यांनी खचाखच भरले होते. सूर्योदयापासून जवळपास मध्यरात्रीपर्यंत निर्वासित गटागटाने शहराच्या कानाकोपऱ्यापर्यंत फेरफटके मारीत असत. त्याच्या पाठोपाठ शहराचे निर्ढावलेले गावगुंड आणि आडदांड पोलिस शिपाई काही कारण नसताना हातातल्या काठ्या सडकेवर आपटीत बेभान अवस्थेत मिरवत असत. घरगुती कामानिमित्त सडकेवरून जाणाऱ्या येणाऱ्यांची कारण नसता छेडछाड करून, भांडण उकरून काढायची खटपट करीत असत. एकट्या दुकट्याला गाठून त्याची झडती घेत घेत त्यांच्याजवळ असतील तेवढे पैसे बळजबरीने हिसकावून घेत असत. अशा रीतीने शहरात दंडेली आणि झोटिंगशाहीचा नंगानाच सुरू होता. तालुक्याच्या गावात आणि आडवळणाला असलेल्या लहानमोठ्या गांवातही औरंगाबाद सारखाच प्रकार होता. लोक हवालदिल झाले होते. आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेसाठी घराच्या दारेखिडक्या आतून कड्या लावून बहुधा बंद ठेवीत असत.

गिरिजाशंकर भावसार ऊर्फ हिंदुस्थानने आपल्या जिवाचे रान करून देशी हातबॉंबच्या शेलमध्ये स्फोटक रसायने भरण्याचा कारभार झपाट्याने सुरू केला तेव्हा हातबॉंबचा स्फोट केल्यावर त्याचा किती मोठा आवाज होतो व त्याचा काय दुष्परिणाम होतो याबाबतचे प्रात्यक्षिक जातीने पहावयाचे, त्यांने कुणालाही न विचारता न सांगता ठरविले. एके दिवशी रात्री दहा वाजता नदीच्या काठाजवळ असलेल्या एका जुनाट व मोठ्या बाभळीच्या झाडाच्या बुंध्याजवळ त्याने एका भरलेल्या शेलची फ्यूज वायर पेटविली. तेथून जेमतेम तो त्या घरांच्या दारापर्यंत आला असेल तेवढ्यात जवळपासच्या लोकांच्या कानठाळ्या बसतील असा आवाज झाला. त्या भयंकर आवाजाने जवळपासचे लोक सैरावैरा पळाले आणि सापडेल त्या आडोशाजवळ दडून बसले. दुसऱ्या दिवशी त्या भयंकर आवाजाबाबत मनमाड गावात बरीच चर्चा झाली.

आंघोळीच्या निमित्ताने गिरिजाशंकर भावसार त्या बाभळीच्या झाडालगतच्या नदीच्या किनाऱ्याकडे गेला, तेव्हा ते बाभळीच्या झाडाचे धूड नदीच्या किनारपट्टीवर आडवे पडलेले त्याला पहावयाला मिळाले. त्याचे बाहू स्फुरण पावले. आनंदाने तो हसू नाचू लागला. शेलचा धूमधडाका लवकरात लवकर श्री. माणिकचंद पहाडे यांना एकांतात गाठून सांगताच, श्री. पहाडे यांचा ऊर दाटून आला. क्षणात त्यांचा चेहरा रक्तासारखा लालजर्द झाल्यासारखा दिसू लागला. गिरिजाशंकरला आतल्या खोलीत बोलावून त्याची पाठ थोपटताना त्याला त्यांनी कडकडून मिठी मारली.

रात्री दहा वाजेपर्यंत भरपूर परिश्रम करून श्री. पहाड्यांनी प्रतिहल्ले करावयासाठी, तयार झालेले हातबाँब विश्वासू कार्यकर्त्यांद्वारे शेंदुर्णी, देऊळगाव राजा, अंबडचे साडेगाव, बोधेगाव टाकळी, टोका, अंगुलगाव, औरंगाबाद, वैजापूर, जालना व कन्नडला पाठविले. ठिकठिकाणच्या तडफदार कार्यकर्त्यांनी त्या शेलद्वारे जोरदार प्रतिहल्ले चढविले. शेलच्या जबरदस्त स्फोटाने ठिकठिकाणची जमीन हादरली. धांगडधिंगा घालणारे गावगुंड, रझाकार व पोलिसांची पळ काढताना त्रेधातिरपिट उडाली. मस्तीने बेभान बनलेले गर्भगळित झाले.

**


अनुक्रमणिका



श्रीमती प्रतिभाताई वैशंपायन



सौ. कुसुमताई जोशी



कै. लालाबिंदा प्रसाद



श्री. काशिनाथराव कुलकर्णी

अनुक्रमणिका

# रझाकारांचे अत्याचार आणि पोलीस कारवाई

औरंगाबाद जिल्ह्याच्या निरनिराळ्या तालुक्यांतून प्रतिहल्ल्याच्या बातम्या एकामागून एक, मराठवाडा विभागाचे सुभेदार सैय्यद बिलिग्रामी यांच्या कानावर सतत आदळत राहिल्याने ते बरेच त्रस्त आणि हवालदिल बनले, बराच वेळ ते अस्वस्थ होते. काय करावे अन् काय करू नये या विचाराने त्यांना भंडावून सोडले होते. ते पाच जिल्ह्याचे निझामी राजवटीचे सुभेदार असल्याचा त्यांना विसर पडला. हैदराबादचे बादशहा मीर उस्मान अलीखान आहेत याचाही त्यांना क्षणार्धात विसर पडला. मीर उस्मान अलीखान ऐवजी सैय्यद कासिम रझवीच त्यांना सर्वत्र दिसू लागला. सैय्यद कासिम रझवीचेच चित्र त्यांच्या डोळ्यात सामावले. त्या चित्राने त्यांचे गलथान बनलेले बाहू स्फुरण पावल्यासारखे वाटू लागले. त्यांच्या मनातला इस्लाम जागा झाला. आतापर्यंत निरनिराळ्या कारणपरत्वे, त्यांच्या मनाच्या कप्प्यात लपवून, दडवून बंदिस्त ठेवलेला इस्लाम जणू थै थै नाचू लागला. त्यांना काय होत होते ते त्यांचे त्यांनाच बराच वेळ समजले नाही. बेचैन अवस्थेत ते निरनिराळ्या विचारांत गुरफटले होते. सर्व हिंदू लोक त्यांना काफिराच्या स्वरूपात दिसू लागले. हिंदू काफिरांच्या रक्ताचे घोट घेण्याचा त्यांनी तडकाफडकी आराखडा तयार केला. शिपायांना पिटाळून शहरातील प्रमुख मुसलमानांची खास अन् अत्यंत खाजगी बैठक बोलावली. त्याच बैठकीत प्रमुख मुसलमानांना रझाकारांचे ज्येष्ठ पदाधिकारी नेमून, त्यांच्याच द्वारे शहरातील प्रत्येक मुसलमानाला रझाकार बनवायचे ठरविले. औरंगाबाद सिल्क मिलच्या कारखान्यात बंदुका व हातबाँब तयार करावयाचे या बैठकीत एकमुखाने ठरले. तडकाफडकी कामाला प्रारंभही केला गेला.

औरंगाबादेतील रझाकार संघटनेचे प्रमुख पदाधिकारी होते, काझी हमीदोद्दिन, काझी गयासुद्दिन, सैय्यद युसूफूद्दिन, सैय्यद करिमुद्दिन, काझी खैरोद्दिन, काझी हाजीमिया चौधरी, बहादूरखान, दिलावरखान, महमंद अली, सैय्यद इब्राहिम व फकरुद्दिन हैदरी.अवघ्या चार दिवसात शहरातील तीनचतुर्थांश मुसलमानांना, त्यात व्यापारीही होते, रझाकर बनविण्यात आले. रझाकारांचे प्रमुख आणि इतर मुसलमान रझाकारांच्या गणवेषात हत्यारासमवेत शहरभर फेरफटके मारू लागले. शहरातील विद्यालये व एकट्या एक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या सोबत, शहरातील तरुणांना बंदुका आदी हत्यारे आणि स्फोटक अस्त्रांचा वापर करावयाची शिकवण देण्याचे काम प्रो. सय्यद इब्राहिमकडे देण्यात आले. ते औरंगाबादेतील रझाकार संघटनेचे आद्य प्रवर्तक होते. सैय्यद बिलिग्रामी पाच जिल्ह्यांचे सुभेदार होते आणि त्यांचे वास्तव्य औरंगाबाद शहरातच होते. राजवट होती हैदराबाद संस्थानाच्या निझामाची मात्र राजवटीचा कारभार सैय्यद कासिम रझवीच्या आदेशाप्रमाणे चालू लागला. सैय्यद कासिम रझवी हे हैदराबाद संस्थानच्या रझाकारांचे प्रमुख शिल्पकार होते. हे महाभाग, हैदराबादच्या निझामाला बाजूला सारून हैदराबाद संस्थानचा सर्व कारभार स्वतःकडे घेण्याची स्वप्ने पाहात होते; इतकेच नव्हे तर दिल्लीचे राज्य हिसकावून घेण्याच्या वल्गना करीत होते. ‘इस्लाम खतरेमें है’ ही आरोळी त्यांना सर्वत्र रुजवावयाची होती. हिंदुस्थानात हिंदुमुसलमानात कायमची तेढ जोपासावयाची होती. या देशावर इस्लामधर्मीय सत्ताच राज्य करू शकते असे त्यांचे गृहीततत्त्व होते. सर्वसामान्य मुस्लिमाप्रमाणेच शासकीय अधिकारी, प्राध्यापक, शिक्षक अशा वर्गांतील मुस्लिमांवरही कासिम रझवीचा प्रभाव खूपच वाढला होता.

अनुक्रमणिका

औरंगाबाद येथील सरकारी महाविद्यालयातील इतिहासाचे प्राध्यापक, सय्यद इब्राहीम हे खरं म्हणजे राष्ट्रीय वृत्तीचे समजले जात. धर्माने मुसलमान असूनही ते कट्टर मुसलमान असल्याचे कोणालाही, कधीही जाणवले नव्हते. सर्व धर्मीयांची त्यांच्या घरात वर्दळ असायची. परंतु राष्ट्रीय विचाराचे म्हणविले जाणारे प्रा. इब्राहिम हे स्वतः रझाकारांचे नेते बनले. त्यांच्या जुन्या व नव्या विद्यार्थ्यांना त्यांनी गळ घालून रझाकार बनविले. त्यांनी आपल्या वर्तनाने हिंदू आणि मुस्लिम विद्यार्थी यांच्यात तेढ निर्माण केली. दूरत्वाची दरी निर्माण केली. हिंदू जातीच्या प्रत्येक व्यक्तीला शत्रू बनविले आणि परिणामतः इस्लामच्या नावाखाली अनेक मुस्लिम विद्यार्थ्यांनाही आयुष्यातून कायमचे उठविले. भडकल गेटजवळ विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय होते. त्याच्या बरोबर दक्षिणेस कवाईत व खेळाची मैदाने होती. तसेच अनेक मुस्लिम विद्यार्थ्यांना रझाकार सैनिक बनविले गेले व सैनिकी प्रशिक्षण दिले गेले. त्याच मैदानावर विद्यार्थी रझाकार मेळावा भरविला गेला आणि 'पोलिस कारवाई'च्या वेळी निरनिराळ्या लॉऱ्यातून शस्त्रांसमवेत पाठविण्यात आले व देवगावजवळ दबा धरून शत्रूवर तुटून पडण्यास यांना सांगितले गेले. प्रो. इब्राहिम यांच्या आदेशानुसार या कोवळ्या वयाच्या विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्याचा प्रतिकार केला व त्यातच आपले प्राण गमावले.

बोधेगाव टाकळीच्या कॅम्प प्रमुखातर्फे एकामागून एक असे दोन तातडीचे निरोप मनमाड कॅम्प कार्यालयात आले. पैठणच्या परिसरात पोलीस आणि रझाकारांची बेसुमार धुमाकूळ माजवून नागरिकांना त्रस्त केल्याचे सांगितले गेले. रझाकारांना पिटाळून लावण्यासाठी अधिकात अधिक बॉंब शेल आणि बंदुकीच्या गोळ्या त्वरित मागविल्या होत्या. मनमाड आणि मनमाड ते अहमदनगर, पुणेपर्यंत बहुतेक प्रवाशांची झडती घेतली जात होती. झडतीत आपल्या कार्यकर्त्यांसमवेत बॉंबही जातील; तसे होऊ नये, आपल्या कार्यकर्त्यांना आवश्यक शस्त्रास्त्रे वेळीच मिळावी, रझाकारांची दंडेली, जेथल्या तेथे थोपवून त्यांचा आवेश वेळीच जिरविला जावा या विचाराने श्री. माणिकचंद पहाडे यांनी त्यांच्या नांदगावला सायंकाळी परत जायचा कार्यक्रम रद्द केला आणि रात्री नऊ वाजता मनमाड-दौंड गाडीने आवश्यक तेवढे बॉंब शेल स्वतःच्या बेडिंगमध्ये व्यवस्थित ठेवून ते निघाले. मी व गिरिजाशंकरने त्यांच्या समवेत यावे असेही त्यांनी सांगितले. आम्ही तिघे मनमाडला मनमाड-दौण्ड गाडीत चडलो. गाडीत गर्दी नव्हती, त्यामुळे आम्हा तिघांना बाकड्यावर व्यवस्थित आडवे पडता आले. गाडी सुटायची वेळ आली तरी प्रवाशांत भर पडली नाही. नऊ वाजता सुटणारी गाडी दहा वाजेपर्यंत प्लॅटफॉर्मवर उभी होती. काही कारणपरत्वे गाडी रद्द झाल्याबाबत डब्याजवळ उभे असलेले प्रवासी एकमेकांना सांगताना गिरिजाशंकरने ऐकले. ऐकले ते खरं आहे का याचा पडताळा घेण्यासाठी त्याने तिकिट इन्स्पेक्टरला विचारले. त्याने ही गाडी रद्द झाल्याचेच सांगितले. गाडी रद्द झाल्याची खबर गिरिजाशंकरने श्री. माणिकचंदना सांगितली.

"ठीक आहे. रात्री एक वाजताच्या गाडीने जाऊ. आपण तिकिटे काढलेली आहेत. जा-ये करण्यापेक्षा इथेच थोडी विश्रांती घेऊ. झोपू,असे सांगून श्री. पहाड्यांनी कुशी बदलली. थोड्या वेळाने गार वाऱ्याच्या झुळकी सुरू झाल्या अन् मी आणि गिरिजाशंकरही झोपलो. सततच्या परिश्रमाने गाढ झोप लागली. सकाळच्या सहाच्या सुमारास पक्ष्यांचा किलकिलाट ऐकू येऊ लागला. कोणत्या स्टेशनवर गाडी थांबली आहे हे पाहण्यासाठी मी जवळच्या खिडकीवाटे बाहेर डोकावून पाहू लागलो तर मनमाड स्टेशनच असल्यासारखे मला वाटले. मी माझे डोळे चोळले. पुन्हा बाहेर डोकावून पाहिले; तेव्हा गाडी मनमाड स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरच उभी असल्याचे मला मनोमन पटले. मी गाडीतून बाहेर पडलो आणि दोन नंबरच्या स्टेशन मास्तरला विचारले,

अनुक्रमणिका

तेव्हा दौण्ड-पुणे मार्गावर धावणाऱ्या सर्व गाड्या रद्द झाल्याचे त्यांनी सांगितले. श्री. पहाडे यांच्या समवेत मी व गिरिजाशंकर मनमाड कॅम्पच्या कार्यालयात आलो. सकाळी सात वाजतांच्या बातम्या ऐकल्या. नेहमीच्याच बातम्या व हवामान वृत्त तेवढेच ऐकावयाला मिळाले.

मनमाड-दौण्ड-पुणे मार्गावरील गाड्या रद्द का व कशामुळे झाल्या? गाड्या रद्द झाल्या आहेत; अशा परिस्थितीत टाकळी कॅम्पला रसद कशी पोहोचविता येईल? रझाकारांनी आपल्या कार्यकर्त्यांना पिटाळून लावले तर नसेल ना? रेल्वे मार्गावर लवकर दुरुस्त करता येणार नाही असा अडसर तर निर्माण केला गेला नसेल ना? अशा प्रकारच्या शंका कुशंकांनी आम्ही सारेच घेरले गेलो होतो. मनमाड-दौण्ड-पुणे मार्गावर सर्वच्या सर्व गाड्या रद्द झाल्याबाबत मनमाडच्या कानाकोपऱ्यात बोलले जात होते. निझामी सरहद्दीबाहेर रझाकारांनी मुसंडी मारली असावी असेही बोलले जात होते. आपल्या विभागात रझाकार आले तर? या विचारांनी अनेकांचे धाबे दणाणले. जो तो आपल्याच सुरक्षिततेबाबत विचार करीत होता. सकाळी रेडिओच्या बातम्या ऐकावयासाठी जो तो आपापल्या रेडिओजवळच बसला होता.

"भारत सरकारचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विशेष आदेशाप्रमाणे भारत सरकारच्या लष्कराचे लेफ्टनंट जनरल जे. एन्. चौधरी यांच्या समवेत आणि प्रत्यक्ष देखरेखीखाली लष्कराच्या विविध तुकड्यांनी दिनांक १३ सप्टेंबरला ठीक रात्रीच्या बारा वाजता हैदराबाद संस्थानच्या सर्व सरहद्दीत एकाच वेळी प्रवेश केला होता.हैदराबाद संस्थानात दोन ठिकाणी तुरळक चकमकी उडाल्या, इतरत्र नागरिकांनी गावकऱ्यांनी लष्कराच्या सर्व प्रमुख अधिकाऱ्यांचे व जवानांचे हर्षभराने जल्लोष करीत अपूर्व स्वागत केले" . अशा वार्ता आकाशवाणीवरून ऐकू आल्या आणि सर्वत्र आनंदाची लाट उसळली.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या मनमाड कॅम्पचे सर्व कार्यकर्ते आनंदाने प्रफुल्लित झाले होते. मनमाडच्या प्रमुख व्यापाऱ्यांनी, दुकानदारांनी आणि नागरिकांनी आनंदाच्या भरात महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, स्वामी रामानंद तीर्थ, हैदराबाद स्टेट काँग्रेस आणि माणिकचंद पहाडे यांच्या जयजयकारांनी मनमाड गावाचा सारा परिसर निनादून टाकला. होळीच्या सणाइतका गुलाल लावून उधळून लोकांनी उफाळून आलेला आनंद व्यक्त केला. याच सुमारास निरनिराळ्या लष्कर अधिकाऱ्यांसमवेत भारताच्या सेना औरंगाबाद जिल्ह्याच्या सरहद्दीवरील देऊळगाव राजा,अजिंठा, नांदगाव, चाळीसगाव, टोका आणि वैजापूर मार्गे औरंगाबाद शहराकडे धडक मारीत असल्याचे वृत्त ऐकल्याबरोबर मराठवाडा विभागाचे सुभेदार सैय्यद बिलग्रामी यांचे सर्वांग थरारून गेले. राग आणि संतापाचा पारा पराकोटीला गेला. त्याचे सर्वांग भाजून निघत असल्यासारखे त्यांना वाटू लागले. हाताच्या दोन्ही मुठी घट्ट आवळून समोरच्या जेवणाच्या लाकडी टेबलावर धडाधड आपटीत, काय करू आणि काय नाही या विचाराने ते बेभान बनले, त्यांच्या निवासस्थानातील चपराश्यांना मनमानेल त्या शिव्यांवर शिव्या हासडू लागले. याच सुमारास औरंगाबाद शहराचे रझाकार संघटनेचे प्रमुख काझी हमीदोद्दिन, प्राध्यापक सैय्यद इब्राहिम आणि औरंगाबाद सिल्क मिलचे मालक गुलशन महाल मध्ये दाखल झाले. रागाने फणफणत्या सुरात सैय्यद बिलग्रामी आरडाओरड करीतच म्हणाले "काझी,इब्राहिम वाटेल ते करा. तुम्ही तयार केलेली रझाकारांची फौज शस्त्रास्त्रे देऊन औरंगाबाद-वैजापूर रस्त्यावर लवकरात लवकर लॉऱ्यातून पाठवा आणि जोरदार हल्ला करावयाचे सांगा. चला, निघा वेळ घालवू नका. चला मीही येतो तुमच्याबरोबर" सुभेदार बिलग्रामी, प्रा. इब्राहिम, काझी हमीदोद्दिन आणि

अनुक्रमणिका

औरंगाबाद सिल्क मिलचे मालक खान, भडकल गेटजवळ आले. त्यांनी 'अल्ला हो अकबर'अशी जोराने आरोळी दिली. अल्ला हो अकबरच्या जयघोषांनी विद्यार्थी रझाकारांनी सारा परिसर निनादून टाकला. पोलिसांच्या मदतीने २०-२५ लॉऱ्या मागविल्या. स्वतःसुभेदार बिलग्रामी, प्रा. इब्राहिम आणि काझी हमीदोद्दीननी विद्यार्थी रझाकारांना लॉऱ्यात चढविले. आवश्यक ते सर्व साहित्य दिले. दुष्मनाच्या सैनिकांवर सर्व शक्तीने तुटून पडायचे आणि शत्रूला पिटाळून लावायचे त्यांना वारंवार सांगितले. लॉऱ्या भरवेगाने नेण्याबाबत लॉऱ्यांच्या ड्रायव्हरना पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांच्या हुकूमी आवाजाने सांगितले. एका मागून एक, सर्व लॉऱ्या गेल्या.

माळीवाड्याजवळ लॉऱ्या थांबल्या, विद्यार्थ्यांनी, रझाकारांनी जवळपासच्या झाडाझुडपांचा आडोसा घेतला. थोड्या वेळानंतर भारत सरकारच्या लष्कराचे तोफांनी सज्ज रणगाडे पश्चिमेच्या बाजूने येत असल्याचे दिसले. रणगाडे जवळ येताच रझाकारांनी त्यांच्या बंदुकांच्या दोन फैरी झाडल्या.

"हत्यारे खाली ठेवा; शरण या" असे मिलिटरीच्या रणगाड्यातून सांगितलेले ऐकताच विद्यार्थी रझाकारांना चेव आला." अल्ला हो अकबर" ची त्यांनी गर्जना केली आणि पुन्हा बंदुकांच्या फैरी रणगाड्यावर झाडल्या.

"हत्यारे खाली ठेवा; शरण या" "हत्यारे खाली ठेवा; शरण या, नाहीतर नाहक मारले जाल" असे वारंवार सांगितले गेले. तरीही विद्यार्थी रझाकारांनी रणगाड्यावर गोळ्या झाडल्या.

तिसऱ्यांदा तेच सांगण्यात आले. "हत्यारे खाली ठेवा, हत्यारे खाली ठेवा, हत्यारे खाली ठेवा; शरण या. शरण या..." पुन्हा गोळ्या झाडल्या गेल्या. रझाकार शरण येत नाहीत असे दिसताच मिलिटरीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने मशिनगन सुरू करायचा हुकूम दिला. स्वयंचलित मशिनगनच्या गोळ्यांचे सूं सूं आवाज झाले. अवघ्या अर्ध्या तासात सुमारे दोनशेवर विद्यार्थी रझाकार मारले गेले. माळीवाडा परिसरात सडकेपासून उत्तरेस दोनशे पावलांच्या अंतरावर विद्यार्थी रझाकारांचे मृत देह रक्ताच्या थारोळ्यात अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेले होते. लष्कराच्या शक्तीचा,लष्करांच्या शस्त्रास्त्रांचा व आपल्या शक्तीचा अन् हत्यारांचा अंदाज नसलेल्यांनी अकारण प्राण गमावले असे लष्कराच्या प्रमुख अधिकाऱ्याला वाटले. भारतीय लष्कराचा ताफा औरंगाबाद शहराकडे वाटचाल करू लागला.

हैदराबाद संस्थानातील मुसलमानाला तडकाफडकी रझाकार बनविले गेले होते. प्रत्येक मुसलमान रझाकारच असल्याचे समजले जाऊ लागले. इस्लामच्या नावाने बेभान बनलेल्यांना रझाकार बनणे आपले परम कर्तव्यच वाटले. रझाकारांनी निराळा गणवेष परिधान केला. मन मानेल तो धांगडधिंगा घातला. अनेक निष्पाप गरिबांचे प्राण घेतले. कितीतरी घरांचे दिवे कायमचे मालवले. हे सर्व त्यांनी इस्लाम आणि मुसलमान या नावाखातर केले. निझामाची अफाट संपत्ती सतत डोळ्यांत ठेवून त्या बळावर अनेक काल्पनिक चित्रेही त्यांच्या मनासमोर तरळत होती. ह्या काल्पनिक विश्वात गुरफटल्याने त्या महाभागांना अनेक स्वप्ने पडू लागली होती. भारत सरकारच्या बलाढ्य लष्कराचा फडशा उडविण्यासाठी पाठविलेल्या विद्यार्थी रझाकार सैनिकांचे पुढे काय झाले याचा विचार करण्याइतकी माणुसकी, 'इन्सानियत'त्यांनी दाखविली नाही. चुटकीसरशी मारल्या गेलेल्या विद्यार्थी रझाकार सैनिकांच्या बेवारस शवांची दुर्गंधी फैलावली नाही तीही भारतीय लष्कराच्या

अनुक्रमणिका

सौजन्याने!" इस्लाम खतरेमें है" अशा पोटतिडिकीने सर्वत्र आरडाओरड करणाऱ्यांनी सारासार विचार न करता "इस्लाम" आणि जात्यंधतेच्या कैफाने बेभान बनलेल्यांनी, निष्पाप विद्यार्थी रझाकारांची शवे तडकाफडकी मातीच्या खड्ड्यात पुरली नाहीत. त्यावर ओंजळभर माती टाकली नाही; यासारखा दुसरा कोणता दैवदुर्विलास असू शकतो? मानव हा ईश्वराचा अंश असतो असे मानणाऱ्या मानवतेच्या पुजाऱ्यांनी, गावकऱ्यांनी खड्डे खणून बेवारस विद्यार्थी रझाकारांची प्रेते पाणावलेल्या डोळ्यांनी पुरली. अकारण अकाली मृत्यूच्या जबड्यात ढकललेल्या विद्यार्थ्यांची प्रेते कोठे पुरली गेली याची जागा त्यांच्या पालकांना कळलीही नाही.

भारत सरकारच्या लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांच्या सेनेसह औरंगाबाद शहरात प्रवेश केल्याबरोबर, सर्वप्रथम हरसूलचा तलाव, पाण्याची टाकी आणि मध्यवर्ती कारागृह ताब्यात घेतले. अवघ्या बारा तासात औरंगाबादचे शेवटचे सुभेदार सैय्यद बिलग्रामी, सैय्यद इब्राहिम, महमद अली, काझी हमीदोद्दिन, कलंदरखान, बहादूरखान, फकरुद्दिन, दिलावर खान, हाजी मिया चौधरी, नेहरी, युसूफद्दिन मगरबी, कमरुद्दिन मगरबी, काझी गयासुद्दिन, काझी खैरुद्दिन, अफझल खान, महंमदअली बशिरुद्दिन, यासोबत शहरातले निर्ढावलेले गावगुंड यांना औरंगाबाद जिल्ह्याच्या मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले. यांच्यासमवेत मन्सूरयारजंग या नबाबाचे शेवटचे वंशज नबाब अरशद अली यांनाही,ते रझाकार नसताना, कारागृहात नेण्यात आले. नबाब अरशद अली व मी माध्यमिक शाळेत पाचवीपासून एकाच शाळेत शिक्षण घेतलेले. त्यांची माझी बरीच सलगी होती ती विद्यार्थी असल्यापासून नीटनेटके राहणे, आल्या-गेल्याचे चांगले स्वागत करणे, विद्यार्थी मित्रांसमवेत खेळणे-बागडणे हेच त्याच्या अंगवळणी पडलेले होते. ते शिया पंथाचे मुसलमान होते.मोहरमच्या दहा दिवसात निव्वळ सुतक्यासारखे राहायचे. त्यांनी त्यांच्या तरुणपणापर्यंत कशाकशाचीही इवलीशी झळ शरीराला लागू दिली नव्हती. दररोज नियमित वेळेला शाळेत जाणेही त्यांना जमत नव्हते. लष्कराच्या सैनिकांनी त्यांना ताब्यात घेतले तेव्हा ते ढसढसा रडत होते. अट्टल गुन्हेगार आणि राजकीय कैद्यांच्या जीवनाबाबत त्यांनी कधीकाळी ऐकलेल्या गोष्टींची आठवण झाल्याबरोबर त्यांचे सर्वांग थरारून गेले. औरंगाबादेतल्या कारागृहात डांबले गेलेले रझाकार, निर्वासित, गावगुंड आणि रझाकारांचे प्रमुख यांची सुटका लवकर होणार नाही. कदाचित त्यांना तेथे कायमचे डांबून ठेवले जाईल अशा अफवा पसरल्या. विद्यार्थी असतानाच नबाब अरशद अली यांना डामडौलाने राहण्याची संवय जडलेली होती. त्यांचे कारभारी त्यांची प्रत्येक हौस पुरी करीत असत. नबाब अरशद अली त्यांच्या तरुणपणी विद्यार्थी असताना कर्जबाजारी होते. कर्जाच्या रकमा विनाआयास येत होत्या. अन् खर्ची पडत होत्या. नबाब अरशद अली हरसूलच्या कारागृहात असताना औरंगाबाद शहरातल्या काही धनवान व्यापाऱ्यांनी दलालांना हाताशी धरले व आपसात संगनमत करून नबाब अरशद अलीची कारागृहात गाठभेट घेऊन त्यांच्या मनात असे पक्के भरवून दिले की, "ते औरंगाबाद कारागृहातून सहीसलामत लवकर सुटू शकणार नाहीत अन् महत्प्रयासाने सुटका झाली तरी त्यांचा सतत छळ केला जाईल. आता त्यांना सुरक्षित जीवन जगताच येणार नाही. औरंगाबाद व हैदराबाद शहरातून बरेच लोक पाकिस्तानात गेले आहेत. पाकिस्तानात त्यांचे स्वागत करण्यात आले आहे. तेथे गेल्यावर कशा कशाची काळजी करावी लागणार नाही." कारागृहात जे ऐकले त्याबाबत अधिक माहिती मिळविण्याऐवजी नबाब अरशद अली यांनी कारागृहातून सुटका झाल्याबरोबर पाकिस्तानलाच जाण्याचा निश्चय केला. सारा कारभार गुपचुप पद्धतीनेच करावा लागणार असल्याने पत्थर दिलाच्या व्यापाऱ्यांनी काळ्या काळजाच्या दलालामार्फत नबाब अरशद अलीच्या ताब्यात असलेल्या मन्सूरयारजंग नबाबाच्या देवड्यांचा

परिसर, देवडीच्या मुख्य दिवाणखान्यातील आलिशान फर्निचर आणि हजारो लोकांचे जेवण एकाच वेळी करता यावे इतकी तांब्या पितळेची भांडी यांच्या विक्रीची योजना निश्चित केली. इस्टेट व इतर साहित्याच्या विक्रीबाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता, इतर नागरिकांना जराही सुगावा लागू न देता करण्यात आली. आधी दिलेल्या कर्जाची रक्कम वजा जाता बाकीची रक्कम त्यांना देण्यात आली. विक्रीच्या निमित्ताने मिळालेली ही सर्व रक्कम घेऊन अरशद अली हैदराबादेत त्यांच्या श्वशुराकडे गेल्याची इत्थंभूत माहिती मला मिळाली. त्यांची देखणी पत्नी हैदराबादेतील एका मान्यवर नबाबाची कन्या होती. ती तिच्या माहेरीच होती. श्री. दिगंबरराव बिंदू त्यावेळी हैदराबाद राज्याचे गृहमंत्री होते. माझी व श्री. बिंदु यांची चांगली ओळख होती. मी श्री. बिंदूंना या प्रकरणाची माहिती दिली. अरशद अलींनी पाकिस्तानला जाऊ नये यासाठी श्री. बिंदूंनी त्यांच्या श्वशुरांना आवश्यक तेवढे सांगितले; पण औरंगाबादेतील तीन व्यापाऱ्यांनी आणि दलालांनी मनावर ठसविलेल्या गोष्टी काही केल्या त्यांच्या डोक्यातून गेल्या नाहीत. शेवटी ते पाकिस्तानला गेले. सोबत नेलेला पैसा संपला. ऐषआरामात आयुष्याचे दिवस घालविणाऱ्या नबाब अरशद अलीला उदरभरणासाठी बसकंडक्टरची नोकरी पत्करावी लागली. कोणा एका गुंडाने त्यांची पत्नी पळवून नेली. मन्सूरयारजंगच्या आलिशान देवड्या ज्या व्यापाऱ्यांनी अरशद अली कडून मातीमोल किंमतीत विकत घेतल्या त्यांना त्या प्रासादाची नुसती साधी डागडुजीही करता येईनाशी झाली.

श्री. लक्ष्मणराव राजवाडे यांची मराठवाडा विभागाचे पहिले मिलिटरी प्रशासक म्हणून नियुक्ती झाली. भारताच्या आय. सी. एस. अधिकाऱ्यांमध्ये एक उत्तम प्रशासक म्हणून ते गणले जात होते. तसे ते ग्वाल्हेर संस्थानातल्या सरदार घराण्यातले होते आणि महाराष्ट्रातील सांगलीचे राजे पटवर्धन यांचे जामात होते. कडक शिस्तीचे भोक्ते अन् पालनकर्ते म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविलेला होता. गेल्या दीड दोन वर्षापासून मराठवाड्यात शासकीय कारभार बेसुमार बिघडलेला होता. सर्वत्र अंदाधुंदी चालू होती. पोलिस विभागाचा कारभार तर गावगुंडासारखाच चालू होता. नागरिकांची सातत्याने पिळवणूक केली जात होती. महसूल, न्याय आणि पोलिस ही खाती एकमेकांच्या संगनमताने वाटचाल करीत असल्याने सर्वसाधारण नागरिकांना माणूस म्हणून जगणे अशक्य बनले होते. गावगुंड इस्लामच्या नावाने बरेच शेफारले होते. बहुतेक शासकीय कार्यालये रझाकारांचे अड्डे बनले होते. शासनाची बिघडलेली घडी नव्याने सुधारून नीट वळणावर आणावयाची कामगिरी पहिले मिलिटरी प्रशासक या नात्याने श्री. राजवाडे यांना पार पाडावयाची होती. पार बिघडलेला शासकीय कारभार फार थोड्या अवधीत श्री. राजवाडे यांनी त्यांच्या कार्यपद्धतींच्या दराऱ्याने व्यवस्थित करण्यात यश संपादन केले. सर्व शासकीय कार्यालये सकाळी दहाच्या ठोक्याला सुरू होऊ लागली. तसेच ती सायंकाळच्या पाच वाजेपर्यंत काम करू लागली. नव्या दमाच्या नव्या अधिकाऱ्यांनी त्याचं जनसेवा हेच व्रत आहे आणि ते प्रथम जनतेचे सेवक आहेत हे त्या कार्यपद्धतीने जनतेला पटवून दिले. शासनाची घसरलेली गाडी रूळावर आली. कामकाजाचा उरक जलद गतीने होऊ लागला. होयबा आणि जी हुजूरवाले दिसेनासे झाले. महसूल खात्यातील कारकुनांना त्यांच्या घरी गाठून त्यांचे हात गरम करणारे व त्यांच्याद्वारे कनिष्ठ-वरिष्ठांना पटवून गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावण्याचा धंदा करणारे, तसेच सदानकदा महसूल विभागात कारकून किंवा कनिष्ठ अधिकारी यांच्याजवळ ठाण मांडून बसणारे व मनमानेल तसा उलटा सुलटा हवा तसा कारभार करवून घेणारे अशा सर्वांची नाकेबंदी करण्यात आली. प्रशासकाच्या परवानगीशिवाय महसूल कार्यालयात कोणालाही प्रवेश करता येऊ नये असा दंडक अंमलात आला. प्रशासक स्वतः जातीने त्यांच्या कार्यालयातले हजेरीपट नियमित डोळ्याखालून घालू लागले. प्रशासकाचा बराच जरब बसला. पगाराशिवाय पगारापेक्षा

कितीतरी अधिक पैसे खिशात घालणाऱ्यांची मुस्कटदाबी झाली. प्रशासक बरेच कडक, वेळेचे व नियमांचे पालनकर्ते असल्याबाबत मराठवाडा विभागात सर्वत्र सांगितले जाऊ लागले. प्रशासक खेळाडू वृत्तीचे होते. उत्तम हॉकीपटू होते. श्री. लक्ष्मणराव राजवाडे यांच्याबरोबर जवळीक करण्यासाठी काही मंडळींनी बराच खटाटोप केला; पण श्री. राजवाडे यांनी आपली काटेकोर वाटचाल जशीच्या तशी चालू ठेवली.

श्री. राजवाडे, औरंगाबादेत पहिले मिलिटरी प्रशासक म्हणून येण्यापूर्वी औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह हैदराबाद संस्थानच्या तिन्ही प्रांतांतील स्वातंत्र्य लढ्याचे सत्याग्रही आणि कार्यकर्त्यांनी खच्चून भरलेले होते. हैदराबाद संस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्यांची मुक्तता करण्यात आली. त्याच मध्यवर्ती कारागृहात नेहमीच्या कैद्यांशिवाय आता रझाकार संघटनेचे लहान मोठे पुढारी, कार्यकर्ते आणि गावगुंड बंदिस्त झाले होते. त्यापैकी काहींची प्रकृती बरी नाही म्हणून, काही वृद्ध अथवा कोवळ्या वयाचे आहेत म्हणून तर काहीना इच्छेविरुद्ध रझाकार व्हावे लागले म्हणून त्यांची मुक्तता व्हावी याचे प्रयत्न सुरू झाले. काही रझाकार राष्ट्रीय विचारांचे पुरस्कर्ते आहेत तर काहींनी कोणतेही अनिष्ट काम केलेले नाही अशी बतावणीही केली जाऊ लागली. नेमक्या याच सुमारास रझाकारांबाबत चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिति नेमण्यात आली. तिचे अध्यक्ष प्रशासक श्री. राजवाडे होते. औरंगाबाद शहरातील काही धनवान मुसलमानांनी त्यांच्या पैशाच्या थैल्या सैल केल्या आणि पैशाच्या आधारे काही मंडळींना मुक्त करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्या चौकशी समितीवर मी असल्याचे माझ्या काही मित्रांना समजले. कोणाला केव्हा सोडायचे याबाबत समितीने पहिल्या बैठकीत निश्चित केले होते. औरंगाबादेतील स्टेट टॉकिजचे मालक खानबहादूर कलंदरखान यांचे मॅनेजर, मुलगा व पुतण्या मला भेटावयाच्या निमित्ताने माझ्या घरी आले. औपचारिक गप्पा गोष्टी झाल्यावर मॅनेजर अजीजखान यांनी त्यांच्या सोबत आणलेली कातड्याची बॅग माझ्या हातात देत मला उद्देशून सांगितले, ‘खान साहेबांना बऱ्याच काळापासून ओळखता. त्यांचा रझाकार संघटनेबरोबर इतका काही संबंध नव्हता. त्यांनी त्यांच्या उभ्या आयुष्यात कोणतेही वेडेवाकडे कृत्य केलेले नाही. तूर्त हे आपल्या सेवेत सादर केले आहे. खान साहेबांना मुक्त करणे तुम्हाला शक्य आहे’. ‘अजीजखान, मी पैशाला कधी बळी पडलो नाही आणि बळी पडणार नाही, तुम्ही मला चांगले ओळखले नाही. अशा पद्धतीने तुम्ही पुन्हा कधीही माझ्या घरी येऊ नका,’ मी त्यांना उत्तर दिले. ते सर्व गांगरून गेले. काय बोलावे त्याचे त्यांनाच समजले नाही. त्यांनी माझ्या घरातून लवकर बाहेर पडावे यासाठी मीच उभा राहिलो. ते सर्व थोडे खजिल झाल्यासारखे माझ्याशी काही न बोलता माझ्या घराबाहेर पडले. अर्थात या घटना बऱ्याच नंतरच्या आहेत.

पोलिस कारवाईनंतर लौकरच मनमाडहून आम्ही औरंगाबादी आलो. स्टेशनवर उतरून तांगा ठरविला. तांगा शहराजवळ आला. सबजीमंडी आणि त्या विभागासमोर सर्वत्र पसरलेली मुसलमानांची जुनाट थडगी, अन् त्याला लागून शाहअली बेहरी दर्गा आणि समोर सिल्लेखाना आमच्या तांग्याने ओलांडला तेव्हा तेथे एकही माणूस दिसला नाही. पैठण गेटपासून औरंगपुरा विभागात नागरिकांची थोडी वर्दळ दिसली. मी माझ्या घराजवळ आलो. तेव्हा माझ्या घराला कुलप लागलेले पाहून मला सौ. आशाताईंनी त्यांच्याच घरी नेले. पंधरा दिवस माझा मुक्काम त्यांच्याच घरी होता.

भारतीय लष्कराने औरंगाबाद शहरावर ताबा मिळविल्यानंतर ऐतिहासिक ‘पोलिस ॲक्शन’ हा शब्द हळूहळू रूढ होत गेला. १३ सप्टेंबरनंतर पंचवीस दिवसांनी श्री. गोविंदभाई औरंगाबादला आले तेव्हा

कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत औरंगाबाद स्टेशनवर केले. हैदराबाद संस्थानात नागरिक स्वातंत्र्य आणि जबाबदार राज्यपद्धतीसाठी हैदराबाद स्टेट काँग्रेसने अंगिकारलेल्या स्वातंत्र्यलढ्याची यशस्वी सांगता झाल्यानंतर श्री. गोविंदभाई श्रॉफ हे औरंगाबाद शहरात पहिल्यानेच येणार असल्याने हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या सहकार्याने भव्य आणि नेत्रदीपक मिरवणूक काढून स्वागत करण्याचे ठरविले होते.

नियोजित स्वागत आणि मिरवणुकीचा प्रारंभ राजाबाजार काँग्रेस कमिटीच्या कार्यालयापासून झाला. शहराच्या सर्व प्रमुख रस्त्यावरून मिरवणूक जात असताना अनेक ठिकाणी महिलांनी भाईंना पंचारतीने ओवाळले, कुंकूम तिलक लावले. नागरिकांनी फुलांचे हार घातले. काही उत्साही नागरिकांनी नोटांचे हारही घातले.

ही भव्य मिरवणूक सुपारी मारुतीजवळ आली असताना कर्वे गुरुजी पूजेसाठी हाती पळी पंचपात्र व पाठीवर उपरणे पांघरुन जात असल्याचे पहाताच श्री. गोविंदभाई चटकन् जीप गाडीतून उतरले व त्यांनी श्री. कर्वे गुरुजींना आदरपूर्वक लवून नमस्कार केला. तेव्हा श्री. कर्वे गुरुजींना अत्यानंदाने भडभडून आले. त्यांचा चेहरा विलक्षण गोरामोरा झाला. डोळ्यातून गंगा यमुनेच्या धारा वाहू लागल्या. श्री. कर्वे गुरुजींनी गोविंदभाईंना कवटाळून मिठी मारली अन् आशीर्वाद देताना पाठ थोपटली. ज्यांनी कोणी तो प्रसंग पाहिला, त्यांचे डोळे आनंदाने पाणावले होते. इतके भव्य हृदयस्पर्शी स्वागत आतापर्यंत कोणाचे झालेले नव्हते. अशा हृदयस्पर्शी स्वागत समारंभाच्या भव्य मिरवणुकीत जहाबाज, जागरूक, समयसूचक, जाणकर इत्यादी विशेषणांनी स्वतःला भूषविणारे नेमस्त-मवाळ आणि सरकारचीच री ओढणारे प्रतिष्ठित मात्र कुठेही दिसले नाहीत.

हैदराबाद स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष व हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ हे नागरिक स्वातंत्र्य व जबाबदार राज्यपद्धतीच्या प्राप्तीसाठी हैदराबाद संस्थानच्या जिल्ह्यांत सर्वदूर आर्थिक मदत गोळा करण्यासाठी वणवण भटकत राहिले होते. बहुसंख्य प्रजेची दुरवस्था त्यांनी सर्वत्र प्रगट केली. हैदराबाद स्टेट काँग्रेसने अंगिकारलेला लढा निव्वळ चुटकीसरशी होत्याचा नव्हता करता येऊ शकेल असे निझामी राजवटीला वाटत होते. निझामी राजवटीबरोबर सरळ सरळ झुंज देऊ नये, मिळते-जुळते घ्यावे; हैदराबाद राजवटीबरोबर लढा लढविणे सोपे काम नाही असेही सांगितले जात असे. राजकारणाचा खेळ खेळणे म्हणजे भातुकलीचा खेळ नव्हे अशाही कानपिचक्या दिल्या जात असत. जरा सबुरीने घ्या. हाच पोक्त सल्ला दिला जायचा. होमकुंड पेटविणे सोपे आहे. पेटलेल्या होमकुंडात कुणाकुणाचे बळी दिले जातील याचा विचार करायला हवा. उतावळा नवरा अन् गुडघ्याला बाशिंग असेच काहीतरी होऊन बसेल. तुम्हाला नागरिकांची, सामान्यांची, शेतकऱ्यांची, मायदेशाची, मायबोलीची काळजी वाटते, आम्हाला काहीच का वाटत नाही? असे प्रति सवाल फेकले जायचे.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या चळवळीने संस्थानी सत्तेचे काही वाकडे होणार नाही; अशाच आशयाचे भाकित राज्यकर्ते वर्तवीत असत. राज्यकर्ते राज्यकर्तेच असतात. सत्ता त्यांच्या हातात असते. सत्तेबरोबर झगडणे पोरखेळ समजू नये. आतताईपणे घिसाडघाईत अकारण भलतेच काहीतरी करून बसू नका. अशाच आशयाचे विचार राजधानीतली बरीच लब्धप्रतिष्ठित मंडळी सांगत असत. 'इस्लाम खतरेमे है' ची आरोळी

अनुक्रमणिका

हिंदुस्थानातील मुसलमानांच्या कानावर पडताच सारेचे सारे मुसलमान हैदराबाद स्टेट कॉंग्रेसला आणि संस्थानातील हिंदू प्रजेला घेरतील व त्यांची त्रेधा तिरपिट उडेल असे निझामी राज्यकर्त्यांचे अनुमान होते. पण घडले उलटेच! जनतेच्या स्वातंत्र्याचा लढा चिरडला गेला नाही, उलट तो प्रसरण पावत गेला. सत्याग्रह करावयाचे तंत्र बदलत गेले. समोरासमोर हल्ल्यावर हल्ले चढविले जाऊ लागले. भारत देश स्वतंत्र झाला. या आनंदात देशाचे नागरिक गर्क होते. आनंदोत्सव पार पाडण्यात मग्न होते. भारत देशाच्या स्वातंत्र्याचा उदो उदो करण्यात भारतीय जनता गुरफटलेली आहे, असे पाहून निझामी राजवटीच्या जात्यंध राज्यकर्त्यांनी नवा पवित्रा घ्यायचे ठरविले होते.

या नव्या धोरणाचा भाग म्हणून, "हैदराबाद संस्थानचा मुसलमान सुलतान मीर उस्मान अली खान याला पदच्युत करून, हैदराबादचे नाव बदलून 'भागानगर' नाव ठेवावयाचे घाटते आहे. मुसलमानांची सर्रास कत्तल सुरू आहे. "इस्लाम आणि इस्लाम धर्मियांना वाचवा" अशा आशयाचे वृत्त अत्यंत गुप्तता राखून जगाच्या कानाकोपऱ्यात पाठविण्यात आले. या नव्या चालीचा जनक होता सैय्यद कासिम रझवी. ही नवी चाल देखील काही उपयोगी ठरली नाही. हैदराबाद मुक्तिसंग्रामाची यशस्वी सांगता झाल्यावर आणि ऐतिहासिक पोलिस ॲक्शन हा शब्द जनमानसात रुजू लागल्यावर अखिल हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचे प्रणेते आणि अध्यक्ष पूज्य स्वामी रामानंद तीर्थ पहिल्यानेच औरंगाबाद शहरात आले असता औरंगाबाद जिल्हा स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आणि सर्व धर्मीय नागरिकांनी त्यांचे भव्य आणि नेत्रदीपक स्वागत केले. औरंगाबाद शहर आणि जिल्हा स्टेट कॉंग्रेस कार्यालयापासून त्यांच्या अविस्मरणीय मिरवणुकीचा प्रारंभ झाला. त्यांची ती मिरवणूक शहराच्या सर्व प्रमुख रस्त्यांवरून जात असताना अनेक ठिकाणी महिलांनी त्याना कुंकूम तिलक लावून आदरभावाने ओवाळले आणि पुष्पहार अर्पण केले. काही काही नागरिकांनी नोटांचे हार तर काहींनी पुष्पासमवेत नोटा लावलेले हार अर्पण केले. सर्व धर्मीय नागरिकांनी त्यांच्या धर्माचा, समाजाचा पोषाख परिधान करून आनंदाने सहर्ष स्वागत करताना स्टेट कॉंग्रेसला भेट म्हणून पुष्पात गुंडाळून निधी अर्पण केला. ज्या उघड्या जीपमधून त्यांची मिरवणूक काढली ती पुष्पमालांनी खचाखच भरली होती.

'महात्मा गांधी झिंदाबाद', 'स्वामी रामानंद तीर्थ झिंदाबाद' च्या घोषणांनी शहरातले वातावरण धुंद झालेले होते. तब्बल तीन चार तास मिरवणूक शहरातून जात होती. हजारो नागरिक, महिला सडकेच्या दोन्ही बाजूने उभे राहून मिरवणुकीचे ते दृश्य पहात होते. टाळ्यांच्या गजरांत स्वामीजींचे स्वागत करीत होते. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या समवेत श्री. गोविंदभाई आणि श्री. माणिकचंद पहाडे उघड्या जीपमध्ये होते.

स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद नागरिकांच्या चेहऱ्यावर झळकत होता. स्वातंत्र्याच्या लढ्याच्या कर्णधारांना डोळ्यांनी जिवंत पाहून सर्वसाधारण स्त्री-पुरुष भारावून गेल्यासारखे दिसत होते. शहरातील बहुतेक नागरिक स्वातंत्र्य प्राप्तीच्या मिरवणुकीचा सोहळा बघण्यासाठी ठिकठिकाणी ताटकळत उभे होते. त्या आबालवृद्ध नागरिकांमध्ये उत्साह ओसंडून वाहात होता. हैदराबाद संस्थानावर निझामाच्या झेंड्याऐवजी स्वतंत्र भारताचा तिरंगा डौलाने फडकत होता. मिलिटरी प्रशासनाने शासनाचा कारभार आपल्या ताब्यात घेतला होता.

रझाकारांचा सैतानी कारभार संपुष्टात आला होता. शेकडो वर्षांच्या गुलामगिरीच्या जोखडातून हैदराबाद संस्थान आणि संस्थानाची प्रजा स्वतंत्र बनली होती. शेकडो लोकांच्या अनमोल बलिदानाने

अनुक्रमणिका

मिळविलेले स्वातंत्र्य कामचलाऊ, नकली आणि बेगडी स्वातंत्र्य नव्हते. महत्प्रयासाने, प्राणपणाने मिळविलेले स्वातंत्र्य कोणतीही पाशवी शक्ती कधीही हिरावून घेऊ शकणार नाही अशी बालंबाल खात्री होती. एक महिन्यापूर्वी औरंगाबाद शहरात सर्वत्र स्मशान शांतता नांदत होती. नैराश्याचे वारे वाहात होते. रझाकारांचा, गावगुंडांचा शहराच्या कानाकोपऱ्यापर्यंत धांगडधिंगा, पाशवी नंगानाच सुरू होता. लोक अत्यंत हवालदिल बनलेले होते. सुरक्षितता डोळ्यांना दिसत नव्हती. जिवाच्या भीतीने अनेकजण संस्थानाच्या हद्दीबाहेर निसटले होते. मायबाप सरकारचेच गीत गाणारे, सरकारबरोबर मिळतेजुळते घेणारे, त्याचेच अनुकरण केले जावे असे सदासर्वदा सांगणारे, अशांततेचा सर्वत्र भडका उडालेला असताना संस्थानात, औरंगाबाद जिल्ह्यात, सर्वत्र शांतता नांदत असल्याचे औरंगाबाद रेडिओद्वारे सांगणारे असे जे लोक होते त्यांना मात्र रझाकारांचा वा गुंडांचा त्रास नव्हता; कारण तशी जाणीवपूर्वक योजनाच होती. शासनकर्त्यांचे हितचिंतक गुलाम बनणाऱ्या महाभागांच्या अंगाला जराही झळ लागली नाही हे जरी खरे असले तरी त्यांच्या शेजाऱ्यांच्या घराची राख रांगोळी झालेली त्यांना दिसली नसेल काय? प्रत्यक्ष दिसले नसेल तरी या गोष्टी त्यांच्या कानावर तर गेल्या असतील ना? जे इतरावर गुदरले तेच त्यांच्यावर बेतले असते तर!...

संस्थानी सत्तेने भयंकर स्फोटक अस्त्रांचा लांब पल्ल्यावर मारा करू शकणाऱ्या स्वयंचलित अमेरिकन बनावटीच्या तोफा खास विमानाद्वारे मागविल्या. त्या तोफांच्या सतत माऱ्याने हैदराबाद संस्थानच्या सरहद्दीला लागून असलेला टापू जमीनदोस्त करून भारत सरकारच्या लष्कराला 'सळो कीपळो' करावयाचे स्वप्न अनेकजण पाहात होते. तसेच त्याच सुमारास पाकिस्तान आणि इतर इस्लामी राजवटीच्या देशांनी, हैदराबाद संस्थानच्या मुसलमानांच्या संरक्षणासाठी चोहोकडून तुटून पडावे अशी राज्यकर्त्यांची व रझाकार प्रमुखांची मनोमन इच्छा होती. ठरल्याप्रमाणे खास विमानातून लांब पल्ल्याच्या तोफा आणि भयंकर स्फोटक दारूगोळाही आला. मात्र स्वयंचलित शस्त्रे चालवावयाचे शिक्षण देणारा येण्यापूर्वीच भारतीय लष्कराचे लेफ्ट. जनरल जे. एन. चौधरी यांनी हैदराबाद संस्थानच्या राजधानीच्या हैदराबाद शहराला चोहोबाजूने घेराव घालून शहरावर ताबा मिळविला आणि निझामाच्या झेंड्याच्या जागी भारत सरकारचा झेंडा फडकविला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारताचे सर्व पुढारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि सर्वसामान्य नागरिक स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद उपभोगीत होते. जनतेच्या आनंदाला, उत्साहाला, भरती आलेली होती.

हैदराबाद संस्थान हिंदुस्थानात असूनही हैदराबाद संस्थानची प्रजा १५ ऑगस्टच्या त्या भारतीय स्वातंत्र्याच्या असामान्य आनंदात सहभागी होऊ शकली नाही. शेकडो सत्याग्रही कार्यकर्ते कारागृहात डांबले होते. तिरंगी राष्ट्रध्वजाऐवजी हैदराबाद संस्थानात जिल्ह्याच्या सर्वच्या सर्व शासकीय इमारतींवर निझामाचा पूर्वापार पिवळा ध्वज फडकत होता. निझामाने भारतीय स्वातंत्र्याबाबत नाममात्रही आस्था तर दाखविली नाहीच उलट आपण सार्वभौम असल्याचा दंडोरा त्याने पिटवला. संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्याचा कर्दनकाळ बनू पाहणाऱ्या, ठरू पाहणाऱ्या निझामाच्या संस्थानातील प्रजा पाण्यातून बाहेर काढलेल्या माशासारखी तडफडत होती. आंदोलन चिरडून टाकण्यासाठी, जोरजुलूम, पाशवी अत्याचारांचा कल्लोळ उसळला. संस्थानात सर्वत्र भयावह अवस्था होती. तरी त्याला न जुमानता अनेक ठिकाणी तिरंगा ध्वज फडकावून सत्याग्रह करण्यात आले.

अनुक्रमणिका

निझामाच्या कृपाछत्राखाली जगणाऱ्या नव्वद टक्के मुसलमान मंडळींनी हिंदू लोकांचा गद्दार, निमकहराम, काफीर म्हणून भरपूर छळ केला. मनमुराद धांगडधिंगा केला. हातात नंग्या तलवारी घेऊन नंगानाच केला. जात्यंधतेला उधाण आले. जात्यंधतेच्या कैफाने बेभान बनलेल्या निझामाच्या शासकीय नोकरांनी माणुसकीला शोभणार नाहीत असे प्रकार करून सर्वसामान्य नागरिकांना त्रस्त करून सोडले. संस्थानाच्या कानाकोपऱ्यात आणि भारतात जातीय दंगली घडवून आणून जनावरांच्या कत्तलखान्यासारखा सर्रास माणसांचाही कत्तलखाना करावयाचे षड्यंत्र रचले. इतके सारे घडत असताना निझामी राजवटीबरोबर मिळतेजुळते घेण्याचाच हेका धरणाऱ्यांना मात्र बदलत्या काळाची पावले ओळखता आली नाहीत. स्वातंत्र्याच्या यज्ञाच्या ज्वाला सतत तेवत आणि भडकत ठेवल्या गेल्या त्या विद्यार्थ्यांच्या आणि गावकऱ्यांच्या अविश्रांत परिश्रमाने अन् निःस्वार्थी त्यागाने; तरी सरकारचे गीत गाणारे, सरकारजमा झालेल्या जमा होऊ घातलेल्या मंडळींना, लोकमान्यांचे खरे वारस अनुयायी असल्याचा कांगावा करणाऱ्या नेमस्त आणि मवाळांना 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' याचा बोध झाला नाही. लोकमान्यांच्या पुण्यतिथीचे स्मरण झाले नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधींची 'चले जाव' ची गर्जना मँचेस्टरपर्यंत शिरकाव करू शकली, मात्र हैदराबाद संस्थानच्या तथाकथित धुरीणांच्या कानात प्रवेश करू शकली नाही. खादीची साधी पांढरी शुभ्र टोपी परिधान करावयाइतके मनोधैर्य त्या महाभागांना दाखविता आले नाही. वाटेल त्या परिस्थितीत त्या महाभागांना हिज हॉयनेस, हिज मॅजेस्टी निझामाला जराही नाराज करावयाचे नव्हते. तरी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाने विराट स्वरूप धारण केले होते.

या स्वातंत्र्य संग्रामात औरंगाबाद जिल्ह्याचा, शहराचा सिंहाचा वाटा होता. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाची यशस्वी सांगता झाल्यावर हैदराबाद संस्थानचा साराचा सारा परिसर महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू, हैदराबाद स्टेट कॉंग्रेस आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयजयकाराने निनादून गेला. स्वामी रामानंद तीर्थ यांचे मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटक विभागात जल्लोषाने स्वागत केले गेले. हजारोंच्या संख्येने आबालवृद्ध स्त्री-पुरुष मध्यरात्र उलटून जात होती तरी स्वागतासाठी मुद्दाम तयार केलेल्या सुशोभित सभामंडपात स्वामीजींच्या दर्शनासाठी तासन्तास बसून राहायचे. जागोजागी स्वामीजींची भव्य मिरवणूक काढली जात असे. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांची भव्य मिरवणूक, पुष्पहारांचा ढीग, जनतेत ओसंडून आलेला उत्साह, हजारोंच्या संख्येत आबालवृद्ध स्त्री-पुरुषांची उपस्थिती याबाबतच्या बातम्या ऐकून निझामी राजवटीच्या अधिकाऱ्यांचा रझाकार बनलेल्या, बनवले गेलेल्या कट्टर मुसलमानांचा, जात्यंध मुसलमानांचा आणि हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष सहभागी न होता लढा लढविणाऱ्या हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या कागदोपत्री सभासदांचा जळफळाट होत होता.

औरंगाबाद जिल्ह्यात तर कितीतरी वेळा शस्त्रधारी पोलिसांना प्राण वाचविण्यासाठी हातातली शस्त्रे सोडून पळून जावे लागले. घडत गेलेल्या घडामोडीमुळे कार्यकर्त्यांचे मनोधैर्य उफाळून आले; तर राज्यकर्त्यांचा आणि रझाकारांच्या सरदारांचा जळफळाट होत गेला.

अनुक्रमणिका

## हिज मॅजेस्टीचे स्वप्न विरून गेले

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाची यशस्वी सांगता झाली. हिज हायनेस ऐवजी हिज मॅजेस्टी निझाम म्हणून संबोधिले जावे यासाठी ज्याने अनेक आतल्या खेळी खेळल्या; जनतेच्याच अमाप पैशाची उधळपट्टी केली; त्याच निझामाला, हैदराबादचा राज्यपाल म्हणून भारताचे गृहमंत्री यांच्या स्वागतासाठी विमानतळावर तिष्ठत उभे राहावे लागले. सर्वसाधारण नागरिकासारखेच नागरिकत्व पत्करावे लागले.

भारत देशाच्या संपूर्ण स्वातंत्र्याला आणि सार्वभौमत्वाला काश्मीर आणि हैदराबाद ही दोन संस्थाने अडसर बनू पहात होती. दोन्ही अडसर बाजूला सारले गेले. भारताचे स्वातंत्र्याचे स्वप्न परिपूर्ण स्वरूपात प्रत्यक्षात उतरविण्याच्या दृष्टीने हैदराबादच्या मुक्ति संग्रामाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या संग्रामात मला शक्त्यनुसार सहभागी होता आले याचा मला अभिमान वाटतो. आपले जीवन सार्थकी लागल्याचे समाधान वाटते. या लढ्यातील मी सांगितलेल्या या आठवणी एका महत्त्वाच्या ऐतिहासिक पर्वाचे ओझरते का होईना, दर्शन घडवितील असा विश्वास वाटतो.

★★★★★

अनुक्रमणिका